म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. 3953

तत्वज्ञ सावरकर

(निबंध)

संपा. य. दि. फडके

REFBK-0025185

JAN 1994

तत्त्वज्ञ सावरकर

निवडक विचार

संपादक

प्रा. डॉ. य. दि. फडके



REFBK-0025185



आणि

मराठी तत्त्वज्ञान – महाकोश मंडळ

पुणे ४

प्रकाशक :
अ. अं. कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर, पुणे ४११ ०३०
आणि
ग. ना. जोशी
संचालक
मराठी तत्त्वज्ञान – महाकोश मंडळ
फर्ग्युसन महाविद्यालय आवार, पुणे ४११ ००४

मुद्रक :
श्री. रवीन्द्र सातपुते
मॉडर्न प्रिंटिंग प्रेस
११७० । १३ ब, शिवाजीनगर, रेव्हेन्यू कॉलनी,
पुणे ४११ ००५

मुखपृष्ठ :
अनंत सालकर

प्रकाशन क्रमांक : ९९७

© सर्व हक्क सुरक्षित

प्रथमावृत्ती : १९८६

किंमत : तीस रुपये

निवेदन

'मराठी तत्त्वज्ञान–महाकोश मंडळा' च्या मराठी 'तत्त्वज्ञान–ग्रंथमाला प्रकल्पा'त 'तत्त्वज्ञ सावरकर' हे अकरावे ग्रंथपुष्प वाचकांच्या हाती देण्यास आम्हाला अत्यंत आनंद वाटतो. मतम मंडळाचे विविध विषयांवर जे ग्रंथ नियोजित केलेले आहेत त्या प्रत्येकात नावीन्य आहे. विसाव्या शतकातील तत्त्वज्ञानावर आमच्या मंडळाने आत्तापर्यंत बर्ट्रन्ड रसेल, रविंद्रनाथ टागोर, आनंद कुमारस्वामी, मानवेन्द्रनाथ रॉय या थोर विचारवंतांचे जीवन व तत्त्वज्ञान यांवर ग्रंथ प्रसिद्ध केलेले आहेत. तसाच 'तत्त्वज्ञ सावरकर' हा एक नावीन्यपूर्ण ग्रंथ आहे.

भारताला इंग्रजांच्या पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी ज्या थोर देशभक्तांनी व वीरांनी आपले सर्वस्व पणाला लावून जन्मभर हालअपेष्टा सहन करून महान कर्तृत्व केले त्यात 'स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर' यांचे स्थान फारच उच्च आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर हे भारताचे एक महान सुपुत्र असून भारताला त्यांनी गौरवाचे स्थान प्राप्त करून दिलेले आहे. त्यांची धडाडी, निर्भयता, उत्कट देशभक्ती व स्वतंत्र प्रज्ञा यांना इतिहासात तोड नाही. धावत्या बोटीतून समुद्रात उडी घेऊन इंग्रजांच्या कैदेतून सुटका होण्यासाठी त्यांनी केलेले धाडस केवळ अभूतपूर्व होते. अंदमानात त्यांना काळचा पाण्याच्या शिक्षेत जे हाल व कष्ट भोगावे लागले त्या तर केवळ नरक यातनाच होत्या. या शूर वीराने सर्व हाल भोगले पण शरणांगती पत्करली नाही, कारण त्यांचे भारत व त्याचे स्वातंत्र्य यावर असलेले अनन्यसाधारण व उत्कट प्रेम. सावरकरांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, अंदमानात लिहिण्यासाठी कागद व टाक मिळत नसताही दिवसभर पशुवत् काम करीत राहूनही सतत विचार करीत राहून वाङ्मयाची निर्मिती केली. तशाही परिस्थितीत भिंतीवर रेखाटून त्यांनी काव्याच्या ओळी रचल्या व त्या दररोज पाठ करून स्मरणात ठेवल्या. त्यांचे संपूर्ण जीवन हे त्याग, परिश्रम, कष्ट, चिकाटी व धगधगीत राष्ट्रनिष्ठा यांचे मूर्तिमंत उदाहरण आहे. त्यानंतर त्यांची सुटका झाल्यावरही रत्नागिरीत नजरबंदीत रहावे लागले, पण सावरकरांनी आपल्या पाठीचा कणा शेवटपर्यंत ताठ ठेवला. केवळ लोकांना व उथळ राजकीय पक्षांना खूष करण्यासाठी त्यांनी आपल्या विचारांना मुरड घालण्यास नकार दिला. त्यांनी आपले बौद्धिक स्वातंत्र्य अबाधित ठेवले व न पटणाऱ्या पण तत्कालीन यश मिळून देणाऱ्या अशा कोणत्याही विचारांशी तत्त्वांशी व धोरणाशी तडजोड करण्यास साफ नकार दिला. सावरकर शूर, साहसी, निर्भय व त्यागी लढवय्ये होते. सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने भारताल

स्वतंत्र करावे असे त्यांचे मत होते व त्यासाठी त्यांनी अभिनव भारत संस्था उभारून बरेच प्रयत्नही केले. पण त्यांच्या त्या प्रयत्नांना यश मिळाले नाही म्हणून त्यांनी आपले मत सोडले नाही. स्वातंत्र्याच्या आधी व नंतरही त्यांनी सैनिकीकरणाचा मंत्र पुनः पुनः आग्रहाने उच्चारला व साहित्यिकांनासुद्धा 'लेखण्या टाकून बंदुकी घेण्याचा' संदेश त्यांनी दिला हे सर्वांना माहीत आहे. शेवटी बळाचीच उपासना महत्त्वाची ठरते असे त्यांचे ठाम मत होते व ते त्यांनी इतिहासातील अनेक उदाहरणे देऊन सिद्ध करण्यासाठी प्रयत्न केले, आणि आजही बळाचे महत्त्व जागतिक राजकारणात किती आहे हे आपणास प्रत्यक्ष पाहावयास मिळतेच आहे, सावरकरांनी गांधीजींच्या अहिंसा तत्त्वाला तीव्र विरोध केला. पण त्यांचे मत भारतीय राजकारणात प्रभावी ठरले नाही हे मात्र खरे.

सावरकर हे उत्कट व पुरुषार्थी जीवनाचे प्रेमी व पुरस्कर्ते आहेत. त्यांना मिळमिळितपणा, भीती, दास्यमनोवृत्ती, नेभळटपणा यांची कमालीची चीड वाटते. मानवांनी निर्भयपणे, धीराने, चिकाटीने व तेजस्वीपणाने पुरुषार्थी जीवन जगावयास पाहिजे असे त्यांनी सतत आग्रहाने प्रतिपादिले. पण त्याचबरोबर आपल्या मताला त्यांनी बौद्धिक विचारांचा भक्कम आधार दिला. केवळ भावनांना आवाहन करून लोकांची दिशाभूल करणे त्यांना पसंत नव्हते. केवळ भारताच्याच नाही तर जगाच्या इतिहासाचे त्यांनी व्यापक व सूक्ष्म अध्ययन करून तो चिकित्सक रीतीने समजावून घेतला व आपल्या मताची मांडणी व समर्थन करताना त्यांनी समग्र जगाच्या इतिहासातून पर्याप्त पुरावे उद्धृत करून आपले विचार बिनतोड युक्तिवादांनी मांडले. ते थोर विचारवत आहेत याविषयी दुमत नाही. ते मूलगामी, चिकित्सक तर्कशुद्ध व पद्धतशीरपणे विचार करणारे असल्याने त्यांचे विचार एक प्रकारचे तत्त्वचिंतन आहे व अशा अर्थाने ते 'तत्त्वज्ञ' आहेत. तत्त्वज्ञ या शब्दाचा काटेकोर अर्थ घेतल्यास ते तत्त्वज्ञ नाहीत हे स्पष्टच आहे. तरीही श्री अरविंद, महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर, विवेकानंद, मानवेन्द्रनाथ रॉय यांसारख्या मौलिक विचारवंतांच्या विचारांना ज्या अर्थाने तत्त्वज्ञान म्हटले जाते त्या अर्थाने सावरकरांच्या विचारांनाहि तत्त्वज्ञानात्मक स्वरूप व महत्त्व आहे. त्यांची वैचारिक देणगी मोलाची आहे. आपल्या विचारांची मांडणी त्यांनी तर्कशुद्ध युक्तिवादांचा भरपूर उपयोग करून केलेली आहे व त्यांच्या विचारांना वास्तव पुराव्यांचाही भरपूर आधार आहे. त्यांनी आपले विचार कोणाचीही भीड व मुरवत न बाळगता अत्यंत परखडपणे व कोणालाही न भीता स्पष्ट शब्दात मांडले आहेत. ज्या हिंदुधर्माचे ते महान प्रेमी व उद्गाते आहेत त्याच्यातील अनिष्ट विचार, प्रथा व रूढी यांच्यावरही त्यांनी कडाडून टीका केलेली आहे. त्यांनी आपल्या बुद्धीप्रमाणे नि.पक्षपाती राहून निर्विकार मनाने जो विचार आपल्याला पटला तो निर्भीडपणाने समाजापुढे मांडला व आत्मप्रामाण्याला जपून जे जे आपल्या बुद्धीला

पटले नाही त्याच्याशी तडजोड करण्यास सदैव नकार दिला, आणि एकटे पडले तरी त्यांनी कोणत्याही विचारापुढे, पक्षापुढे, संघटनेपुढे, धोरणापुढे शरणांगती पत्करली नाही. अशा अर्थाने स्वा. सावरकर हे एक महान द्रष्टे प्रज्ञावंत व मौलिक चिंतन करणारे तत्त्वज्ञ आहेत असे म्हणावयास हरकत नाही. सावरकरांचे व्यक्तिमत्त्व थोर व धिरोदात्त होते. पारतंत्र्यातून भारताला मुक्त करून नव्या जगात एक बलवान तेजस्वी, कर्तृत्वसंपन्न व अग्रेसर राष्ट्र म्हणून नवा भारत उभा राहावा यासाठी त्यांनी जे मूलगामी व बुद्धिनिष्ठ विचार मांडले त्यांना नवभारताच्या उभारणीत महत्त्वाचे स्थान आहे त्यांचे हे मौलिक व बुद्धिनिष्ठ विचार समाजापुढे पाहिजे तितक्या स्पष्टपणे अद्याप आलेले नाहीत म्हणून मतम मंडळाने सावरकरांच्या स्वतःच्या शब्दात त्यांचे विचार संकलित करून हे पुस्तक विशेषत: सध्याच्या काळातील तरुण पिढीपुढे आणले आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकरांची जन्मशताब्दी आपल्या राष्ट्राने नुकतीच साजरी केली. या महत्त्वाच्या प्रसंगी त्यांचा गौरव करण्यासाठी व त्यांना आदरांजली वाहण्यासाठी मतम मंडळाने 'तत्त्वज्ञ सावरकर' हे पुस्तक तयार करून घ्यावयाचे ठरविले. ते आता प्रसिद्ध करून वाचकांसमोर आम्ही आणत आहोत.

या पुस्तकाची रचना करणारे संपादक आधुनिक भारतीय विचारांचे अभ्यासक व सुप्रसिद्ध लेखक प्रा. डॉ. य. दि. फडके हे आहेत. त्यांनी सावरकरांच्या मुळ लेखनातून तत्त्वज्ञानाच्या विचारांच्या दृष्टीने महत्त्वाचे समर्पक उतारे व लेख यांची निवड करून हे पुस्तक तयार केलेले आहे. मतम मंडळाच्या विनंतीला मान देऊन व आढेवेढे न घेता इतर कामाचा खूप व्याप मागे लागलेला असूनही त्यांनी आमच्या मंडळासाठी हे छोटेसे पण महत्त्वपूर्ण पुस्तक संपादित करून दिले याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. त्यांच्या या सौजन्यपूर्ण व मार्मिक कामाबद्दल मतम मंडळ त्यांचे फार आभारी आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या सर्व वाङ्मयाचे हक्क ज्यांच्या स्वाधीन आहेत ते श्रीं. बाळाराव सावरकर यांची सावरकराचे उतारे प्रसिद्ध करण्यासाठी परवानगी आवश्यक होती. पण ती मतम मंडळास मिळण्यात काही अडचणी आल्या. या पुस्तकाचे संपादन प्रा. डॉ. य. दि. फडके हे करणार असल्याने व ते प्रस्तावना लिहिणार असल्याने श्री. बाळाराव सावरकर यांनी सावरकरांच्या विचारांवर किंवा दृष्टिकोनावर त्यांचे मते अन्याय होऊ नये म्हणून डॉ. फडके यांच्या प्रस्तावनेबरोबरच आपलेही तत्संबंधी विचार प्रसिद्ध करण्याचा आग्रह धरला; व हा मुद्दा बराच ताणला गेला. ग्रंथसंपादनाच्या रूढ पद्धतीनुसार संपादकाचा अधिकार अंतिम असतो. पण डॉ. फडके यांनी विचारांती श्री. बाळाराव सावरकरांचे आपल्या प्रस्तावनेची दुसरी बाजू मांडणारे म्हणणे या पुस्तकातच पण शेवटी परिशिष्टात प्रसिद्ध करण्यास उदार मनाने संमती दिली. मात्र श्री. बाळाराव

सावरकरांनी व्यक्त केलेल्या मतावर शेवटची प्रतिक्रिया संपादकाची असावी हेही त्यांचे म्हणणे श्री. बाळाराव सावरकरांनी मान्य करून त्या परिशिष्टात डॉ. फडके यांचीही प्रतिक्रिया प्रसिद्ध करण्यास संमती दिली. याप्रमाणे या पुस्तकाच्या शेवटच्या भागात व परिशिष्टात श्री. बाळाराव सावरकरांचे म्हणणे व त्यावरील डॉ. फडके यांचे प्रत्युत्तर ही दोन्ही छापली आहेत; ही गोष्ट थोडीशी रूढ प्रथेशी विसंगत वाटण्यासारखी असली तर मतम मंडळाने आपद्धर्म तिचा स्वीकार केलेला आहे. या पुस्तकात नावीन्य व वेगळेपणा आहे असे श्री. बाळाराव सावरकर यांनाही वाटते. त्यांनी वरील अटीवर मतम मंडळास स्वा. सावरकरांच्या लिखाणातील लेख व उतारे वापरण्यास संमती दिली याबद्दल मतम मंडळ त्यांचे ऋणी आहे.

तसेच हे पुस्तक प्रसिद्ध करण्यासाठी पुण्याच्या 'कॉंटिनेन्टल' प्रकाशनाचे सौजन्यशील उदारधी श्री. अनंतराव कुलकर्णी यांनी मतम मंडळास आर्थिक व इतर सर्व सहकार्य देण्याचे मान्य करून ते प्रकाशात आणण्यास मोलाची मदत केली आहे; त्याबद्दल मतम मंडळ कॉन्टिनेन्टल प्रकाशन व मुख्यतः श्री. अनंतराव कुलकर्णी यांचे फार आभारी आहे.

या पुस्तकाचे मुद्रण करण्याची जबाबदारी पुण्याच्या मॉर्डन प्रिंटिंग प्रेसचे श्री. रवींद्र सातपुते यांनी स्वीकारली व अत्यत अल्प काळात हे पुस्तक छापण्याचे अवघड काम यशस्वीरीत्या करून दिले याबद्दल मतम मंडळ त्यांचे आभारी आहे. या पुस्तकात आम्ही सावरकरांच्या स्वतःच्याच भाषेचा उपयोग केलेला असल्याने त्यांचे मुळातील शुद्धलेखनही तसेच ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण काही ठिकाणी अनुस्वार व ह्रस्व – दीर्घ यांच्या बाबतीत नव्या शुद्धलेखनाचाही उपयोग केला गेला आहे. त्यामुळे सावरकरांच्या मूळ लेखांच्या शुद्धलेखनात काही ठिकाणी फरक असलेला आढळून येण्याची शक्यता आहे. पण वर नमूद केलेल्या अडचणीमुळे असे फरक झाले असल्यास आणि शुद्धलेखनाच्या जुन्या नियमाचे काटेकोरपणे पालन झाले नसल्यास त्याबद्दल मी दिलगीर आहे.

शेवटी हे पुस्तक ज्या नव्या तरुणांसाठी तयार केले आहे त्यांना यातील विचार उद्बोधक व प्रेरक ठरोत व या पुस्तकाच्या वाचनाने स्वातंत्र्यवीरांच्या समग्र वाङ्मयाचा अभ्यास करण्याची प्रेरणा त्यांना मिळो अशी इच्छा व्यक्त करतो. असे झाल्यास हे पुस्तक सार्थकी लागेल.

ग. ना. जोशी
संचालक, मतम मंडळ

अनुक्रमणिका

मतम मंडळाचे निवेदन — पाच ते आठ

प्रस्तावना — १-२१

विभाग पहिला : — २२-४८

१. स्वातंत्र्य म्हणजे काय ? — २४-२८
(उतारा : समग्र सावरकर वाङमय : खंड १ : पृ २४५-२५०)

२. आयुष्य म्हणजे काथ्याकूट — २८-२९
(उतारा : स. सा. वा. खंड १ : माझी जन्मठेप : पृ. २७२)

३. प्रतिकूल तेच बहुधा घडेल — २९
(उतारा : स. सा. वा. खंड १ : माझी जन्मठेप : पृ. २७३-२७४)

४. माणूस आणि निसर्ग — २९-३१
(उतारा : स. सा. वा. खंड १ : माझी जन्मठेप : पृ. ३१०-३११)

५. प्रसंगी आत्मघात हे आत्मकर्तव्यच ठरते — ३१
(उतारा : स. सा. वा. खंड १ : माझी जन्मठेप पृ. ३७३)

६. आत्महत्येचे आकर्षण — ३१-३२
(उतारा : स. सा. वा. खंड १ : माझी जन्मठेप : पृ. ३७४-३७५)

७. मी काय काय वाचले — ३३-३६
(उतारा : स. सा. वा. खंड १ : माझी जन्मठेप : पृ. ४६५-४६८)

८. स्वतंत्र जीवन ? — ३६-३९
(उतारा : स. सा. वा. खंड १ : माझी जन्मठेप : पृ. ५९३-५९६)

९. देश स्वतंत्र झाल्यानंतर वाटलेली कृतार्थता — ३९-४१
(उतारा : स. सा. वा. खंड ८ : पृ. ४३१-४३२)

१०. स्वातंत्र्य संपादनाचे श्रेय हे सामुदायिक श्रेय आहे — ४१-४३
(उतारा : स. सा. वा खंड ८ : पृ. ४३३-४३५)

११. स्वातंत्र्याचा सगळ्यात मोठा शत्रू अराजक होय — ४३-४७
(उतारा : स. सा. वा. खंड ८ : पृ. ४८३-४८७)

१२. आत्महत्या आणि आत्मार्पण — ४७-४८
(उतारा : स. सा. वा. खंड ८ : पृ ५२३-५२९)

दहा ४९–७६

विभाग दुसरा : ५१–५८

१. मनुष्याचा देव आणि विश्वाचा देव ५१–५८
(लेख : सावरकर साहित्य : भाग १ : पृ. १६–२७)

२ रहस्यकार आणि उपयुक्ततावाद ५९–६५
(लेख : स्फुटलेख : पृ. २१६–२२२)

३. अत्याचार शब्दाचा अर्थ ६५–७१
(लेख : स. सा वा खंड ३ : पृ. १२६–१३२)

४. खड्गा तुझा विजय असो ७१–७६
(उतारा : स. सा. वा. खंड ३ : पृ. ६०–६५)

विभाग तिसरा : ७७–९३

१. खरा सनातन धर्म कोणता ? ७८–८६
(उतारा : स. सा. वा. खंड ३ : पृ. ३०९–३१६)

२. धर्मग्रथांचा ऐतिहासिक दृष्टीने अभ्यास करावा ८६–९३
(उतारा : स. सा. वा. खंड ४ : पृ. २५५–२५८ आणि पृ. २९२–२९५)

विभाग चौथा : ९४–११३

१. हिंदुत्वाची व्याख्या ९५–१०५
(लेख : स. सा. वा. खंड ३ : पृ. १–१३)

२. सात स्वदेशी बेडचा १०६–११३
(लेख : स. सा. वा. खंड ३ : पृष्ठ ४९३–५००)

विभाग पाचवा : ११४–१४०

१. जातिभेद नको, हिंदुत्व हवे ११६–११९
(पत्र : स सा. वा. खंड ३ : पृ. ६४१–६४४)

२. धर्मांतर १२०–१२४
(उतारा : स. सा. वा. खंड ३ : पृ. ५७१–५७४)

३. डॉ. आंबेडकर आणि बौद्ध धर्म १२५–१३०
(लेख : स. सा. वा. खंड ३ : पृ. ६८०–६८४)

४. बौद्धधर्माचे स्वरूप १३१–१४०
(लेख : स. सा. वा. खंड ३ : पृष्ठ ६८४–६९३)

विभाग सहावा : १४१–१५२

१. स्वधर्म नि स्वराज्य १४२–१४४
(उतारा : स. सा. वा. खंड ८ : पृ. २५–२७)

२. १८५७ च्या क्रांतीची प्रधान कारणे १४५–१४६
(उतारा : स. सा. वा खंड ८ : पृ ३०–३२)

३. १८५७ मधील अपयशाची कारणे १४७–१४९
(उतारा : स. सा. वा. खंड ८ : पृ. ४२१–४२५)

४. इतिहासातील सोनेरी पान कोणते ? १५०–१५२
(उतारा : स. सा. वा. खंड ४ : पृ ५८३–५८६)

विभाग सातवा : १५३–१७५

१. यंत्र हे शाप की वरदान ? १५४–१६५
(लेख : स. सा. वा. खंड ३ : पृ. ३८०–३९१)

२. यंत्राने का बेकारी वाढते ? १६५–१७५
(लेख : स. सा. वा खंड ३ : पृ. ३९१–४०१)

विभाग आठवा : १७६–१८४

१. साहित्याचे ध्येय काय असावे ? १७७–१८४
(उतारा : स. सा. वा. खंड ४ : पृ ४८१–४८८)

परिशिष्ट श्री. बाळाराव सावरकर १८५–१९३

डॉ. य. दि. फडके १९५–१९६

शुद्धिपत्र १९७–१९९



प्रस्तावना

एखाद्या अद्‌भुत कथेसारखे आयुष्य जगलेल्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांची चरित्रे तसेच त्यांचे काव्य, नाटके, निबंध, इतिहासग्रंथ अनेकांनी वाचलेले असतात. सावरकरांच्या बोलण्या-लिहिण्यामागे आणि कृतीमागे एक निश्चित तात्त्विक दृष्टिकोण होता याची मात्र अनेकांना पुरेशी कल्पना नसते. इतिहास घडविणारे सर्व राजकीय नेते हे तत्त्वचिंतक असतातच असे नाही. छत्रपती शिवाजी महाराज, नेपोलियन बोनापार्ट, बिस्मार्क, सरदार वल्लभभाई पटेल वगैरेंनी आयुष्यभर केवळ कृतीशील राजकारण केले. याउलट लेनिन, माओ झे डाँग, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, मानवेन्द्रनाथ रॉय वगैरे राजकीय नेत्याप्रमाणेच स्वातंत्र्यवीर सावरकरांनीही आपल्या राजकीय कृतीमागचे तात्त्विक अधिष्ठान वेळोवेळी विशद केले. मात्र हे सारे नेते फक्त तत्त्वचिंतनात रममाण होऊन आपल्या चिंतनाचे फलित ग्रंथरूपाने मागे ठेवणारे कांट-हेगेल यांच्यासारखे तत्त्ववेत्ते नव्हते. या कृतिवीरांनी आपल्या तत्त्वज्ञानाची पद्धशीर मांडणी करण्याच्या कार्यक्रमास कधीच अग्रक्रम दिला नाही. सावरकरांनीही निखळ तत्त्वचिंतनात्मक असे लेखन फारच थोडे केले असले तरी आपल्या चिंतनशील मनाला पडलेले प्रश्न त्यांनी प्रसंगपरत्वे मांडले, आणि त्यांपैकी काहींची आपल्याला पटलेली उत्तरे कधी कधी सांगितली तीही अनेकदा आपल्या एखाद्या कृतीचा, धोरणाचा आशय स्पष्ट करताना ! म्हणूनच हजारो पृष्ठांच्या सावरकर वाङ्मयात विखुरलेला असा तत्त्वचिंतनपर भाग एकत्र करून, त्याची संगती लावून त्यामागचे सावरकरांचे तत्त्वचिंतन समजावून घ्यावे लागते आणि आपल्या परीने त्याचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न करावा लागतो.

घरातल्या फळचांवर वडिलांनी ठेवलेल्या पोथ्या आणि पुस्तके चाळून ती पुन्हा लावण्याचा लहानपणी विनायकराव सावरकरांना छंद जडला होता. एकदा जगाच्या संक्षिप्त इतिहासाचा एक भाग त्यांच्या हाती लागला. त्या पुस्तकात अरबस्तानचा इतिहास सांगितलेला होता मात्र त्या पुस्तकाचे पहिले पान फाटलेले होते. हे पान धुंडाळूनही सापडले नाही तेव्हा सावरकरांचा हिरमोड झाला खरा, पण तेव्हा त्यांना प्रश्न पडला, " समजा, पहिले पान सापडले तरी काय ? त्यात जेथून कोठून प्रारंभ झालेला असेल त्यापूर्वी काय होते हा प्रश्न उरणारच !"

लहानपणी उमजलेले हे सत्य सावरकरांनी पुढे 'सप्तर्षि' काव्यात शब्दबद्ध केले आहे. "इतिहासाचे पहिले पान न मिळणे तुला पहायाते ! आरंभ तुझा दुसऱ्या पानापासूनि शाप हा याते ॥"[१]

कमालीचे आस्तिक देवलसी असलेल्या त्यांच्या ज्येष्ठ बंधूंना–बाबारावांना–वेदांताची तसेच योगाभ्यासाची सारखी ओढ लागलेली असे. बाबारावांमुळेच तत्त्वजिज्ञासेचा सूत्रपात झाला हे तात्यारावांनी आठवणी सांगताना मान्य केले आहे. वयाच्या तेराव्या चौदाव्या वर्षी सावरकरांची कुलस्वामिनी दुर्गादेवीवरील भक्ती फार वाढली. ध्यानस्थ सावरकरांना त्या कोवळ्या वयात 'देवी कधी कधी प्रत्यक्ष' दिसू लागली. 'दैवी भाषा ऐकू' येऊ लागली. लवकरच श्रद्धेची जागा संशयाने घेतली. भोळ्या भावनेवर प्रबळ जिज्ञासेने मात केली आणि धारदार बुद्धीच्या व तर्काच्या साहाय्याने सावरकर वयाने व ज्ञानाने वडील असणाऱ्यांशी वाद घालू लागले. प्रतिपक्षाच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ वाचू लागले. एकीकडे मित्रमेळ्यासारखी संघटना बांधीत असतानाच सारांश व उतारेंच्या रूपाने सावरकर नानाविध ग्रंथातील ज्ञान 'सर्वसारसंग्रह' नावाच्या टिपणवहीत साठवू लागले. जॉन स्टुअर्ट मिल, हर्बर्ट स्पेन्सर यांच्या इंग्रजी ग्रंथांची मराठी भाषांतरे प्रथम वाचून त्यांचे तत्त्वविचार सावरकरांच्या ओळखीचे झाले. जोसेफ मॅझिनीचे मराठी तसेच इंग्रजी चरित्रही त्यांनी विद्यार्थीदशेत वाचले होते आणि ते त्यांना फार आवडले होते. म्हणूनच विलायतेला जाताना बोटीवरही त्यांच्याजवळ मॅझिनीचे इंग्रजी चरित्र होते.

१९०६ साली विलायतेच्या वाटेवर असताना आगनावेच्या माथ्यावर बसून अथांग महासागर व आकाश पहात असताना आपल्याला कोणते प्रश्न पडत ते त्यांनी सांगितले आहेत. "या प्रळयप्रभावाच्या अखंड आवर्तनांचा हेतू काय ? का यांना काही साध्यच नाही ? ही विश्वाची अबाढव्य घडामोड कशासाठी चालली आहे ? का हा केवळ आंधळ्या कोंशिबिरीचा खेळ आहे ? ज्याला साखरेचे पुट दिलेल्या भाषेत भगवंताची लीला म्हणावयाचे ? ...धरणीकंप, धूमकेतू, जलप्रलय, हिमप्रलय अशी ज्या 'लीले'तील सौम्यातील सौम्य खेळणी आहेत तिला मनुष्यभाषेत तरी भगवंताची लीला म्हणावयाचे की पैशाचिक उत्पात ! आणि ही लीला किंवा हे लळीत चालावयाचे तरी किती वेळ ? लीला म्हटली की एक दिवस, एक वर्ष, एक युग, एक कल्प खेळल्यानंतर तरी तिचा कंटाळा 'भगवंताना'सुद्धा नको का यायला ? पण ब्रह्मांडे मांडण्याचा नि मोडून टाकण्याचा हा महामायेच्या भातुकलीचा खेळ अनादिकालाच्या आरंभापासून तो अनंतकाळाच्या अंतानंतरही चाललाच आहे. चालणारच आहे ! त्या भगवंताला नि महामायेला प्रत्यक्ष काळाचासुद्धा कंटाळा येत नाही !"

" आणि हचा ब्रह्मांडाच्या घडामोडीत हचा बापड्या बिचाऱ्या श्रमजीवी मनुष्याचे स्थान कोणते ? त्याचेकडे कोणी ढुंकून तरी बघणारा आहे का ? किंवा मनुष्य, मन, हेच काय ते मुख्य असून असते असे तेच काय ते असून हे सारे ब्रह्मांड हेच नसते आहे ? मनाला होणारा केवळ आभास आहे ? मन सुषुप्तीत लीन होताच हा सगळा ब्रह्मांडाचा पसारा पार नाहीसा होतो आणि आचार्य म्हणतात त्याप्रमाणे ' जागरिते तास्मिन्नेव अग्निस्फुल्लिंगनवत् तस्यप्र तिभासः !'...मला हेही आठवते की मग मी पद्धतशीर विचार करण्यासाठी त्या काळच्या माझ्या ज्ञानानुसार अगदी शून्यापासून निरनिराळचा दर्शनांचा क्रम लावला. शून्यवाद, स्याद्वाद, अज्ञेयवाद, जडवाद, मायावाद, ब्रह्मवाद, त्यावेळी नवीनच पुढें आलेला; मानवतेलाच एकमेव देवता मानून तिची पूजा बांधणारा फ्रेंच तत्त्वज्ञ कॉंत हचाचा (Positivism) (प्रत्यक्षवाद ?) नि हेकेलचा (Sabstance) जडाद्वैतवाद, अशावेळी ज्यांना ज्यांना मला विचारांत घ्यावेसे वाटले नि ज्याविषयी मला न्यूनाधिक ज्ञात होते त्यांना अशा क्रमाने मांडून त्यातून काय काय पटते, काय समजते, काय समजत नाही, त्याची चिकित्सा करण्यात प्रतिरात्र तास तास घालवावे.' [२] दुर्दैवाने हचा तात्त्विक चिकित्सेचे विस्तृत विवरण आत्मचरित्राच्या कक्षेबाहेरचे असल्याने सावरकरांनी ' शत्रूच्या शिबिरात ' या त्याच्या मृत्युपूर्वी अवघे पाचसहा महिने आधी प्रसिद्ध झालेल्या आत्मवृत्तात ते केले नाही आणि नंतर ते कालवश झाल्यामुळे राहूनच गेले.

गेल्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्रजी विद्या घेणाऱ्या महाराष्ट्रातील तरुणांच्या पिढचा जॉन स्टुअर्ट मिल, हर्बट स्पेन्सर या इंग्रज तत्त्ववेत्त्यांच्या विचारावर पोसल्या गेल्या. इंग्लंडमध्ये गेल्यावर सावरकरांनी हर्बर्ट स्पेन्सर मुळातून वाचला, तसेच अंदमानात जन्मठेपेची शिक्षा भोगत असतानाही त्यांनी स्पेन्सरच्या ग्रंथांची पारायणे केली. उत्क्रांतिवाद, सुखवादी उपयुक्ततावादी नीतीचो संकल्पना, अज्ञेयवाद हे स्पेन्सरच्या तत्त्वज्ञानाचे मुख्य भाग होते हे सर्वमान्य आहे. सावरकरांच्या तत्त्वविचारातही त्यांना फार महत्त्वाचे स्थान आहे. मात्र त्यामुळे स्पेन्सर व सावरकर यांच्या तत्त्वज्ञानातील साम्य व भेद दाखविले की काम भागते असे समजण्याचे कारण नाही. [३] ' युक्ततम ' ' श्रेष्ठतम.' ' बलवत्तम ' ' सर्व समर्थ ' असतो तोच टिकून राहतो किंवा तग धरतो (survival of the fittest) या सिद्धांताची मूळ इंग्रजी शब्दयोजना स्पेन्सर यांचीच होती. १८५९ साली चार्लस रॉबर्ट डार्विन या जीवशास्त्रज्ञाचा ' द ओरिजिन ऑफ स्पेसीज ' हा ग्रंथ प्रसिद्ध होण्यापूर्वी १८५२ ते १८५७ या वर्षात स्पेन्सर यांनी लिहिलेल्या लेखात डार्विनच्या उत्क्रांतिवादी सिद्धांताच्या पाऊलखुणा उमटल्या होत्या. सावरकर इंग्लंडला होते तेव्हाही उत्क्रांतिवादाने उठलेले वादळ ओसरलेले नव्हते. उत्क्रांतिवादाचे समर्थक आणि विरोधक

यांच्यामध्ये अटीतटीने तब्बल पन्नास वर्षे चाललेला वाद सारखा उसळी घेत होता. सावरकरांनी उत्क्रांतिवादाचा केलेला स्वीकार हा त्यांनी केवळ स्पेन्सरच्या ग्रंथांच्या केलेल्या अध्ययनाचा परिणाम नव्हता. चार्लस डार्विन (१८०९–१८८२), थॉमस हेन्री हक्स्ले (१८२५–१८९५) अर्न्स्ट हेकेल (१८३४–१९१९), सुप्रजनन-शास्त्राचा प्रवर्तक आणि चार्लस डार्विनचा आतेभाऊ फ्रान्सिस गाल्टन (१८२२–१९११) या उत्क्रांतिवादी शास्त्रज्ञांची पुस्तके सावरकरांनी इंग्लंडमध्ये वाचली आणि त्यातील विचारसरणीचा ठसा त्यांच्या मनावर तेव्हा जो एकदा उमटला तो आयुष्यात कधीच पुसला गेला नाही. या उत्क्रांतिवादी विचारसरणीचा जबरदस्त प्रभाव समाजशास्त्र, मानवशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, भाषाशास्त्र नीतिशास्त्र, पुराणवस्तुसंशोधन, सुप्रजननशास्त्र, तौलनिक धर्मशास्त्र वगैरे ज्ञान-क्षेत्रांवरही पडला. म्हणूनच जीवशास्त्रातील शेवटचा शब्द हा समाजशास्त्रातील पहिला शब्द असतो असे गेल्या शतकाच्या उत्तरार्धात म्हटले जात असे.

अंदमानातून कारावास भोगून परतल्यानंतर रत्नागिरीस तेरा वर्षे (१९२४–३७) स्थानबद्ध असताना आणि १९३७ साली बंधमुक्त झाल्यानंतरच्या काळातही सावरकर डार्विनच्या भाषेतच बोलत व लिहीत राहिले. "जीवनकलहात श्रेष्ठतम असतो तोच जगतो" "हा निष्ठूर नियम खोदलेली ती निसर्गाची तलवार कितीही झाकली तरी तिची जीवघेणी धार आणि त्या निसर्गाची ती Red in tooth and claw असणारी वाघनखे ही काही बोथट होत नाहीत" या सावर-करांच्या भाषेमागे दडलेला डार्विन सहज ओळखता येतो. विविध विषयांवर सावर-कर बोलत किंवा लिहीत असले तरी अधूनमधून त्यांत डार्विन सारखा डोकावताना दिसतो. १९२८ साली श्रद्धानंद साप्ताहिकात शिवरायांच्या यशस्वी राजनीतीचे एक सूत्र स्पष्ट करताना सावरकरांनी लिहिले. 'जर रणक्षेत्रावर हिंदूस पराजया-मागून पराजयच येत रहाते, अहिंदूच काय पण सृष्टीदेखील तिच्या निर्घृण, निष्ठुर स्वभावानुरूप तशा अकर्मण्य आणि दुर्बल राष्ट्राकडे पाठ फिरविती आणि त्याच्या भाळी 'जीवनकलहात मरणासच योग्य' अशी मुद्रा ठोकून त्यास काळाचे जबडया-तून ढकलून देती...कारण काहीही म्हटले तरी ज्यास झगडयात झगडता येत नाही आणि जिंकता येत नाही त्यास जगात जगता येत नाही–येणार नाही हा सृष्टीचा निष्ठुर नियम आहे—तो [शिवाजी] रणक्षेत्रात उतरला तेव्हा 'न्यायाचा जय होईलच' ह्या दैववादाची माळ घेऊन न उतरता ती निसर्गाची निष्ठुर वाघनखे घेऊन उतरला. 'रणक्षेत्रात जिंकील तोच जीवनक्षेत्रात जगेल!' हा निसर्गनियम आहे ना? ठीक आहे, असेल! पण तो अमोघ आहे, तो अनुल्लंघ्य आहे म्हणून त्याच्या त्या निष्ठुरतेस निष्ठुरतेनेच तोंड देऊन 'red in tooth and claw' असणाऱ्या जीवनकलहाच्या वाघनखानेच अहिंदुगर्वाच्या अफझुलखानास मी चिरीन

ही हिंदु पराक्रमाने प्रतिज्ञा केली आणि भगव्या झेंड्याच्या तळाखाली भयंकर संगर माजले.' [४]. १९३७ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदूंचे जिणे सदा-सर्वदा शरणागतीचे आणि एकसारख्या पराभवाचेच होते असे मत व्यक्त करताच सावरकर त्यांच्यावर तुटून पडले आणि पाच सहस्त्र वर्षांत अनेक आक्रमणांना तोंड देऊन चीनप्रमाणेच हिंदुस्थानही तग धरून राहिला आहे. हिंदुराष्ट्र विजयशील आहे असा सावरकरांनी निर्वाळा दिला. हे प्रतिपादन करताना सावरकरांनी लिहिले, " भयंकर जीवनकलहात ते झुंजत राहिले, जिकीत राहिले, म्हणून हे हिंदुराष्ट्र जगले आहे. राष्ट्राराष्ट्रांचा साऱ्या प्रतिपक्षामध्ये ते आपल्या चिवटपणाने नि प्रबळतेने या जीवनकलहाच्या स्पर्धेत निसर्गनियमाप्रमाणे जगावयास योग्य ठरले, In the struggle for existence it proved fittest to survive,' म्हणून हे हिंदुराष्ट्र आजही जिवंत आहे." [५]

स्वातंत्र्योत्तर काळातही सावरकर याच भाषेत बोलत राहिले. २६ जानेवारी १९५० हा पहिला प्रजासत्ताक दिन सर्वांनी मतभेद विसरून साजरा करावा असे आवाहन एक पत्रक काढून करताना सावरकर म्हणतात, " आमच्या राष्ट्रावरही संकटे आली पण त्यांच्याशी आम्ही झुंज घेतली. त्या संकटावर स्वारी भरून हया जीवनकलहात surrival of the fittest श्रेष्ठतम असतो तोच जगतो हया कसोटीस उतरलो म्हणूनच जगावयास योग्य ठरलो." [६] डिसेंबर १९५१ मध्ये ' पूरक धान्ये ' या विषयांवर व्याख्यान देणाऱ्या सावरकरांच्या शब्दामागे दडलेला डार्विन असाच सहज ओळखता येतो. " निसर्गाकडे जर आपण पाहिले तर असे दिसते की किडे मुंग्यांना खातात. किड्यांना चिमण्या खातात. चिमणीला ससाणा खातो. ससाण्याला पारधी मारतो. हरिण गवत खाते तर हरणाला वाघ खातो. लहान माशाला मोठा मासा गिळतो हयावरून असे दिसते की बलवत्तम असतो तोच जगतो. हा आहे निसर्गनियम." [७]

सावरकरांनी स्वीकारलेल्या स्पेन्सर, डार्विन, हक्सले, हेकेल प्रभृतींच्या उत्क्रांतिवादातील कच्चे दुवे जसे विसाव्या शतकातील जीवशास्त्रज्ञांनी दाखवले आहेत तसेच गेल्या शतकातील उत्क्रांतिवादाच्या उणीवा व मर्यादा यांचीही आजच्या जीवशास्त्रज्ञांना जाण असते जीवनकलहात बलवत्तम वा श्रेष्ठत्तम असतो तोच जगतो आणि अशा तऱ्हेने निसर्गाकडून निवड केली जात असते; या उत्क्रांतीवादाच्या स्पेनर व डार्विन प्रणीत सूत्राविषयी गेल्या शे-सव्वाशे वर्षांत अनेक महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. ' जीवनकलह ' या संज्ञेने नेहमीच युद्ध किंवा संघर्ष अभिप्रेत असतो असे नाही. वाळवंटात वाढणाऱ्या वनस्पती रखरखीतपणा टाळण्यासाठी भोवतालच्या परिस्थितीशी कशा जुळवून घेतात किंवा थंडीपासून जनावरे आपले रक्षण कसे करतात हे सांगून थिओडोसियस डॉबझानस्की हे जग-

विख्यात अनुवंशशास्त्रज्ञ म्हणतात, " बलवत्तम वा श्रेष्ठतम असतो तोच जगतो म्हणजे श्रेष्ठतम किंवा बलवत्तम असा एकच प्रकार किंवा जात टिकून राहते आणि बाकी सर्व प्रकार किंवा जाती मरून जातात असा त्याचा अर्थ नाही. जे ठिकाण धरण्यास, जगण्यास योग्य असते ते ते टिकते, जगते. जीवनकलहातील हे यश मिळण्यासाठी इतरांशी नेहमी झुंज किंवा स्पर्धा करावी लागते असे नाही. युद्ध अगर संघर्षच करावा लागतो असे नाही तर परस्परांशी सहकार्य करून, एकमेकांस मदत करूनही हे यश मिळविता येते. [८] निष्ठुरपणे केलेला संघर्ष हाच एक निसर्गाचा नियम आहे किंवा निर्दयपणे केलेल्या स्पर्धेतून प्रगती होते असा डार्विनवादाचा अर्थ घेऊन बलवंतांनी दुबळ्यावर केलेल्या आक्रमणाचे, शोषणाचे अगर आर्थिक क्षेत्रातील, आंतरराष्ट्रीय राजकारणातील अनिबंध स्पर्धेचे समर्थन करणे योग्य ठरणार नाही. असे आज अनेक जीवशास्त्रज्ञांना वाटते. निसर्गात एक प्राणी दुसऱ्या वर झडप घालून त्याचा गळा घोटताना दिसतो म्हणून मनुष्यप्राण्यानेही तसेच करावे असे नाही. 'डार्विन, हक्स्ले आणि उत्क्रांती' यांची कहाणी सांगणाऱ्या विल्यम अर्विन यांनीही नैसर्गिक निवडीची प्रतिक्रिया किती गुंतागुंतीची आहे. स्पर्धेचे स्वरूप व तीव्रता, गुणबिंदूची (Gene) संरचना वगैरे अनेक कारणांचा या प्रक्रियेवर कसा परिणाम होत असतो या वस्तुस्थितीकडे लक्ष वेधले आहे. [९] विसाव्या शतकातील जीवशास्त्रज्ञांचे हे विचार सावरकरांनी नीट लक्षात घेतले होते असे म्हणण्यास आवश्यक ते पुरावे त्यांच्या उपलब्ध लेखनात आढळत नाहीत.

डार्विनचे सिद्धांत सामाजिक शास्त्रात लागू केल्याने होणाऱ्या अनिष्ट परिणामांची सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासकांना वाढती जाणीव झाल्याने गेल्या पन्नास-साठ वर्षांत सामाजिक शास्त्रे डार्विनवादाच्या मगरमिठीतून मुक्त झाली. सावरकरांना मात्र डार्विनवादाने अखेरपर्यंत जखडले होते असे दिसते.

योगवासिष्ठ हा ग्रंथ सावरकरांना अतिशय आवडत असे. काव्य व तत्त्वज्ञान यांचा अपूर्व संगम या ग्रंथात झाला असल्याने अंदमानच्या कारागृहात दोरखंड वळता वळता आपण वारंवार योगवासिष्ठातील श्लोक म्हणत असू असे सावरकरांनी स्वतःच सांगितले आहे. योगवासिष्ठ ग्रंथात पौरुष प्रयत्न, दैव व नियती यासंबंधी वसिष्ठांनी केलेले विवेचन आणि 'ईश्वराचे अधिष्ठान म्हणजे काय' या निबंधात सावरकरांनी केलेले प्रतिपादन एकत्र लक्षात घेणाऱ्यास सावरकरांवर योगवासिष्ठाचा पडलेला प्रभाव जाणवल्याशिवाय राहात नाही. वसिष्ठांच्या मते प्राक्तन व ऐहिक असे पौरुषाचे दोन प्रकार आहेत. प्राक्तन पौरुषाला दैव अथवा प्रारब्धकर्म म्हटले जाते. पूर्वजन्मात केलेले शुभ आणि अशुभ प्रयत्न यांनाच दैव असे म्हणतात. दैव ही केवळ कल्पना आहे. दुबळ्या बुद्धीच्या मनुष्यांना दुःखात किंचित समाधान व्हावे इतकाच दैवाचा उपयोग आहे. [१०] स्पंदरूप धारण

करणाऱ्या परब्रह्माच्या चित्शक्तीला वसिष्ठ 'नियती' म्हणतात. मनुष्यप्राण्याचे अदृष्ट (प्राक्तन कर्म किंवा दैव) आणि नियती या दोन्ही सत्ता ऐहिक पौरुष प्रयत्नांना वश होतात म्हणून शास्त्रशुद्ध पौरुष प्रयत्न हा दैवाहून श्रेष्ठ आहे असे वसिष्ठांनी रामचंद्रास उपदेश करताना बजावले आहे.

वसिष्ठांप्रमाणेच सावरकरांचीही पौरुष प्रयत्नामुळे इहलोकी अभ्युदय व निःश्रेयस प्राप्त होते अशी खात्री झालेली दिसते. " सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयांचे । परंतु तेथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे " या समर्थ रामदास-स्वामींच्या ओवीचा अर्थ उलगडून सांगताना सावरकरांनी म्हटले आहे ' जर भगवंताच्या अधिष्ठानाचा इतकाच अर्थ असेल की ऐहिक आणि मानवी उपायांच्या हातीच यशाची किल्ली नसून मनुष्याच्या ज्ञानाच्या नि शक्तीच्या पलीकडे ज्या अनेक अज्ञात, अज्ञेय, प्रचंड अशा अमानुष विश्वशक्ती आहेत त्यांच्या आघाता-प्रत्याघातांच्या टकरीतही त्या यशाचा वा अपयशाचा संभव असतो तर तो अर्थ बरोबरच आहे.' [११] मात्र कोणत्याही चळवळीचे यश हे वैज्ञानिक सामर्थ्यशाली, प्रत्यक्षनिष्ठ अशा ऐहिक साधनांनी विपक्षाहून वरचढ होण्याच्या यत्नावर अवलंबून असते असे सावरकरांचे ठाम मत होते.

योगवासिष्ठात मनाचे स्वरूप व सामर्थ्य यांच्याबद्दल वसिष्ठांनी केलेल्या विवेचनाचाही सावरकरांवर प्रभाव पडलेला दिसतो. संकल्प करणे हेच मन होय. संकल्पाहून मन निराळे नाही असे वसिष्ठांचे म्हणणे होते. ओढाळ गुराला बांधून टाकावे तसे विवेकाने अचपळ मनाला बांधून आपण त्याला कसा आवर घातला हे ' माझी जन्मठेप ' या पुस्तकात सावरकरांनी वारंवार सांगितले आहे. सावरकरांनी या पुस्तकात शब्दांकित केलेले मनाचे खेळ वसिष्ठांनी वर्णिलेल्या चंचल मनाच्या नानाविध लीलांची आठवण करून देतात. मन जशी भावना करते तसे ते तत्क्षणी होत असते. इंदुब्राह्मणाचे मुलगे, अहल्या आणि कृत्रिम इंद्र ह्यांनी केलेल्या दृढ-निश्चयाची उदाहरणे या सिद्धांताच्या समर्थनार्थ पुरेशी आहेत असे वसिष्ठांचे म्हणणे होते. प्रथमत: सामान्य ब्राह्मण असलेले इंदुपुत्र केवळ मनोभावनेच्या सामर्थ्यावर अखेरीस ब्रह्मदेवपदी कसे पोहोचले हे विशद करण्यासाठी वसिष्ठांनी इंदुब्राह्मणाच्या मुलांची कथा सांगितली आहे.

मगध देशाच्या इंद्रद्युम्न राजाची पत्नी अहल्या हिने आपण गौतमपत्नी अहल्या आहोत असा भ्रम घेतला आणि ती इंद्र नावाच्या, जारकर्मात निपुण ब्राह्मणाशी रत झाली. तिचा पती इंद्रद्युम्न राजा याने तिला केलेल्या शिक्षेचा तसेच भरतमुनींनी दिलेल्या शापाचाही अहल्येच्या निर्धारावर कसलाच परिणाम झाला नाही. दीर्घकालच्या अभ्यासानंतर मनाने दृढनिश्चय केला तर शापाने किंवा शरीराचा क्षय झाल्यानेही त्याचा नाश होत नाही हे रामचंद्रास पटवून देण्यासाठी

वसिष्ठांनी ही कथा सांगितली आहे. जाणूनबुजून दिव्यदाहक असे सतीचे वाण घेणाऱ्या सावरकरांना वसिष्ठांनी गायिलेली दृढ निश्चयाची महती आवडली असणे साहजिक आहे. मातृभूमी स्वतंत्र करण्याचा सावरकरांनी बालवयात मनाशी संकल्प केला. तो सिद्धीला नेण्यासाठी विजनवास पत्करला. कारागृहात अनेक वर्षे अमानुष छळ सोसला तरी विचारांती केलेला त्यांचा निश्चय अभंग राहिला. आपण केलेल्या संकल्पानुसार खंडित स्वरुपात का होईना मातृभूमी स्वतंत्र झालेली पाहण्याचे भाग्य त्यांना लाभले. या विजयाचा सांगता समारंभ साजरा करीत असतानाच पुढे मिळवावयाच्या विजयाचे संकल्पही त्यांनी बोलून दाखविले. संकल्प करण्याच्या आणि निर्धाराने ते पुरे करावयाच्या माणसाच्या सामर्थ्यावर वसिष्ठाप्रमाणे त्यांचाही विश्वास असल्यामुळे दृढनिश्चयाच्या बळावर अशक्य समजले जाणारेही शक्य करून दाखवणाऱ्या माणसाविषयी बोलताना अगर लिहिताना सावरकर फार रंगून जात याचे आश्चर्य वाटत नाही.

आतून सदोदित दरवाजे बंद असणाऱ्या घरासारखे अंतिम तत्त्व अज्ञेय आहे अशी सावरकरांची धारणा होती हे 'अज्ञेयाचे रुद्धद्वार' या त्यांच्या कवितेवरून स्पष्ट दिसते. हे बंद दरवाजे उघडता येणार नाहीत हे माहीत असतानाही बुद्धीच्या, तर्काच्या ज्ञानाच्या साहाय्याने ते ठोठावीत राहाण्याचा प्रयत्न सोडून देण्यास सावरकर तयार नाहीत. एक प्रचंड शिळा घेऊन पायथ्यापासून ती एका उंच डोंगराच्या माथ्यावर चढवण्याचा प्रयत्न करणाऱ्या शापित सिसीफसची कथा ग्रीक पुराणात आहे. शिळा गडगडत खाली येणार हे माहीत असतानाही ती डोंगरमाथ्यावर चढविण्याचा प्रयत्न करणाऱ्या सिसीफसप्रमाणे अज्ञेयाचे बंद दरवाजे ठोठावण्याचा निष्फळ प्रयत्न सोडून देण्यास सावरकरही तयार नाहीत. 'घर दुजे बांधू देईना, आपले कुणा उघडीना। हा यत्न असा चालेना, बसवे न सोडूनी यत्ना। ठोठावित आणि मी म्हणुनी पुनरपि बा रे, ती तुझ्या घराची बंद सदोदित दारे' असे सावरकर या कवितेच्या अखेरीस म्हणतात ते त्यांच्या तात्त्विक भूमिकेशी सुसंगत आहे.

अज्ञेयाचे बंद दरवाजे उघडता येणार नाहीत हे माहीत असतानाही ते ठोठावीत राहाण्याचा प्रयत्न माणसाने सोडू नये, त्याचप्रमाणे अमर्याद सृष्टीविषयीचे माणसाचे अज्ञान अनंत असले तरी मानवी ज्ञानाच्या बळावर ते मागे हटविण्याचा प्रयत्न माणसाने सारखा चालू ठेवावा असे सावरकरांचे सांगणे असे. सावरकर म्हणतात, "सृष्टी अमर्याद, अनंत आहे; मनुष्याचे ज्ञान कितीही वाढले तरी पूर्वीइतकेच ज्ञानाच्या पकडीपासून, हातापासून दूरच राहाते. सांत ज्ञानाभोवतीचा अनंत अज्ञानाचा वेढा कधीही उघडणारा नाही. किंबहुना ज्ञान म्हणजेच सांत, अज्ञान तेच अनंत; सांत अशामानवी मनाच्या आटोक्यात न गवसलेल्या नवनव्या घटना ह्या अनंत सृष्टीत नेहमीच घडत राहणार" [१२] या त्यांच्या तात्त्विक भूमिकेमुळे

चमत्कार म्हणताच त्याची हेटाळणी करून तो ऐकूनही न घेणे हा त्यांना बुद्धिभोळेपणा वाटे आणि धर्मभोळेपणाइतकाच तो ते अनिष्ट समजत असत. प्रत्येक चमत्कार म्हणजे सृष्टीने माणसाला घातलेला नवा प्रश्न! तो सोडविण्याची धमक बाळगणे म्हणजे खरी वैज्ञानिक वृत्ती. चमत्कार, अदभुतता म्हणजेच अपूर्वाई नि कार्यकारणभावाचे अज्ञान असे सांगून चमत्कारामागचा कार्यकारणभाव उलगडून दाखवण्याचा सावरकर सल्ला देत असत. आजच्या ज्ञात अशा कार्यकारणभावांच्या कक्षेबाहेर असलेले पुनर्जन्मासारखे अभ्युपगम (हायपोथेसिस) आहेत. पूर्वजन्मातील आठवणी बरोबर सांगणाऱ्या काही माणसांबद्दलच्या बातम्या वृत्तपत्रे अधूनमधून प्रसिद्ध करीत असतात. अशा प्रकरणांचा उलगडा मानसशास्त्रीय उपपत्तीनी लावण्यासारखा असतो असे सावरकर मानीत असत. म्हणूनच "सकृद्दर्शनी अपूर्व आणि चमत्कारिक भासणाऱ्या घटनांची वैज्ञानिक छाननी करून त्याची उपपत्ती लावण्याचा वा बिंग फोडण्याचा निःपक्षपातीपणे यत्न चालू ठेवावा" असे ते सांगत असत. [१३]

अर्न्स्ट हेकेलचे विज्ञानविषयक ग्रंथ सावरकरांनी वाचले होते आणि त्यांना ते आवडलेही होते. 'द रिडल ऑफ दि युनिव्हर्स' हा हेकेलचा १८९९ साली प्रसिद्ध झालेला ग्रंथ सावरकर विलायतेत शिकत असताना फार लोकप्रिय होता. पदार्थाचे स्वरूप, गतीचा व जीवाचा उगम, निसर्गातील सुबुद्ध अवस्था, संवेदनेचा व जाणिवेचा उगम, विचाराचा व भाषेचा उगम, इच्छाशक्तीचे स्वातंत्र्य, ही विश्वातील कोडी सुटलेली नाहीत असे १८८० साली एमिल दु बॉइ रेमंद या फ्रेंच तत्त्ववेत्त्याने म्हटले होते. पदार्थविज्ञानाने व डार्विनच्या उत्क्रांतिवादाने ही बहुतेक कोडी उकलता येतात असे हेकेलचे म्हणणे होते. विसाव्या शतकातील तिसऱ्या व चौथ्या दशकात निःशंकपणाने व आत्मविश्वासाने विज्ञानाच्या सामर्थ्याची सूक्ते गाणारे सावरकर पाहिले की एकोणिसाव्या शतकातल्या अर्न्स्ट हेकेलसारख्या वैज्ञानिकांची आठवण झाल्याखेरीज रहात नाही.

विसाव्या शतकातील वैज्ञानिक मात्र निःशंकपणे, उत्साहाने विज्ञानाची महती गाताना दिसत नाहीत. विज्ञानांच्या मर्यादांची अधिक जाणीव झालेली असल्याने आजचे वैज्ञानिक सावधपणे बोलताना आढळतात. जेम्स क्लार्क मॅक्स्वेलपासून ते अल्बर्ट आइनस्टाईनपर्यंतच्या वैज्ञानिकांच्या संशोधनामुळे माणसाच्या निरीक्षणशक्तीच्या मर्यादा उघडकीस आल्या आणि त्या तीव्रतेने जाणवू लागल्या [१४] संपूर्ण विश्व म्हणजे आपल्या नजरेला दिसणाऱ्या जगाचा केवळ विस्तार अशी गेल्या शतकातल्या अनेक शास्त्रज्ञांची समजूत होती. त्यामुळे आपल्याला दिसणाऱ्या गोष्टींचा उलगडा करता आला की साऱ्या विश्वाचे कोडे सोडवणे शक्य होईल असे अर्न्स्ट हेकेलसारख्यांना वाटत होते. हा समज बरोबर नाही हे लक्षात आल्याने

सर जेम्स जीन्ससारख्या वैज्ञानिकाला प्लेटोने दिलेला गुहेचा दृष्टांत आठवला. गुहेत बंदिस्त असलेल्या आणि प्रकाशाकडे पाठ करून समोरच्या भितीवरच्या सावल्यांचे निरीक्षण करणाऱ्या माणसासारखी विसाव्या शतकातल्या माणसाची अवस्था झाली आहे असे सर जेम्स जीन्स यांनी म्हटले आहे. ज्या ज्या गोष्टीचे आपण निरीक्षण करीत असतो त्या त्या गोष्टीचे गुणधर्म हे निरीक्षणाच्या कृतीमुळे बदलतात असा सिद्धांत पदार्थविज्ञानाच्या क्षेत्रात मांडला गेला. हायझेनबर्ग या जर्मन वैज्ञानिकाच्या या सिद्धांतामुळे तसेच खगोलशास्त्रातील कृष्णविवरांच्या संकल्पनेमुळेही निरीक्षणाच्या मर्यादांची तीव्रतेने जाणीव झाली.

विसाव्या शतकातील विज्ञानक्षेत्रातील नवनवीन मतप्रवाहांची पुरेशी ओळख करून घेण्यास आवश्यक असलेली उसंत तसेच स्वास्थ्य दुर्दैवाने सावरकरांना कधीच लाभले नाही. दीर्घ मुदतीचा कारावास; रत्नागिरीसारख्या आडगावात तेरा वर्षांची स्थानबद्धता, मुक्ततेनंतरचे सक्रिय राजकारण, स्वातंत्र्योत्तर काळातील कारावास, व प्रकृती अस्वास्थ्य अशा कारणांमुळे या शतकातील विज्ञान, तत्त्वज्ञान तसेच सामाजिक शास्त्रांच्या क्षेत्रातील नवे सिद्धांत समजावून घेऊन तरुणपणी स्वीकारलेल्या आपल्या तात्त्विक भूमिकेची फेरतपासणी करणे सावरकरांना शक्य झालेले दिसत नाही. त्यामुळे त्यांच्या तत्त्वचिंतनाचा चेहरामोहरा गेल्या शतकाच्या उत्तरार्धात पाश्चिमात्य देशात लोकप्रिय झालेल्या तत्त्वचिंतनाशी मिळताजुळता राहिला. अद्ययावत असण्याबद्दल कटाक्ष बाळगणाऱ्या सावरकरांची अशी अवस्था व्हावी याबद्दल खेद वाटला तरी त्यामुळे ही वस्तुस्थिती नाकारण्याचे कारण नाही.

निसर्गाप्रमाणेच मानवी जीवनातही हिंसा अपरिहार्य आहे, एवढेच नव्हे तर आवश्यक तेव्हा हिंसा केल्याने ती इष्टही असल्याचे सिद्ध होते, अशी सावरकरांची धारणा होती. माणसाचे अन्न खाणारी माकडे तसेच माणसाच्या अन्नाचा फडशा पाटणारे लांडगे, उंदीर, डुकरे, टोळ वगैरे मारून टाकून आपले आपणच पिकवलेले अन्न वाचविणे आवश्यक व इष्ट ठरते. मनुष्याला जी हिंसा उपकारक होईल ती अहिंसाच होय. उलट जी अहिंसा मनुष्याला मारक होईल ती अहिंसा हिंसा आहे असे सावरकरांचे मत होते. सावरकरांच्या आवडत्या योगवासिष्ठात कर्कटी राक्षसांची कथा आहे कर्कटी राक्षसीने विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देणारा किरात देशाचा राजा विक्रम म्हणतो, "स्वधर्मेण च हिंसैव महाकरुणया समा" वध्यजनांचा वध करणे ही धर्मशास्त्रदृष्ट्या हिंसा होत नाही, कारण धर्मानुरूप केलेल्या हिंसेची योग्यता दयेइतकीच श्रेष्ठ आहे. इंद्र व अहल्या यांच्या कथेतील राजा इन्द्रद्युम्न भरतमुनींनी इंद्र व अहल्या यांना शाप देऊन त्यांचा नाश करावा असे सुचवताना म्हणतो, 'यदवध्यवधात्पापं वध्यत्यागात्तदेव हि' वध करण्याला योग्य अशा पुरुषाचा वध न केल्याने जितके पाप लागते तितके वध करण्याला योग्य अशा

पुरुषाचा वध न केल्याने लागत असते. योगवासिष्ठातील या सुभाषितांशी मिळती-जुळती अशीच सावरकरांची हिंसा-अहिंसेच्या प्रश्नाबद्दलची भूमिका होती.

निसर्गात आत्यंतिक अहिंसेला मुळीच स्थान नसून आत्यंतिक अहिंसा ही अव्यवहार्य मानवी जीवनाला घातक व म्हणून पूर्णपणे अनीतिकारक असते असे सावरकर सांगत. हिंसक कृत्य दुष्ट हेतूने परपीडक बुद्धीने केले तरच तो अत्याचार; तेच कृत्य सुष्ट संरक्षणार्थ न्याय्य बुद्धीने केले तर ते सदाचार ठरते असे सावरकरांचे मत होते. मनुष्याला जी हिंसा उपकारक होईल ती हिंसा अहिंसाच होय. उलट जी अहिंसा मनुष्याला मारक होईल ती अहिंसा हिंसा आहे असे ते मानीत. त्यामुळे हिंसक कर्म हे नेहमीच अनीतिमान कृत्य असते असे मानण्यास ते तयार नव्हते. हिंसक कर्म हे केवळ आपद्धर्म म्हणूनच समर्थनीय ठरते असे नाही तर विशिष्ट परिस्थितीत हिंसक कर्म करणे हेच माणसाचे नैतिक कर्तव्य ठरते असे सावरकर प्रतिपादन करीत असत.

हिंसा-अहिंसेच्या प्रश्नाबाबतचे सावरकरांचे विवेचन वाचताना काही शंका मनात येतात. निसर्गात हिंसा अपरिहार्य आहे म्हणून मानवी जीवनातही ती शक्यतो टाळण्याचा प्रयत्न करणे हा वेडेपणा कसा ठरतो ? जनावरांच्या जगातले नियम माणसांच्या दुनियेतही लागू पडणारच असे समजून मानवी जीवनाकडे पाहावयाचे याला काही पर्याय नाही काय ? निजलेल्या लहान मुलामध्ये शिरलेल्या सापाला ठार मारणे किंवा माणसांच्या जत्रेत घुसलेल्या एखाद्या पिसाळलेल्या कुत्र्याला मारणे आवश्यक ठरले तरी त्याच न्यायाने माणसांना मारणे नेहमीच योग्य ठरते का ? वध करण्याला योग्य माणूस कोणता हे ठरविण्यासाठी निकष कोणते आणि ते कोणी लावावयाचे ? एखादे हिंसक कृत्य अपरिहार्य तसेच इष्ट ठरविताना सावरकर त्या कृत्याच्या परिणामांचा मुख्यतः विचार करीत असत असे दिसते. ज्यायोगे फार अधिकात अधिकांचे सुख वा हित साधले जाईल ते कर्म विहित होय अशी उपयुक्ततावादी कसोटी सावरकरांनी स्वीकारली होती. "मानवी जीवनात जे जे विचार किंवा आचार उपकारक होतील त्या त्या सर्वांना नीती किंवा सद्गुण म्हणावे आणि त्याच्या विरोधी जे जे असेल त्याला अनीती किंवा दुर्गुण समजावे." हे एक व्यापक व मूलभूत सूत्र सावरकरांनी सांगितले आहे. [१५] वड, पिंपळ हे छायादायी विस्तीर्ण वृक्ष उपयुक्त आहेत तोपर्यंत त्यांचे रक्षण करणे योग्य आहे मात्र त्यांच्यापासून उपद्रव होऊ लागला की कोणत्याही इतर झाडाप्रमाणेच ते तोडून टाकणे हाच खरा धर्म असे सावरकर सांगत असत. या त्यांच्या युक्तिवादामागेही उपयुक्तता हीच एक कसोटी त्यांनी स्वीकारल्याचे दिसते.

गाय माता नव्हे, देवता तर नव्हेच नव्हे; गाय एक उपयुक्त पशु आहे या त्यांच्या मतामागेही उपयुक्ततावादी दृष्टिकोण होता. गायी मारू नयेत म्हणून राष्ट्र

मरू देणाऱ्या धर्मभोळ्या हिंदूंवर ते झोड उठवीत असत. शत्रूने एखाद्या किल्ल्यास किंवा प्रत्यक्ष राजधानीला वेढा घालून अन्नधान्याची रसद तोडली तर किल्ला किंवा राजधानी गमावून राष्ट्रहत्या करण्यापेक्षा हरिसिंग नलवा या शूर सेनापतीने जसे गाईचे रक्त शिंपडलेले धान्य खाल्ले तसे करावे एवढेच सांगून सावरकर थांबले नाहीत, तर तसे करणे हाच खरा हिंदू धर्म होय, असे म्हणून त्यांनी कर्मठ सनातन्यांचा रोष ओढवून घेतला [१६] वड, पिंपळ, गाय यांच्याप्रमाणे वार्धक्यामुळे अगर व्याधीमुळे मनुष्यदेहही समाजाला उपयुक्त राहिला नाही व केवळ भुईला भार बनला तर अशा देहाचा त्याग करणे योग्य ठरते असे सावरकरांचे म्हणणे होते. एखादी भाबडी समजूत किंवा रूढी धर्मभोळेपणावर आधारलेली असली आणि तरीही तिच्यामुळे राष्ट्रीय हितच अधिक साधत असेल तर तिच्याकडे उपयुक्ततावाद्याने काणाडोळा करावा आणि लोकसंग्रहाचे एक हत्यार म्हणून वेळाशक तिचा वापर करावा असे सावरकरांचे मत होते. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवास राष्ट्रीय महोत्सवाचे रूप आणून दिले. लोकसंग्रहाच्या दृष्टीने, राष्ट्रसंघटनेच्या दृष्टीने, गणेशोत्सव उपयुक्त असल्याने प्रत्येक हिंदूने त्यात भाग घ्यावा असा सावरकर सल्ला देत असत. कोणताही ग्रंथ, कोणतेही ज्ञान, कोणतीही वस्तू, चाल, घाटणी टूम, ग्राह्य की अग्राह्य, योग्य की अयोग्य, हे ठरविताना ती उपयुक्त आहे का ते पाहावे असा त्यांचा आग्रह होता. मात्र त्यांना उपयुक्तता नेहमीच अभिप्रेत होती असे दिसत नाही. अनेकदा उपयुक्ततेपेक्षा (Utility) त्यांना व्यावहारिक सोय (Expediency) अभिप्रेत होती असे वाटते.

व्यक्तीला स्वाभाविकपणे हवे असते ते स्वतःचे सुख, आणि ते मिळण्यात तिचे हित असते असे एकोणिसाव्या शतकातील इंग्लंडमधले उपयुक्ततावादी समजत असत. उपयुक्ततावादातील तार्किक अडचणी व्यक्तिवादामुळे निर्माण होतात हे जाणवल्यामुळे असेल कदाचित, सावरकरांनी व्यक्तीच्या हिताऐवजी राष्ट्रहित साधण्यावर भर दिला. राष्ट्रवादी विचारप्रणालीचा एकोणिसाव्या शतकात युरोपात जोसेफ मॅझिनीसारख्या विचारवंताने हिरिरीने पुरस्कार केला. अंदमानातून सुटून आल्यानंतर १९२४ च्या आरंभी रत्नागिरीस स्थानबद्ध झाल्यानंतर सावरकर हिंदुत्वाचा, हिंदुराष्ट्राचा जोरदार पुरस्कार करू लागले. अंदमानात जाण्यापूर्वीही ते कडवे राष्ट्रवादी होते. पण त्या काळात ते हिंदुराष्ट्राची महती गात नव्हते. अंदमानातून आल्यानंतरच्या काळात सावरकरांच्या तत्त्वचिंतनात हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व आणि हिंदू स्वयमेव राष्ट्र आहेत हा विचार केंद्रस्थानी आहे. ज्या ज्या गोष्टीमुळे हिंदुराष्ट्र कमकुवत होते, पराभूत होते, त्या त्या गोष्टींवर ते तुटून पडलेले दिसतात. धर्मभोळेपणा, बुवाबाजी, जातिभेद व अस्पृश्यतेसारख्या प्रथा, अहिंसेवर अधिष्ठित असलेले गांधीजींचे सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान, वगैरे गोष्टींवर त्यांनी झोड

उठवली; कारण या सर्वांमुळे हिंदू राष्ट्र दुबळे होते असे त्यांचे ठाम मत होते. या उलट इहवाद, विज्ञाननिष्ठा, अस्पृश्यतानिवारण, हिंदुसंघटन, शुद्धीकरण, सैनिकीकरण व औद्योगीकरण या सर्वांमुळे हिंदुराष्ट्र सामर्थ्यशाली व संपन्न होईल अशी त्यांना खात्री वाटत होती. म्हणून त्यांचा त्यांनी सतत पुरस्कार केला. प्राणिसृष्टीतल्या भयंकर आणि प्रचंड जीवनकलहात जो सर्वसमर्थ असतो तोच जसा जगतो तसेच राष्ट्राराष्ट्रांच्या कलहामध्येही सामर्थ्यशाली राष्ट्रच टिकते अशी त्यांची धारणा होती. म्हणून ते शास्त्राच्या तसेच शस्त्राच्या उपासनेवर भर देत असत. त्यांचा राजकीय विचारही डार्विनवादाने पुरता झाकळून गेला आहे.

"आसिंधुसिंधु भारतभूमिका ही ज्याची पितृभू नि पुण्यभू आहे तो हिंदू" अशी सावरकरांनी हिंदू शब्दाची व्याख्या केली आहे. [१७] चलाखीने केलेल्या या व्याख्येनसार जैन, शीख, भारतातील बौद्ध हे हिंदू ठरतात, तर मुसलमान, ख्रिस्ती, ज्यू, पारशी यांची गणना हिंदुमध्ये होत नाही. हिंदुत्व या संज्ञेचा आशय हिंदुधर्म या शब्दाहून कितीतरी व्यापक आहे असे सांगताना सावरकर म्हणतात हिंदुधर्म या शब्दात हिंदुंची धार्मिक व्यवहारपद्धती त्यांचे अध्यात्मशास्त्र व त्यांची श्रद्धातत्त्वे याच गोष्टींचा काय तो संबंध येतो. [१८] सावरकरांनी 'हिंदू' शब्दाच्या केलेल्या व्याख्येनुसार पारशी, ख्रिस्ती, ज्यू यांची गणना हिंदुमध्ये करता येत नसली तरी या अन्य धर्मियांपासून हिंदूराष्ट्राला कसलाच धोका पोहोचणार नाही असे त्यांना वाटत होते. पारशांची हिंदूराष्ट्राविषयी केवळ सदिच्छेची वृत्ती आहे; ख्रिस्ती हिंदूंच्या गळचातील धोंड होणार नाहीत आणि संख्येने फारच थोडे असलेले ज्यू हिंदूंच्या राष्ट्रीय आकांक्षांच्या विरुद्ध नाहीत असे मत व्यक्त करून सावरकरांनी मुसलमानांवर हल्ला चढवला आहे.

हिंदुस्थानात हिंदू आणि मुसलमान अशी मुख्यत: दोन राष्ट्रे विद्यमान आहेत असे सांगून मुसलमान हिंदुस्थानला शत्रूभूमी मानीत असल्याने हिंदी राष्ट्रवादाचे मुसलमानांना वावडे आहे असा सावरकर इशारा देत असत. तसे पाहिले तर प्रादेशिक ऐक्याच्या समान बंधावर आधारलेल्या ज्या हिंदी राष्ट्राच्या कल्पनेची अंदमानातून आल्यानंतरच्या काळात सावरकरांनी टर उडवली त्या हिंदी राष्ट्राच्या कल्पनेचीच सावरकरांनी अंदमानात जाण्यापूर्वी तळी उचलली होती. अठराशे सत्तावनचे स्वातंत्र्यसमर या त्यांच्या ग्रंथाच्या मूळच्या मराठी हस्तलिखितात त्यांनी हिंदभूमी, भारतभू, स्वदेश असे शब्द वापरले आहेत. अठराशे सत्तावनच्या स्वातंत्र्यसमरास त्यांनी अनेकदा हिंदुमुसलमानांचे संयुक्त धर्मयुद्ध म्हटले आहे आणि मुसलमानांनी फडकावलेल्या हिरव्या निशाणाचे हिंदूंनी फडकावलेल्या जरतारी निशाणाइतकेच मोकळेपणाने कौतुक केले आहे. त्या पुस्तकात अनेक स्वदेशभक्त मुसलमानांची जिवंत चित्रे रंगवणारे सावरकर अंदमानातून परतल्यानंतर मुसलमानांकडे

संशयी दृष्टीने पाहू लागले आणि मुसलमानांनी हिंदुस्थानाला स्वदेश किंवा स्वराष्ट्र कधीच मानलेले नाही असे बजावू लागले.

अंदमानातून आल्यानंतरच्या काळात सवरकरांचा मुस्लीम विरोध इतक्या टोकाला गेला की त्यांना वस्तुस्थितीचेही भान राहीनासे झाले. इंग्रजांविरुद्ध हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी हिंदू झगडत असताना मुसलमान निव्वळ मौज पाहात राहिले असे ते म्हणू लागले. रत्नागिरीतील तेरा वर्षांची स्थानबद्धता संपून मुक्त झाल्यानंतर १९३७ साली हिंदुमहासभेच्या अध्यक्षीय भाषणात सावरकर म्हणाले, "हिंदुस्थानच्या बंधमोचनाच्या लढ्यात जे जे फासावर गेले, ज्या शेकडोंनी अंदमानातील काळ्यापाण्याला तोंड दिले आणि ज्या सहस्त्रांनी कारावास पत्करिला ते सारे हिंदूच होते" (१९) हे त्यांचे म्हणणे वस्तुस्थितीला धरून नव्हते. इंग्रजांविरुद्धच्या लढ्यात मुसलमानही वेळोवेळी सहभागी झाले होते. १८५७ च्या पहिल्या अयशस्वी स्वातंत्र्ययुद्धात ते मोठ्या संख्येने लढले होते आणि त्यांच्यापैकी अनेकांना रणांगणावर वीरमरण लाभले होते, हे खुद्द सावरकरांनीच रंगवून सांगितलेले आहे. वहाबी पंथाचे पाईक असलेले कडवे मुसलमान इंग्रजांविरुद्ध सशस्त्र लढा देत असल्याने त्यांच्यापैकी काहींनी सावरकर बंधू अंदमानात जन्मठेपेची शिक्षा भोगण्यासाठी गेले त्यापूर्वी किमान चाळीस वर्षे आधी अंदमानात 'काळे पाणी' अनुभवले होते.

शेरअली या पठाण वहाबी कैद्याने १८७२ साली अंदमानला भेट देण्यासाठी आलेल्या व्हाइसरॉय लॉर्ड मेयोचा खून केला होता, तर मौलाना मोहम्मद जाफर ठाणेश्वरी या वहाबी मुसलमान कैद्याने अंदमानात जन्मठेप भोगून आल्यानंतर 'कालापानी' नावाची उर्दू आत्मकथाही गेल्या शतकात प्रसिद्ध केली होती. पहिल्या महायुद्धाच्या काळात गदर पक्षाने उत्तर भारतात उठाव घडवून आणण्याचा जो अयशस्वी प्रयत्न केला त्यात हिंदू व शीख यांच्याबरोबर मुसलमानही सामील झाले होते. त्यातल्या काहींना लष्करी न्यायालयाच्या आदेशानुसार फासावर लटकवण्यात आले होते. अफगाणिस्थानात हिंदुस्थानचे हंगामी सरकार स्थापन करण्याच्या उलाढालीच्या सूत्रधारांत राजा महेंद्रप्रताप बरोबरच मौलवी बरकतुल्ला व ओबदुल्ला सिंधी हे मुसलमान देशभक्तही होते. काकोरी कटाच्या खटल्यात फाशी गेलेले अशफाकउल्ला आणि १९३० च्या सत्याग्रह संग्रामात फासावर चढलेले सोलापूरचे कुर्बान हुसेन या हुतात्म्यांचा सावरकरांनी नामनिर्देश केला नाही, तरी त्यामुळे कोणास ही वस्तुस्थिती लपवता येणार नाही. सावरकरांनी मात्र जाणूनबुजून या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष केले आणि श्रोत्यांना भुरळ घालणाऱ्या शैलीने ते हिंदुस्थानकरिता कोण मेले हा सवाल वारंवार विचारीत राहिले. "हचा

देशाच्या स्वातंत्र्याच्या १८५७ पासून सुरू झालेल्या लढ्यात कोणी खरा त्याग केला ? हिंदूनी की मुसलमानांनी ? अंदमानात कोण गेले ? हिंदू की मुसलमान ? सत्याग्रह संग्रामात बळी गेले ते तरी कोण होते ? मुसलमान छे, छे हिंदूच !' [२०]

शेकडो पृष्ठांचे सावरकर वाङमय वाचताना एक मोठी उणीव सारखी जाणवते. मानवी इतिहासाला वळण देण्यास कारणीभूत ठरणाऱ्या शक्तींमध्ये आर्थिक शक्तीचे फार महत्त्वाचे स्थान आहे. असे असूनही सावरकरांनी या आर्थिक शक्तींकडे जवळजवळ दुर्लक्ष केले आहे. त्यांच्या लेखनात आर्थिक कारणाबाबत, कार्यक्रमाबाबत क्वचित एखादेवेळी विवेचन केलेले आढळते. तेही अपुरे व सदोष असते. " सर्व मानवी व्यवहार नि इतिहास केवळ आर्थिक सूत्रात सामावू पहाणे हे सर्वस्वी एकांगीपणाचे आहे " हे त्यांचे म्हणणे स्वीकारले तरी त्यामुळे आर्थिक कारणाविषयी व हितसंबंधांविषयी सदोदित मौन धारण करणे समर्थनीय ठरत नाही. [२१] केवळ अर्थिक हितसंबंधांचा विचार करून धार्मिक, जातीय नि वांशिक प्रश्न सुटणार नाहीत असा त्यांचा दावा आहे. तो ज्याला मान्य आहे त्यालाही धार्मिक, जातीय नि वांशिक प्रश्नांच्या मूळाशी असलेले आर्थिक हितसंबंध दृष्टिआड करणे परवडण्यासारखे नाही. १९३९ साली कलकत्ता येथे भरलेल्या हिंदुमहासभेच्या अध्यक्षीय भाषणात आर्थिक धोरणाची त्यांनी आखलेली रूपरेषा हे त्यांच्या आर्थिक विवेचनाचे एकुलते एक उदाहरण आहे.

' वर्गहितांचा राष्ट्रीय समन्वय ' अशा शब्दांत त्यांनी आर्थिक धोरणाचे सुलभ सूत्र सांगितले आहे. उत्पादनाच्या शक्तीमुळे व संबंधांमुळे समाजाची विभागणी वर्गांमध्ये झालेली असते. या वर्गामध्ये सतत संघर्ष सुरू असतो. शासनसंस्था ही कोणत्याही समाजातील उत्पादन साधनांवर मालकी असणाऱ्या वर्गाच्या हातातील एक हत्यार असते ही मार्क्सवादी विचारसरणी सावरकरांना मुळीच मान्य नाही. भांडवलवाले व श्रमजीवी यांचे हितसंबंध सर्व राष्ट्राच्या आवश्यकतेला पूरक मानून या दोन्ही वर्गांच्या आकांक्षांचा वेळोवेळी समन्वय करण्याची कामगिरी शासनसंस्था पार पाडील असे सावरकर म्हणत होते. टाळेबंदी व संप यांच्यामुळे राष्ट्राची आर्थिक शक्ती क्षीण होणार असेल तर निग्रहाने त्यांना प्रतिबंध करण्याची सावरकरांची तयारी होती. महत्त्वाच्या उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करण्याचे तत्त्व शेतीलाही लागू पडेल असे ते म्हणत होते. त्यावरोबरच व्यक्तिगत मिळकत ही सामान्यतः सुरक्षित मानली जाईल आणि राष्ट्रहितासाठी ती ताब्यात घेणे आवश्यक असल्यास त्याबद्दल मूळ मालकाला योग्य नुकसानभरपाई किंवा किंमत दिली जाईल अशीही ते ग्वाही देत होते. [२२] राष्ट्राच्या आर्थिक शक्तींचे संवर्धन करणे, शेतीच्या, उद्योगधंद्यांच्या उत्पन्नात वाढ करणे आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी

होणे ही उद्दिष्टे त्यांनी बोलून दाखविली तरी या उत्पन्नाच्या समान वाटपाच्या प्रश्नाबाबत सावरकर अवाक्षर काढीत नाहीत. हिंदू शेतकरी, कामकरी, व्यापारी यांच्या रक्षणासाठी ज्या काळात सावरकरांनी हा ' राष्ट्रीयत्ववादी ' आर्थिक कार्यक्रम मांडला त्या काळात इटलीत मुसोलिनीची राजवट व जर्मनीत हिटलरची राजवट यांची चलती होती. सावरकरांचे आर्थिक धोरण म्हणजे युरोपातील या दोन राजवटींच्या आर्थिक धोरणाची सावरकरांनी हिंदुराष्ट्रासाठी काढलेली स्वस्त आवृत्ती होती.

त्या काळात चलती असलेल्या सर्वच विचारप्रणालींमध्ये काही फरक करण्याची अगर निवड करण्याची तसदी घेण्याचे कारण नाही असे सावरकरांना वाटत होते. या विविध विचारप्रणालींचा पुरस्कार करणारी सर्व राष्ट्रे चोर आहेत असे सावरकरांचे मत होते. " हे जे काही ' वाद ' आहेत, उदाहरणार्थ लोकसत्तावाद, साम्राज्यवाद इ. इ. त्यांचे प्रतिपादक सर्व एकाच माळेचे मणी आहेत. त्यांना आपण नाव कोणतेही द्या. त्यांना बोल्शेविझम म्हणा किंवा नाझीझम म्हणा, काहीही म्हणा, त्या सर्वांनी आपल्या तरवारीच्या सामर्थ्याच्या जोरावर दुसऱ्या लोकांना जिंकले असून किंवा अद्याप जिंकले नसल्यास ते जिंकू इच्छीत असून त्यांच्या सर्व वादांचा तात्पर्यार्थ दंडुकेशाही एवढाच आहे." [२३] सर्व विचारप्रणालींबाबतच्या त्यांच्या या भूमिकेमुळे हिंदुराष्ट्राचे हित साधण्यासाठी कोणत्याही विचारप्रणालीच्या पुरस्कर्त्या राष्ट्रावरोवर बिनदिक्कत हातमिळवणी करण्यास सावरकर सिद्ध होते. ' आत्मानं सततं रक्षेत ' हे त्यांच्या मते हिंदुराष्ट्राच्या परराष्ट्रीय धोरणाचे सूत्र असले पाहिजे. इटली, जर्मनी, जपान ही राष्ट्रे जर ठग असतील तर इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स ही राष्ट्रे महाठग आहेत असे सांगत. सगळाच चोरांचा बाजार असल्याने जर्मनीने झेकोस्लाव्हियाचे स्वातंत्र्य हिरावून घेतले, इटलीने अबीसिनिया गिळंकृत केला किंवा जपानने चीनवर आक्रमण केले तर आक्रमक राष्ट्रांचा धिःकार करणे किंवा आक्रमणाला बळी पडलेल्या देशाविषयी सहानुभूती व्यक्त करणे हा सावरकरांच्या लेखी निव्वळ वेडगळपणा होता. राष्ट्राराष्ट्रामधल्या कारभारात नीतीला मुळीच स्थान नसते असे त्यांचे ठाम मत होते.

निसर्गात जसा जीवनार्थ निष्ठुर कलह चालतो तसाच आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या क्षेत्रातही राष्ट्राराष्ट्रांमध्ये जीवघेणा संघर्ष चालू असतो. या खेळात ज्या विशिष्ट राजकीय विचारप्रणालीने एखाद्या राष्ट्राचे भाग्य उदयाला येते तो पंथ त्या राष्ट्रापुरता चांगला व इतर वाईट, असे सावरकर मानीत असत. हिटलरच्या नाझीवादाने जर्मनीचे भाग्य उजाडले असेल किंवा फॅसिझममुळे इटलीची सरशी होत असेल तर या विचारप्रणाली त्याज्य मानण्याचे कारण नाही असा सावरकरांचा युक्तिवाद होता. त्यामुळे ते सरळ सवाल टाकीत असत " मुसोलिनीने

सत्ता हाती आल्यानंतर अवघ्या चार वर्षांच्या अल्पावधीत आपले राष्ट्र उन्नत स्थितीला आणले. मग फॅसिझमला तुम्ही कशाच्या जोरावर नावे ठेवता ? बोल्शेविझमचे तत्त्व रशियाच्या बाबतीत परिणामी ठरले. जर्मनीला बोल्शेविझम मान्य नाही पण नाझी तत्त्वाच्या जोरावर हिटलरने जर्मनीचे स्वरूप पार पालटून टाकले आहे. जर्मनी काही हिन्दुस्थान नाही. जर्मनीने ज्यू लोकांना बाहेर घालविल्याबद्दल तुम्हाला वाईट का वाटावे ? [२४]

राष्ट्याराष्ट्रातील जीवघेण्या कलहात टिकून राहावयाचे असेल तर हिंदुराष्ट्र शस्त्रसंपन्न असले पाहिजे आणि अद्ययावत शस्त्रास्त्रांच्या बाबतीत इतरांपेक्षा वरचढ होण्यासाठी त्याने विज्ञानाची उपासना केली पाहिजे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात स्वसंरक्षणासाठी इंग्रजी राज्यकर्त्यांना हिंदी लोकांची सेनादलात मोठ्या प्रमाणावर भरती करणे भाग पडले. या संधीचा फायदा घेऊन हिंदूंनी भूदल, नौदल, वायुदल वगैरे सैन्याच्या विभागांत तसेच रणसाहित्य तयार करण्याच्या कारखान्यांत शिरावे आणि लढण्याची तसेच शस्त्रास्त्रे तयार करण्याची विद्या मिळवावी असे सावरकरांनी हिंदूंना आवाहन केले. शाळकरी विद्यार्थ्यांना तसेच महाविद्यालयात शिकणाऱ्यांना सैनिकी शिक्षण सक्तीचे करावे अशी १९४० साली मदुरा येथे भरलेल्या हिंदुमहासभेच्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी मागणी केली. भारत स्वतंत्र झाल्यानंतरही सैनिकी शिक्षण सक्तीचे करण्यात आले नाही म्हणून अभिनव भारत सांगता समारंभाचा समारोप करताना त्यांनी पुन्हा एकदा ही मागणी केली. "प्रचंड नि अजेय शस्त्रबळाची सज्जता करण्याच्या दिशेने" स्वातंत्र्योत्तर काळात सत्ताधारी काँग्रेस पक्षाने काहीच प्रयत्न केले नाहीत. याबद्दल सावरकरांनी कडक टीका करणे साहजिक होते.

राष्ट्र ही संकल्पना सोडली तर शस्त्रबळावर त्यांचा जेवढा विश्वास होता तेवढा अन्य कोणत्याही गोष्टीवर नव्हता. अत्याधुनिक शस्त्रांनी सज्ज असलेले सैन्य नेहमी आक्रमकच असावे लागते, संरक्षक सैन्य ही गोष्टच मुळी अस्तित्वात नाही असेही ते म्हणत. नागा लोकांचे बंड भारत सरकारने सरळ बाँब वर्षाव करून मोडून काढावे असा ते सल्ला देत असत. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, कोणताही प्रश्न असला तरी त्यावर शस्त्रबळाचा वापर हा रामबाण उपाय ते सुचवीत कारण सारे प्रश्न अखेर शस्त्रबळावर सोडवता येतात. राष्ट्रांच्या सीमा देखील खड्ग निश्चित करीत असते अशी त्यांची श्रद्धा होती. त्याच्या या दृष्टिकोणामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणातील राष्ट्याराष्ट्रांमधील सहकार्य, शांततामय सहजीवन जगण्याची शक्यता; सामोपचाराने, वाटाघाटीद्वारा राष्ट्याराष्ट्रांमधील तंटे सोडविण्याची शक्यता, अधिकाधिक संहारक शस्त्रास्त्रांच्या निर्मितीसाठी राष्ट्रांनी चालवलेल्या स्पर्धेचे

...२

मानवी जीवनावर होत असलेले भयानक परिणाम, यांबद्दल सावरकरांनी कधीच चिंता व्यक्त केली नाही. केवळ शस्त्रबळाचा वापर करून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केल्यास सगळे प्रश्न सुटतातच असे नाही, उलट मूळ प्रश्न अधिक चिघळतो. तो कधीकधी जास्त गुंतागुंतीचा होतो याचे अवधान त्यांनी बाळगलेले दिसत नाही.

हिंदूंच्या धर्मभोळेपणावर, देवभोळेपणावर सावरकरांनी कडाडून टीका केली आहे. कारण त्यामुळे हिंदुराष्ट्राचे सामर्थ्य घटते. जातिव्यवस्थेवर आधारलेला हिंदुसमाज जातिवेडामुळे पोखरला गेला आणि फुटला त्यामुळे तो एकसंघ बनवावयाचा असल्यास जन्मजात जातीचा उच्छेद करणे त्यांना आवश्यक वाटले. शूद्र समजल्या जाणाऱ्या हिंदूंना वेदांचे अध्ययन करण्यास किंवा वेदोक्त संस्कार करण्यास असलेली बंदी, व्यवसायबंदी, स्पर्शबंदी, समुद्र पार करण्यास केलेली बंदी, परधर्मियांना स्वधर्मात घेण्यास घातलेली बंदी, रोटीबंदी तसेच बेटीबंदी या सात स्वदेशी बेडया तोडल्याखेरीज हिंदुराष्ट्र बलशाली होणार नाही म्हणून अस्पृश्यता नष्ट करण्यावर त्यांनी भर दिला. सावरकरांचा विज्ञाननिष्ठ जात्युच्छेदक कार्यक्रम हिंदू समाजातील बहुसंख्य परंपरानिष्ठ पुराणमतवाद्यांना रुचणे शक्यच नव्हते. त्यांच्या विरोधाला न जुमानता धडाडीने त्यांनी हिंदुसमाज–सुधारणेचा हा कार्यक्रम अंमलात आणण्याचा कसोशीने प्रयत्न केला. सावरकरांचा समाजसुधारणेचा विचार समता या संकल्पनेवर आधारलेला नव्हता. सर्व माणसे समान अशी त्यांची कधीच भूमिका नव्हती. सर्व हिंदू तेवढे समान असले पाहिजेत यावर त्यांचा भर होता. हिंदुराष्ट्रवादाच्या चौकटीत जेवढघा सुधारणा बसतील तेवढयाचीच त्यांनी तरफदारी केलेली आहे. हिंदुसमाजातील जातिजातीत बेटीबंदी नसावी असे मत मांडणाऱ्या सावरकरांना कोणाही हिंदूने मुसलमान ख्रिश्चनादिकांशी विवाह करता कामा नये असे वाटे. असा विवाह एखाद्या हिंदूने केला तर वधूला किंवा वराला आधी हिंदू करून घ्यावे अशी त्यांची शर्त असे. आंतर्जातीय विवाहाने हिंदूचे संख्याबळ घटत नाही, आंतरधर्मीय विवाहामुळे ते घटते म्हणून वधूस किंवा वरास आधी हिंदू करून घेण्याचा ते आग्रह धरीत असत. अस्पृश्यतेच्या प्रथेमुळे हिंदूसमाजातील एक मोठा गट अलग पडतो व दुरावतो म्हणून ही प्रथा नष्ट करण्याचा निर्धार करणाऱ्या सावरकरांना अस्पृश्य समजल्या गेलेल्या हिंदूंनी अन्याय्य व विषम वागणुकीला विटून धर्मांतर करण्याचा निर्णय घेतला तर तो आवडत नसे स्वबुद्धीने हिंदू धर्म सोडून अन्य धर्माचा स्वीकार करण्याचे स्वातंत्र्य हिंदूना देण्यास ते तयार नसत. स्त्रीपुरुषांची समानताही त्यांना रुचत नव्हती. संततिनियमनाच्या साधनांच्या वाढत्या उपयोगामुळे हिंदूंसकट सर्वच स्त्रियांच्या दास्यविमोचनास मदत होते याकडे त्यांनी लक्ष दिले नाही; कारण हिंदूंचे संख्याबळ कसे वाढेल याची त्यांना अधिक चिंता वाटत असे. समाजातील सर्व क्षेत्रात स्त्रियांनी कर्तृत्व गाजवावे

यापेक्षा राष्ट्रहितासाठी स्त्रीने उत्तम संततीचे पालनपोषण करून वीरमाता बनण्यात धन्यता मानावी यावर ते अधिक भर देत असत.

अंदमानातून परतल्यानंतरच्या काळात ज्या हिंदूराष्ट्रवादाचा त्यांनी मरेपर्यंत पोटतिडीकेने पुरस्कार केला त्या हिंदूराष्ट्रवादी विचारसरणीमुळे त्यांच्या विचार-विश्वाला आपोआपच मर्यादा पडल्या. राष्ट्रहित म्हणजे नेमके कोणाचे हित हे प्रत्यक्षात सांगणे कठीण असते. राष्ट्रवाद हा मुळातच भावनेतून निर्माण झालेला असतो. एक वंश, एक धर्म, एक भाषा, एक इतिहास, एक देश, एक संस्कृती वगैरे अनेक घटनामुळे आपण एक राष्ट्र आहोत अशी भावना एखाद्या लोकसमूहामध्ये मूळ धरते व रुजते या भावनेची उत्कटता व तिचा प्रभाव हा सर्व काळात किंवा लोकसमूहात सारखा नसतो. भूतकाळात आपल्या राष्ट्राने मिळविलेल्या विजयाच्या कथा हे राष्ट्रवादी नेहमीच रंगवून सांगतात. त्यामुळेच हिंदुराष्ट्राच्या इतिहासातील सहा सोनेरी पाने कोणती हे सांगताना सावरकरांच्या वाणीला व लेखणीला भरती येते. राष्ट्रवाद्यांना आपली बाजू नेहमीच सत्याची व न्यायाची वाटत असते. आपल्या राष्ट्राच्या सीमा आपणास हव्या तशा निश्चित व्हाव्यात असा त्यांचा आग्रह असतो. केवळ शस्त्रबळाने त्या शेजारच्या राष्ट्रांना मान्य करावयास लावणे गैर आहे असे त्यांना कधीच वाटत नाही. सर्वसामान्य माणसांच्या भावनांना आवाहन करण्याची शक्ती राष्ट्रवादी विचारसरणीत जात्याच असते. राष्ट्ररक्षणाच्या नावाखाली समाजा-मधल्या असंख्य गोरगरिबांची दिशाभूल करणे मूठभर प्रस्थापितांना सोपे जाते. राष्ट्रवादामुळे विसाव्या शतकात जागतिक शांतता वारंवार धोक्यात आली आहे. महायुद्धाच्या खाईत काही राष्ट्रे होरपळली आहेत, बेचिराख झाली आहेत. राष्ट्रा-राष्ट्रामधल्या उग्र शस्त्रस्पर्धेमुळे सगळचा मानवजातीचा विनाश होईल की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. राष्ट्रवादामुळे उद्भवलेल्या या समस्यांची सावरकरांनी कधी दखल घेतलेली दिसत नाही कारण शस्त्र व राष्ट्र यांच्या पली-कडे सावरकरांनी दुसरे काही पाहिलेच नाही.

संदर्भ–टीपा

१) वि. दा. सावरकर : **समग्र सावरकर वाङ्मय**, खंड १, १९६३, पृ. ११४–१२५

२) वि. दा. सावरकर : **शत्रूच्या शिबिरांत**, दुसरी आवृत्ती, १९७३, पृ. २६-२८

३) विलास खोले (संपादक), सूर्यबिंबाचा शोध, १९८४, मे. पुं. रेगे यांच्या 'सावरकरांचे तत्त्वज्ञान' या लेखात त्यांनी सावरकरांच्या दोनतीन कवितांचे दाखले देऊन स्पेन्सर व सावरकर यांच्या तत्त्वचिंतनातील साम्य व भेद दाखविला आहे. एवढ्याने काम भागते असे श्री. रेगे यांना वाटले असावे.

४) वि. दा. सावरकर : **रणशिंग**, १९५२, पृ. ४८-५०

५) कित्ता, पृ. ९६

६) वि. दा. सावरकर : **क्रांतिघोष**, १९७९, पृ. १७

७) कित्ता, पृ. ५९

८) थिओडीसीयस डॉबझॉन्स्की : **हेरेडिटी अँड द नॅचरल मॅन**, १९६४, पृ. १५४

९) विल्यम अर्विन : **एप्स, एंजल्स अॅन्ड व्हिक्टोरिअन्स**, १९५५, पृ १२२

१०) र. भा. पावगीशास्त्री : **योगवासिष्ठातील तत्त्वज्ञान**, १९५१, पृ. ७०-७३

११) वि. दा. सावरकर : **समग्र सावरकर वाङ्मय**, खंड ३, १९६४, पृ. २९८

१२) वि. दा. सावरकर : स्फुटलेख, १९८२, पृ. २३८-२३९

१३) कित्ता, पृ. २३९

१४) ब्रिआन एम. स्टेबलफोर्ड : **द मिस्टरीज ऑफ मॉडर्न सायन्स**, १९७७, पृ. ३१

१५) वि. दा. सावरकर : **हिंदु-राष्ट्र-दर्शन**, १९४७, पृ १८९

१६) वि. दा. सावरकर : **समग्र सावरकर वाङ्मय**, खंड ३, १९६४, पृ. १८६-१८७

१७) कित्ता : पृ. ५

१८) वि. दा. सावरकर : हिंदु-राष्ट्र-दर्शन, १९४७, पृ. १०
१९) कित्ता : पृ. १७
२०) कित्ता : पृ. ९४
२१) कित्ता : पृ. १३३
२२) कित्ता : पृ. १३६–१३८
२३) कित्ता : पृ. १८२
२४) वि. दा. सावरकर : समग्र सावरकर वाङ्मय, खंड ४, १९६५; पृ. ४२०

विभाग पहिला

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हे नुसते तत्त्वचिंतक नव्हते तर आपण विचारपूर्वक स्वीकारलेली तत्त्वे व ध्येय यांना मूर्त रूप देण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणारे ते एक झुंजार नेते होते. असामान्य शौर्य, असाधारण धैर्य व साहस, अमोघ वक्तृत्व व ओजस्वी लेखन या गुणांच्यामुळे विद्यार्थी दशेतच सावरकरांच्या नावाभोवती एक तेजोवलय निर्माण झाले होते. प्राणांची बाजी लावण्यास सिद्ध असलेल्या त्यागी तरुणांच्या गुप्त संघटनेमार्फत नाशिक, पुणे व नंतर लंडन येथे त्यांनी सशस्त्र क्रांतीसाठी केलेले प्रयत्न, त्रिखंडात गाजलेली त्यांची ती समुद्रातील उडी, नंतर झालेली पन्नास वर्षांची काळ्यापाण्याची शिक्षा, अंदमानच्या कारागृहातील अंगावर शहारे आणणारा त्यांचा भयानक छळ, रत्नागिरीची स्थानबद्धता, गांधीखून खटल्यात आरोपी म्हणून गोवले गेल्याने स्वातंत्र्योत्तर काळातही वाट्याला आलेला बंदिवास, यामुळे सावरकरांची जीवनगाथा ही त्यांच्या हयातीतच अद्भूत रम्य कादंबरीसारखी वाटत असे. आपल्या या विलक्षण आयुष्यातील चढउतार, आशानिराशा, यांची कहाणी स्वत: सावरकरांनीच वेळोवेळी सांगितली आहे. सावरकरांच्या या आत्मपर लेखनातील निवडक तत्त्वचिंतनपर उतारे या विभागात घेतले आहेत.

ज्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचा त्यांनी लहानवयातच ध्यास घेतला त्याचा व्यापक अर्थ त्यांनी पहिल्या उताऱ्यात स्पष्ट केलेला आहे. स्वातंत्र्ययुद्धात लढत असताना अनेकवर्षे कारावास भोगावा लागला. या कारावासात काथ्या कुटण्याचे कंटाळवाणे काम करताना ज्या तत्त्वविचारामुळे दिलासा मिळाला, धीर धरता आला, दुःखद वर्तमानकाळामुळे नाउमेद न होता भविष्यकाळाविषयी आशा बाळगता आली, आत्महत्या करण्याचा विचार बाजूला सारता आला, तो विचार क्रमांक दोन ते सहा या उताऱ्यांत व्यक्त झालेला आहे. सातव्या उताऱ्यात सावरकरांनी काय काय वाचले आणि त्यातले कोणते ग्रंथ विशेष आवडले हे त्यांनी सांगितलेले आहे. बंदिवासात सावरकर आपल्या स्थितीविषयी चिंतन करून मन कसे रिझवीत असत हे आठव्या उताऱ्यावरून लक्षात येईल. खंडित स्वरूपात का होईना भारत स्वतंत्र झाल्याचे आपण 'याचि देही याचि डोळा' पाहिले याबद्दल सावरकरांना वाटणारी कृतार्थता नवव्या उताऱ्यात लख्ख उमटली आहे. तर स्वातंत्र्यसंपादनाचे श्रेय मवाळ तसेच जहाल विचारसरणीच्या त्याचप्रमाणे निःशस्त्र तसेच सशस्त्र मार्गांनी स्वातंत्र्य मिळवू पाहणाऱ्या सर्वांनाच दिले पाहिजे हा विचार दहाव्या उताऱ्यात व्यक्त केलेला आढळेल. स्वतंत्र्यप्राप्तीनंतर देशातील सर्व लोकांनी घटनेचे व कायद्याचे पालन करून आणि शांतता राखून आपले तीव्र मतभेदही मतपेटीतच सामावले पाहिजेत असा सावरकरांचा आग्रह होता. तो अकराव्या उताऱ्यात आढळेल. आपले जीवितकार्य संपूर्णपणे सफल झाले अशा कृतकृत्य भावनेने सावरकर अखेर मरणाला सामोरे गेले. या आत्मार्पणामागची त्यांची भूमिका बाराव्या उताऱ्यांत आढळेल.

१. स्वातंत्र्य म्हणजे काय ?

राजद्रोही ! भयंकर ! वंडखोर ! म्हणून राजसत्ता गुरगुरू लागली. माथेफिरू ! मूर्ख ! म्हणून शहाणे तिरस्कारू लागले. अनिष्ट ! अकाली ! आत्मघात होतील ! म्हणून हितचिंतकहि गळा पडून मागे ओढू लागले. पण आम्हांस शुद्ध नव्हती, वेशुद्धांसारखे, अंगी संचार झाल्यासारखे, आम्हांस जे शब्द ऐकू येत होते, ते शिवाजीचे नि कृष्णाचे, मॅझिनीचे नि गॅरिबाल्डीचे. त्या भूतकाळाचे आणि 'धन्य !' 'धन्य !' म्हणून स्वागत करणाऱ्या त्या अजात भविष्यकाळाचे ! त्याकाळच्या निशेत आणि त्या भविष्यकाळाच्या संचारात आम्ही वेडावलो होतो. तेव्हा देखील आमचें आम्हांसही तें कळत होतें. आमच्या गोविंद कवींनी त्या काळीच रचलेल्या हया कवितेचा त्याविषयीचा तत्कालीन अस्सल पुरावाच जेव्हा सांगू लागला, 'अरे बापरे ! काय जल्पसी ! लागें वेड तुला !! शिपाईबुवा धरून नेइल देईल चोपाला !!' तेव्हा त्यांस अभिनव भारताच्या त्या वेडयांच्या रुग्णालयातील तो वेडा तरुण उत्तर देतो 'वेड ? खरेंच खरेंच !

कंसकंदना, रघुनंदना समान मज साचें ।
वेड लागलें स्वातंत्र्याचें । दास्यमोचनाचें ।
बंधुनो, धरारे मला ।।
म्लेंच्छ पामरा । बधिर मी खरा ।
मज स्वदेशरिपु रक्ताचें ।
पाजावें अमृत साचें ।
तेव्हाच आज मी वांचे ।।
स्वातंत्र्याच्या बंदीमाजी चला मला कोंडा ।
भारत भूवरि विमुक्त फडको परि भगवा झेंडा ।।

पण ज्या स्वातंत्र्यलक्ष्मीचे आम्ही पूजक होतो ती कोणत्या रूपाने आम्हांस प्रकट झाली होती ?

ज्या हया स्वातंत्र्याचें आम्हांस वेड लागलें होतें तें काय केवळ रक्तपिपासू, आततायी, आसुरी राष्ट्रीय स्वातंत्र्यच होतें ? नाही, नाही ! अगदी पहिल्यापासून देशाभिमानाचा अतिरेक हा देशाभिमानाच्या अभावाइतकाच एक अनैतिक दुर्गुण आहे अशी अभिनव भारताची स्पष्ट शिकवण आहे. हिंसा आणि अहिंसा, सत्य आणि असत्य; व्यक्तिराष्ट्र आणि मानुषक (Humanity) यांच्या मर्यादा कोणत्या या विषयाचा मित्रमेळाच्या त्या पहिल्या दोन वर्षात देखील प्रतिसप्ताहाच्या बैठकीत यथेच्छ खल होत असे. व्यावहारिक नीतीचे अत्युच्च तत्त्व जें उपयुक्ततावाद, अधिकांत अधिक मनुष्यांचें हित ज्यांनी साधतें तो सद्गुण, असें जें त्याचें मर्म—त्याचा सुगावा मला लागताच आणि मला तो पटताच मी त्याच्या कसोटीस हीं सर्व द्वन्द्वें लावून त्याच्या हितकारक स्वरूपाच्या मर्यादा स्पष्ट करणारी अनेक व्याख्याने मित्रमेळघात त्याच कालात दिलेलीं होतीं. आमच्यात धार्मिक आणि वेदांतिक प्रवृत्तीचे अनेक सभासद असत.

त्यांनी गुप्तसंस्था, शस्त्रयुद्धप्रभृति शब्दांना पापाचा वास येतो म्हणून स्पष्ट शंका अनेक वेळा घेतलेल्या होत्या. इतकेंच काय, पण राजकीय किंबहुना ऐहिक चळवळी व्यर्थ होत; परमेश्वराचें अधिष्ठान, दैवी कृपा, जपतपादि साधनांनी मिळवून पारमार्थिक मुक्ति मिळविणें हेंच साध्य आणि साधन असे वाद आमच्या बैठकीतून पुंडलीक, बाबा, केव्हा केव्हा म्हस्करप्रभृति देवलसी मंडळी अनेक वेळा उपस्थित करीत. त्यामुळे त्यांच्या समाधानार्थ त्या पारमार्थिक आणि हया ऐहिक चळवळींचा, साधनांचा आणि ध्येयाचा समन्वय घालण्यासाठी वारंवार 'धर्म,' 'मुक्ति', 'हिंसा' अशा तात्त्विक विषयांचा माझ्या त्यावेळच्या ज्ञानानुसार मी यथेच्छ ऊहापोह करी. माझीं त्यावेळची काही ठराविक सूत्रें येथें दिलीं असतां माझी आणि माझ्या मतानुवर्ती असलेल्या संस्थेच्या नीतीकल्पनांची काहीशी कल्पना सहज येऊ शकेल. गुप्ततेचा आणि सत्याचा समन्वय घालताना मी नेहमी सांगावें की, मनुष्यजातीचें हित हेंच सर्व सद्गुणांचें समर्थन आहे. अर्थात् ज्या सत्याने मनुष्याचें एकंदरीत कल्याण साधतें तें सत्य, सद्गुण, धर्म; पण ज्या सत्याने चोरास सोडून संन्याशास फाशी होतें तें सत्यही दुर्गुण, तें सत्यच असत्य. तोच 'जो राती चोरांनी धरिला त्याची करावया मुक्ती । लेश विचार न करिता बोलाव्या तेथ शत मृषा उक्ती ।।' 'धारणात् धर्ममित्याहुः धर्मो धारयति प्रजाः' ही कृष्णनीतीची खरी नीति होय. बाकी केवळ वाग्जाल ! अर्थात् जेव्हा अन्यायी, दुष्ट शक्ति सत्य पक्षांची वाचा जखडून टाकतात, तें वाक्स्वातंत्र्य हिरावून घेतात, प्रकट सदाचरणही अपराध ठरवितात, तेव्हा त्या शक्तीचा पाडाव करण्यासाठी अवश्यक झाल्यास गुप्तपणेही

न्यायाचें दळ एकत्र, संघटित आणि संचालित करणें अगदी धर्मकर्तव्यच होऊन बसतें. श्रीकृष्ण गोकुळात गुप्तपणेंच वाढले. ते तसे वाढताहेत हें सत्याच्या नावाने, कंसास जर कोणी नंद वा वासुदेव अकाली जाऊन सांगता तर त्यांचें तें सत्यच अक्षम्य अधर्म होता. कारण तशा सत्यानेच मानुषकांचें अधिकांत अधिक अहित होतें. वास्तव गुप्तताच तिथे खरी नीति होती, खरा धर्म होता. दिल्लीहून निसटलेले शिवाजीराजे अमक्या पेटाऱ्यात आहेत, अमक्या स्थळी आहेत, असें औरंगजेबास सांगणाऱ्या मराठ्याची जीभच कापून टाकावयास हवी होती. जेवढे विश्वासघातकी, देशद्रोही सूर्याजी पिसाळ तेवढे बहुधा सत्यवादीच नव्हते काय ? गुप्तता हा दुर्गुणही नव्हे, सद्गुणही नव्हे. तिचा उपयोग लोकहितार्थ केला जात आहे की अहितार्थ यावर तिचे सद्गुणत्व वा दुर्गुणत्व ठरविले पाहिजे.

गर्भाधान बहुधा गुप्तच असते-- पण तेवढ्यासाठी तें पाप ठरते की काय ? तीच स्थिति शस्त्रयुद्धाची. रावणाच्या हाती वा कंसाच्या हाती जी तलवार पापी रक्तलिप्सु, अधर्म्य ठरते तीच रामाच्या व कृष्णाच्या हाती यज्ञाग्नीच्या ज्वाळे-सारखी निर्मळ आणि पावक ठरते ! तीच स्थिति देशाभिमानाची. आपले जे न्याय्य अधिकार आहेत, ज्या अधिकारांच्या योगे अधिकांत अधिक मनुष्यांचे हित साधता येतें त्या राष्ट्रीय अधिकारांच्या रक्षणार्थ आणि विकासार्थ जो झटतो आणि झुंजतो तो देशाभिमानच तेवढा सद्गुण होय. पण स्वदेशाच्या राक्षसी हावेला जो बळी पडून अन्य देशांच्या अस्तित्वावर व अधिकारावर अतिक्रमण करतो, मनुष्यास उपद्रव देतो, तो देशाभिमान हा आपल्या वैयक्तिक स्वार्थास्तव दुसऱ्याच्या घरांवर निखारे ठेवणाऱ्या आततायी आगलावेपणाइतकाच अधर्म्य आणि दंडनीय होतो. राष्ट्र हें केव्हाही मानुषकांच्याच हितार्थ आहे, असले पाहिजे. हे तत्त्व आम्ही कंठशोष करून सांगत असावे. इंग्लिशांचा इंग्लिश म्हणून आम्ही केव्हाही द्वेष केला नाही, करू दिला नाही. इंग्लंड हिंदुस्थानवर आततायी आक्रमण जोवर करीत आहेत, तोवरच ते आमचे शत्रु. तो आततायीपणा त्यांनी सोडताच ते आमचे मित्र आहेत. कारण मनुष्यमात्र एक आहे, आपला बंधू आहे. इतकेंच नव्हे, तर इंग्लंडच्या न्याय्य स्वातंत्र्यास जर कोणी दुसरें राष्ट्र अन्यायी दंडेलीने तुडवू पाहील तर आम्ही इंग्लंडच्या मुक्ततेसाठी असेच झटू, झुंजू. ही आमची अनेक वेळा व्यक्त-विलेली प्रतिज्ञा असे. आमची खरी जाति मनुष्य, खरा धर्म माणुसकी, मानवधर्म; खरा देश पृथ्वी, खरा राजा ईश्वर, अशी आमची अत्युदात्त भावना असे. अगदी अशाच शब्दांत आम्ही भावनेच्या भरात ती तेव्हापासूनच व्यक्तवावी. अर्थात् ज्या स्वतंत्रतेसाठी आम्ही झुंजत होतो तिचेही स्वरूप असेच अत्यंत व्यापक असे. सद्यः-परस्थितीत हिंदुस्थानात इतर सर्व प्रकारची स्वतंत्रता मुक्ति, व्यक्तींची पारमार्थिक मुक्तिदेखील राजकीय स्वतंत्रतेवाचून खुरटली आहे, प्रतिबद्ध आहे, कुंठित आहे,

म्हणून ती राष्ट्रीय स्वतंत्रता हेंच आमचे सद्यःकालीन ध्येय, लक्ष्य होतें. धर्म, पारलौकिक साधना, आत्मिक उन्नति ही राजकीय दास्याने कशी जखडली जाते आणि धर्मासाठी देखील आज राजकीय स्वातंत्र्य कसे अवश्य आहे हें तर मला वारंवार सिद्ध करून द्यावें लागे. रामदासांच्या 'तीर्थक्षेत्रें भ्रष्टलीं' प्रभृति वचनांवर कितीदा तरी प्रवचनें करावीं लागत. बळावाचून तत्त्व, शक्तिवाचून न्याय, प्रयत्नावाचून दैव, भौतिकावाचून आत्मिक, ऐहिकावाचून परमार्थिक पंगु आहे, अपूर्ण आहे हें विवरावें लागे आणि त्या विवरणार्थच अभिनव भारताचे तत्कालीन निकटतम ध्येय जें राष्ट्रीय स्वतंत्रता तें व्यक्तीच्या व राष्ट्राच्या अंतिमतम पारमार्थिक ध्येयाला, मुक्तीला विसंवादी नाही. इतकेंच नव्हे, तर त्या पहिल्या स्वातंत्र्यतेचा परिपूर्ण विकास म्हणजे दुसरी स्वतंत्रता ही मुक्ति असते, हें मला वारंवार विशद करावें लागे. कारण त्यायोगेच पहिल्या राष्ट्रीय चळवळीस पापी निदान बंधक समजून केवळ वैयक्तिक मुक्तीचाच अवलंब करू इच्छिणारी आमच्यातील देवलसी मंडळी या राष्ट्रीय,या लोकल्याणकारक राज्यक्रांतीची अभिमानी आणि अनुयायी करून घेता येई. यापुरती रामदासांनी शिवाजीस उपदेशिलेला दासबोध ही ही आमची एक स्मृतिच असे. तो देवलसी मंडळींनाही देशलसी बनवावयास फार उपयोगी पडे. त्या वेळी अनेक साधु आणि संत, हरिदास आणि पुराणिक, गोसावी आणि बैरागी, आम्हांस जेव्हा जेव्हा हा राजकीय खटाटोप व्यर्थ आहे, ईश्वराची कृपा तेवढी असली की झालें, म्हणून उपदेशीत. तेव्हा भारतीय राजकीय स्वतंत्र्य हेंच त्या ईश्वरी कृपेचें हचा युगाचे खरें साधन होय; स्वराज्यावाचून स्वधर्म केवळ पंगु आहे असें आम्ही अशाच कोटिक्रमांनी वारंवार सिद्ध करीत असू. अभिनव भारताचें आदिध्येय जी स्वतंत्रता तिचा अर्थ किती उदात्त स्वरूपाचा होता; व्यक्तीच्या, राष्ट्राच्या आणि मानवाच्या ऐहिक नि पारलौकिक कर्तव्याचा समन्वय आणि संपूर्णता म्हणजेच स्वतंत्रता आणि इतर कोणत्याही तामसी आकुंचित अर्थी नसून, त्या अत्यंत व्यापक अर्थीच आम्ही प्रथमपासूनच त्या ध्येयास कसें वाहून घेतलेलें होतें, हें त्या तीनचार वर्षांतच रचलेल्या माझ्या स्वतंत्रतेच्या स्तोत्रातील खालील पंक्तींची तत्कालीन साक्षही सिद्ध करील –

जयोस्तु ते श्रीमहन्मंगले ! शिवास्पदे ! शिवदे ! ।
स्वतंत्रते भगवती त्वामहं यशोयुतां वंदे ॥ १ ॥
राष्ट्रांचें चैतन्य मूर्त तू ! नीतिसंपदांची ।
स्वतंत्रते भगवती, श्रीमती राज्ञी तू साची ॥ २ ॥
जें जें उत्तम, उदात्त, उन्नत, महन् मधुर, तें तें
स्वतंत्रते भगवती, सर्व तव सहचारी असतें ॥ ३ ॥
मोक्ष मुक्ति हीं तुझीच रूपें तुलाच वेदांती ।
स्वतंत्रते भगवती, योगिजन परब्रह्म वदती ॥ ४ ॥

हें अधम रक्तरंजिते । सुजन पूजिते । श्री स्वतंत्रते ।
तुजसाठी मरण तें जनन ।
तुजवीण जनन तें मरण ।
तुज सकल संपदा शरण ।
भरतभूमिला दृढालिंगना, कधि देशिल वरदे ।
स्वतंत्रते भगवती त्वामहं यशोयुतां वंदे ॥ ५ ॥

इंग्रजांसुद्धा अखिल मनुष्यमात्राचें कल्याण व्हावें म्हणून, मानुषकाचा परम विकास व्हावा म्हणून, आम्हांस स्वतंत्रता हवी होती. मनुष्याची आत्मिक उन्नतीच नव्हे, तर मानसिक उन्नति, नैतिक उन्नति आणि उन्नतीही राजकीय पारतंत्र्याने खुंटते म्हणून आम्हांस भारताची राजकीय स्वतंत्रता हवी होती. तीस कोटी मनुष्यांच्या माणुसकीचा विकास अवरुद्ध करणारे भारताचें राजकीय पारतंत्र्य मनुष्य जातीच्याही अधःपतनास कारण होणार असल्यामुळें त्याचा उच्छेद, शिरच्छेद करणें हें आम्ही आमचें राजकीय कर्तव्यच नव्हे, तर धार्मिक कर्तव्यही समजत होतो. जसा रावणाचा शिरच्छेद हें रामास कर्तव्य वाटलें. कंसाचा शिरच्छेद हें कृष्णास कर्तव्य वाटलें. जुन्या अवताराप्रमाणेच परित्राणाय साधूनाम् विनाशायच दुष्कृताम्, धर्मसंस्थापनार्थाय, हा अभिनव भारताचाही नवा अवतार देवाने धारण केला आहे, अशी आमची निष्ठा होती. आणि ती जवळ जवळ अशाच वचनांनी, युक्तिवादांनी, शास्त्राधारांनी आणि तत्त्वप्रवचनांनी आम्ही अनेक प्रसंगीं आणि अनेक प्रकारांनी अगदी प्रारंभापासूनच प्रकटवीत आलो.

[समग्र सावरकर वाङ्मय– खंड १ला – चरित्रखंड – माझ्या आठवणी पृष्ठ २४५ ते २५०]

२. आयुष्य म्हणजे काथ्याकूट

हूं चल दे तोंड तिला. काथ्या कुटावयाचा इतकेंच ना ! हा रे वेड्या मना ! त्यात हलकेपण तें काय आहे ! आयुष्य व्यर्थ जातें ? अरें हें आयुष्यही स्वतःच एक काथ्याकूट आहे. पंचमहाभूतास पिळून वळून हें आयुष्याचें चरहाट वळावयाचें, तेच ते तंतू जोडून जोडून लांबवीत बसावयाचें व शेवटी सडत आलें की, मृत्युच्या ' मोगरी ' ने कुटून पुनः काथ्या करून पंचमहाभूतांच्या ढिगात मिसळून द्यावयाचें !

सकाळ झाली की संध्याकाळ, संध्याकाळ झाली की सकाळ, सगळी काथ्याकूट. आपण वनस्पति खात खात जगावयाचें, जगत जगत मरावयाचें, मरताच त्या हाडा-मांसास वनस्पतींनी खावयाचें, सगळी काथ्याकूट. तेजोमेघाची सूर्यमाला, सूर्यमालेची पृथ्वी, पृथ्वीची एखाद्या धूमकेतूशी टक्कर उडाली की पुन्हा तेजोमेघ, सगळी

काथ्याकूट ! तशीच, त्याचाच व त्याचाच अवश्य व अपरिहार्य भाग म्हणून, हें वळलेलें चऱ्हाट उकलून कुटण्याची आमची काथ्याकूट. जर ती महान् काथ्याकूट महत्त्वाची असेल, जर तीत आयुष्य व्यर्थ जात नसेल, तर हीही एक छोटीशी काथ्याकूट कर्तव्यच आहे. कारण त्या महान् काथ्याकुटीचा हाही अपरिहार्य घटक आहे. कारण तो घडत आहे. (समग्र सावरकर वाङ्मय – चरित्रखंड – माझी जन्मठेप – पृष्ठ २७२. जगातील काथ्याकूट)

३. प्रतिकूल तेच बहुधा घडेल

माझ्या या कष्टमय हेतुपूर्वक स्वतःवर कोसळून घेतलेल्या संकटाचे पर्वताखाली चिरडलेल्या आयुष्यात जर कोणता एखादा नियम अतिशय कडू पण अतिशय हितपरिणामी झाला असेल तर 'सदोदित प्रतिकूल तेंच घडेल' हें गृहीत धरून त्यास तोंड देण्याची मनाची सज्जता करून ठेवणें हाच होय.

ज्यांचा ज्यांचा सर्वतोपरी असहाय अशा कालात, देशात वा परिस्थितीत जन्म झाला असेल, आणि तरीही त्या परिस्थितीशी भयंकर झुंज खेळून तिला चीत करून, तिच्या छातीवर उभे राहून कोण्या नवयुगाची, कोण्या महान् ध्येयाची उषा ज्यांना पहावयाची असेल त्यांना त्यांना 'प्रतिकूल तेंच बहुधा घडेल हें गृहीत धरून त्यास तोंड देऊ' या नियमाचें हें हालाहल प्यायलेच पाहिजे. प्रतिकूल तेंच घडणार आणि मी त्यास तोंडही देणार असा निर्धार केला असता क्वचित् अनुकूल तेंच घडलें-आणि असहाय पिढीत जन्मलेल्यांच्या जीवनात तोच संभव अधिक – तर मात्र एकाएकी निराशेच्या कोसळणाऱ्या पहाडाखाली धैर्याचा चक्काचूर होऊन गेल्याविना सहसा राहत नाही. सिद्धीच्या मानस सरोवरावर क्रीडा करण्याचें ज्या पिढीचें भाग्य असेल ते राजहंस सुखेनैव मुक्ताफळ भोजन करून, बिसतंतूंचा फराळ करोत ! परंतु प्रयत्नांच्या मृतसरोवराच्या विषारी प्रदेशातून ज्या पिढीस मार्ग कंठावयाचा आहे तिने प्रतिकूलाचे लोखंडाचे चणेच खावयाची व पचवावयाची सवय ठेवली पाहिजे. [समग्र सावरकर वाङ्मय-खंड १ ला-माझी जन्मठेप. पृष्ठ २७३-२७४ प्रतिकूल तेंच बहुधा घडेल]'

४. माणूस आणि निसर्ग

समुद्र शांत आहे, एखाद्या सरोवरासारखा शांत आहे, आणि त्यावर, हिमावर मुले आनंदाने थंड प्रदेशात निसरत-घसरत जातात तशी ही आगबोट सलील विहरत चालली आहे. सूर्य पृथ्वीकडे टक लावून निरीक्षण करीत आहे.

जणू काय मनुष्यजातीने जडावर मिळवलेला हा अपूर्व विजय पाहून तो थक्क झाला आहे ! केवढा समुद्र, केवढी ही चिमुकली नाव ! पण त्या नावेतल्या एका इवलाल्या खोलीत बसलेला एक मनुष्य त्या समुद्रास माणसाळलेल्या एखाद्या हत्तीप्रमाणे सुकाणूच्या अंकुशाने वाटेल तस वळवीत कसा अर्ध्या वचनात ठेवीत आहे ! मनुष्याच्या जडावर केवढा हा विजय ! एक दिवस, कोणी सांगावें, हा सूर्य मनुष्याने मनावर मिळवलेल्या नव्या विजयाने असाच थक्क होऊन पृथ्वीकडे पाहात राहील. मनुष्याने मनातील राक्षसास जिंकून पीडक आणि पीडित यांचा एकमेकास छेद देऊन, आणि आपल्या पायातील दास्यत्वाच्या बेडया तोडून तो मुक्त झालेला आहे आणि तत्रापिही प्रेमपाशाने बद्ध झालेला असा धन्य दिवसही, न जाणो एका काली उगवेल आणि हा सूर्य पृथ्वीकडे त्या नूतन विजयाने आनंदित होऊन पुन्हा असाच पाहील ! मनुष्यजातीचें स्वातंत्र्य हें केवळ मनुष्यमात्राच्या प्रेमाचें काय तें दास राहील. त्या हया धन्य दिवशी तो दिवस आणण्यासाठी आत्म-बलिदान करणाऱ्या सर्व भुक्तकष्टांचे आणि हुतात्म्यांचे कष्टभोग आणि हौतात्म्य सफल होईल. मनुष्यजाति त्यास धन्यवाद देईल. त्या विजयांचें तें महान् श्रेय ज्यांस ज्यांस मिळणार त्यांत मीही एक विभागी असेन. केवढा मोठा उज्ज्वल हा भविष्यकाळ !

पण वर्तमानकाळ ? तुझी प्रस्तुतची स्थिति ? स्वप्न, स्वप्न ! मूर्खा, भविष्य-काळाचें तुला तें पडत असलेलें केवळ स्वप्न होय. अशीं स्वप्नें पाहत पाहत आज वेदकाळापासून मनुष्यांचीं युगेंच्या युगें गेलीं. केवळ त्या भविष्यांच्या स्वप्नांचा उप-योग वर्तमानाच्या रात्रीच्या घोर मोहांधकारात क्षणभर प्रकाश देणें इतकाच होय. हाच समुद्र पाहा. केवढी ही अतर्क्य, अदम्य, राक्षसी शक्ति ! त्याच्या अंगावर ही नाव निसरत गम्मत करीत चालली आहे; तो चालू देतो म्हणून. जसा तो एखादा प्रचंड राक्षस एखाद्या घुंगरुटाचें धाष्टर्य क्षणभर आणि पटकन चापटी मारून करून टाकतो त्यास होतें की नव्हतेसें ? तसें हें तुम्हा घुंगरूट मनुष्यांचें धाष्टर्य, ही प्रचंड सामुद्रिक शक्ति खवळेल तर हें खंडच्या खंड उचलून चुरून सुपारीसारखे झटकन गिळून टाकील ! तर पत्ता लागू देणार नाही की, इकडे कोणी आशिया खंड होतें की नव्हतें ! किती यःकश्चित् हा मनुष्य ! आणि त्या यःकश्चित् मनुष्यातील मी आज किती यत्किंचित्कर व्यक्ति झालेलो आहें !! आज हया जगातील टाकाऊ ठरलेल्या अधमांत आणि दुष्टांत अंग चोरून उघडे बसलेल्या हया बंदिवानांच्या ओळीत एका दुर्लक्षित कोपऱ्यात मीही अंग चोरून उकिडवा बसलेलो आहे; हातात हातकडी, पायात बेडी, इतका यःकश्चित् की त्या बोटीच्या झाडूवाल्यांनीही मजकडे सहानुभूतिपूर्वक बोट दाखवून ' बालिस्टरबाबू ' म्हणून दया करावी. त्या पाणी ओतून लाकडे धुणाऱ्या नोकरानेही म्हणावें, ' ए कैदी, उठो इधरसे ! बैठ उधर !'

आणि मला तसें वागणें भाग पडावें ! [समग्र सावरकर वाङ्मय – खंड १ ला, – माझी जन्मठेप – पृ. ३१०–३११]

५. प्रसंगी आत्मघात हे आत्मकर्तव्यच ठरते

कोणाची चर्चा करू नये, कोणास कळवू नये. पण तो कोलू फिरवीत असता घामाने लिडबिडलेल्या अंगावर उडणारी ती भुशी पिसून पिळून निघालेलें पीठ आणि कचरा चिकटलेलें तें घाणेरडें-उघडे-बागडें शरीर पाहून मनानें वारंवार बंड करून उठावें, ' स्वतःचा तिरस्कार वाटू लागावा. असलें दुःख आता का सोसतोस ? हचा तुझ्या शरीराचा आणि कर्तृत्वाचा राष्ट्रेंच्या राष्ट्रें उदयास आणण्यासाठी उपयोग व्हावा; – आता तें मातीमोल ठरलें. मग या अंधकारात उगीच कष्टत कां पडतोस ? याचा कार्याला – तुझ्या मातृभूमीच्या उद्धाराला – आता कवडीचा उपयोग नाही, तिकडे तुझ्या हालअपेष्टांचें अवाक्षरही कळत नसेल, मग नैतिक परिणाम तर दूरच ! –असा कार्याला उपयोग नाही, तुझ्या स्वतःला उपयोग नाही इतकेंच नव्हे तर केवळ भारभूत होत आहे–तर मग हें जीवन व्यर्थ का धारण करतोस ? बस्स, जो उपयोग त्याचा व्हावयाचा तो होऊन गेला. आता चल दोरीच्या एका हिसक्यासरशी करून टाक त्या जीवनाचा अंत ! हा समुद्रमंथनासच उपयोगी पडावा म्हणून निर्माण झालेला कर्तृत्वशक्तीचा मेरुदंड हचा यःकश्चित् कथलीतलें ताक घुसळविण्याचें कामाला लावून त्याचा स्वतःच अनादर कां करतोस ?' पुनः पुनः मनाने म्हणावें, ' आता जगणें व्यर्थ; आत्मघातच आत्मसन्मान होणार आहे.' नोव्हालिस आदिक कित्येक नीतिविशारदांची आणि ऐतिहासिक उदाहरणांचीही आठवण व्हावी की प्रसंगीं आत्मघात हें आत्मकर्तव्यच ठरत असतें.

[समग्र सावरकर वाङ्मय–खंड १ ला—माझी जन्मठेप–पृ ३७३]

६. आत्महत्त्येचे आकर्षण

त्या दिवशी आत्महत्त्येचें आकर्षण मला एकसारखें ओढीत होतें. ती मघाची शून्य स्थिति हेंच मरण. तें तर हचा जीवनाहून निःसंशय गोड आहे ! मला ज्या दोन चार वेळा माझ्या विवासनातील यातना असह्य होऊन आत्महत्त्या अत्यंत आकर्षक वाटू लागली त्यापैकी पहिली वेळ म्हणजे मार्सेलिसहून परत धरलो गेल्यानंतर एडनच्या आजुबाजूस भयंकर उष्म्यात आणि त्रासात बोटीवर बंद केलेली होती ती होय. दुसरी ही कोलूतली त्या चक्कर आलेल्या दिवसाची. दोनही वेळी मनाची आणि बुद्धीची झुंज चालता चालता बुद्धि जवळ जवळ चारी मुंड्या चीत

पडण्याचा प्रसंग आलेला होता. आणखी एक दोन वेळी तो प्रसंग पुनः यावयाचा होता. त्या रात्री खोलीच्या ज्या खिडकीच्या गजास टांगून बहुधा बंदिवान फाशी जात त्या खिडकीकडे मी लुब्ध दृष्टीने चार पाच वेळा तरी पाहिले असेल. बुद्धीचा आणि मनाचा तो संवाद मी तिन्हाईतपणे जसा काही ऐकत होतो तो पुढे मी एका कवितेत ग्रंथिलाही होता. वारंवार मनाच्या वरील कोटिक्रमास विवेकाने उत्तर द्यावें. ' वेड्या, हा तुझा अहंकार ! समज की, तुझे कर्तृत्व म्हणजे एक राष्ट्राचें राष्ट्र उद्धारता येणारी प्रचंड गति देण्यास क्षम असणारे यंत्र आहे; पण आता त्याचें काय ? त्याचा योग्य आणि यथाप्रमाण उपयोग होत नाही ! एका अर्थी खरें. पण अशा रीतीने जेथे इतर यंत्रें चुरून जातात तेथे गुप्त, अज्ञात यातनांचा मार सहन करण्यात उपयोगी पडावें, तें कार्य त्यांच्याकडून करून घ्यावें म्हणूनच हें कर्तृत्वशक्तीचें यंत्र केलें नसेल कशावरून ? राष्ट्रोद्धाराच्या झुंजांत अनेक महत्त्वाचीं नाकीं लढवावीं लागतात त्यांत बंदिगृहाचा मोर्चा सगळ्यांत कठीण आणि तरीही अत्यंत आवश्यक असतो. मग तो लढविण्यास तुमची योजना झाली आहे हा काय कर्तृत्वाचा थोडा गौरव झाला ?

आणि एका अर्थी कसलें कर्तृत्व घेऊन बसला आहेस ? तुझें, त्यांचे, ह्या सर्व मनुष्यजातीचें तर काय पण हचा सूर्याचे देखील हचा प्रचंड विश्वाच्या उलाढालीत खरे पाहिलें असता तिळमात्र तरी महत्त्व आहे काय ? एखाद्या सावणी फुग्यासारखा तो आता स्वतःच्या महत्त्वाभिमानाने फुगत उडालेला दिसतो आहे. पण एका क्षणार्धात विश्वाची मूळ शक्ति दुसरा एखादा खेळकर फुगारा मारताच फुसदिशी नाहीसा होईल, तरी विश्व चालेलच ! म्हणून विवेक कर. सापेक्षात जे कर्तव्य आहे त्याची खरी परीक्षा येथेच आहे. या कारागारात जो देशसेवा करील तो खरा देशसेवक. जें मूल्य दिल्याविना देशोद्धार होणेंच नाही तें कारापीडनाचें मूल्य देणें म्हणजे जीवन व्यर्थ जाणें नव्हेच नव्हे. कीर्तीचें, लौकिकाचें, मनाचें बोट त्यांस लागलेलें नाही, पण म्हणूनच तें अधिक अव्यर्थ होय. आणि जर मरावयाचेंच जर निदान ... मग असें का मरतोस ? तू सोसलेल्या यातनांचा सूक्ष्म परिणाम देशावर होईलच होईल. परंतु तें जर तुला खरे वाटत नसेल आणि ही बातमी देखील देशास कळणार नाही मग त्याचा नैतिक परिणाम कोठला होणार ? मग व्यर्थ कष्ट कां म्हणून ? मरणारच असशील तर असा कुत्र्यांचे मोलाने आपल्या हाताने कां मरतोस ? त्यांना तुला फाशी देऊ नये म्हणून दया आली होती की काय ? मग जें त्यांना करता आलें नाही तें तू त्यांच्याकरता स्वतःचे हातानें करून आपल्या पक्षाचे हानीत आणि अपजयात आणखी भर कां घालतोस ? जर मरणें तर त्या सेनेतील तू एक सैनिक आहेस त्या सेनेचें तसेंच एखादें कार्य करून मग तरी मर. फाशी घेऊन नव्हे तर ... आपल्या एका जीवास्तव ... असा मर !

[समग्र सावरकर वाङ्मय-खंड १ ला माझी जन्मठेप पृ. ३०४-३७५]

७. मी काय काय वाचले

इंग्रजी पुस्तकांचा भरणा तर मुख्य भागच होता. स्पेन्सरच्या दोन्ही मीमांसा, समाजशास्त्राचे त्याचे सर्व भाग, जवळ जवळ सारा हर्बर्ट स्पेन्सर, मिल, डार्विन, हक्स्ले, हेकेल, इमर्सन यांचीं बहुतेक पुस्तकें तेथे होतीं. कार्लाइल, मेकॉले, गिबन यांचे इतिहास; शेक्सपीयर, मिल्टन, पोप यांचे समग्र ग्रंथ; अबटचा नेपोलियन, बिस्मार्क, ग्यारिबाल्डी, मॅझिनी इत्यादिकांची चरित्रें; इटली, इंग्लंड, अमेरिका, हिंदुस्थान यांच्या इतिहासावरील प्रख्यात ग्रंथ; डिकन्स, टॉलस्टॉय, क्रोपाट्कीन यांचे बहुतेक ग्रंथ; विवेकानंदांच्या आणि रामतीर्थांच्या सर्व ग्रंथांच्या तीन तीन प्रती; ट्रीस्क आणि नीच्छे यांचे राजनीतीवरील निबंध; प्लेटोचे रिपब्लिक; 'स्टेट' कॉन्ट्रॅक्ट इत्यादि शासनशास्त्रीय प्राचीन आणि अगदी नव्यातील नवीन ग्रंथ अशीं कितीतरी उत्तमोत्तम पुस्तकें तिथें राजबंदिवानांनी संग्रहीत केली होतीं. थिऑसफीच्या ग्रंथांचीही वाण नव्हती. प्रथम वरील ग्रंथांतील राजकीय संबंधाच्या प्रत्येक ग्रंथागणिक आम्हांस भांडणें करावीं लागलीं तेव्हा तें मिळू शकलें. एका प्रगतिप्रिय पर्यवेक्षकास वगळलें तर सर्व अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत तें ग्रंथालय सलत असे. हिंदुस्थानातून कोणी बडा अधिकारी आला म्हणजे वारी तीं राजकीय पुस्तके लपविण्याची व्यवस्था करी, नाही तरे तो रागे भरायचा ! परंतु पुढे पुढे तें सर्व पचलें इतकेंच नव्हे तर ग्रंथालयात युरोपियन अधिकारी आपलीं पुस्तके ठेवूं लागले आणि त्यातील आपण वाचावयास नेऊ लागले. अशाच एका अधिकाऱ्यानें ॲनी बेझंटच्या आत्मवृत्तापासून तो कृष्णमूर्तीच्या 'माझ्या गुरुदेवापर्यंत' थिऑसफीचीं अनेक पुस्तके दिली होती.

या सगळ्या ग्रंथांचें आम्ही अध्यवसायपूर्वक अध्ययन केले. तेथील ग्रंथ असा वाचल्यावाचून ठेवला नाही. कित्येक अनेकदा वाचले आणि राजबंदीतील अनेकांकडून इतिहास, अर्थशास्त्र आणि शासनशास्त्र यांवरील पुस्तकांचें अध्ययन करविलें. राजबंदिवानाचे विचार प्रगल्भ व्हावे म्हणून निबंध लिहून घ्यावेत. मागे वर्णिलेल्या रविवारच्या सभांतून त्यांचीं व्याख्याने करवावीं, 'स्टेट' सारखीं कठीण पुस्तकें अगदी महाविद्यालयातील वर्गासारखी दहा पांच जणांस एकत्र करून शिकवावीं.

संस्कृत ग्रंथांपैकी आम्ही जीं पुस्तके, काव्यें मागविलीं तेवढींच तेथे होती. बाकी एखाद दुसरे पुस्तक कोणा दुसऱ्याचें असेल नसेल. परंतु भाषांतराच्या पुस्तकातच अनेक संस्कृत ग्रंथ मूलसुद्धा छापलेले होते. सर्व उपनिषदें, ऋग्वेद,

रामायण, महाभारत, ब्रह्मसूत्रे, ईश्वरचंन्द्रांच्या कारिका, योगसूत्रें इत्यादि संस्कृत ग्रंथांचें परिशीलन तेथे करता येई.

बंगाली वा मराठी वा संस्कृत वा इंग्रजी वा पंजाबी – नवीन पुस्तक प्रसिद्ध झालेलें कळलें की तें महत्त्वाचें दिसल्यास तिकडे मागविलें गेलेंच म्हणून समजावें. अशा रीतीने जरी स्वदेशापासून आणि एका अर्थी जगापासून आम्ही दूर जाऊन बंद केलेलो होतो तरी स्वदेशाच्या नाडीतली आंदोलनें एकसारखीं आमच्या हृदयात प्रतिध्वनित होत होतीं. जगातील प्रत्येक नवीन लहर आम्हा जगद्बहिष्कृत निर्वासितांच्या मज्जापीठाच्या तटास स्पर्शल्याविना राहात नव्हती.

राजबंदिवानांच्या उच्च विचारास सारखी चालना देण्यासाठी हें ग्रंथालय इतक्या मोठ्या स्वरूपास आले नव्हतें तेव्हा आम्ही नाना युक्त्या योजीत असू. उदाहरणार्थ एकदा हाच प्रश्न सर्वांस टाकला की पेशवाई बुडाल्यापासून हिंदुस्थानात नांव काढण्यासारखे राष्ट्रीय पुरुष असे कोण उत्पन्न झाले त्यांचीं नावें प्रत्येकाने सांगावी. त्यात ज्यांस सर्वांत अधिक मतें मिळतील असे शेवटी बारा निवडले जातील. एक आठवडाभर तीच चर्चा चालून शेवटी नामावल्या आल्या पण त्यांत सत्तावनच्या क्रांतिवीरांतील एकाचेही नांव कोणास सुचले नाही राष्ट्रीय पुरुषांत क्रांतीतील एक नांव एकाने काय तें सुचविले ! आणि तें त्या स्त्रीचें – लक्ष्मीबाईचें ! बाकीच्यांना तेंही सुचले नाही. तेव्हा मग त्या इतिहासावर आम्ही अनेक वेळा बैठकींतून, व्याख्याने, संवाद, व्यक्तिशः चर्चा केल्या. बंगालीत प्रसिद्ध झालेलें रजनीकान्तांचे 'शिपाई युद्ध' हे पुस्तक आणविले. त्या पुस्तकाचें नांव कसें चुकीचें आहे, ते क्रांतियुद्ध शिपायांचें युद्ध कसें नव्हतेंच, हे विशद करण्याचा प्रयत्न केला. प्रत्येकाचें तोंडी तात्या टोपे, नानाराव पेशवे, कुंवरसिंग, लक्ष्मीबाई इत्यादि नांवें रूळलेलीं असत.

थॉमस एकेम्पिसचे 'इमिटेशन्स' हे आमचे फार आवडते पुस्तक असे. कुराण इंग्रजी भाषांतरात प्रथम वाचले. नंतर बंगाली भाषांतर चाळले; हिंदुस्थानच्या तटास पोचल्यावर मराठी भाषांतर चाळले; त्याव्यतिरिक्त अगदी मूळ वाचले म्हणजे त्याचा खरा स्वाद मिळेल असा माझ्या मुसलमान मित्रांचा अभिप्राय पाहून त्यांच्याकडून प्रत्येक पान त्यांच्यासारखेच शुचिर्भूत मने एकाग्र बसून वाचून आणि हिंदी भाषांतर करवून ऐकले. महमद अली (इंग्लंड) यांनी कुराणास नवीन पाश्चिमात्य उपनेत्रांतून पाहून केलेले अगदी आधुनिक भाषांतरही वाचले. बायबल समग्र मागे दोनदा वाचल्याचे लिहिलेच आहे. उपनिषदे एकदा मुख्य दशोपनिषदांतील एकेक घेऊन एकेक महिना त्यावर रात्रिरात्रि विचार करीत वर्षभर अभ्यासिली. योगवासिष्ठही एकदा वाचावें म्हणून सहज घेतले, तों त्याची गोडी इतकी लागली की वेदान्तावर झालेल्या, आमच्या अवलोकनात आलेल्या ग्रंथात असा सुंदर ग्रंथ

विरळा असे वाटू लागले. काय ते निरपवाद सिद्धान्त-आणि काय ती सुंदर कविता की, जिच्या मोहक मुखातील मधुर सुस्वरात ते सिद्धांत श्रवणास आणि मनास तल्लीन करीत आत्म्यास परिसावयास मिळतात. तत्त्व आणि कविता यांची सांगड संस्कृत कवीच घालू जाणत. भगवद्गीतेचा विश्वदर्शनाचा अध्याय पहा, किंवा कालिदासाच्या काव्यातील विष्णुवर्णनाचे श्लोक किंवा कुमार संभवातील 'स्वयंविधाता' तपसः फलानां केनापि कायेन तपश्चचार !' अशी आकाशासारखी अनाकलनीय व्यापक अर्थाला एखाद्या सुंदर सरोवरासारख्या श्लोकात चटकन प्रतिबिंबित करणारी सरस वचने पहा !

आणि खरोखरच कवितेचा आणि तत्त्वाचा विरोध असणेच अशक्य आहे. कविता सौंदर्यास भुललेली आणि सौंदर्य तेंच की जें निरपवाद परिपूर्ण आनंद देतें. तेंच सत्य ! इंद्रियमनबुद्धि यांच्या विरोधास लवलेश वाव न उरू देता जें शंकाकुल आत्म्यास एकाएकी निःसंशय आणि संपूर्ण समाधानात डोलवितें तें सत्य. तेंच समाधान—समाधीचें सौंदर्य !—आणि म्हणूनच कविता तेथेच, 'कंठे स्वयंग्राह निषिक्तबाहुः' होऊन आपल्या कामाची परम तृप्ति पावते.'

हे वेदान्तविषयक ग्रंथ वाचताना एक मात्र अनुभव आम्हाला वारंवार यावा, की तत्काळ शिराशिरा आणि तंतुतंतु खिला, समरस, तल्लीन होऊन पुनः कर्मच्या निरर्थक उठाठेवीत पडण्यास अगदी इनकार करीत ! कर्मोत्साह पार मावळून जाई- 'नैष्कर्म्यसिद्धि परमां' हे शब्द सारखे गुणगुणत, स्वदेशसेवा, परोपकार मूकदया इत्यादि अत्युदार भाषाही क्षणिक आणि पोरखेळ वाटू लागत. हीच स्थिति भूगर्भ-शास्त्रातील किंवा ज्योतिषशास्त्रातील पुस्तकें वाचताना पण निराळ्या कारणामुळे होई. या शास्त्रातील कालाचे आणि सृष्टीचें त्रासदायक भव्यत्व पाहून आणि पृथ्वी आणि व्यक्तिजीवन तुच्छसें होऊन निराशापूर्ण कर्मवैय्यर्थ्य वाटावें आणि दुःख व्हावें, परंतु वेदान्ताच्या सुंदर सिद्धांताचे आनंदात कर्माचें वैयर्थ्य दुःखदायी होत नसे. बाहुलीचें खेळणें खेळणें आहे हें कळून होणारा हुरूपमोड त्या खेळण्याच्या आनंदाहून अनंतपटीने देणारी ती प्रत्यक्ष सखीच मिळाल्याने नाहीसा होऊन तो कर्माच्या भुसाच्या बाहुलीचा त्याग सुखकारकच होई. भौतिक शास्त्रांनी कर्मवियोग होऊन त्रास वाटे. वेदान्ताने कर्मत्याग करावासाच वाटून तो सुखकर होई. कित्येक वेळा योगवासिष्ठादिक ग्रंथांचे श्लोक म्हणता म्हणता हातातले दोरखंड हातातच राहून मन इतके कर्मपराङ्मुख व्हावें की, तास तास अवयव देहास आहेत कीं नाहीत याचें भानही उरू नये. पाऊल पुढे पडू नये. वाटे सर्व सोडून द्यावें, प्रचारकार्यदेखील पोरखेळ भासावा, शेवटी प्रकृतीनें प्रवृत्तीस वळेबळे स्फुरवून कार्यास जुंपवावें.

उलटपक्षी इतिहास आणि भौतिक शास्त्रें वाचीत गेल्यास स्वाभाविक कार्य-लालसा केव्हा केव्हा इतकी प्रदीप्त व्हावी, महायुद्धाच्या हिंदुस्थानातील तत्कालीन

क्रांतिकारक आघातप्रत्याघातांच्या, रशियातील झारसारख्यांचीं सिंहासनें चक्काचूर झाल्याच्या वार्तम्या ऐकताच कर्मशक्ति इतकी अनावर होऊन उठावी की वाटे बुवकीसरशी हवा तुरुंगाच्या भिंती धुळीस मिळवून आणि तो पूर्वोक्त हिंदुस्थानचा ध्वज उभारून मरणमारणाच्या क्षेत्रात आता उडी टाकावी !

कर्माच्या आणि नैष्कर्म्याच्या अशा परस्परविरुद्ध झुंजी रिकाम्या मनाच्या मोकळ्या मैदानावर सारख्या चालत. त्या पाहून कधी कधी स्वतःचें स्वतःलाच हसू यावें !

(समग्र सावरकर वाङ्मय–खंड १ ला–माझी जन्मठेप–पृष्ठे ४६५–४६८)

८. स्वतंत्र जीवन ?

व्यवहारतः पाहिलें तर जर बाहेरच्या स्वतंत्र्यादिक राष्ट्रीय चळवळी किंवा वैयक्तिक जीवनातील भातुकली सार्थ आणि गंभीर असतील तर हें कारागारीय जीवनही अगदी तसें नाहीच असें नाही. त्या राष्ट्रस्वातंत्र्याच्या महान् ध्येयासाठीच हें कारागार, हा वंदिवास, ही तपस्या तू आणि तुझे सहतपी आचरीत आहेत त्या ध्येयाच्या गांभीर्याचें तेज परावर्तित होत असल्याने तुझ्या कारागारीय जीवनातील लहान सहान गोष्टीही बाहेरील मोठमोठ्या जीवनघटकांप्रमाणेच तेजस्वी आणि आदरणीय आणि महत्त्वाच्या भासणाऱ्या आहेत. रशियाच्या झारच्या किंवा एखाद्या रासपुतीनच्या विलासी व राज्यव्यापी उलाढाली लोक जितक्या उत्सुकतेने वाचतात त्याहून अधिक उत्सुकतेने आणि पूज्य बुद्धीने रशियातील एखाद्या अलेक्झांडरला मारून सैबेरियात सडत पडलेल्या क्रांतीकारकांच्या वैयक्तिक आणि लहानसहान हालचाली केव्हा केव्हा वाचल्या जातात. राजवाड्यावर केंद्रित झालेलें नसतें इतके एकाग्रतेने सार्वजनिक लक्ष केव्हा केव्हा निर्वासितांच्या झोपडीवर किंवा दंडितांच्या कारागारीय कोठडीवर विद्ध झालेलें असतें. आणि नसतें तेव्हादेखील राष्ट्रीय उषःकाल यावयास त्या अंधारकोठडीतील अंधाराच्या घटिका मोजीत बसणें अत्यंत महत्वाचें असतें. मग कारागारातील जीवन केवळ कारागारीय म्हणूनच बाह्य आणि स्वतंत्र जीवनाहून हीनतर किंवा व्यर्थतर कां वाटावे ?

स्वतंत्र जीवन ? वेड्या मना. हया कारागाराच्या भिंतीबाहेर का स्वातंत्र्य आहे ? हया दगडी भिंतीपलीकडे सृष्टिनियमाच्या भिंती आहेत ! मनाला इच्छेच्या, क्षितिजाच्या भिंती आहेत ! हया कारागाराच्या भिंतींनी तू जितका बद्ध झाला आहेस तितकेच ते बाहेरचें तुला स्वतंत्र वाटणारे लोकही बद्ध झालेले आहेत. थोडक्यात म्हणजे जें कारागारात तेंच बाहेर, हें प्रमाण अधिक उणें असेल पण प्रकार एकच.

आणि करमणूक ? ही काय करमणूक, हवा पहा हवा पुस्तकाच्या दोन पृष्ठांत मुंग्यांनी आपली राजधानी बांधली आहे.

आजाराची जी गोष्ट तीच कंटाळवाची. कारागारात जीवन एकसारखें आणि निरर्थक वाटतें. पण तत्त्वतः पाहता बाहेर तरी काय आहे ? तू बंदी आहेस. पण हा बंदिपाल आणि हा पर्यवेक्षक तर बंदी नाहीत ना ? पण काय फरक आहे ! तेही प्रत्यही उठतात, कार्यालयात बसतात, तेच तें लिहितात, खातात, निजतात ! पुन्हा उठतात—पुन्हा निजतात. त्यांचेंही जीवन कोणतें मोठें सार्थकत्व पावतें आहे ! लग्नें झालीं, मुलें झालीं, पेन्शन मिळालें, हें सार्थक ? लहान मुलेंही भातुकलीत हे सर्व प्रकार खेळतातच. त्या पोरखेळाहून या संसाराचा काही तरी अधिक अर्थ, तुझ्या कारागारीय अन्वयाने, दृष्टीने लागतो का ? तत्त्वतः दोन्हीही खटाटोप व्यर्थ आहेत. कारण आईबापांच्या कंडेवर वाढावें. मग त्यांस स्मशानात पोचवून मुलाबाळांस कंडेवर वाढवावें, आणि मग आपण स्मशानात पोचावें—कशासाठी ? काय मिळतें हवा सर्व खटाटोपात ? हें चक्रही एकसारखें आणि कंटाळवाणेच नाही का ? आचार्यांनी विचारेलेला प्रश्न ' ततः किं ' हवा तुझ्या कारागारीय परवश चळवळीस जितका लागू आहे, तितकाच तो बाहेरच्या महायुद्धाच्या चळवळीसही लागू नाही का ? या फ्रान्स आणि जर्मनीने कितीदा हेच युद्धाचे पोरखेळ केलेले आहेत ? फ्रँक लोकांची गॉलवर स्वारी झाली तेव्हापासून आजपर्यंत – आज फ्रान्सने विजय मानावा की उद्या जर्मनीपुढे नाक घासून काळा सुतकी वेष धारण करावा. आज नेपोलियन पहिला की उद्या नेपोलियन दुसरा; बाजीराव पहिला की उद्या बाजीराव दुसरा! हवात हवा एकसारखेपणात हवा चूलबोळक्यांच्या मांडामांडीत आणि मोडामोडीत हा उभा संसार कोणता अर्थ साधीत आहे ? जिकडे तिकडे तेंच ते एकसारखें. पण कंटाळा, निरर्थकता, तत्त्वतः कारागृहाच्या कोठडीच्या दारावरच नव्हे तर संसारातील प्रत्येक राजवाड्यावर, ताजमहालावर, पर्वतावर आणि समुद्रावर हीच पाटी टांगलेली असते की ' ततः किम् !' मग कारागारात आहेस म्हणून विशेष वाईट कां वाटून घेतोस ? जें कारागारात तेंच—

बातमी ! बातमी ! हवा बातमीच्या लालसेची तीच स्थिति. कारागारात बातमी मिळत नाही आणि बाहेर मिळते म्हणून कारागार असह्य वाटतें ? हें पाहा कोणत्याही बातमीने अंतिम समाधान होणारें आहे का ? अगदी हिंदुस्थान स्वतंत्र झालें; तरी मना ! चिरकालिक अशा काही तरी शाश्वती मानता येईल का ? हिंदुस्थान आज स्वतंत्र झालें; पुन्हा वैभवाने शिथिल झालें; पुन्हा परतंत्र झालें; तो इतिहास पहा. हवा पिढीनें स्वातंत्र्यार्थ लढावें, पुढील पिढीने तें भोगावें; तिसरीने तें गमवावें, पुन्हा सहावें, लढावें, मरावें, भोगावें, गमवावें–प्रत्येक राष्ट्राचा, प्रत्येक राजकुलाचा, प्रत्येक समाजाचा उभा इतिहास, सर्व बातम्या हवा तीन चार

वाक्यांत भरलेल्या आहेत. एवढ्या एकदा ऐकल्या की, पुन्हा बातमी म्हणून उरत नाही. छे ! राष्ट्रांची नव्हे तर उभ्या विश्वाची देखील नवी बातमी म्हणून येणें नाही. कारण सर्व उलाढालीतील अगदी निर्णायक, अगदी शेवटची, म्हणजे प्रलय ! प्रभव ही विश्वाची पहिली बातमी. ती आता शिळी झाली आहे. आता जी अगदी ताजी बातमी म्हणून ऐकू येणार ती प्रलय ! बस प्रभव ते प्रलय, — हयात सर्व बातम्या आल्या. आणि त्या दोन्ही सुला कळल्या आहेत. मग कारागारामध्ये बातमी नाही म्हणून विशिष्ट दुःख का मानतोस ? नुसत्या पोरखेळाच्या बातम्या, भातुकलीच्या बातम्याहून तत्त्वज्ञांस अधिक रंजनाई कशा वाटणार ! हया क्षणिक आणि उत्पत्ति, लय, प्रभव, प्रलय, जन्म, मृत्यू या लंबकामध्ये कुठेतरी हेलकावा खाणाऱ्या बातम्या आलेल्याच आहेत त्या इतक्या क्षणिक आहेत की, त्यांतील कोणतीही बातमी शेवटची म्हणून म्हणता न आल्याने ही बातम्यांची तृष्णा — कधीही समाधान मिळणें नाही — मग तू कारागारात बैस किंवा जगात अगदी वाऱ्यासारखा मोकळा सूट ! गेल्या महिन्याच्या बातमीसाठी कारागारात चुटपुट लागते तर गेल्या तासाच्या बातमीविषयी अमेरिकेत चुटपूट लागते. कारण तिकडे प्रतिप्रहरी नवें पत्र निघतें म्हणून गेल्या प्रहराची बातमी शिळी वाटून ताज्या प्रहराची बातमी मिळविण्यासाठी मन लोलुप आणि व्यवसायातील बाजारभावामुळे चितातुर होतें. उद्या पृथ्वीवरील सर्व बातम्या क्षणोक्षणी कळू लागल्या तर मनुष्य मंगळावरील बातमी ऐकण्यासाठी असाच चुटपूट करीत बसेल तू जसा या कारागारात हिंदुस्थानिक बातमी ऐकण्यासाठी बसला आहेस !

तेव्हा तत्त्वतः पाहिलें तर कारागारातील तुझें जीवन बाहेर जे स्वतंत्रपणे फिरत आहेत त्यांच्या जीवनाहून अगदीच व्यर्थ नाही. ती पहा मुंग्यांची नगरी ! लोकसंख्येने अगदी पाटलीपुत्रात नव्हती इतकी तीं गजबजलेली आहे. तीं अंडीं, ती त्यांची राणी, ती त्यांची राजकन्या, त्या त्यांच्या लढाऊ मुंग्या म्हणजें खडें क्षत्रिय सैन्य पहा. मुंग्यांतही चातुर्वर्ण्य सुप्रतिष्ठित आहे. श्रमविभाग आहे. तें पलीकडे आकाशात तुझ्या डोळ्यांपुढे तरंगत फिरणारें तिळाहून दसपट सूक्ष्मतर असणाऱ्या घुंगरुटांचें राज्य पहा. थवाच्या थवा ज्यू लोकांचा फिरत्या अवस्थेतील राष्ट्राप्रमाणे एकत्रित उडत प्रवास करीत चालला आहे पहा. आणि त्या घुंगरुटांस यःकश्चित् लेखू नकोस. येवढा तू मनुष्य, पण तुला पंख नाहीत. पण त्या तिळाच्या दहाव्या तुकडयाएवढ्या घुंगरुटांस बघ ते पंख. त्यातील स्नायु किती सूक्ष्म असतील पण किती कार्यक्षम ! तें ईश्वरी कौशल्य निरीक्षण कर. ही काय करमणूक नाही ! मोठमोठे शास्त्रज्ञ केवळ कृमिकिटकांच्या वा पशुपक्ष्यांच्या जीवनक्रमाचा अभ्यास करण्यासाठी आयुष्यचें आयुष्य एखाद्या वाऱ्यापुढे वा मधाचे पोळ्यापुढें बसून काढतात. तें जर निरर्थक तुच्छ नसेल तर तुझे तरी आयुष्य हया कारागारात निरर्थक

जातें आहे म्हणून कां म्हणावें ?

किंवा ही करमणूक पहा. तीं मांजरें प्रत्यही उत्तररात्री आपलीं प्रीतिगीतें गात फिरतात. इतक्यात एखादा प्रतिस्पर्धी येऊन त्या रतिगीतांचें पर्यवसान रण-गीतात होऊन भयंकर रण माजतें. कां ? उपहासास्पद वाटतें हें सारें ? पण मग रामायण तरी काय आहे ? या दोन मांजरांसारखीच दोन मनुष्यें कामातुरतेत प्रतिस्पर्धी झाली आणि त्यांचें भांडण जुंपलें. हीं मांजरें नखांनी ओरबडतात आणि तोंडाने भयंकर गर्जना करतात. ते भाला, तलवार, त्रिशूळ घेऊन बोचकारीत होते आणि दुंदुभींच्या तोंडांनी गर्जना करीत होते ! बाकी मनोविकारांचें तीव्रत्व आणि गंभीरत्व आणि व्याकुलत्व उभयपक्षी समान होतें. मांजरास हया बोक्यांची लढाई आम्हांस रामरावणांची वाटली तितकीच महत्वाची वाटत असणार हें उघड आहे. विकासवादाच्या भाषेत बोलावयाचें म्हणजे हें मार्जारायण विकास घेत घेत रामायणात परिणमित झालें आहे.

विकासवादाची गोष्ट निघाली म्हणून तेंही पहा. जीवनकलह हें विकासाचें जसें विघटक साधन आहे तसें अपत्यसंगोपन हें संघटक साधन म्हणून विकास-शास्त्रज्ञ म्हणतात. जीवनकलहाचे तत्वानुरूप त्या मार्जारायणाचाच रामायण हें विकास आहे. तसेंच हया अपत्यसंगोपनाचें तत्त्वानुरूप 'मेरी'चे किंवा यशोदेचें मातृप्रेम हा त्या गृहपालित मादीच्या प्रेमाचा विकास आहे. हें पहा कारागारीय डॉक्टरांचे अंगण आणि त्यात आपल्या दहा बारा पिलांस मागे पुढे घेऊन खेळवीत आणि मधूनच त्यास कुकूचिकूचें मंजुळ पाळणे म्हणत चाललेली ती कोंबडी, पहा त्या घारीच्या झेपेपासून कसें आपलें पिलू वाचविलें. पूतनेच्या झेपेसरशी कळवळली नसेल असा त्या घारीची झेप आपल्या पिलांवर पडताच तिचा जीव कासावीस झाला. पहा ते सृष्टीचे कौतुक. लहान मुलांचे खेळ किंवा शाळेतील चढाओढी पाहण्यास दर्शिकें (तिकिटें) काढून लोक जातात. हा हया लहान पिलांचा थवा, त्या त्यांच्या उडया, ती कुलकुलकुल किलकिल, ती दाणे टिपण्यात चढाओढ आणि आटपापटया, तशाच मनोरंजक नव्हेत काय ? त्यांच्या मनात तेच खेळाडू भाव आणि तोच आनंद उचंबळत आहे जीवन हे जीवोजीवो समसंवेदन झालेले असते. केवळ सहानुभूतीने ते जगून पहा

(समग्र सावरकर वाङ्मय—खंड पहिला—माझी जन्मठेप. पृ. ५९३–५९६)

देश स्वतंत्र झाल्यानंतर वाटलेली कृतार्थता

भारतातील माझ्या सहस्त्रावधी हितचिंतकांकडून वेळोवेळी असे अुद्गार निघतात की, हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही त्या स्वातंत्र्यासाठी झुंजताना

मी जे काही कष्ट भोगले त्यांचे श्रेय मला मिळालें नाही. सशस्त्र क्रांतिकारकांवाचून अितर निःशस्त्र मार्गाने कार्य करीत असता ज्यांनी सापेक्षतः अल्प कष्ट सोसले त्यांचाही अनेक प्रकारे गौरव होत आहे. कोणाला भू-दानें, कोणाला द्रव्यदानें, कोणाला अधिकारदानें, पारितोषिकें म्हणून वाटण्यात येत आहेत, पण परकीय शत्रूंनी राजहृत केलेल्या, जप्त केलेल्या आम्हा सशस्त्र क्रांतिकारकांचीं घरेंदारें, द्रव्य, मत्ता हींसुद्धा परत द्यावयाची नाही म्हणून प्रस्तुतच्या आमच्या स्वकीय शासनाने, सरकारने अुघडपणें सांगून टाकलेले आहे. पण हा न्याय आहे कीं नाही हा प्रश्नसुद्धा आज विद्यमान असलेले वयोवृद्ध क्रांतिकारक विचारात घेऊ अिच्छित नाहींत. निदान माझ्यापुरतेंच बोलायचें तर मला तरी त्याविषयी लवलेश हेवा वाटत नाही. अहो, सारा हिंदुस्थान आमची सारी मातृभूमि, निदान हा तीन चतुर्थांश तरी विस्तृत देश शत्रूच्या हातून आमचा आम्हांस परत मिळाला, स्वतंत्र झाला, ह्यातच त्या शत्रूंनी छिनावून नेलेल्या टीचटिचीच्या आमच्या क्षुद्र जहागिरी नि घरटीं नि दीडदमडया हीं सारी आम्हांस परत मिळालेलींच आहेत. ह्या आजच्या स्वतंत्र भारतीय महाराज्याचा अध्यक्ष होण्याचा मान मिळणें हीही भाग्याची गोष्ट आहेच, पण तें भाग्य पुढील पिढीतील कोणातरी सुयोग्य देशभक्तास लाभावें ह्यासाठीच पन्नास वर्षांपूर्वी देशशत्रूंशी झुंजत असता मारीत मरणें हेच सर्व भाग्यांत परम भाग्य समजणाऱ्या सशस्त्र क्रांतिकारकांच्या पुरस्सर पथकांच्या आम्ही अग्रभागी राहून शत्रूंवर चालून गेलो. जर कधी काळी पन्नास पाअुणशें वर्षानंतर स्वराज्य आल्यावर आम्हांस मानाचीं स्थाने किंवा पारितोषिकें 'ह्या हेचि देही ह्याचि डोळा' मिळतील ही आमची महत्त्वाकांक्षा असती तर आम्ही रिव्हाल्वरें आणि बाँब हातो घेऊन त्या बलाढ्य शत्रूवर तुटून पडलो असतो का — सरळ फाशीच्याच वाटेने धावलो असतो का ?

ह्यात कृतार्थतेची धन्यतरता आहे !

मी माझ्यापुरते तरी अगदी मनःपूर्वक सांगतो की आम्ही आमची मातृभूमि स्वतंत्र झालेली 'ह्याचि देही ह्याचि डोळा' पाहिली ह्यातच आम्ही स्वतःस कल्पनेहून कृतार्थ झालों असें समजतो, कारण ते पहाण्याचीही आम्ही कधी लालसा धरली नाही, केवळ तो दिवस केव्हातरी अुगवावा म्हणून झुंजण्याची तेवढी लालसा धरलेली होती. म्हणून तो सोनियाचा दिवस पाहिला ह्यातच हवें होतें त्याहून अधिक मिळाले. निदान मी तरी अत्यंत समाधानात आहे. वैफल्याची लवलेश भावना माझ्या मनास शिवत नाही. कारण अेकार्थी माझे मूळ संकल्प सफल झालेले आहेत. राष्ट्र स्वतंत्र झाल्यानंतर त्याचा अध्यक्ष होणें ह्यातही धन्यता

आहेच. ज्या थोर पुरुषाला आज ती लाभली आहे त्याचे हार्दिक अभिनंदन मी त्या वेळीच प्रकटपणे केलेलें आहे. आणि अेक स्वराष्ट्रनिष्ठ सामान्य नागरिक म्हणून माझ्या वाटचाला येअोल ती राष्ट्रसेवा मी करत राहीन असें मी त्यांना तार धाडून आश्वासिलेंही आहे.

परंतु दुसऱ्या अर्थी स्वराष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी लढून तें स्वतंत्र झाल्यानंतर ती सारी राज्यसत्ता आपल्या देशबांधवांच्या हाती अर्पून, त्यातील दमडीच्याही लाभाचीं वा अधिकारपदाची लालसा न धरता, अितर स्वदेशबांधवांच्या मानातच आपला मान आणि सुखातच आपलें सुख मानून अेका स्वराज्यनिष्ठ सामान्य नागरिकाप्रमाणे शक्य तें राष्ट्रकर्तव्य तेवढे करीत निरिच्छ समाधानात राहणें ह्यातही कृतार्थतेची धन्यतरता आहेच आहे !!

यवनांची, सिकंदराच्या ग्रीक सैन्याची आणि राजसत्तेची, दाणादाण अुडवून दिल्यानंतर आणि चंद्रगुप्ताची त्या स्वतंत्र भारतीय साम्राज्यावर स्थापना झाल्यानंतर शेवटी आर्य चाणक्य स्वतः निवृत्त होअून हिमालयात निघून गेले अशी कथा आहे. मला वाटतें कृतार्थ झालेल्या सशस्त्र क्रांतीकारकांच्या आमच्या पिढीनेही तोच आदर्श डोळ्यापुढे ठेवावा. त्यांच्या आत्यंतिक त्यागाच्या प्रतिज्ञेला आणि परंपरेला तोच शोभून दिसेल.

स्वातंत्र्य संपादनाचें श्रेय हें सामुदायिक श्रेय आहे

दिवंगत सशस्त्र क्रांतीकारांना ते जिवंत असता माथेफिरू, अत्याचारी, देशघातक हत्यारी अित्यादि निवडक शिव्याशापांची लाखोली परशत्रूंकडूनच काय ती नव्हे तर त्यांच्या स्वदेशबांधवांकडूनही वाहिली जात होती; तथापि ते दिवंगत झाल्यानंतर का होअीना, पण त्यांच्या तुमुल जयजयकारांनी आज हा प्रचंड समुदाय त्यांच्याविषयीची आपल्या देशाची अुत्कटकृतज्ञता व्यक्तवीत आहे हें पाहून नि अैकून मला काय, पण जर मनुष्य मेल्यानंतरही आत्मरूपाने अस्तित्वात असू शकतो हे खरें असेल तर त्या सहस्त्रावधि दिवंगत आत्म्यांनाही साश्चर्य संतोष वाटत असेल ! हें अपूर्व दृश्य मी प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी पाहीन असें अगदी काल परावापर्यंत मला केव्हाही वाटलें नव्हतें. त्या परिस्थितीत तसें वाटणें शक्यच नव्हतें. अितिहासातून सशस्त्र क्रांतिकारक पक्षाने स्वातंत्र्यसंपादनार्थ काही कार्य केलें असा कोणताही अुल्लेख आणि त्यांचीं नांवेंही चक्क पुसून टाकण्याचा डाव परशत्रूंनी नि काही स्वार्थी नि भेकड स्वकीयांनीही योजिलेला होता. खोटा अितिहास लिहिण्याचा त्या लोकांनी चंग बांधला होता. म्हणूनच खरा अितिहास जसा घडला तसा लिहिला जावा ह्यासाठी मी नि माझ्या सहकाऱ्यांनी हा महोत्सव घडवून

आणला आहे. हचा महोत्सवात केवळ भारतीय सशस्त्र क्रांतिकारकांनाच श्रद्धांजलि वाहिली जाणार आहे हे जरी खरें असले तरी हिंदुस्थानचें जें स्वातंत्र्य आज आपण संपादू शकलो आहोत तें सशस्त्र क्रांतिकारकांनीच काय तें मिळविलें असें मी मानीत नाही. तसें म्हणणें हीही पहिल्या चुकीप्रमाणेच अेक दुसरी अुलटी चूक होअील, तसें म्हणणे हाही खोटा अितिहास लिहिण्यासारखेंच अश्लाघ्य होअील. स्वातंत्र्य मिळताच ते 'आम्हीच आणि आमच्या तथाकथित अहिंसक साधनांनीच मिळवलें' अशी जी अेकच ओरड करण्यात आली ती बव्हंशी खोटी, पक्षपाती आणि लाटंबाजीची आहे हे स्पष्ट करणे अितिहासाच्या नि सत्याच्या दृष्टीने कर्तव्यच होते. तसें न करणे ही अैतिहासिक कृतघ्नता झाली असती. हचास्तव स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मला प्रकटपणे माझे विचार सांगण्याची पहिली संधि मिळताच सन १९४९ च्या डिसेंबरमध्ये कलकत्त्यास भरलेल्या अ. भा. हिंदुमहासभेच्या अधिवेशनाचे अुद्घाटनीय भाषणात मी स्पष्टपणे पहिली घोषणा केली की ब्रिटीशांच्या परदास्यातून भारताची मुक्तता करण्याचे नि स्वतंत्र नि सार्वभौम असें आपल्या भारताचे संघराज्य करण्याचें श्रेय हें सशस्त्र किंवा निःशस्त्र अशा कोणत्याही अेका पक्षाचे नसून तें गेल्या २-३ पिढ्यांतील सर्व पक्षांच्या सर्व स्वदेशनिष्ठ कार्यकर्त्यांचे समाअीक श्रेय आहे! १८५७ च्या सशस्त्र क्रांतिवीरांचा वाटा तर त्यात आहेच आहे. पण त्यानंतरच्या देशभक्त दादाभाअींपासून देशभक्त गोखल्यांपर्यंतच्या नेमस्त म्हणविणाऱ्या पक्षातील सर्व कार्यकर्त्यांनाही ते श्रेय यथाप्रमाण मिळालें पाहिजे. राष्ट्रीय किंवा जहाल म्हणून ज्या ज्या पक्षाला म्हणत त्याचाही वाटा या सामुदायिक क्षेत्रात आहेच आहे. स्वतःस असहकारवादी अणि अहिंसक म्हणवून घेणाऱ्या सहस्रावधि देशभक्तांनी नि देशसेवकांनी हचा राष्ट्रीय स्वातंत्र्यास्तव जें भारतव्यापी कार्य केलें त्याविषयीही आम्ही कृतज्ञता व्यक्तविलीच पाहिजे. मी तर हचाच्याही पुढे जाअून स्वानुभवाने असे सांगतो की सशस्त्र वा निःशस्त्र अशा कोणत्याही गुप्त वा प्रकट चळवळीत सक्रिय भाग ज्यांनी घेतला नाही परंतु ज्यांनी ज्यांनी आपआपल्या हृदयात मूक सहानुभूति बाळगली आणि, 'देवा माझ्या भारताला स्वतंत्र कर' म्हणून अबोल प्रार्थना केली अशा आमच्या लक्षावधि स्वदेशबांधवांच्या त्या मूक शुभाशीर्वादांनाही आजच्या आपल्या हचा राष्ट्रीय विजयाचें श्रेय तया त्या प्रमाणात आहेच आहे. रामायणाविषयी येथे लागू पडेल अशी अेक सुंदर कथा आहे. जेव्हा रामाचें सशस्त्र सैन्य लंकेवर चालून गेलें तेव्हा समुद्र आडवा आला. शस्त्र टाकून रामाने त्याची पूजा केली- प्रार्थना केली कीं वाट दे. पण तो सागर अधिकच फुगू लागला. शेवटी रामाने धनुष्यावर अमोघ बाण चढवून दटावलें 'देतो कीं नाही वाट' त्यासरशी मात्र भयभीत होअून तो समुद्र प्रसन्नला नि वाट दिली. तुळसीदासजी हचा कथेत म्हणतात, 'भयबिन होय न प्रीत'!! पुढे रामसैनिक सेतू बांधू

लागले. तिथेंच अेक पाल होती. तिला काही प्रचंड शिला किंवा लहानसा दगडही त्या समुद्रात सेतूच्या आधारासाठी भर टाकता येणें शक्य नव्हतें. तरी त्या सत्कार्यास जो शक्य तो हातभार लावण्यासाठी तिने आपलें अंग पाण्यात ओलें करावें, वाळूत घुसळावें, आणि सेतूपाशी जाअून तेवढी वाळू तेथे त्या पाण्यात झाडावी. तिला समुद्रात तेवढीच भर टाकणें शक्य होते. त्या भरीचे स्थूल गणिताने काहीच मूल्य नव्हतें; पण सूक्ष्म गणिताने त्या वाळूच्या कणांचीही शून्यापेक्षा काहीतरी अधिक भर पडतच होती, आणि त्या पालीच्या सद्भावनेची भर तर अगणितच होती. अशा अुदार, व्यापक नि प्रामाणिक दृष्टीनेच आम्ही सर्वांनी हया आपल्या स्वातंत्र्यसंपादनाचे श्रेय, नुसत्या सदिच्छकांपासून तों निःशस्त्र नि सशस्त्र प्रतिकारकांपर्यंत सर्वांचे मिळून, सामुदायिक श्रेय आहे अशी यथाप्रमाण कृतज्ञता बाळगली पाहिजे, अशा निःपक्षपात भूमिकेवरून जें जसें घडलें तें तसेंच सांगणारा जो अितिहास लिहिला जाअील तोच खरा अितिहास !

स्वातंत्र्याचा सगळ्यात मोठा शत्रू अराजक होय

" क्रांतिकाल संपताच आणि स्वदेश स्वतंत्र होअून स्वराज्य स्थापन होताच आता आपले सर्वांचें पहिले राष्ट्रीय कर्तव्य हें असावयास पाहिजे की क्रांतिकालातील आपणच राष्ट्रभर फैलावलेल्या राज्यविध्वंसक वृत्तींना नि साधनांना तत्काल विसर्जून राष्ट्रात विधायक नि निर्बंधशील वृत्तींचे वर्चस्व स्थापिलें पाहिजे. पर राज्य अुलथून पाडण्यासाठी गुप्त कट, सशस्त्र बंडाळी, भयंकरवाद, निर्बंधभंग, परराज्यद्रोह हीं सर्व साधनें पुण्यच असतात, अपरिहार्य असतात. पण जर हीं साधनें नि हया सर्व वृत्ती स्वराज्य स्थापन होताच पंचमहापातकांसारखीच अधर्म्य समजून तत्काल टाकून दिली नाहीत तर बाहेरच्या शत्रूहूनही स्वराज्यात प्राणघातक ठरल्यावाचून राहत नाहीत. ही जाणीव दूरदर्शी क्रांतिकारक पुढाऱ्यांना क्रांतिकालातच अितकी अुत्कटतेने झालेली असे की ' अभिनव भारत ' हया गुप्त आणि मित्रमेळा किंवा लंडनमधील Free India Society सारख्या प्रकट शाखांतून तिची सविस्तर चर्चा केली जाअी. क्रांतिकारकांना तशी चेतावणी दिली जाअी. सुदैवाने हया त्या क्रांतिकालीन वस्तुस्थितीचा पुरावा आजही काही अंशी अुपलब्ध आहे. मी सन १९०८-०९ मध्ये लिहिलेला अिंग्लिश भाषेतील War of Indian Independence 1857 हा ग्रंथ आता प्रकटपणे प्रकाशित झालेला आहे. त्यात हया विधेयाची (Point ची) चर्चा नि समर्थन आपल्याला ठायी ठायी सापडेल. त्याचप्रमाणे हिंदी संस्थानिकांना क्रांतिपक्षास मिळण्यासाठी आवाहन करणारी 'Choose, O! Indian Princes!' नावाची जी अनेक महत्त्वाची गुप्त अिंग्लिश पुस्तिका मी लंडनमध्ये प्रसिद्धिली होती,

आणि जिचा त्यावेळी खूप गाजावाजा झाला होता ती संबंध नसली तरी तिच्यातील अेक वरील विषयाला लागू असलेला महत्वाचा अुतारा आजही अुपलब्ध आहे. अर्थात् तो अुतारा तरी अुपलब्ध ठेवण्याचे श्रेय 'Unrest of India' हया पुस्तकाचे कर्ते व्हालेन्टाईन चिरोल हया आमच्या प्रतिस्पर्ध्यालाच आहे! हया प्रलेखीय पुराव्यावरूनही (Documentary Evidence) हें स्पष्ट होअील कीं अगदी क्रांतिकालीही परराज्य अुलथून पाडले जाताच स्वराज्याची स्थापना कोणत्या मूलभूत तत्त्वांच्या पायांवर नि साधनांनी केली पाहिजे हयाचा आराखडाही क्रांतिकारकांनी निश्चित करून आपल्यासमोर ठेविला होता. त्यावेळी हया प्रकरणी आम्ही क्रांतिकारकांना देत असू त्या अुपदेशाचें सार मी खालील ब्रीदवाक्यात व्यक्तविलेले वरील प्रलेखात सापडेल. स्वराज्य प्रस्थापित होताच क्रांतिकालातील ब्रीद वाक्यें विसर्जून स्वराज्याने तत्काल खालील ब्रीदवाक्ये आपल्या कार्यक्रमफलकावर आणि हृदयावर कोरून टाकली पाहिजेत की Constitution within – Revolution outside ! Law within–sword outside ! Peace within – War outside !

स्वराज्य स्थापन झाले म्हणजे पहिल्याच दिवशी काही रामराज्य स्थापन होऊ शकत नाही

कोणताही देश पारतंत्र्याचे जोखड फेकून देअून स्वतंत्र होतो याचाच अर्थ असा असतो की पारतंत्र्याच्या कालात परकीय शत्रूंनी त्याची जी विघटना केलेली असते; त्याच्यात दास्यप्रवण वृत्तीची जी जोपासना केलेली असते, बलात्कार, छळ निष्पीडन यांहींकरून त्याची जी दुर्दशा केलेली असते, दुष्काळ, दारिद्र्य नि दैन्य हयांचा जो तेथे हाहाकार माजविलेला असतो तो स्वातंत्र्यसंपादनाच्या पहिल्या दिवशी त्या देशास बहुतांशी तसाच ग्रासीत असतो. स्वातंत्र्यानंतर जी स्वराज्यीय शासनसंस्था लगोलग कारभार पाहू लागते तिला ती कोणाच्याही पक्षाची असली तरी, हा हाहाकार नि दुर्दशा अेका दिवसात कोण्या जादूच्या कांडीसरशी नाहीशी करता येणे अशक्य असतें. अशा वेळी सर्व नागरिकांचें मुख्य राष्ट्रीय कर्तव्य हेंच असले पाहिजे की काही काळ तरी कळ सोसून आपल्या स्वकीय शासनास तो दुर्दशा निवारण्यासाठी शक्य तें तें साहाय्य प्रत्येकी आपल्या परिश्रमाने नि सहनशीलतेने देत राहिले पाहिजे. आज राज्यकारभार काँग्रेस पक्षाच्या हाती आहे. त्यांच्या हातून शंभर चुका प्रत्यही होतात म्हणून जिकडे तिकडे ओरड चालू आहे. पण तुम्ही लक्षात ठेवलें पाहिजे की, मागच्या अनेक निवडणुकीत काँग्रेस पक्षाला बहुमताने निवडून देअून त्यांच्या हातून अशाच चुका घडत आल्याची अशीच ओरड बव्हंश जनतेने चालविली असता पुन्हा घाण्याच्या बैलाप्रमाणे डोळझापणे बांधून त्या काँग्रेशी

मतपेटीशी येताच जनतेने आपलीं मतें गेल्या निवडणुकीतही त्याच काँग्रेस पक्षाला बहुमताने टाकलीं आणि राज्यकारभार पुन्हा त्यांचे हाती दिला. त्यांनी काही बळाने तो कारभार तो तुमच्या हातून छिनावून घेतलेला नाही. जर आता त्यांच्या हातून चुका घडत असतील तर त्या दोषाचा अर्धाअधिक वाटा त्या बव्हंश जनतेचाच आहे. न्यायाच्या दृष्टीने हेही स्पष्ट केले पाहिजे की, क्रांतिकाल संपतासंपताच नवनिर्मित स्वराज्याची घडी नीट बसविण्याचे कठिण कार्य बहुमताने काँग्रेस पक्षाच्या हाती सोपविले न जाता दुसऱ्या साम्यवादी, समाजवादी, हिंदुत्वनिष्ठ प्रभृति अितर कोणत्याही पक्षांचे हाती जाते तरी काँग्रेसप्रमाणेच काही अनुभवामुळे तर काही सत्तालोभामुळे त्या अितर पक्षांचे हातूनही अशा काही चुका घडल्याच नसत्या असें नाही. कारण अेकाच सरोवरातल्या पाण्यात भरून काढलेल्या निरनिराळ्या पोहऱ्यांप्रमाणे आपले सारे पक्ष हे अेकाच समाजातून वर येणारे असल्यामुळे त्यांच्यात हुषा वा त्या प्रमाणात तेच गुणदोष असण्याचा संभव अधिक ! अशा स्थितीत तत्कालीन शासनसंस्थेकडून काही राजकीय चुका घडल्या, काही व्यक्तीव्यक्तींचा पक्षीय द्वेषभावनेने छळ झाला, तरी आपण अेकदम डोक्यात राख घालता कामा नये. माझ्यापुरते बोलावयाचे तर ब्रिटिशांच्या वेळी माझा जो छळ झाला तो आपण जाणताच. परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही मला जे कारावास भोगावे लागले त्यामुळे अधिक मनस्ताप सोसावा लागला. तथापि त्याविषयी मी स्वकीय शासनाविरुद्ध चकार शब्दही काढला नाही. तेही वरील कारणाकरीच होय.

पण परराज्य म्हणजे प्रत्यक्ष राष्ट्रीय मृत्युच !

परंतु आजच्या सत्ताधिकाऱ्यांकडून कित्येक अन्याय्य आणि देशहिताला घातक अशीं दुष्कृत्ये घडतात हे जरी खरे असले तरी त्यामुळे चिडून जाअून, मी मघा सांगितलेला तो देशहितकारक संयम सुटून सामान्य जनतेच्याच नव्हे तर राजकीय पक्षांच्या तोंडून नि लेखांतूनही अशी क्रोधाविष्ट भाषा निघालेली जेव्हा मी अैकतो कीं हें कसले स्वराज्य ? हुषापेक्षा ते ब्रिटीश राज्यच बरे होते, किंवा रशियाचे राज्य बरे ठरेल! तेव्हा तेव्हा माझ्या मनात चर्र होते. कारण जयचंदी वृत्ति ती हीच ! हिनेच भूतकाली आपल्या मातृभूमीला पारतंत्र्याच्या गर्तेत लोटले आहे. मी आरंभीच सांगितले होते की अराजकासारखा आपल्या प्रस्थापित स्वराज्याला दुसरा भयंकर शत्रू नाही. परंतु अेकवेळ ते स्वकीय देशांतर्गत अराजक किंवा यादवी युद्धही पुरवले पण ब्रिटिशांचे नि रशियाचे तर काय पण देवदूतांनेही परराज्य परवडणार नाही. देशांतर्गत अराजक ही एक भयंकर राष्ट्रीय व्याधि आहे. ती कष्टसाध्य असली तरी असाध्य असतेच असे नाही. परंतु परराज्य म्हणजे प्रत्यक्ष राष्ट्रीय मृत्यूच होय. ही

अुत्कट जाणीव नि भावना आपल्या लोकांच्या रोमारोमात भिनली पाहिजे.

कोणतीही राज्यपद्धति झाली तरी तीत राष्ट्राचें कल्याण कोणच्या मार्गाने साधता येअील याविषयी पक्षभेद आणि मतभेद हे असणारच. त्यात काही हानि नाही, उलट ते मतभेद निःस्वार्थ आणि देशहितप्रेरित असले तर अुपकारकच ठरतात, परंतु आता स्वराज्यप्रस्थापनेनंतर कितीही तीव्र मतभेद असले तरी ते आपले सारे मतभेद मतपेटीतच सामावले पाहिजेत !

त्या मतपेटीचे बूड फुटकें आहे कीं नाही तें मात्र कटाक्षाने पहा ! हें दायित्व (Responsibility) जनतेवर आहेच. परंतु जनतेपेक्षाही ज्या पक्षाच्या हाती घटनात्मकरीत्या राज्यकारभार सोपविला जाअील त्या सत्ताधारी पक्षावरच तें दायित्व विशेषतः पडतें. आज काँग्रेसचे राज्य आहे अशी भाषा वृत्तपत्रांतून सर्वत्र वापरली जाते. परंतु लोकसत्ताक राज्यतंत्राविषयी आपल्या जनतेत आणि राज्यीय अधिकाऱ्यांतही अद्यापि किती अज्ञान पसरलेले आहे तें अशाच लहान लहान वाक्यांतून प्रकट होतें. आणि त्या वाक्यांमुळे विषारी विचार राष्ट्रीय मनोभूमिकेत रुजत जातात. राज्य काँग्रेसचें नाही. राज्य आपणां सर्वांचे आहे. कारभार तेवढा आजच्या पुरता काँग्रेसचा.

ही जाणीव स्पष्टपणे व्यक्त होअील अशी भाषा तोंडोतोंडी रुळली पाहिजे. राज्यकारभार आज काँग्रेसच्या हाती आहे. अुद्या नव्या निवडणुकीत तो कारभार अितर कोणत्याही पक्षाच्या हाती राष्ट्रीय बहुमत देऊ शकेल. कारण राज्य राष्ट्राचें आहे ! ह्यास्तव जर अराजकाचे संकट टाळावयाचें असेल तर निवडणुकीतील मतदान नि तिचे निर्णय हें घटनेप्रमाणेंच, पक्षांधत्वाचा नि अप्रामाणिकपणाचा लवलेश स्पर्श होऊ न देता त्या त्या वेळच्या राज्यीय सत्ताधिकारी पक्षाने पार पाडले पाहिजेत. पण जर त्यांचेच हस्तक मतदानपेटयांचे तळ फोडून ठेवू लागले किंवा ज्या राज्यघटनेविषयी राष्ट्रीय स्वातंत्र्याची स्थैर्यशिलाच असा अत्यंत आदर लोकांत अुत्पन्न व्हावयास पाहिजे आहे त्या राज्यघटनेतच पक्षीय सत्तालोभाने राज्यधारक तात्कालिक बहुमताच्या बळावर वारंवार पालट करू लागले तर लोकक्षोभही कधी काळी त्या घटनेला आग लावून देअील. ह्या संकटाची जाणीव त्या त्या वेळच्या राज्यीय सत्ताधिकारी पक्षाने जर ठेवली नाही तर देशात अराजकाला आमंत्रिल्याच्या पापाचे तेच धनी होतील.

'विरोधी' नव्हे 'अल्पमतीय' पक्ष

ह्या दृष्टीने ब्रिटनच्या लोकतंत्रातून आपण अुसना घेतलेला विरोधी पक्ष हा विधीमंडळातून वापरला जाणारा शब्दही त्याज्य आहे. राज्यधारक (सरकारी)

पक्षावाचून जे दुसरे पक्ष विधिमंडळात असतात त्यांना संयुक्तपणे साधरणतः Opposition party विरोधी पक्ष असें ब्रिटनमध्ये म्हणतात. पण ब्रिटिश जनतेला त्यांच्या सुदीर्घ लोकसत्ताक परंपरेमुळे त्या विरोधी, Opposition शब्दाचा अर्थ कसा करावयाचा तें ठाऊक असतें. त्यामुळे अेकंदर राष्ट्राला अुपकारक असेल त्या त्या घोरणात राज्यधारक पक्षाला तो विरोधी म्हणविणारा पक्षही विरोध करीत नाही. अुभयतांच्या संगनमतानेच ते वागतात. पण आपल्या अिकडे लोकतंत्रीय परंपरा ही नवीन. त्यायोगे राज्यधारक पक्षाला सरकारी पक्षाला-विरोध म्हणूनच विरोध करण्याची वृत्ति बळावू नये यासाठी Opposition हा विपर्यासप्रवण शब्दच त्याज्य समजणे चांगलें. राज्यधारक पक्ष आणि हा विरोधी म्हणविणारा पक्ष ह्यांच्यात खरा विभेद अितकाच असतो की पहिला पक्ष बहुमतीय असल्यामुळे त्याच्या हाती घटनेप्रमाणे राज्यकारभार जातो आणि हा भिन्नपथीय पक्ष, ही Opposition party अल्पमतीय असल्यामुळे त्याच्या हाती राज्यकारभार आलेला नसतो. ह्यासाठी ह्या दोन पक्षांना सरकारी पक्ष नि बिनसरकारी पक्ष असें जरी म्हणता येअील तरी बहुमतीय पक्ष आणि अल्पमतीय पक्ष असे शब्द योजणेंच अुचिततर आहे. या अल्पमतीय पक्षाचे मुख्य कर्तव्य जर देशाला अपायकारक कृत्य राज्यधारक पक्षाचे हातून होतें असें वाटले तर ते हाणून पाडण्यापुरता त्या शासकीय पक्षाला (Government) विरोध करणे वैध, परंतु ज्या गोष्टी देशहितकारक आहेत त्यांत राज्यधारक पक्षाशी मनःपूर्वक सहकार्य करणे, असें दुहेरी काम राहील.

आत्महत्या आणि आत्मार्पण

धन्योऽहं धन्योऽहं कर्तव्यं मे न विद्यते किंचित् ।
धन्योऽहं धन्योऽहं प्राप्तव्यं सर्वमद्य संपन्नम् ॥

आत्मार्पण आणि आत्महत्या यांत काहीच फरक नाही ? आहे म्हणावा तर नाही आणि नाही म्हणावा तर आहे !

व्याधींनी, अपघाताने किंवा अशाच कोणत्या तरी अपरिहार्य कारणामुळे मरण न येता, जीव न जाता, जे लोक कोणत्याही कारणाने जीव नकोसा होअून स्वतःच स्वतःचे मरण स्वतःवर ओढवून घेतात त्यांनी आत्महत्या केली असें आपण म्हणतो. पुष्कळ समाजांतून तो एक दंडनीय अपराधही (गुन्हा) समजला जातो. आत्मा नि जीव या शब्दांतील तात्त्विक भेद काय मानला जातो याची चर्चा येथे न करता व्यवहारात आपण होअून आपला जीव देण्याच्या कृत्यास जो वर सांगितल्याप्रमाणे 'आत्महत्या' शब्द वापरला जातो त्यातला तो आत्मा हा शब्द त्याच व्यावहारिक अर्थी आम्ही येथे वापरीत आहोत. तथापि काही प्रकरणी आपण होअून

आपला जीव देणाऱ्याच्या, आपल्याच हाताने आपल्या प्राणांचा बळी देणाऱ्याच्या कृत्यांना, तीं कृत्ये वरील व्यावहारिक अर्थी 'आत्महत्या'च असताही मात्र आत्महत्या न म्हणता आत्मार्पण, आत्मविसर्जन इत्यादि संस्कृत शब्द योजून तीं कृत्ये प्राचीन कालापासून गौरवाहें मानलीं जात आलीं आहेत....

...जो जीव आपण होऊन जात नाही तो हेतुपूर्वक बळानें देण्याच्या सर्व कृत्यांना 'आत्महत्या' म्हणत नाहीत. तसे कृत्य निंद्यच मानले जाते असें नाही. तर अत्यंत असमाधानाने, विफलतेच्या तीव्र जाणीवेने, संकटांना टाळून, अिच्छा असतानाही सुखाने जगता येत नाही म्हणून, अत्यंत अतृप्त अशा मनःस्थितीत, वैतागाच्या भरात जे बळाने जीव देतात त्यांच्या त्या कृत्याला साधारणतः 'आत्महत्या' म्हटले जातें. परंतु आपले जीवितकार्य, जीवनाचे ध्येय, जीवनाचा हेतु, संपूर्णपणें सफल झालेला आहे अशा सफलतेच्या, कृतकृत्यतेच्या भावनेने जे आपल्या ऐहिक अस्तित्वाची हर्षभराने समाप्ती करतात त्यांच्या त्या कृत्यास 'आत्मार्पण' असें म्हणतात. यद्यपि हचा परिवर्तनशील किंवा अखंड विकसनशील जगात सर्वतोपरी परिपूर्णता अशी केव्हाही असू शकणार नाही.

जे जीवनात संपादावयाचें होतें तें सर्व संपादिलेले आहे म्हणून आता कर्तव्य असे काही अुरलेले नाही अशा कृतकृत्य भावनेने रिक्तकाम किंवा पूर्णकाम झालेले धन्य पुरुष आपण होऊन आपले प्राण विसर्जन करतात. तें आपले नश्वर जीवन विश्वाच्या चिरंतन जीवनात विलीन करून टाकतात. योगवासिष्ठात म्हटल्याप्रमाणे,

अंतारिक्तो बहीरिक्तो रिक्त कुम्भरिवाम्बरे ।
अंतःपूर्णो बहिःपूर्णो पूर्णकुम्भरिवार्णवे ॥

तथापि आपल्या या जीवनकार्याची सापेक्षतः परिपूर्णता झाली आहे अशी आत्मसंतुष्टता वाटल्यानंतर समाजाला किंवा स्वतःला जो देह वार्धक्याने म्हणा, व्याधीने म्हणा, पण केवळ भारभूत असाच रहाणार आहे त्या देहाचा गृहाप्रवेशाने, प्रायोपवेशनाने, अग्निदिव्याने, समुद्रसमाधि किंवा जलसमाधि किंवा अंतिम योगसमाधि घेऊन किंवा अशाच कोणत्या तरी मार्गाने जे त्याग करतात तें त्यांचें कृत्य अुत्तान अर्थी 'बळाने जीव देणे'च असताही त्याला 'आत्मसमर्पण' म्हणून जे गौरविले जातें तें यथार्थच असतें !

धन्योऽहं धन्योऽहं कर्तव्य मे न विद्यते किंचित् ।
धन्योऽहं धन्योऽहं प्राप्तव्यं सर्वमद्य संपन्नम् ॥

विभाग दुसरा

स्वातंत्र्यवीर सावरकर हे विख्यात समाजसुधारक गोपाळराव आगरकरांप्रमाणे अज्ञेयवादी होते. कोणत्या हेतूने किंवा हेतूवाचून जगड्व्याळ विश्व प्रेरित झाले त्याचा उलगडा माणसाला करता येणार नाही. मात्र विश्वाची रचना माणसाला बरीचशी प्रतिकूल असली तरी माणसाने विश्वाच्या व्यापारांमागचे नियम समजतील तितके समजावून घेऊन त्यांचा मनुष्यजातीच्या हितासाठी व सुखासाठी शक्य तितका उपयोग करून घ्यावा असे सावरकरांचे मत होते. 'मनुष्याचा देव आणि विश्वाचा देव' या निबंधात त्यांनी अनेक समर्पक उदाहरणे देऊन या मताचे विवरण केले आहे.

तत्त्व म्हणून महात्मा गांधींनी अहिंसेचा सदैव केलेला पुरस्कार आणि त्यांनी सतत केलेला अत्याचाराचा आणि हिंसेचा निषेध स्वातंत्र्यवीर सावरकरांना मुळीच मान्य नव्हता. प्रत्येक बळप्रयोग हा अत्याचार नसतो असे सावरकरांचे म्हणणे होते. बळप्रयोग दुष्ट हेतूने अगर परपीडक बुद्धीने केला तर तो अत्याचार ठरेल. मात्र निरपराधी सज्जनांच्या रक्षणार्थ न्यायबुद्धीने बळप्रयोग केला तर त्यास सदाचार म्हटले पाहिजे असे सावरकरांचे मत होते. 'अत्याचार शब्दाचा अर्थ' या त्यांच्या

पृथःकरण करून, ते घटक पुन्हा मोजून त्या अमर्याद व्यापाची जंत्री करीत राहिल्यानें विश्वाच्या असीम महाकोषांतील वस्तूजाताचें मोजमाप करणें केवळ अशक्य असें समजून आपल्या प्राचीन तत्त्वज्ञान्यांनी, आपल्या पांच ज्ञानेंद्रियांनींच ज्या अर्थीं हें सर्व विश्व केंव्हांहि जें कांहीं आकळलें जाऊं शकणारें आहे तें जाऊं शकतें, त्या अर्थीं त्याचें 'पंचीकरण' करणें हाच वर्गीकरणाचा अुत्कृष्ट मार्ग होय असें जें ठरविलें तें एका अर्थी क्रमप्राप्तच होतें. अितकेंच नव्हे, तर तो त्यांच्या त्यांच्या अप्रतिरथ बुद्धिमत्तेचा त्या काळचा अेक आश्चर्यकारक विजयच होता ! ज्ञानेंद्रियेंच जर पांच तर विश्वाचें यच्चावत् वस्तुजात त्यांच्या त्या पांच गुणांपैकीं कोणत्यातरी अेका वा अनेक गुणाचेंच असणार. अर्थात् त्यां पांच गुणांच्या तत्त्वांनीं, पंचमहाभूतांनींच, ते घडलेले असणार. ह्या विश्वदेवाचा आम्हांशीं जो कांहीं संवाद होणें शक्य आहे तो ह्या त्याच्या पांच मुखांनीच काय तो होणार; म्हणूनच तो विश्वदेव तो महादेव पंचमुखी होय !

आपल्या ज्ञानेंद्रियांनी विश्वाच्या गुणधर्मांचे आकलन करण्याचा मनुष्याचा हा यत्न जितका अपरिहार्य नी सहज, तितकाच स्वतःच्या अंतःकरणानें त्या विश्वाला निर्मिणाऱ्या देवाच्या अंतःकरणाची कल्पना करण्याचा मनुष्याचा यत्नहि साहजिकच होता. त्यांतहि मनुष्याला सुख देण्यासाठींच कोण्या दयाळू देवानें ही सृष्टी निर्मिली असली पाहिजे, ह्या मानवी निष्ठेला अत्यंत प्रबळ असा पाठिंबा ही सृष्टिदेवींच प्रतिपदीं प्रतिपदीं तिला तशी लहरच आली कीं सारखीं देत राही. आजही देतेच आहे !

खरोखर, मनुष्याच्या सुखसोयीसाठीं त्या दयाळू देवाने ही सृष्टीची रचना किती ममताळूपणानें केली आहे पहा ! हा सूर्य, समुद्र–किती प्रचंड हीं महाभूते ! पण मनुष्याच्या सेवेस त्यांना देखील त्या देवानें लावलें. दुपारीं तहान–तहान करीत मुले खेळून दमून येतील तेव्हां त्यांना थंडगार नी गोड पाणी मिळावें म्हणून आजी सकाळींच विहिरीचें पाणीं भरून 'कुज्यांत' घालून गारत ठेवते, तशा ममतेनें उन्हाळ्यानें नद्या सुकून जाण्याच्या आधींच हा सूर्य त्या समुद्रांतलें पाणी किरणांचे दोर खोलखोल सोडून भरतो. मेघांच्या 'कुज्यांतून' सांठवून ठेवतो, आणि तेहि मध्यंतरी अशी कांहीं हातचलाखी करून, कीं समुद्रांत असतांना तोंडी धरवेना असें खारट असणारे तें पाणी किरणांच्या कालव्यांतून त्या आकाशाच्या विस्तीर्ण सरोवरांत सांचतांच अितके गोड नी गार व्हावें कीं जें पाणी पिण्यासाठीं देवांच्याहि तोंडास पाणी सुटावें ! पुन्हा समुद्राचें खारट पाणी माणसासाठीं गोड करून देण्याच्या धांदलीत साराच सारा समुद्र गोड करून टाकण्याची भलतीच चुकीही न होअील अशी तो दयाळू देव सावधगिरीहि घेवितो. अेका वर्षांत हवें तितकेंच पाणी गोड करून आटविण्याअितकीच शक्ति सूर्यकिर-

णांत आणि साठविण्याअितकीच शक्ति मेघांत ठेविली जाते. नाहींतर सारा समुद्रच गोड झाल्याने मनुष्यास मीठ मिळणें बंद होऊन त्यांचा सारा संसार अळणी व्हावयाचा !

हे पशु पहा ! मनुष्याच्या सेवेला आणि सुखाला हवे तसेच विविध, हवे तितकेच बुद्धिमान, बाळवंटांतलें तें मनुष्याचे तारू-म्हणून कांटे खाऊन पाण्यावाचून महिनोगणतीं चालण्याची युक्ति त्या अुंटाला शिकविली. तो घोडा किती चपल ! त्याच्यावर स्वारी भरणाऱ्या मनुष्यास भर रणांगणांतहि संभाळून वहण्याअितकी नी मनुष्याशीं अत्यंत प्रामाणिकपणें वागण्याअितकी बुद्धि त्याला देवानें दिली. पण मनुष्यावरच स्वारी भरण्याअितकी बुद्धि मात्र दिली नाहीं ! ही गाय पहा ! अेका बाजूला सुकें गवत ढकलावें नी दुसऱ्या बाजूला त्याचें बनलेलें ताजे ताजें जीवनप्रद दूध चरव्या भरभरून काढीत बसावें ! असें तें आश्चर्यकारक रासायनिक यंत्र ज्या देवाने घडविले तो खरोखरच किती दयाळू असला पाहिजे ! आणि, पुन्हा प्रत्येक वेळीं जुनें यंत्र मोडतांच नवें घडण्याचे श्रमसुद्धां मनुष्याला पडूं नयेत अशी सोय त्यांतच केलेली; पहिल्या यंत्रांतच गवताचे दूध करून देतां देतांच तसलींच नवीन अजब यंत्रे बनविण्याचीहि व्यवस्था केलेली !

अेक गव्हाचा दाणा पेरला कीं त्याचे शंभर दाणे ज्या जगांत होऊन अुठतात; अेक आंबा ! रसानें, स्वादानें, सत्त्वानें कोण भरपूर भरलेलें तें देवफळ ! पण तरीहि तें अितके सुपीक कीं एक आंबा रुजविला की त्याचा वृक्ष होऊन प्रतिवर्षी हजार हजार आंबे त्याला लागावे नी असा क्रम वर्षानुवर्षे चालावा; फार काय सांगावें, अेका आंब्याच्या फळापासून होणारीं तीं लाखों फळें सगळींचीं सगळीं जरी मनुष्यांनीं खाल्लीं तरी पुन्हा आंब्यांचा तोटा म्हणून पडूंच नये, यासाठीं आंब्याच्या झाडाच्या फांदीचीच कलमें करून त्यांच्या आंबरायांच्या आंबराया भरभराटण्याची सोय ज्या जगांत देवाने केलेली आहे; अेका कणाचा मण होणारीं हीं तांदूळ, बाजरी, जोंधळे प्रभृति नानाविध सत्वस्थ धान्यें; अेक बी पेरलो को अेका पिढीस सहस्त्रावधि रसाळ फळें पुरविणारीं ही फळझाडें; हे फणस, पपनस, अननस, द्राक्षें, डाळिंबे; या गवतासारख्या अुगव म्हणतांच अुगविणाऱ्या अति रुचकर बहुगुणी विविधरस शाकभाज्या, फळभाज्या; ज्या जगांत पुरून अुरताहेत, ज्याचा गाभाच गोड आहे, तो साखरेंच्या पाकानें ओतप्रोत भरलेला अूंस देखील जगांत अितका पिकतो की त्याचे मळेचे मळे माणसांना नकोसे झाले म्हणजे बैल खाऊन टाकतात त्या जगास निर्मिण्यांत देवाने मनुष्यावर जी अमर्याद दया केली आहे; तीविषयी मनुष्य त्याचा अुतराई होणार तरी कसा !!

तशीच ही मनुष्याच्या देहाची रचना ! पायांच्या तळव्यापासून तों मज्जांतील सूक्ष्मातिसूक्ष्म पिंडानुपिंडापर्यंत हया शरीराची रचना मनुष्याला सुख-

दाखी होऊील अशीच सुसंवादी करतांना हे मनुष्याच्या देवा, तूं जी केंसानुकेसा-गणिक काळजी घेत आला आहेस ती कुठवर सांगावी ! मनुष्याचा हा अेक डोळा जरी घेतला तरी, कितीं युगे, किती प्रयोग, किती अनवरत अवधानें करून तूं आज हा आहे तसा घडवूं शकलास ! प्रथम प्रकाशाला किंचित् संवादी असा अेक नुसता त्वरिंबदू; प्रकाशाला नव्हे तर त्याच्या सावलीला तेवढा जाणणारा; अंधेर नी अुजेड अितकाच फरक काय तो जाणणारा तो पहिला त्वरिंबदु; त्याच्यांत सुधारणा करतां करतां किती प्रयोग करून, किती रद्द करून, पुन्हा प्रयोग करून रचतां रचतां शेवटीं आज मनुष्याचा सुंदर, टपोरा, पाणीदार, महत्त्वाकांक्षी डोळा तूं घडविलास ! अितका महत्त्वाकांक्षी डोळसपणा त्या मनुष्याच्या डोळ्यांत मुसमुसत आहे की, देवा तुझ्याच कलेत तुझाच पाडाव करण्यासाठी दुर्बिणीचे प्रतिनेत्र निर्मून तो तुझ्या त्या आकाशांतील प्रयोगशाळेचेंच अंतरंग पाहू अिच्छित आहे ! नव्हे, तुलाहि त्या दुर्बिणीच्या टप्प्यांत गांठून कुठेतरी प्रत्यक्ष पहातां येतें की नाही याचे प्रयोग करूं म्हणत आहे !!

आणि त्या मनुष्याच्या डोळ्यास प्रसादविण्यास्तव सौंदर्याचा नी सुरंगांचा जो महोत्सव तूं त्रिभुवनांत चालूं केलास त्याची आरास तरी काय वर्णावी ? हें पारिजातकाचें सुकमल फूल, तें सोनचांपयांचें सुवासमत्त सुमन ! हा मोराचा पिसारा पहा. अहाहा ! अेकेका पिसाची ती ठेवण, तें रंगकाम, ती जिवंत चमक तें तरल नटवेंपण ! आद्य कलावन्त ! अशा अनेक सुंदर पिसांचा तो पिसारा पसरून तो तुझा मोर जों जों आनंदानें अुन्मत्त होऊन नाचूं लागतो तों तों देवा, तुझी ती ललित कलाकुसरी पाहून 'धन्य, देवा, धन्य तुझी ! वा रे वा !' असें वारंवार अुद्गारत माझें हृदयहि नाचूं लागतें ! आणि असा पिसारा मनुष्यासहि तूं कां दिला नाहींस म्हणून किंचित् रुसूंहि लागतें ! हे नयनाल्हादक रंगांचे नी श्रवणाल्हादक गोड लकेऱ्या घेणारे शतावधि पक्ष्यांचे थवेच्या थवे ज्या जगांत मंजुळ आनंदांचे किलबिलाट करीत आहेत; गुलाब, चमेली, बकुळ, जाअीजुअी, चंपक, चंदन, केतक, केवड्यांची बनेंचीं बनें सुंदर फुलांचें सडे पाडीत आहेत; आणि सुगंधाने सारा आसमंत दरवळून सोडीत आहेत; मानसांतून हचा प्रीतिरति आणि मानससरोवरातून हचा कमलिनी कुमुदिनी विकसत विलसत आहेत; ज्या जगांत रात्रीं चांदण्या आहेत, अुषःकाल गुलाबी आहेत, तारुण्य टवटवीत आहे, निद्रा गाढ आहे. भोगांत रुचि आहे, योगांत समाधि आहे-देवा ! तें हें जग ज्या तूं आम्हां मनुजांना अितकें सुखमय होअूं दिलेस, होअूं देत आहेस, त्या तूं तें आमच्या सुखा-साठींच असें निर्मिलेंस असे आम्हांस कां वाटू नये ? आम्हाला जशी आमच्या लेंकरांची माया आहे म्हणूनच आम्ही त्यांच्या सुखासाठी जपतों, तसेंच आमच्या सुखासाठीं अितकें जपणाऱ्या देवा, तुला आम्हां मनुष्यांची माया असलीच पाहिजे.

आम्ही माणसें, देवा, तुझीं लेंकरे आहोंत; तूं आमची खरी आई आहेस ! आईला देखील दूध येतें–तूं दिलेंस म्हणून ! आम्ही मनुष्ये तुझे भक्त आहोंत, आणि देवा, तूं आम्हां मनुष्यांचा देव आहेस. अितकेच नव्हे, तर तू आम्हां मनुष्यांचाच देव असून तुझ्यावांचून दुसरा देव नाहीं ! हे सारें जगत तू आमच्या सुखसोयीसाठींच घडविलें आहेस !

मनुष्याच्या अिच्छेस जुळेशी ही विचारसरणी सत्यास जुळेल अशीहि ठरली असती – जर ह्या जगांतील प्रत्येक वस्तु नी प्रत्येक वस्तुस्थिति मनुष्याला सुखकारक नी अुपकारक अशीच असती तर ! पण मनुष्याच्या दुर्दैवानें या साऱ्या जगांतील तर राहोतच, पण ज्या पृथ्वीस तो मनुष्य प्रथम प्रथम तरी 'सारें जग' म्हणून स्वाभाविकपणेंच संबोधित होता, जिला विश्वंभरा, भूतधात्री, अशा नांवानें तो अजूनही गौरवतो, त्या पृथ्वीरील वस्तुजातहि वा वस्तुस्थितीहि मनुष्यास सर्वस्वीं अनुकूल नाहीं; अितकेच नव्हे, तर उलट अनेक प्रकरणीं मारकच आहे.

ज्या सूर्याचे नी समुद्राचे मनुष्यावर झालेले अुपकार आठवून आठवून आपण आत्तांच त्याचीं स्तोत्रे गाअिलीं तो सूर्य नी तो समुद्रच पहा! अुन्हाने तापून चक्कर येअू लागलेल्या अवश वाटसरूवर, लाठीच्या पहिल्या दोनचार तडाक्यांनीं अर्धमेला होअून गेलेल्या सापावर आपण जसा शेवटचा टोला मारून तो साप पुरतां ठार करतों तसा, हा सूर्य आपल्या प्रखर किरणांचा शेवटचा तडाखा मारून त्या मनुष्यांना ठिकच्यो ठिकाणीं ठार मारण्यास चुकत नाहीं ! ज्या भारतांत त्या सूर्यास लक्षावधि ब्राह्मण, सकाळ संध्याकाळ अर्घ्य देण्यास अुभे असत, त्याच भारतांत, त्या धर्मशील काळींहि दुर्गादेवीच्या दुष्काळांचा सुकाळ करून बारा बारा वर्षें आपली प्रखर आग सारखी वर्षत लाखों जीवांस जिवंत भाजून काढीत आला आहे ! कुराणांत, तौलिदांत, भाविक पैगंबरांनीं स्तुति केली आहे कीं 'मनुष्यासाठीं, हे देवा, हे किती असंख्य मासे, किती रुचकर अन्नाचा हा केवढा अखंड सांठा तू या समुद्रात ठेवला आहेस !' पण तोच समुद्र मनुष्यास जशाचा तसाच गिळून पचवून टाकणाऱ्या अजस्त्र सुसरींना आणि प्रचंड हिंस्त्र माशांनाहि तसेंच निःपक्षपाताने पाळीत आहे ! मनुष्यांचीं तारवें पाठीवर वाहून नेतां नेतां, सदय वाटाड्याचें सोंग घेअून चाललेला वाटसाऱ्या जसा भररानांत त्याच बायाबापड्या वाटसरूंवर अुलटून त्यांचे गळे कापतो, तसा हा समुद्र अकस्मात् हजारों माणसांनी भरलेलीं तीं तारवें नी त्या प्रचंड टिटानिका बोटी आपल्या पाठीवरून फेंकून आपल्या भयंकर जबड्यांत ढकलतो–गट्कनी गिळून टाकतों ! अेखादी राक्षसीण रागावली तर अेखाद्या लेंकराचो मानगुटी नदींत दाबून, त्याचा गुदमरून जीव जाअीतों धरील ! अेखादी हिंस्त्र सुसर फार तर दोन तीन सुरेख कुमारिकांना नदींत अुतरून लाजत लाजत स्नान करीत असतां त्यांचे काकडीसारखे कोळे

लुसलुशीत पाय दांतांत धरून हिसडून गटकन् गिळून टाकील; पण ही गंगामाय, जमनाजी, ही ही देवनदी जार्डन, हा फादर थेम्स, हजारों कुमारींची–मुलालेकरांची–मान अेका मानेसारखी, आपल्या पाण्यांत याचा अवश हीव गुदमरून ठार होओतों दाबील, नगरेंचीं नगरें त्यांचा पाया हिसडून गिळून टाकील.

अिजिलकुराणादिक धर्मग्रंथांत भावडी भक्ति लिहून गेली कीं, बोकड, कोंबडी, ससा, शेळी, हरीण हेहि नानाविध प्राणी मनुष्यांना पुष्कळ मांस मिळावें म्हणून, हे दयाळु देवा, तूं निर्मिलेस ! पण त्यांच्या रुचकर मांसानें, स्मरणानें तोंडास पाणी सुटलेल्या त्या भक्तीस हयाचें अगदींच कसे विस्मरण पडतें कीं हयाच जगांत त्याच देवानें मनुष्यांचेंहि मांस खाण्यासाठीं सिंह, वाघ, चित्ते, लांडगे हेहि निर्मिलेले आहेत. हे दयाळु देवा, तूं माणसाची कोवळींकोवळीं मुलें अशाचसाठीं निर्मिलींस कीं, आम्हांस कांकडोसारखी मुखशुद्धि सदोदित मिळावी अशी मनुष्यास फाडून चिरफाडून खाल्ल्यानंतर त्याच्या हाडांवर ढेकरा देत बसलेल्या सिंहांच्या नी लांडग्यांच्या रक्ताळलेल्या तोंडांतली कृतज्ञ स्तुतीहि त्याच देवास पावत आहे ! आशिया आणि आफ्रिका यांस जोडणारे खंडच्या खंड ज्या दिवशीं महासागरांत, त्या खंडावरील वरमाला घेऊन अुभ्या असलेल्या लक्षावधि कुमारिकांसह, दूधपाजत्या आयालेकरांसह, अर्धभुक्त प्रणयोजनांसह, पूजांजलि वाहात्या, भक्तांसह, त्याच देवाची स्तुति चाललेल्या लाखों देवालयांसह तें खंडच्या खंड त्याच देवानें ज्या दिवशीं त्या महासागरांत गणपति डबकन् बुडवावा तसें बुडविलें. त्याच्या दुसऱ्या दिवशीं हीच अुषा, हीच वेदांनीं गाअिलेली अुषा, असेंच गोड गुलाबी हास्य हंसत त्या शुकशुकाट दृश्याकडे पहात होती ! कुराणांत म्हटलें आहे कीं, ' चंद्र निर्मिला, अशासाठीं कीं, मनुष्याला निमाज पढावयाच्या वेळा कळाव्या ! पण जो जो निमाज पढे त्या त्या अिस्लामियांची, त्या मुल्लामौलवीमशिदीसुद्धां कत्तल करून, त्या खलिफाच्या घराची राखरांगोळी अुडवून त्या लाखों मुस्लिमांच्या कापलेल्या डोक्यांच्या ढिगावर ज्या दिवशीं तो निजामाचा कट्टर शत्रू चेंगिजखान चढून जाअून शांतपणें बसला, त्या रात्रीं त्या बगदाद नगरीं हाच चंद्र त्या चेंगिजखानालाहि त्याच्या वेळा पलें पलें मोजून असाच बिनचूक दाखवित शांतपणे आपली कौमुदी वितरीत होता.

ही सुगंधी फुलें, हे सुस्वर पक्षी, तो मनोहर पिसारा पसरून नाचणारे हे सुंदर मोरांचे थवे, रानचे रान अकस्मात् पेटून भडकलेल्या वणव्यांत, चुलींत वांगे भाजावें तसें, फडफड करतात न करतात तोंच भाजून राख करून टाकतो–तो कोण ? गाय दिली तो दयाळु, तर त्याच गाअीचे दूध पिऊन तिच्यांच गोठ्यांत बीळ करून राहणारा तो विषारी साप, त्या गाअीचें दूध देवाच्या नैवेद्यासाठीं काढावयास येणाऱ्या व्रतस्थ साध्वीला कडकडून डसून तिचा जीव घेणारा तो साप,

तो ज्यानें दिला तो कोण ? प्रत्येक भोगामागें रोग, केंसागणिक ठणठणणारे केंसतोंड, नखानखांचे रोग; दातादातांचे रोग, ते कण्ह, त्या कळा, ती आग, त्या सांथी, ती महामारी, ते प्लेग, ती अतिवृष्टि, ती अनावृष्टि, ते अुल्कापात ! जिच्या मांडीवर विश्वासाने मान ठेवली ती भुअीच अकस्मात् अुलटून मनुष्यांनीं गजबजलेले प्रांतचे प्रांत पाताळांत जिवंत पूरुन गडप करून टाकणारे ते भूमिकंप !! आणि कापसाच्या राशीवर जळती मशाल कोसळावी तसें हया पृथ्वीच्या अंगावर कोसळून अेखाद्या गवताच्या गंजीसारखी भडभड पेटवून देणारे ते दृष्ट धुमकेतु–ते कोणी केले ?

जर हया विश्वांतील यच्चावत् वस्तुजातांच्या मुळाशीं त्यांना धारण करणारी, चालन करणारी, किंवा जिच्या क्रमविकासाचे ते परिणाम होत आले आहेत अशी जी शक्ति आहे तिला देव म्हणावयाचें असेल तर त्या देवानें हे सारें विश्व, मनुष्यास त्याचा मध्यबिंदु कल्पून केवळ मनुष्याच्या सोयींसाठींच निर्मिलें ही भावना अगदीं भाबडी, खुळी आणि खोटी आहे असें मानल्यावांचून वरील विसंगतीचा अुलगडा होअूंच शकत नाहीं.

कोणत्या हेतूनें वा हेतूवांचून हे जगड्व्याळ विश्व प्रेरित झालें तें मनुष्याला तर्कितां देखील येणें शक्य नाहीं. जाणतां येणें शक्य आहे तें अितकेंच कीं, काहीं झालें तरी मनुष्य हा हया विश्वाच्या देवाच्या खिसगणतींतहि नाहीं. जशी कीड, मुंगी, माशी, तशाच हया अनादिअनंत कालाच्या असंख्य अुलाढालींतील हा मनुष्यहि अेक अत्यंत तात्पुरता आणि अत्यंत तुच्छ परिणाम होय. त्याला खायला मिळावें म्हणून धान्य अुगवत नाहीं, फळें पिकत नाहींत, कोथिंबीर खमंग झालेली नाहीं. धान्य पिकतें म्हणून तो खाअूं शकतो, अितकेंच काय तें. त्याला पाणी मिळावें म्हणून नद्या वहात नाहीत. नद्या वहातात म्हणून पाणी मिळतें अितकेंच काय ते. या पृथ्वीवर जेंव्हा नुसत्या प्रचंड सुसरीच सुसरी नांदत होत्या नी मनुष्याचा मागमूसही नव्हता तेंव्हाहि नद्या वहात होत्या, झाडें फुलत होतीं, वेली फुलत होत्या. मनुष्यावांचून तर काय, पृथ्वी नव्हती तेंव्हांहि हा सूर्य असाच आकाशांत भटकत फिरण्यास भीत नव्हता, आणि हा सूर्यहि जरी त्याच्या साऱ्या ग्रहोपग्रहांसहितसुद्धा हरवला तरी, अेक काजवा मेला तर पृथ्वीला जितकें चुकलेंसे वाटतें तितकें देखील या सुविशाल विश्वाला चुकलेंसें वाटणार नाहीं. हया विश्वाच्या देवाला अेका पलाचेंहि सुतक, असे शंभर सूर्य अेखाद्या सायींत अेकां दिवसांत जरी मरूं लागले तरी, धरावें लागणार नाहीं !!

तरीदेखील ज्या कोणच्या हेतूनें वा हेतूवांचून ही विश्वाची प्रचंड जगड्व्याळ अुलाढाल चालूं आहे तींत अेक अत्यंत तात्पुरता नी अत्यंत तुच्छ परिणाम म्हणून का होअीना, पण मनुष्याला त्याच्या लांबीरुंदीच्या गजानें मापतां यावें असें, त्याच्या

संख्येत मोजता यावे असें, जितकें सुख नि जितक्या सोयी उपभोगितां येतात हा मात्र आणि येवढाच काय तो हया विश्वाच्या देवाचा मनुष्यावर झालेला अुपकार होय ! मनुष्याला हया जगांत जें सुख मिळूं शकतें तेवढेंहि मिळूं न देण्यासारखीच जर हया विश्वाची रचना हया विश्वाच्या देवानें केली असती, तर त्याचा हात कोण धरणार होता ? हे सुगंध, हे सुस्वर, हे सुखस्पर्श, हे सौंदर्य, हें सुख, हया रुचि, हया सोयी आहेत, त्याहि अमूप आहेत ! ज्या योगायोगानें मनुष्यास हया सर्व लाभत आहेत त्या योगायोगाला शतशः धन्यवाद असोत ! ज्या विश्वशक्तींनीं कळत न कळत असा योगायोग जुळवून आणला त्यांना त्या अंशापुरतें मनुष्याचा देव म्हणून संबोधिल्याचे समाधान आपणांस अुपभोगितां येअील, अुपकृत भक्तीचें फूल वाहून त्यास पूजितांहि येअील !

परंतु त्या पलिकडे हया विश्वाच्या देवांशीं वाटच्या भिकारड्यानें सम्राटाशीं जोडूं पहावा तसा कोणचाहि बादरायण संबंध जोडण्याची लचाळ हाव मनुष्यानें आमूलात् सोडून द्यावी हेच अिष्ट ! कारण तेंच सत्य आहे ! आपले चांगले तें देव करील, देव चांगले करील तर मी सत्यनारायण करीन, ही आशा, हा अवलंब, अगदीं खुळचट आहे ! कारण तो अगदीं असत्य आहे ! ज्या ज्या संकटांतून आपणांस सोडविलें म्हणून आपण देवाचा सत्यनारायण करतों, त्या त्या संकटांत प्रथम आपणांस ढकलतो कोण ? तोच सत्यनारायण, तोच देव ! जो प्रथम आपला गळा कापतो आणि नंतर त्यास मलम लावतो त्याची मलम लावण्यासाठीं पूजा करावयाची तर प्रथम गळा कां कापलास म्हणून त्याची आधी यथेच्छ शोभाही करावयास नको काय ? विश्वाच्या देवाच्या ठायीं हया दोन्हीही भावना अनाठायी नी असमंजस आहेत.

नी विश्वाची आद्यशक्ति ज्या कांहीं ठराविक नियमांनी वर्तते आहे ते तिचे नियम समजतील ते समजून घेअून त्यांतल्या त्यांत आपल्या मनुष्यजातीच्या हिताला नी सुखाला पोषक होअील तसा, त्यांचा साधेल तितका अुपयोग करून घेणें अितकेंच मनुष्याच्या हातांत आहे. मनुष्यजातीच्या सुखाला अनुकूल तें चांगलें, प्रतिकूल तें वाअीट, अशी नीति-अनीतीची स्पष्ट मानवी व्याख्या केली पाहिजे. देवांस आवडतें तें चांगले, आणि मनुष्यास जें सुखदायी तें देवास आवडतें हया दोन्ही समजुती खुळचट आहेत; कारण त्या असत्य आहेत. विश्वांत आपण आहोंत पण विश्व आपलें नाहीं; फार फार थोडया अंशीं तें आपणांस अनुकूल आहे; फार मोठया अंशीं ते आपणांस प्रतिकूल आहे–असें जें आहे तें नीटपणें, धीटपणें, समजून घेऊन त्याला बेधडकपणें तोंड देणें हीच खरी माणुसकी आहे ! आणि विश्वाच्या देवाची खरी खरी तीच पूजा !!

सावरकर साहित्य भाग १–'मनुष्याचा देव आणि विश्वाचा देव !' पाने १६ ते २७.

रहस्यकार आणि अुपयुक्ततावाद

सूक्ष्मो हि भगवन्धर्मः परोक्षो दुर्विचारणः ।
अतः प्रत्यक्षमार्गेण व्यवहारविधिं नयेत् ॥

युरोपमध्ये भौतिक शास्त्रांची दिवसेंदिवस अेकसारखी वाढ होत राहिल्याने आणि नवीन नवीन शास्त्रीय शोधास व प्रगतीस धनाची, सवडीची व सत्तेची जी जोड मिळणे अवश्य असते ती जोड मिळणे शक्य असल्याने आणि तो पाठिंबा तिकडे मिळत असल्याने व आपल्या अिकडे मिळणे दुर्घट झाल्याने भौतिक शास्त्रांत युरोपीय वाङ्मयात जसे ग्रंथ निर्माण होत आहेत तसे आपल्या हिंदी भारतीय वाङ्मयात अजून निर्माण होत नाहीत. हे जरी खरे आहे, तथापि बौद्धिक शास्त्रांत प्रस्तुत आपल्या मराठी, हिंदी, बंगाली, तामीळ, तेलगू अित्यादी भारतीय भाषांतून किंवा अिंग्रजीमधूनही भारतीय विद्वानांनी कांही कांही असे अुत्कृष्ट प्रतीचे ग्रंथ प्रसिद्ध केलेले आहेत की युरोपमध्ये त्या विषयावर त्या तोडीचे ग्रंथ क्वचितच आढळतात. युरोपीय वाङ्मय व परिस्थिती यांचा अभ्यास करून युरोपीय विद्वान त्यांचे ग्रंथ लिहितात. अर्थातच युरोपव्यतिरिक्त पौर्वात्य जगाच्या ज्ञानाची व परिस्थितीची जोड त्यास न मिळाल्याने ते थोडेबहुत व कधी कधी तर बव्हंशी अेकदेशीय असतात. पौर्वात्य वाङ्मय व त्यांतही 'जुने तितके सोने' या मंत्राचा अखंड पाठ करीत पौराणिक परिस्थितीच्या मर्यादेतच स्वतःला कोंडून घेणारे आमचे जे जुने पंडित ग्रंथ लिहितात तेही भारताबाहेरील जगाच्या ज्ञानास आणि अनुभवास आंचवले असल्याने तेही केवळ युरोपीय विद्येचेच अध्ययन केलेल्या विद्वानांच्या ग्रंथाप्रमाणेच आणि केव्हा केव्हा तर त्यांच्या अेकदेशीपणावरही ताण करतील असे, आकुंचित आणि अप्रगामी असतात.

पाश्चात्य व पौर्वात्य पंडित

अेक पक्ष युरोपीय व पाश्चात्य भ्रमाने दूषित तर दुसरा भारतीय व पौर्वात्य प्रौढीने अंध. आजपर्यंतच्या युरोपीय वा भारतीय पंडितांच्या ग्रंथांत हा अेकदेशीपणा आढळणे हेच वरील कारणाने अपरिहार्य होते. परंतु आता युरोपीय विद्वानांच्या अुच्च व अुदात्त विचाराचे ज्यांनी परिशीलन केलेले असूनही अेखाद्या सव्यसाचीप्रमाणे जे आपल्या भारतीय शास्त्रांतही निष्णात आहेत अशा विद्वानांचा प्रादुर्भाव आपल्या हिंदुस्तानांत होअू लागल्यानें त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांतून युरोपीय व भारतीय या अुभय विचारपद्धतीचे केवळ खुद्द मिश्रणच नव्हे, तर समन्वयही दिसून येत आहे. समाजशास्त्र, अर्थशास्त्र, तत्त्वशास्त्र, नीतिशास्त्र अित्यादी शास्त्रां-

सर गेल्या वीस-तीस वर्षांत मराठी, बंगाली व अितर भारतीय विद्वानांनी लिहीलेल्या ग्रंथांत कांही ग्रंथ असे आहेत की, त्या विषयावरील युरोपीय ग्रंथांत त्यांस तोड मिळत नाही. कारण युरोपीय विद्वान पौर्वात्य ज्ञानास, अनुभवास व परिस्थितीस अपरिचित असल्याने व पौर्वात्य पंडित पाश्चिमात्य ज्ञानाशी परिचित नसल्याने या दोहोंच्या ग्रंथांतून आढळणारा संकुचितपणा या आजकालच्या आपल्या जाड्या भारतीय विद्वानांच्या ग्रंथांत त्यांनी अुभयविध ज्ञानांचा, परिस्थितींचा व अनुभवांचा व्यासंग केला असल्यानें आढळून येत नाही. संस्कृतादी पौर्वात्य ज्ञानाची गंगा पाश्चिमात्य ज्ञानाच्या यमुनेशी आणि शोणाशी संगम पावून अशा ज्या ग्रंथतीर्थांतून आपल्या संपूर्ण वैभवानें अवतीर्ण झालेली आहे, त्या भारतीय विद्वानांनी लिहिलेल्या अर्वाचीन ग्रंथांत लोकमान्य टिळकांचा 'श्रीमद्भगवद्गीतारहस्य' ग्रंथ केवळ सरस्वतीच्या मुकुटमण्याप्रमाणे शोभतो.

अुपयुक्ततावादाचा विचार

गीतेतील कर्मयोगाच्या विवेचनांत भारतीय नीतिशास्त्र अथवा कार्यव्यवस्थितीविषयक तत्त्वांची पाश्चात्य मताशी तुलना करीत असतांना रहस्यकारांनी युरोपीय नीतिशास्त्रांनी अुपयुक्ततावादाविषयी जी मते अवलंबिली आहेत त्यांचेही समालोचन क्रमप्राप्त म्हणूनच केलेले आहे. ते करतांना अुपयुक्तवादांतच जे अनेक पोटभेद आहेत त्यांच्यातील दोषाविष्करण करून गीतेमध्ये प्रतिपादित असलेल्या कर्मयोगाच्या तत्त्वाचा, अुपपत्तीचा व व्यवस्थितीचा ऊहापोहही त्यांस करणे अवश्य झाले. परंतु केवळ तुलनेचे कार्यच त्यांस करावयाचे असल्याने अुपयुक्ततावादातील दोषच तेवढे निवडून ते गीतेतील तत्त्वज्ञानात निरस्त केलेले आहेत. हे दाखविण्याचे त्यांचे कार्य रहस्यकार करीत असता सामान्य वाचकांचा असा समज होण्याचा संभव आहे की, रहस्यकारांनी संक्षेपाने अुल्लेखिलेले दोष हे अुपयुक्ततावादातील कांही पक्षांच्या विचापद्धतीचे दोष नसून ते त्या अुपयुक्तता तत्त्वाचेच अपरिहार्य व्यंग आहे. परंतु वास्तविक स्थिती तशी नाही, आणि अुपयुक्ततावादाचे सर्वसाधारण महत्त्व हे विवेचनात्मक परीक्षण चालले असतांना आणि त्यांतील स्फुट दोषाविष्करण करीत असतांही रहस्यकार जाणून होते. परंतु त्यांचे मुख्य कार्य अुपयुक्ततावादाची सर्वतोपरी छाननी करण्याचे नसून त्यांतील कांही व्यंगें प्रामुख्यानें अुल्लेखून त्यांचा कर्मयोगाच्या ब्रह्मात्मैक्य अुपपत्तीने निरास कसा करता येतो ते दाखविण्याचा असल्याने त्यांनी साहजिकच अुपयुक्ततावादाच्या सर्वसामान्य थोरवीची चर्चा प्रामुख्यानें केलेली नाही. तथापि तदर्थक अुल्लेख हे त्यांच्या लेखणीतून बऱ्याच ठिकाणी प्रत्यक्षपणें व अनेक ठिकाणी अप्रत्यक्षपणे

अुतरलेले आहेत. अुदाहरणार्थ, रहस्याच्या ८८ व्या पानांत (प्रथम आवृत्ति) ते म्हणतात; " पुष्कळांचे पुष्कळ हित " हे तत्त्व अगदीच निरुपयोगी आहे असे आमचे म्हणणे नाही, " केवळ बाह्य गोष्टींचा विचार कर्तव्य असतां यापेक्षां दुसरे अुत्कृष्ट तत्त्वच मिळावयाचे नाही. परंतु केवळ याच तत्त्वावर अवलंबून राहता येत नाही "

अुपयुक्ततावाद म्हणजे ते वर्तन नैतिक होय की ज्यायोगे शक्य तितक्या अधिक मनुष्यांचे शक्य तितके अधिक हित साधले जाते. या मताचा वास्तविक पाहता रहस्यकारांनी प्रतिपादिलेल्या गीतेतील आत्मैक्य प्रतीतीने अंगी बाणलेल्या आणि सर्वभूतहितरत असणाऱ्या साम्यबुद्धीच्या किंवा शुद्धबुद्धीच्या नीतितत्त्वाशी कांहीच विरोध नाही. हें अुपयुक्ततावादाचे किंवा थोडक्यांत हितवादाचे तत्त्व पाश्चात्यांनी प्रथमच शोधले आहे असे नसून ते महाभारताच्या अनेक श्लोकांतून ग्रंथिलेले वा सूचित केलेले आहे. आम्हांस तर असे वाटते की, अगदी पहिला व प्रख्यात अुपयुक्ततावादी जर कोणी असेल तर तो पार्थसारथी भगवान श्रीकृष्ण होय. रहस्यकारांनी अुपसंहारांत गीतेमध्ये प्रतिपादित असलेल्या आत्मौपम्यभावाने सर्वभूतहिततत्पर असणाऱ्या शुद्धबुद्धी स्थितप्रज्ञाच्या ज्या वर्तनास नीतीचा पाया म्हणून, नीतीचे मापन म्हणून, नीतिशास्त्राचा आधार म्हणून निर्दिष्ट केलेले आहे त्या वर्तनाचा अुपयुक्ततावादाशी कसा विरोध येत नाही, अितकेच नव्हे तर ते अेकमेकांचे कसे पूरकच आहेत, हे खालील अत्यंत संक्षिप्तपणे केवळ सूचित केलेल्या प्रमेयांवरूनही स्पष्ट होअील.

सुखवाद म्हणजे काय ?

प्रथमतः सुखवाद किंवा हितवाद म्हणजे पुष्कळ वैषयिक सुखच होय असे नाही, अुलट या जगामध्ये वा परलोकावर विश्वास असणाऱ्यांच्या विश्वासाप्रमाणे परलोकांतही शक्य तितके असणारे, लभ्य तितके होणारे सुख म्हणजे आत्यंतिक सुख होय. वैषयिक सुखाहून आध्यात्मिक सुख पुष्कळ अंशी चिरकालीन, अपरतंत्र आणि अुत्कृष्ट असल्याने अुपयुक्ततावादाप्रमाणेही तेच अुपार्जनीय आणि नैतिक ठरते. सुख शब्दाचा अध्यात्मिक सुख या अर्थी प्रत्यक्ष गीतेतही अुल्लेख केलेला आहे. " सुखमात्यंतिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतीन्द्रियं, " " सुखमत्यंतमश्नुते " त्यांत सुख शब्दाच्या ठिकाणी हित शब्द घातला म्हणजे वादच अुरत नाही. नीतीची पराकाष्ठा सर्वभूतहितरतत्त्व आहे हेच गीतेचे रहस्यकारांनी नीतिसर्वस्व ठरविलेले आहे, आणि अुपयुक्ततावादाचा हाच सिध्दांत आहे की, ज्यायोगे फार अधिकांत अधिकांचे सुख वा हित साधले जाअील ते कर्म विहित होय.

त्यांतही सर्वभूतहितरतत्व या शब्दांतील सर्वभूत या पदाचा अर्थ आपण करू लागलो तर आपणांस अंती अुपयुक्ततावाद्यांच्या परिभाषेचाच आश्रय करावा लागतो. कारण सर्वत्र अेकच अविच्छिन्न आणि अविच्छेद्य असे सघन ब्रह्मच भरलेले आहे; हे जरी सत्य असले आणि ही अुपयुक्ततावादाशी, साम्यबुद्धीच्या मताशी ती आहे त्याहून अधिक विरोधी होअूंच शकत नाही. तथापि एकदा ब्रह्मसृष्टींतून मायासृष्टीत पाय टाकला की तेथे भेदाभेद अुत्पन्न होतो आणि म्हणूनच नीति-अनीतीचा प्रश्न अुद्भवतो. ब्रह्मसृष्टीत माझा आत्मा तोच दुसऱ्याचा हे वाक्यदेखील अर्थपूर्ण ठरणारे आहे– 'तेथे हे कांहीच न लगे !' पण आत्मैक्यबुद्धीने कां होअीना पण अेकदा साम्याच्या आकाशातून आपण वैषम्यांच्या स्थिर पण जड भूमीवर अुतरलो म्हणजे सर्वभूतहितरतत्व याचा अर्थ अक्षरशः सर्व भूतांचे हित असा घेणे अशक्य होते.

नैतिक घोटाळे

माझ्या आत्म्यास जे अनुकूल तेंच दुसऱ्याच्या आत्म्यास अनुकूल आहे असे समजून मी चालू लागलो तर चालणे हे जितके अशक्य तितकेंच न चालणेही अशक्य होअून जाते. जगणे हे जितके अनीतीचे तितकेच मरणे हेही अनीतीचे होते. कारण चालावे जगावे तर " पक्षमणोऽपि निपातेन येषां स्यात् स्कंधपर्ययः " असे सूक्ष्म हजारो जीव माझ्याच आत्म्याप्रमाणे ज्यांना जगावेसे वाटते ते मारले जातात. न जगावे तर, न चालले तर माझा आत्मा दुःख पावतो. आत्महत्या घडते आणि पुन्हा चालता चालता मारले जातात त्याहून बसल्या बसल्या कांही कमी जीव मारले जातात असेही नाही ! बरे, सर्वभूत या शब्दाचा अर्थ सूक्ष्म भूते सोडून दृश्य भूतें असाही घेतला तरी निर्वाह होत नाही. कारण व्याघ्र अेखाद्या आश्रमांतील सवत्स गाअीवर तुटून पडताच स्थितप्रज्ञ ऋषिदेखील व्याघ्रापासून गाय सोडविण्यासाठी व्याघ्रास ठार मारणे नीती समजत. आता आत्मौपम्य दृष्टीने गाय न मरू देणे हे नीतीयुक्त आहेच आहे. पण व्याघ्राचे भक्ष्य हिसडून त्याची क्षुधापीडिता वाढविणे, किंबहुना त्याचा प्राणही घेणे, हे केवळ आत्मौपम्य दृष्टीने अनीतीचेच ठरणार.

महाभारतांत आलेल्या दरोडेखोरांच्या दृष्टांतातही केवळ आत्मौपम्यबुद्धी किंवा सर्वभूतहित या तत्त्वानें निभाव लागला नाही. दरोडेखोरास मारले काय किंवा वाघास मारले काय, ते सर्वभूतहिताच्या विरुद्ध आहे; कारण वाघ व दरोडेखोर हे मेल्याने व ती तरी भूतेच असल्याने ते कर्म अनीतीचेच होअील. बरे, वाघ आणि दरोडेखोर हे न मारल्याने गाय व साव हे मारले जाअून पुनः सर्व भूतांचे

हित साधले जात नाही तें नाहीच. तथापि सावासाठी दरोडेखोरास व गाअीसाठी व्याघ्रास मारा म्हणून स्थितप्रज्ञ सांगतांच ते त्याने सांगणे सर्वभूतहित या भाषेपेक्षा अुपयुक्ततावाद्यांच्या परिभाषेचा आश्रय केल्यानेच समर्थनीय ठरते. दरोडेखोर मारला पाहिजे, कारण त्या अेकाच्या शासनाने समाजाचे म्हणजे अधिकतम जनांचे हित साधते, व्याघ्र मारून गाय सोडवली पाहिजे, कारण मनुष्यांस व्याघ्राहून गाय अुपयोगी असते. तेव्हां सर्व भूतांचे हित साधणे सर्वस्वी अशक्य असून मनुष्यास व्यावहारिक शक्यतेचा अेकच मार्ग मोकळा आहे आणि तो म्हणजे मनुष्यजातीस अधिकांचे अधिक कल्याण, शक्य तितक्या पुष्कळांचे शक्य तितके पुष्कळ सुखसाधणें हाच होय. 'सर्वभूतहिते रतः' ही पदे अर्थवादात्मक असून त्यांचा मुख्यार्थी 'बहु-मनुष्यहिते रतः असाच होतो. म्हणूनच कृष्णाने कंस मारला आणि रहस्यकारांनी भगवंतांनी अर्जुनास रणांत तू कां लढ म्हणून जो अुपदेश केला म्हणून ग्रंथिला आहे, त्यांतही दुर्योधनाला तो अन्यायी आहे म्हणून मार असेच म्हणजे मनुष्य-जातीच्या हितास अडथळा होत आहे, तर अेकाच्या असुखाने, वधाने जर सहस्त्रावधि लोकांचे कल्याण होत आहे, तर तू त्याला मारणेच युक्त आहे असे म्हटले आहे. परंतु हे तारतम्य आत्मौपम्यबुद्धीहून वा सर्वभूतहितेच्छेहून अुपयुक्ततावाद्यांच्या परिभाषेनेंच अधिक सुस्पष्ट आणि सुव्याख्यात केले जाते.

अुपयुक्ततावादाची अुपयुक्तता

अितकेच नव्हे तर शुद्धबुद्धी किंवा साम्यबुद्धी संपादन करणे हे जरी रहस्य-कारांनी मनुष्याचे प्रथम कर्तव्य आणि नीतीचे मूल म्हणून सांगितले आहे तरी वारंवार हे मान्य केले आहे की, कोणाच्याही शुद्धबुद्धीची परीक्षा त्याच्या बाह्य आचरणावरूनच केली पाहिजे. परंतु बाह्य आचरणावरून म्हणजेच त्याचे आचरण सात्त्विक, राजस, तामस अित्यादी कर्म-दान-तप क्रियेचे जे वर्गीकरण पुढे गीतेत केलेले आहे त्याच्या अनुरोधाने सत्त्वगुणविशिष्ट आहे की नाही, हे पाहूनच करावयाचे ना ? आता हेही रहस्यकारांनी स्पष्टच सांगितले आहे की जगताचे धारण-पोषण हचाचा अर्थ सर्वभूत हिताच्या अर्थाप्रमाणेच आणि मार्ग सांगितलेल्या तद्विषयक कारणांसाठीच मनुष्यांचे धारण असा करावा लागतो, अितकेच नव्हे, तर अंती अधिकांत अधिक मनुष्यांचे साध्य तितके अधिक धारण पोषण व कल्याण असाच करावा लागतो. तेव्हां अर्थातच कोणाची बुद्धि शुद्ध झाली आहे हे ठरवण्यास अुपयुक्ततावादाविणें दुसरा मार्गच नसल्यानें नीतिनिर्णयांत या हितवादाच्या पुष्कळांचे पुष्कळ सुख, या निकषाची कसोटीच निर्णायक ठरते. नीतिनियमांची व पुष्कळांचे पुष्कळ हित

साधण्याची ही जी प्रवृत्ति मनुष्याच्या स्वभावात अुत्पन्न झाली आहे, तिची अुपपत्ति भौतिकवाद्याप्रमाणे मानली किंवा आध्यात्मिक पंथाच्या ब्रह्मात्मैक्य बुद्धीने लावली तरी दोन कर्मांत एक कर्म ग्राह्य कां हे ठरविण्याला नीतिशास्त्रास अुपयुक्ततावादाचाच आश्रय करावा लागतो. प्रत्यक्ष श्रीकृष्णाप्रमाणे जे शुद्धबुद्धी व स्थितप्रज्ञ आहेत त्यांनी देखील जेव्हां जेव्हां दोन धर्मांतून अेक कर्म न्यायतर कां याचे विवेचन केले तेव्हां तेव्हां स्पष्टपणे " लोकसंग्रहमेवापि संपश्यन् कर्तुमर्हसि " किंवा कर्णपर्वांत म्हटल्याप्रमाणे " धारणाद्धर्ममित्याहुर्धर्मो धारयति प्रजाः " असेच प्रतिपादन केले आहे.

शुद्धबुद्धीची कसोटी

कोणते कर्म पुष्कळांचे पुष्कळ हित साधील हे ठरविणे समयाविशेषी कठीण जाते आणि तसे ते हित मोजण्यास जरी तपमापनाप्रमाणे अेखादे यंत्र निघाले नसले, तरी कोणाची शुद्धबुद्धी आहे हे ठरविण्यासही तसे यंत्र निघालेले नाही. श्रीकृष्णाला स्वार्थी व अशुद्धबुद्धी म्हणणारे शिशुपाल व बुद्धाला दांभिक, सुखलोलुप म्हणणारे देवदत्त जर निघू शकतात तर तेथे अितरांचा काय पाड ! अितकेच नव्हे तर कोणाची शुद्धबुद्धी आहे हे मापन करण्यास कर्माअधिक प्रमाणाने समर्थ असे कोणते साधन असेल तर ते त्याचे बाह्यवर्तन. त्याचा व्यवहार, जगहितार्थ, भूतहितार्थ म्हणजे शक्य तितक्या मनुष्यांच्या वा मनुष्यजातीच्या शक्य तितक्या हितास अनुकूल आहे की नाही ही अुपयुक्ततावादाची कसोटी लावून पहाणे हेच होय. रहस्यकारांच्याच शब्दांत सांगावयाचे म्हणजे बाह्य व्यवहाराचा विचार नैतिक दृष्टीने कर्तव्य झाला तर या अुपयुक्तवादाहून दुसरे अुत्कृष्ट तत्त्वच मिळावयाचे नाही.

आणि बाह्य व्यवहाराशीच आमचा संबंध असून आम्हास कर्माच्या मागे असणाऱ्या वासनेशी वा बुद्धीशी कांहीच कर्तव्य नाही असे सर्वच अुपयुक्ततावादी म्हणत नाहीत; अितकेच नव्हे, पण कर्माच्या मागे असणारी बुद्धी—मी हे कर्म मनुष्यजातीचे शक्य तितकेच अधिक हित संपादनार्थ करीन-करावे-करीत आहे-अशी असणे हेच कर्माच्या नीतिमत्तेचे अत्यंत प्रबलदर्शक आहे हेही मानण्यास त्यांचा कांही प्रत्ययवाद असण्याचे कारण नाही. त्याचप्रमाणे ही परार्थसाधक प्रवृत्ति ' ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या ' या अद्वैत सिद्धांताने प्रतिपन्न होणाऱ्या आत्मैक्य बुद्धीने अुत्पन्न झालेली आहे असेही मानण्यास त्यांची काही हरकत नाही किंवा अीश्वरानेच बुद्धि अशीच अुत्पन्न केली आहे की यापलीकडे कांही सांगता येत नाही. अद्वैत सिद्धान्तात अनुमित होण्याच्या अुपपत्तीसही त्यांची आडकाठी नाही. ब्रह्म-

सृष्टीचा विचार करून जगदुत्पत्ति, जगद्हेतु व मानुषकर्तव्य यांविषयी सात्त्विक, सूक्ष्म व शुध्द बुद्धीनें शक्य तितका विचार करून कोणताही सिध्दांत केला तरी अेकदा व्यवहारात अुतरले की, कर्माकर्मांतील तारतम्य ओळखण्यासाठी नीतिशास्त्र-विशारदांची जी सूत्रात्मक नांवे सांगितली आहेत तींत सर्वांत 'पुष्कळांचे पुष्कळ हित' हे सुखवादाचे वा हितवादाचे तत्त्व अनुस्यूत झालेले असल्यानें शुध्दबुध्दि आणि स्थितप्रज्ञता प्राप्त झालेल्या महापुरुषांसही 'किम कर्म किं कर्मेति' असा प्रश्न येतांच केवळ आत्मैक्याच्या किंवा साम्यबुद्धीच्या कसोटीचा आश्रय पुरेसा न पडून त्यास हेच लोकहित लोकसंग्रह, दुष्टबुद्धिविनाश म्हणजे 'पुष्कळांचे पुष्कळ सुख' या तत्त्वाचीच कसोटी लावावी लागली.

अत्याचार शब्दाचा अर्थ

Resistance to aggression is not only justifiable but impe-ratve; Nou-resistance hurts both altruism and egoism.

— Herbert Spenser's
"Ethics"

गेल्या सात आठ वर्षांत अर्थविहीन अवडंबराचा धुडगस राजकारणांत ज्या दहा पांच शब्दांनीं घालून लोकांच्या सम्यग् दृष्टीस अगदीं साफ चकवून टाकलें त्यांत हा अत्याचार किंवा violence शब्द मुख्यत्वेकरून गणला गेला पाहिजे. अजूनही या शब्दाच्या वास्तविक अर्थाविषयीं चिकित्सा कोणीही करीत नसल्यामुळें त्याचा दुरुपयोग होत आहे. आणि त्यामुळें राष्ट्राची राजकीय मनोवृत्ती अंध होऊन दिवसाला रात्र आणि रात्रीला दिवस समजत पदोपदीं ठेचाळत चालली आहे.

अत्याचार या शब्दाचा उच्चार करतांच तो ब्राईट आणि दूषणीय वर्तनाचा निदर्शक शब्द आहे हें त्यांच्या धात्वार्थावरूनच प्रतीत होतें. नको इतका, हानी होईल इतका, किंवा अयोग्य इतका अतिरेकी आचार म्हणजे अत्याचार हा अर्थ त्या शब्दाच्या उच्चारासरशींच मनांत उदय पावतो. अर्थातच एखाद्या कृत्यास अत्याचारी हें विशेषण लावलें जातांच ते कृत्य गर्हर्य आहे, निंद्य किंवा त्याज्य असलेंच पाहिजे अशी उपजत भावना उत्पन्न होते. तीच स्थिति violence शब्दाची आहे. दुसऱ्याला निष्कारण दुःख किंवा आघात होईल असें अतिरेकी बलात्काराचे वर्तनाला हा शब्द लावीत आलेला असल्यामुळें त्या शब्दाच्या उच्चारासरशी कोणत्याही सद्वृत्त मनुष्यास हा शब्दाशी संबंध

असलेल्या कृत्यांची घृणा तात्काळ उत्पन्न व्हावी हें साहजिकच आहे. हया दोन्ही शब्दांत बळाचा किंवा शक्तीचा पीडक उपयोग ध्वनित होत असतो. अत्याचार काय किंवा violence काय हे दोन्हीही शब्द बळाच्या, शक्तीच्या उपयोगासच ध्वनित करतात. हया त्यांच्या ध्वनीचा खरा अर्थ आणि न्याय मात्र मर्यादित असतो, परंतु ती मर्यादा कोणती ही गोष्ट ध्यानांत न घेतां कांहीं अतिरेकी लोकांनीं शक्तीचा उपयोग किंवा बळाचा प्रयोग हया शब्दांहून अधिक व्यापक अर्थाचा बोध करणाऱ्या शब्दांसच ते अत्याचार किंवा violence हे प्रतिशब्द योजण्यास हिंदी राजकारणांत अहिंसेचें थोतांड घुसडून देताना आरंभ केल्यामुळे, आज त्या शब्दांनीं उभ्या राजकारणाचा राष्ट्रघातक विपर्यास दिवसाढवळया चालविलेला आहे.

violence किंवा अत्याचार हयां शब्दांतील अर्थाचें मूळ अधिष्ठान शक्ति किंवा बळ हे असल्यानें, शक्तीचा किंवा बळाचा उपयोग ज्या ज्या कृत्यांत प्रमुखपणें केला जातो, त्या त्या कृत्यांस हया अतिरेकी बुध्दीनें violence किंवा अत्याचारी म्हणून संबोधिण्यास प्रथमतः आरंभ केला. अर्थातच अत्याचार किंवा violence हया शब्दांशीं मूलतःच निगडित असलेली निंद्य व त्याज्य भावना त्या संबोधनासरशीं त्या त्या कृत्याविषयीं लोकांचे मनांत सहज उत्पन्न होत गेली वाईट गोष्टी करूं नका हें वाक्य म्हणतांच जसें त्यास कोणीही सहज संमति देऊन टाकतो, कारण वाईट म्हटलें की तें निंद्य असणारच ही अर्थाची सांगड त्या शब्दाशीं मूळचीच जुळलेली असते. तद्वतच आपण अत्याचार करूं नयेत, आपण अनत्याचारी असावें, हें वाक्य उच्चारलें जातांच त्यास संमति देणें हें आपलें कर्तव्य आहेच आहे असें प्रत्येकास आणि विशेषतः सामान्य समुदायास पटकन वाटूं लागतें. राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनांत आम्हीं Non-violentच राहूं, म्हणजे अत्याचार करणार नाहीं, ही शपथ त्याच त्या शब्दांच्या सहज ध्वनीनें प्रत्येकानें बिनबोभाट घेतली. तीस हरकत करणें म्हणजे मी अत्याचार करीन असें म्हणण्यासारखेंच होणारें असल्यानें आणि अत्याचार हा अजूनहि निंद्यच असल्यानें कुणीहि तसें म्हणण्यास साहजिकच सिद्ध झाला नाही. मी वाईट करीन हें जसें कुणीं म्हणत नाहीं, तसेंच मी अत्याचार करीन असें कुणीहि सत्प्रवृत्त मनुष्य म्हणत नाहीं. परंतु हया सत्प्रवृत्तीच्या ढालेखालीं लपून अहिंसेच्या थोतांडानें जें जें कर्म शक्तीच्या किंवा बळाच्या प्रयोगानें करावें लागतें, तो तो अत्याचार होय, असा गवगवा करण्यास जेव्हां आरंभ केला, तेव्हां सहज लोकांचाही न कळत बुध्दिभ्रंश होऊन तेही शक्तीच्या प्रयोगासच अत्याचार बळप्रयोगावर अवलंबून असतो इतक्या गमकावरूनच जो जो बळप्रयोग तो तो अत्याचार असतोच असा विपर्यस्त आणि अतिव्याप्त समज सर्वत्र फैलावून त्यामुळें राजकारणांत अहिंसा, अनत्याचार, Non-violence हया शब्दांनीं मोठा घोटाळा उडवून दिला. युगानुयुगे जीं जीं कृत्ये प्रशस्त म्हणून इतकेंच नव्हें तर

प्रशंसनीय म्हणून जगामध्यें वाखाणलीं होतीं तीं तीं सद्गुणांच्या टिपणींतून निघून एकाएकीं दुर्गुण म्हणून निंद्य समजली जाऊं लागली. शौर्य, क्षात्रतेज, झुंजारपणा, रणनैपुण्य, शस्त्रनैपुण्य, तिखटपणा, दुष्टांचा कंड शमवणारा पराक्रम, हे सर्व बळाचे प्रयोगावर अवलंबून असतात म्हणून अत्याचाराच्या व्याख्येंत कोंबली जाऊ लागली–दुर्गुण म्हणून धिक्कारली जाऊं लागली. जें जें कर्म शक्तिप्रयोगात्मक असते तें तें अत्याचार होय अशी जी अतिरेकी बुध्दीची व्याख्या राष्ट्रानें अंधपणानें स्वीकारली तिचा हा साहजिक परिणाम होता. शेवटीं इतक्यावर गोष्ट आली कीं दगडी पुतळ्याचा पाय हातोड्यानें तोडणें हीहि हिंसा होऊं लागली आणि हातांत लाठी धरणें हें अत्याचारी प्रवण आणि म्हणूनच अनत्याचाराला विसंगत असें कर्म ठरलें. तो हातोडा मारण्याचें किंवा ती लाठी धरण्याचें अत्याचारी कृत्य ज्यामुळें शक्य होतें, तो हातच प्रत्येक अनत्याचारानें तोडून टाकला पाहिजे इतकी आज्ञा सुटण्याचें काय तें बाकी उरलें होतें !

मनुष्याच्या भावभावना शब्दार्थांशीं निगडित झालेल्या असल्यानें शब्दोच्चारा बरोबर ती ती भावना, बुद्धीला विचार करण्यास वेळ मिळण्याचे आधींच, तत्काळ त्याचे मनांत उठून त्याच्या कृतीस घेरून टाकते. एखादा नवीन मनुष्य आंत येतांच जर कोणी आपणांस हळूच म्हटलें, पक्का पाजी आहे तो, तर तत्काळ पाजीपणाच्या भावनेशीं निगडित झालेला तिरस्कार आपले मनांत उद्भवून त्या मनुष्याची पारख करण्याचे आधींच आपलें मन किंचित तरी कलुषित करून ठेवतो. शब्दांच्या यथावत् प्रयोगाचें हें महत्त्व प्रदर्शविण्यासाठी वेदामध्यें आणि पुराणांत स्वर चुकलेल्या अर्थाचा अनर्थ होऊन देवांचा केवढा घात झाला त्या प्रकरणाच्या कथा वर्णिलेल्या आहेत. तशीच स्थिति या अत्याचाराच्या शब्दांचे आणि अर्थाचे स्वर चुकून आपल्या राष्ट्राची गेल्या सात-आठ वर्षात झालेली होती. अत्याचार वाईट कर्म आहे, तो बळप्रयोगात्मकच असतो अर्थात् बळप्रयोगात्मक कर्म तें तें वाईट अशी हेत्वाभासाची विचारसरणी नकळत राष्ट्राचा बुद्धिभ्रंश करती झाल्यामुळें, कर्माकर्माच्या विनिर्णयाचा केवढा घोटाळा उडाला ! जें जें बळप्रयोगात्मक कर्म तें तें अत्याचार म्हणून समजलें जाऊं लागलें. दरवडेखोर कुऱ्हाड घेऊन घरांत शिरले हे बळप्रयोगात्मक कर्महि अत्याचार आणि त्यास संधि साधून सुरी भोसकून नि घायाळ करून आपल्या निरपराध मुलाबाळांचे रक्षण करणारें स्वतःचें कृत्यहि बळप्रयोगात्मक असल्यानें तोहि अत्याचारच ! रावणानें सीता बलात्कारानें नेली हाहि अत्याचार आणि रामाने बलप्रयोगाने त्याची दाही शिरें छाटलीं हाहि अत्याचारच ! मुसलमानांनी कोहटला आपले बहुसंख्यत्वाचे बळावर हिंदूंची शिरे छाटली, जाळीत पोळीत राक्षसी धिंगाणा घातला हाहि अत्याचार ! तरीहि तेथील थोड्या हिंदूंनीं आपल्या स्वत्वरक्षणासाठी बंदुका झाडून त्या मुसलमानी गुंडांना शूरपणानें तोंड

दिलें तोही अत्याचारच ! इटालीला, अमेरिकेला, आयर्लंडला जे प्रबळ परदेशीय शत्रू पादक्रांत करून त्यांचें स्वातंत्र्य बलात्कारानें हरण करते झालें, तेहि अत्याचारी आणि त्या परशत्रूंच्या बेयोनिटी आपल्या मातृभूमीच्या छातींत घुसत असलेल्या पाहून ज्या वीरपुंगवांनीं त्या बेयोनिटी धरणारे मदांध हात आपले छपविलेले खंजीर खुपसून छाटून काढले तो गारिबॉल्डी, वॉशिंग्टन आणि एमेट, आणि व्हॅलेरा हेहि अत्याचारीच ! निजलेल्या मुलाच्या कंठास त्याच्या अंगावरील दागिन्यासाठीं नख देऊन मारणारा नृशंस हत्यारीहि अत्याचारी आणि हत्यारास फांशीची शिक्षा देणारा न्यायाधीशहि अत्याचारीच ! तितकाच कृष्णहि पापी की जितका कंस ! तितकाच बलवान् भीमहि पापी कीं जितका त्याच्या सुशील राणीस नग्न करूं पाहणारा दुःशासन ! ! कारण कीं दोघांचींहि कर्मे बळप्रयोगात्मकच होती—आणि जो जो बळेप्रयोग तो तो अत्याचार–तो तो violence म्हणून कांहीं भाबड्या बृहस्पतींनीं अनत्याचारावर भाष्य केलेलें होतें साप डसतो म्हणून अत्याचारी आणि मनुष्य त्यास मारतो म्हणून अत्याचारी ! त्यांतहि सर्प सहज डसतो आणि मनुष्य जाणूनबुजून त्यास मारतो म्हणून सर्पाहून मनुष्यच अधिक अत्याचारी, अधिक पापी, अधिक निंद्य होय !! अशा थरावर गोष्ट आली ! जे वीरपुरुष राष्ट्रासाठीं सशस्त्र संगरांत झुंजत मेले, त्यास पापी समजण्यांत येऊं लागले. प्रताप आणि शिवाजी हयांना अत्याचारी म्हणून निंदितांना कमरेचीं पोकें निघालेलीं, शेळपट हात लोंबणारीं आणि खादीच्या टोप्या घातलेली मुर्दाड मुलें मार्गोमार्गी आढळूं लागलीं; आणि सर्व जगत मशीनगन्सच्या चढाओढींत चूर असतां शस्त्र नुसतें धरूं पाहाणें हाही अत्याचारच आहे. तुम्हीं लाठीदेखील धरूं नका म्हणून उपदेशिणारे मुर्दाड महंत पण लाठी पाहतांच मळमळूं लागणाऱ्या त्या मुर्दाड मुलांच्या बिनकण्याच्या पाठी गौरवाने थोपटूं लागले !! राष्ट्रांत नुकतेंच पुन्हां उदय पाहूं लागलेलें क्षात्रतेज नष्ट झालें. त्या क्षात्रतेजाच्या उदयानें भीति पावलेले राष्ट्रशत्रू पुन्हा प्रबळ दिसूं लागले.

हया लज्जास्पद स्थितीचा ज्या कांहीं लोकांस तिटकारा वाटे, ते हळहळू तिचा निषेध करूं लिघाले. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्यांस देखील त्यांच्या निषेधाचे सयुक्तिक समर्थन करणें, हया अत्याचाराच्या व्याख्येंत ते स्वतःच फसल्यामुळें अशक्य झालें. कित्येक क्रांतिकारक अनत्याचाराच्या या गाढवपणाच्या गोंधळास त्रासून स्वतःच म्हणूं लागले, "आम्ही अत्याचारच करणार, आम्हीं violence च करणार." परंतु "आम्ही वाईटच वागणार, आम्हीं अन्यायच करणार" असें कोणी त्रासून म्हणाला, तरी त्याचे त्यासच जसें तें वाक्य नीट समर्थन करतां येत नाहीं तशीच त्यांची स्थिति झाली. गेल्या राष्ट्रसभेंत मद्रासेस अध्यक्षांसुध्दां कित्येकांनीं म्हटलें कीं, आम्हीं आज अनत्याचारी (Non-violent) असलों

तरी उद्यां तसेंच राहूं अशी हमी घेऊं देऊं शकत नाहीं. परंतु त्याचा अर्थ आम्ही वेळ पडली तर उद्यां अत्याचारी होऊं, violent होऊं असा निघत असल्यानें आणि अत्याचार या शब्दांतून उच्चारांतच त्याचा मूळचा निंद्य अर्थ तत्काळ ध्वनित होत असल्यानें, त्यांचीं तीं वाक्यें त्यांच्या आणि इतरांच्या मनास आम्हीं आलां अन्यायही करणार, आम्हीं पापच करणार, अशा त्राग्यासारखीं स्वतःचीं स्वतःलाच कशींशींच आणि असमर्थनीय लागतात. जी गोष्ट ते समर्थन करूं पाहतात ती गोष्ट उत्तम असतांही तिला व्यक्त करण्यासाठीं हा भलताच शब्द उपयोजिला गेल्यामुळें तीहि भलतीशीच वाटूं लागते आणि ज्या बळप्रयोगात्मक कर्माचें तें समर्थन करूं पाहातात तेंच त्या समर्थक वाक्यांनींच निषेधार्ह ठरते.

या सगळ्या घोंटाळ्याचें कारण म्हणज अत्याचार किंवा violence ह्या शब्दांची चुकलेली व्याख्याच खरी म्हणून अजूनही उराशी बाळगली जात आहे हें होय. अत्याचार हें बळप्रयोगात्मक कर्म आहे ही गोष्ट खरी आहे. परंतु म्हणून बळप्रयोगात्मक कर्म तें तें अत्याचार असतेंच असा विपर्यास मात्र सिद्ध होत नाहीं, अत्याचार हा बळप्रयोगात्मक जीं अनेक बरीं वाईट कर्मे आहेत त्यांपैकीं एक कर्म होय. आगलाव्या हाही आग पेटवितो आणि सैंपाकीही आग पेटवितो; म्हणून सैंपाकी हा आगलाव्या होत नाही; त्याप्रमाणे स्वदेशस्वातंत्र्यार्थ न्याय – समरांत शस्त्र धारण करणारा देशवीर, लोकपीडक मदांध तलवारींस कांडकन मोडून टाकून त्याचे शीर आपले तलवारींनें छाटणारा आणि त्यासाठीं फांशीवर लटकणारा हुतात्मा, किंवा आपल्या देवालयाचें, घरादाराचें, स्वजनाचे अन्याय्य गुंडगिरीपासून सशस्त्र संरक्षण करणारा तेजस्वी पुरुष ह्यानें केलेला प्रतिकार हाही एक बळप्रयोगात्मक कर्मच असलें तरी अत्याचारी होत नाहीं, तर तो सदाचारी असतो.

बळप्रयोगात्मक कर्मे हीं दुष्ट हेतूनें, परपीडक बुद्धीनें केलीं तरच तीं अत्याचारी होत. तें कर्म सुष्टसंरक्षणार्थ न्याय बुद्धीनें केलें तरच तें सदाचार होतें. तेव्हां बळप्रयोग किंवा शक्तिप्रयोग, परपीडक बळाचा उपयोग तोच अत्याचार ही अत्याचाराची खरी व्याख्या होय. Violence अत्याचार हा नेहमीच निंद्य आहे. पण force बळ कांहीं नेहमीच निंद्य असत नाहीं कारण violence is aggressively used. आततायी बळ हेंच काय तें अत्याचार आणि आततायी हाच अत्याचारी होय !!

दुसऱ्यास अन्याय्य उपद्रव देण्यासाठीं ज्या बळाचा उपयोग केला जातो तें बळ अत्याचार आहे; परंतु त्या परपीडक बळाचा प्रतिरोध करण्यासाठीं जें बळ उपजिले जाते ते अत्याचार नव्हें. इतके नाहीं तर तो सदाचारच होय. कारण सर्व सदाचारांची कसोटी जी लोकहितवर्धकता ती त्या कर्मास ततोतत आणि आत्यंतिकतेनें लागूं शकते. अघातक शक्ती ही अत्याचार; पण प्रत्याघातक शक्ती ही सदाचारच होय. जो परपोहेक खड्ग धारण करून कंस देवकीच्या बंदीगृहांतील सूति-

कागारांत शिरला तें खड्ग अत्याचारी होय, परंतु त्या प्रजापीडक आततायाच्या हातून अखिल मथुरेची मुक्तता करण्यासाठीं जें खड्ग घेऊन त्या गोकुळाचा तो विश्ववंद्य जगजेठी रंगसभेंत घुसला आणि त्या कंसास सिंहासनावरून ओढून त्याचा शिरच्छेद करता झाला तें खड्ग सदाचारी होय. दोन्हीहीं खड्गेंच, दोन्हींही शस्त्रेंच, दोघांची कर्मेंही बळप्रयोगात्मकच, पण एका खड्गानें लोकपीडेची परमावधि केली म्हणून तें पापी, अत्याचारी आणि दंडय ठरलें. दुसऱ्यानें त्या लोकपीडक नराधमत्वाचे कैचींतून निष्पाप आणि निरपराध जनतेची मुक्तीच केली म्हणून तें दुसरें खड्ग लोकमंगलकारक व म्हणूनच सदाचारी, आणि म्हणूनच पूजनीय ठरलें.

नाहींतर अत्याचाराच्या आजच्या विपर्यस्त कल्पनेप्रमाणें दोन्हीं खड्गेंही बलप्रयोगींच असल्यामुळें तीं दोन्हींहि अत्याचारीच ठरलीं जातात. लोकहितकारक कर्महीं अत्याचारी अशी भयंकर अनवस्था उत्पन्न होऊन लोकांस हयांपैकीं एक पूजनीय कां आणि दुसरें दंडनीय कां हें स्वतःचे स्वतःलाही समजून सांगतां येईनासें होतें. परंतु अन्याय्य आक्रमण करण्याची शक्ति हीच तेवढी अत्याचारी असून, न्याय प्रतिरोध करणारी शक्ति ही सदाचारी असते, हीं त्या शब्दांची व्याख्या स्पष्टपणे ध्यानांत धरली तर विचारविभ्रम नाहींसा होतो. चोर, दरवडेखोर, खुनी, हे जेव्हां सशस्त्र बलात्कार करून निरपराधांचा छळ करतात आणि अनाथांचा प्राण घेतात तेव्हां तें कर्म नृशंसक असल्यानें तें बळ आक्रमक, आघातक, उपद्रवी असल्याने That force being aggressively used becomes violence, तें बळ अत्याचार होतें. परंतु त्या दरवडेखोरास शासन करण्यासाठीं जेव्हा घरचा धनी आपला खंजीर वेळ प्रसंग पाहून त्या सशस्त्र दरवडेखोराच्या उरांत भोसकून बळपूर्वक प्रत्याघात करतो किंवा जेव्हां न्यायाधीश त्या प्राणघातक हत्याऱ्यास फांशी देऊन त्यास बळपूर्वक प्राणदंड देतो तेव्हां तें बळ, तें कर्म, तो सशस्त्र प्रतिकार अत्याचार नसून सदाचारच असतो.

म्हणूनच धर्मशास्त्राचे प्रथम प्रवर्तक मनुमहाराज म्हणतात कीं,

आततायिनमायान्तं हन्यादेवाविचारयन् ।
आततायिवधे दोषो हन्तुर्भवति कश्चन
प्रकाशं वा प्रकाशं वा मन्युतन्मन्युमर्हति ।

आततायी हा अत्याचारी. त्याला गुप्तपणें वा प्रकटपणें, आव्हानून वा छापा घालून मारणारा हा अत्याचारी नसून सदाचारी होय. नैर्बंधिक दृष्ट्याही प्रत्येक समाजांतील लोकांस निर्बंधशास्त्राच्या (कायद्याच्या शास्त्राच्या) जुन्यांतील जुन्या पुस्तकांपासून तो आजच्या इंग्रजी राजवटीतील भारतीय दंड विधानापर्यंत (Indian Penal Code) स्वपररक्षणार्थ उपयोजिलेलें बळ Self-defence च्या वर्गांत घातलेलें असून तें अत्याचारी किंवा Violent म्हणून संबोधिलें जात

नाहीं. Violentce किंवा अत्याचार हा निर्बंधदृष्टचा दंडनीय आहे. पण self-defence स्वपररक्षणार्थ उपयोजिलेले शस्त्र किंवा शक्ति हे Legitimate force न्याय्य आणि नैर्बंधिक बळ याच वर्गांत मोडलें जाते. तो अत्याचार नसून नैर्बंधिक दृष्टचा हा सदाचारच समजला जातो.

तींच गोष्ट राजकारणाची आहे. इटली देशावर त्या देशाच्या इच्छेविरुद्ध आणि हिताविरुद्ध ऑस्ट्रियानें केवळ वेयोनेटाचें जोरावर जें राज्य केलें तो अत्याचारच होय; तो आततायीपणा होय. परंतु स्वदेशस्वातंत्र्यार्थ गारिबॉल्डी, क्रॅस्पी, मॅझिनी इत्यादि क्रांतिकारकांनीं प्रतियोजिलेले शस्त्रबळ हे सदाचार होतें. हचास्तवच हिंदुस्थानांत १८५७ सालीं झालेलें प्रचंड क्रांतियुद्ध हाही हचा कारणासाठींच अत्याचार होऊ शकत नाही.

हचा विवरणाचा आशय हचा किंवा त्या देशांत आजच कोणी सशस्त्र क्रांति केलीच पाहिजे असा काढणें हो चूक होईल, कारण सशस्त्र क्रांति हचा किंवा त्या देशाने आज किंवा कधींही करावी किंवा नाही. त्या सशस्त्र क्रांतीचे समर्थन किंवा निषेध करण्याची कारणें हीं त्या त्या देशाच्या स्थितीनुरूप निराळीं आहेत. परंतु आज सशस्त्र क्रांति शक्य नाहीं किंवा इष्टही नाहीं, असें ज्यांस वाटते, त्यांसही ती क्रांति सशस्त्र आहे एवढचासाठीं अत्याचारी असलीच पाहिजे, असे म्हणतां यावयाचें नाहीं इतकेंच काय तें या लेखानें प्रतिपादित होऊं शकतें. तेव्हा अत्याचार व सदाचार यांची वर विवर्णित केलेली सत्य व्याख्या आपण नेहमी ध्यानात धरली म्हणजे आजपर्यंत झालेली अतिरेकी भूल आपल्या हातून कधींहि घडणार नाही.

गांधी-गोंधळ, अत्याचार शब्दाचा अर्थ, लेखक बॅ. विनायक दामोदर सावरकर.

खड्गा तुझा विजय असो

नैतिक कृत्य कशाला म्हणावें या संबंधाच्या अुहापोहांत स्थल नि काल यांच्या अभावास्तव मी खोल शिरू अिच्छित नाहीं नीतीचें शास्त्र आत्मस्फूर्तीनें, साक्षात्कारानें किंवा व्यवहाराच्या सोयानें कोणत्याही तत्त्वावर अधिष्टित झालेलें असो तथापि त्याचा हो व्यावहारिक बाजू, जो सर्व नीतिशास्त्रवेत्ते अेकमुखानें मान्य करतात नि जिच्या योगानें नीति कोणती आणि अनीति कोणती, सद्गुण दुर्गुणाहून वेगळा करा, किंवा चांगले वाअीट कोणतें हें ठरविलें जातें ती कसोटी केवळ व्यावहारिक गोष्टीवर अधिष्ठित केलेली आहे. तो म्हणजे ही कीं मानवी जीवनाला जे जे विचार किंवा आचार अुपकारक होतील त्या त्या सर्वांना नीति किंवा सद्गुण म्हणावें, आणि त्याच्या विरोधी जें जें असेल त्याला अनीति किंवा दुर्गुण समजावें. हाच न्याय सर्व नीतिशास्त्रवेत्त्यांनी मान्य केलेला आहे. याचाच अर्थ

नीतीची कल्पना मानवी जीवनावरच मुख्यतः अधिष्ठित आहे. या अगदी व्यावहारिक आणि पुन्हां पूर्णपणें पायाभूत कसोटीस अनुसरून पहातां ज्या आत्यंतिक अहिंसावादांत अन्याय्य आक्रमणाविरूद्धही केला जाणारा सशस्त्र प्रतिकार त्याज्य ठरविला जातो तें अहिंसेचें तत्त्वज्ञान अगदीच अव्यवहार्य, मानवी जीवनाला घातक आणि म्हणून पूर्णपणे अनीतिमय असेंच मानिलें पाहिजे. लहान मुले निजलेलीं असतां त्यांच्यामध्यें अेखादा साप शिरला, किंवा लोकांची जत्रा जमली असतां त्यांमध्यें अेकादा पिसाळलेला कुत्रा अेकदम घुसला, तर तुम्ही त्याला मारूं शकत असतांही केवळ आत्यंतिक अहिंसेच्या तत्त्वज्ञानास अनुसरून तुम्ही त्यास ठार मारलें नाहीं तर तुम्ही प्राणघातक हिंसेलाच आपल्या कृत्यानें प्रोत्साहन देतां असें होतें. कारण तुमच्या त्या कृत्यानें तो साप किंवा पिसाळलेला कुत्रा माणसांना चावून ठार मारतो. यामुळे अेका सापाचा किंवा कुत्र्याचा जीव वाचविण्याकरितां तुम्ही अनेक माणसांचे जीव वाचविण्याचें टाळतां आणि त्याला आपल्या सोयीप्रमाणें आणि सवडीप्रमाणें अनेक माणसांचे जीव घेण्यास स्वतंत्र ठेवतां. अशा रीतीनें दुहेरी पापाचे तुम्हीं धनी होतां. याच्या अुलट जर, तुम्ही तो कुत्रा किंवा साप त्या क्षणी ठार मारिला तर कुणीही जीवाचा कोणत्याही कारणाकरितां केव्हांही वध करावयाचा नाहीं या तुमच्या तत्त्वाच्या विरोधी वर्तन केल्याचें पाप तुम्हांस लागतें. या अेकाच उदाहरणावरून आत्यंतिक अहिंसेचें तत्त्व हें केवळ अव्यवहार्य, मानवी जीवनाला घातक, आणि म्हणून पूर्णपणे अनीतिकारक आहे असें सिद्ध होतें. जी गोष्ट वैयक्तिक बाबतींत लागू पडते तीच राष्ट्रांच्याही बाबतींत लागू पडते. हेंही लक्षांत ठेवावें कीं, जे धर्म अनत्याचार, अहिंसा, अित्यादींचा आत्यंतिक गुणगौरव करतात त्यांनासुध्दां या नियमांना अपवाद करावे लागले आहेत. कोणत्याही प्रकारच्या अन्याय्य आक्रमणाविरूध्द केल्या जाणाऱ्या सशस्त्र प्रतिकाराचा निषेध ते करीत नाहींत नि असा निषेध करणें हा खऱ्या अहिंसेचा गुणही होअूं शकत नाहीं.

मर्यादित अहिंसा हा गुण; आत्यंतिक अहिंसा हें पाप !

तथापि, मर्यादित अहिंसा मात्र अेकंदरीनें मानवी जीवनाला अत्यंत अुपकारक असल्यामुळें तो अेक मोठा गुण असून आपले वैयक्तिक किंवा सामाजिक जीवन, किंबहुना आपल्या सर्व सामाजिक सुखसोयी त्यावरच आधारलेल्या आहेत. पण कोणत्याही काळीं किंवा प्रसंगी पाळावयाची आत्यंतिक अहिंसा ही वैयक्तिक किंवा राष्ट्रीय स्वरूपाच्या मानवी जीवनाला अत्यंत हानिकारक असून ती अनीतिकारकही आहे नि म्हणूनच ती त्याज्य ठरविली पाहिजे. ज्या नीतिशास्त्रवेत्त्यांनी समर्याद अहिंसेला अेक मोठा सद्गुण म्हणून मानलें त्यांनींच आत्यंतिक स्वरुपाच्या

अहिंसेला त्याज्य समजून तिचा निषेध केला आहे.

जैनबौद्धांची अहिंसा गांधींहून वेगळी !

बौद्ध धर्मानें किंवा जैन धर्मानें जें अहिंसाधर्माचें प्रतिपादन केलें आहे तें गांधीजींनीं प्रतिपादिलेल्या सर्व प्रकारच्या परिस्थितींत सशस्त्र प्रतिकाराचा निषेध करणाऱ्या आत्यंतिक अहिंसाधर्माशीं अगदी विरोधी आहे. ज्या जैन लोकांनीं राज्यें स्थापन केलीं, वीर आणि वीरांगना निर्माण केल्या, जे समरभूमीवर शस्त्रानें लढले आणि ज्या जैन सेनापतींनीं जैन सैनिकांचीं सैन्यें लढविलीं त्यांचा जैन आचार्यांनी कोठेंही नि केव्हाहीं निषेध केला नाहीं ही अेकच गोष्ट त्यांची अहिंसा गांधीवादी घाणेरड्या अहिंसेहून वेगळी होती असें सुचविते. किंबहुना अन्याय्य आक्रमणाचा सशस्त्र प्रतिकार करणें नुसतें न्याय्यच नव्हे तर आवश्यक आहे असें जैन धर्मानेंही अुघडपणें प्रतिपादिलें आहे. जर अेकादा सशस्त्र नि आततायी मनुष्य अेकाद्या साधूची हत्या करूं लागला तर त्या साधूचा जीव वांचविण्यासाठी अशा मनुष्यास ठार मारणें आवश्यक असलें तर सरळ ठार मारावें; कारण अशा प्रकारची हिंसा ही एक प्रकारें अहिंसाच होय असें म्हणून जैन धर्मग्रंथ तिचें समर्थन करतात. मनुस्मृतीमध्यें म्हटल्याप्रमाणेंच जैन धर्मग्रंथानेंही असेंच म्हटलें आहे कीं, या ठिकाणी हत्येचें पाप जो मूळ हत्या करतो त्यास लागतें; हत्या करणाऱ्याचा वध करणारास तें लागत नाहीं. "मन्युस्तन् मन्युमर्हति !" भगवान् बुद्धानें सुद्धां अशाच प्रकारचा अुपदेश केला आहे. अेकदां अेका टोळीचे पुढारी त्याजकडे गेले नि दुसऱ्या टोळीच्या लोकांनीं आपणाविरुद्ध आक्रमण केल्यामुळें त्यांचा सशस्त्र प्रतिकार करण्यास अनुज्ञा मागूं लागले, तेव्हां बुद्धानें त्यांस सशस्त्र प्रतिकाराची आज्ञा दिली. भगवान् बुद्ध म्हणाले, "सशस्त्र आक्रमणाच्या प्रतिकारार्थ क्षत्रियांनीं युद्ध करण्यास आडकाठी नाही. जर ते सत्कार्याकरितां सशस्त्र होअून लढतील तर त्यांस पाप लागणार नाहीं."

माणसांची संरक्षक तलवार !

आपण हा निसर्गाचा नियम म्हणून समजा, किंवा अीश्वराची अिच्छा म्हणून माना, निसर्गांत अत्यंतिक अहिंसेला कोठेंहि स्थान नाहीं ही गोष्ट अगदीं सत्य आहे. नाहींतर मनुष्यप्राणी हा जिवंतच राहिला नसता, किंवा फार तर अेकाद्या भित्र्याप्रमाणें किंवा किड्याप्रमाणें कोठें तरी पृथ्वीच्या पाठीवर जीव धरून राहिला असता. परंतु त्यानें आपल्या मूळ सामर्थ्याच्या जोडीला कृत्रिम शस्त्राची जोड निर्माण केल्यामुळें त्याला आजची स्थिति प्राप्त झाली आहे. भौतिक शास्त्राप्रमाणें

जेंव्हां प्राण्याला मानवी जीवन प्राप्त झाले तेव्हां त्याच्याभोवतीं अत्यंत क्रूर पशु आणि सरपटणारे प्राणी पसरलेले होते. त्यांच्याशी तुलनेनें पहातां केवळ व्यक्ति या नात्यानें तो अत्यंत दुर्बळ प्राणी होता. ज्यावेळीं तो प्रथम निर्माण झाला तेव्हां त्याच्या भोवताली असणाऱ्या प्रचंड अरण्यांत जगण्यासाठीं धडपड करणाऱ्या सर्व प्राण्यांत शरीरतः मनुष्यप्राणी हा अत्यंत दुर्बळ होता. त्याला विषारी दांत नव्हते किंवा सोंड नव्हती; त्याला शिंगें नव्हती किंवा तीक्ष्ण नखेंही नव्हतीं. आपण गाअोला स्वभावतःच आणि शरीरानेंही अत्यंत निरुपद्रवी आणि स्वसंरक्षणाला अत्यंत असमर्थ असा प्राणी समजतों; तथापि जर गाय आणि मनुष्य ह्या दोघांचीही लढत जुंपली तर अशी गायसुद्धां माणसाच्या पोटांत आपली शिंगें खुपसून ठार मारील, पण मनुष्य कांहीं करूं शकणार नाही. मनुष्याचें मोठेंपण जर कशांत असेल तर तें आपल्या शारीरिक अवयवांना सायर्ध्य प्राप्त करून देण्याकरितां जो कृत्रिम शस्त्रें त्यानें निर्माण केली त्यांत आहे, म्हणूनच तो सर्व प्रकारच्या पशूंवर मात करूं शकला. वाघ, सिंह, हत्ती, लांडगे, साप, कांसव, या सर्वांच्यावर मात करून त्याने जमीन आणि पाणी यांवर आपले प्रभुत्व स्थापन केलें. अगदीं प्राचीन काळापासून लोहयुगापर्यंत सर्व काळांत मनुष्य अितरांवर आपला शह ठेवूं शकला, आपला विस्तार वाढवूं शकला नि या पृथ्वीचा धनी बनूं शकला तो केवळ शस्त्रांच्या साहाय्यानें. खरोखर स्वतःच्या संरक्षणाकरितां अुत्पन्न केलेली तरवार हीच माणसाची खरी रक्षणकर्ती झालेली आहे !

निसर्ग नियम हेच शाश्वत

आत्यंतिक अहिंसावाद मानणें नि त्यासाठीं कोठल्याही प्रकारच्या आक्रमणाच्या सशस्त्र प्रतिकाराचा निषेध करणें हें महात्मापदाचें किंवा साधुत्वाचे लक्षण नसून तें केवळ मिथ्यावादाचें आणि मूर्खपणाचे लक्षण आहे. जी गोष्ट पाशवी जगताशीं झगडा करतांना मनुष्यानें कार्यवाहींत आणली तीच गोष्ट मानवांमानवांतील झगडा करून जिवंत राहाण्यास त्यास उपयोगी पडली. अेका टोळीचा दुसऱ्या टोळीशीं, अेका वंशाचा दुसऱ्या वंशाशीं किंवा अेका राष्ट्राचा दुसऱ्या राष्ट्राशीं होणारा झगडा आजपर्यंत हेंच दाखवीत आहे. अितिहासाच्या प्रत्येक पानापानांतून, अगदीं अखेरच्या पानापर्यंत अेकच गोष्ट सिद्ध झालेली दृष्टीस पडते ती ही कीं अितर गोष्टी सारख्या असल्या तरी जीं राष्ट्रें सैनिकी दृष्टया सामर्थ्यवान ठरतील तींच काय ती जगतील, नि जी राष्ट्रें सैनिकी दृष्टया क्रमकुवत ठरतील तीं गुलामगिरींत खितपत पडतील किंवा नामशेष होअून जातील. आपण जगाच्या अितिहासांत अेक नवें दालन अुघडणार आहोंत, अेक नवें तत्त्वज्ञान प्रसृत करणार आहोंत, असें म्हणणें भाकडपणाचें आहे. तुम्हीं कदाचित् अितिहासांत नवीन भर घालूं शकाल

पण निसर्गाचा जो नियम आहे त्यांत तुम्ही काडीमात्र फरक करूं शकणार नाहीं. फार कशाला, जर आजही माणसाने वाघांना आणि कोल्ह्यांना आपण पूर्णपणें अहिंसावादी राहणार आहोंत, कोणत्याहि जीवाची कधींही हिंसा करणार नाहीं नि शस्त्र अुचलणार नाहीं असा कोरा चेक लिहून दिला तर ते लांडगे आणि वाघ सुद्धां तुमचीं मंदिरें आणि मशिदी, तुमची संस्कृति, तुम्ही पिकवलेलीं शेतें, तुम्ही बांधलेली घरें आणि आश्रम ही सारीं पार अुध्वस्त करून टाकतील, आणि बारा वर्षांच्या आंत साधू आणि पापी माणसें या सर्वांना खाअून फस्त करतील. निसर्गाचा नियम अशा प्रकारचा असल्यामुळें अशा प्रकारचें आत्यंतिक अहिंसेचें, मानवी जीवनाला घातक असणारें नि आक्रमणाचाही सशस्त्र प्रतिकार करूं नको म्हणून सांगणारें तत्त्वज्ञान हें किती अनीतीचें आणि पापकारक आहे हें काय वेगळें सांगावयास पाहिजे ?

फोल कल्पना !!

तरीसुध्दां आश्चर्य आहे तें हें कीं, ज्यांना हें आत्यंतिक अहिंसेचें तत्त्वज्ञान अव्यवहार्य वाटतें आणि म्हणून जे त्याचा निषेधही करतात तेच लोक बोलतांना असें बोलतात कीं, आम्हां व्यवहारी माणसांच्या बाबतीत जरी तें तत्त्वज्ञान अव्यवहार्य असलें तरी मुळांत तें मोठें नीतीचें लक्षण असून जो कोणी त्या तत्त्वाचा अंगीकार करील तो महात्मा धन्य होय ! त्यामध्यें मानवश्रेष्ठांचे सद्गुण भरलेले आहेत. ही जी मनोवृत्ति आहे ती ताबडतोब बदलली पाहिजे. अशा प्रकारचे तऱ्हेवाअीक मत प्रतिपादन करणाऱ्या या प्रेषितांना सामान्य लोक देवदूत समज लागतात, आणि मानवी जीवनाची अुंची वाढविण्याकरितां त्यांनी काहीं नवें नीतिनियम शोधून काढले आहेत असें मानूं लागतात. ज्यांना त्यांचें हें धोरण आचरणांत आणता येत नाही ते लोक यांच्या या तऱ्हेवाअीकपणाला साधुत्वाचें लक्षण म्हणून समजतात आणि तसें झालें म्हणजे या लोकांनाही आपण कोणीतरी मोठे महात्मे आहोंत असें वाटूं लागतें, नि ते सुखेनैव, बेलूटपणे, मोठ्या गंभीरपणाचा आव आणून भारतीय जनतेला हातांत काठी घेणे हें सुध्दां पाप आहे असें प्रतिपादन करूं लागतात. एवढेंच नव्हे तर पुढें स्वतंत्र झाल्यानंतरही हिंदुस्थानला अेकही सैनिक लागणार नाहीं किंवा हिंदुस्थानचो सीमा सांभाळण्या-करितां अेकही लढाअू जहाज आपणांस ठेवावें लागणार नाहीं असें सरळ सांगत सुटतात ! परदेशीयांच्या जोखडाखालून हिंदुस्थानचें स्वातंत्र्य मिळविण्याचा याचा मार्ग म्हणजे सुताचा चरखा होय, आणि जर या आत्यंतिक अहिंसेच्या कल्पनेवर हिंदुस्थाननें विश्वास ठेवला आणि त्यास अनुसरून त्यानें सैन्य, नौकादल किंवा

सैनिक दल ठेविलें नाहीं तर जगातील कोणतेंही राष्ट्र हिंदुस्थानवर स्वारी करणार नाहीं, किंवा जर कोणी केलीच तर त्याच्यासमोर गरगर फिरणाऱ्या चरख्याच्या आवाजावर गाणें गाणाऱ्या देशसेविकांचा ताफा उभा करून आपण त्यांना परतण्यास भाग पाडूं अशी यांची विचारसरणी आहे !

सापेक्ष अहिंसाच हवी

जेव्हां गोष्टी अशा थराला जातात नि यांच्यासारखे भंगट लोक सर्वसामान्य भोळसट माणसांचे विश्वस्त प्रतिनिधी म्हणून गोलमेज परिषदेसारख्या परिषदांना जातात आणि परदेशांत सुध्दां असलीं खुळचटपणाचीं, हिंदुस्थानच्या नांवानें मोठ्या गंभीरपणानें विधानें करूं लागतात तेव्हा परदेशांतील राजकारणी लोक आणि युरोप-अमेरिकेंतील सर्वसामान्य जनता हीं यांच्या या खुळचटपणाला हंसतात. यामुळें या मतांचा गंभीरपणें समाचार घेण्याची वेळ आली आहे. या मताच्या प्लेगाला आता शक्य तितक्या लौकर गाडून टाकलेंच पाहिजे. आपण या लोकांना क्षमायाचनेच्या भाषेंत नव्हे तर अगदीं ठणठणीत शब्दांनीं असें सुनावलें पाहिजे कीं, तुमचें हें आत्यंतिक अहिंसेचें खूळ केवळ अव्यवहार्य आणि अनैतिक तर आहेच, पण शिवाय यांत साधुत्वाची छटा कोठेंच नसून त्यांत सारा मूर्खपणा मात्र भरलेला आहे. जेव्हां जगांतील सर्व माणसें आत्यंतिक अहिंसेचे पालन करतील तेव्हां जगांत युध्दच होणार नाहीं, आणि सशस्त्र सैनिकांचीहि त्यावेळीं गरज उरणार नाहीं असें हें सांगतात. पण हे तत्त्वज्ञान सांगण्यास फारशी बुध्दि लागत नाहीं. जर प्रत्येक माणसानें चिरंजीव व्हायचें ठरविले तर या जगांत कधीं कोणाला मरणच येणार नाहीं असे म्हणण्यासारखें हें आहे. आम्हीं जेव्हां तुमच्या आत्यंतिक अहिंसेच्या तत्त्वज्ञानाचा धिक्कार करतों, तेव्हां साधुत्वाच्या दृष्टीनें तुमच्यापेक्षां आम्ही कांहीं कमी आहोंत म्हणून नव्हे, तर तुमच्यापेक्षां आम्हांस अधिक बुध्दी आहे म्हणून होय ! **मर्यादित अहिंसावाद हें आमचे ध्येय आहे. आणि म्हणून माणसाचे संरक्षण करण्याचें पहिलें साधन म्हणून केवळ संरक्षणासाठीं आम्ही तलवारीची उपासना करतों. याच बुद्धीनें हिंदु लोक शक्तिदेवता कालीमातेची खूण म्हणून शस्त्राची पूजा करतात. गुरुगोविंदसिंगानें आपल्या तलवारीला उद्देशून केलेल्या काव्यांत पुढीलप्रमाणें म्हटलें आहे :—**

सुखसंताकरणम् दुर्मतिहरणम् खलदलदलनम् जयतेगम् ।

आणि आम्हीहि या थोर गुरूच्या गाण्यांत आपला सूर मिसळून असें म्हणतों कीं, ' खड्गा तुझा, विजय असो.'

हिंदुत्वाचे पंचप्राण, ' खड्गा तुझा विजय असो ' अध्यक्षीय भाषण, मदुरा.

विभाग ३

धर्मभोळेपणा व देवभोळेपणा यावर स्वातंत्र्यवीर सावरकरांनी नेहमीच तुफान हल्ला चढवला आणि इहवादी दृष्टिकोण स्वीकारण्याच्या आवश्यकतेवर भर दिला. कर्मठ सनातन्यांना व समाजातील बहुसंख्य परंपरानिष्ठ लोकांना सावरकरांचे हे प्रतिपादन मुळीच रुचले नाही. 'खरा सनातन धर्म कोणता ?' या लेखात त्यांनी प्रथम धर्म या शब्दाचे निरनिराळे अर्थ स्पष्ट केले आहेत. शाश्वत अपरिवर्तनीय सृष्टिनियमांना सावरकर खरा सनातन धर्म म्हणतात. पारलौकिक स्थितीसंबंधीची विधेयें म्हणजे सिद्धान्त नसून कल्पना आहेत तर आचारासंबंधीचे निर्बंध सर्वथैव परिवर्तनीय होते आणि असलेच पाहिजेत असे सावरकर म्हणतात. मनुस्मृतीसारख्या ग्रंथाकडे धर्मशास्त्र म्हणून न पाहता सावरकर तो एक त्याकाळचे समाजचित्र दाखवणारा सामाजिक इतिहासग्रंथ म्हणून कसे व का पाहतात हे 'मनुस्मृतीतील महिला' या त्यांच्या लेखमालेतील येथे घेतलेल्या उताऱ्यावरून लक्षात येईल.

खरा सनातन धर्म कोणता ?

सनातन शब्दाचा मुख्य अर्थ शाश्वत, अबाधित, अखंडनीय, अपरिवर्तनीय. धर्म हा शब्द, अंग्लिश लॉ ह्या शब्दाप्रमाणेंच आणि तसाच मानसिक प्रक्रियेमुळें पुष्कळ अर्थांतरे घेत आला आहे.

(अ) प्रथम त्याचा मूळचा अर्थ नियम. कोणत्याहि वस्तूच्या अस्तित्वाचें नी व्यवहाराचें जो धारण, नियमन करतो तो त्या वस्तूचा धर्म. सृष्टीचे धर्म, पाण्याचे धर्म, अग्नीचे धर्म प्रभृति. त्यांचे अुपयोग ह्या व्यापक अर्थीच होतात. सृष्टिनियमांस 'लॉ' शब्दहि लावतातच, जसें 'लॉ ऑफ ग्रॅव्हिटेशन.'

(आ) ह्याच व्यापक अर्थामुळें पारलौकिक आणि पारमार्थिक पदार्थांच्या नियमांसहि धर्मच म्हणण्यात येअू लागले. मग ते नियम प्रत्यक्षागत असोत वा तसे भासोत ! स्वर्ग, नरक, पूर्वजन्म, अीश्वर, जीव, जगत् यांचे परस्परसंबंध, ह्या साऱ्यांचा समावेश धर्म ह्या शब्दांतच केला गेला. अितकेंच नव्हे तर हळूहळू तो धर्म शब्द या त्याच्या पारलौकिक विभागार्थच विशेषेंकरून राखून ठेवल्यासारखा झाला. आज धर्म शब्दाचा विशेष अर्थ असा हाच होतो कीं या अर्थी धर्म म्हणजे 'रिलिजन.'

(अी) मनुष्याचे जे अैहिक व्यवहार वरील पारलौकिक जगतांत त्यांस अुपकारक ठरतीलसें वाटलें, त्या पारलौकिक जीवनांत त्यांचें धारण करतील असे भासले, तेहि धर्मच मानण्यांत आले. अिंग्लिशमध्ये मोसेस, अब्राहिम, महंमद प्रभृति पैगंबरांच्या स्मृतींतहि अशाच खच्चून असलेल्या साऱ्या कर्मकांडास 'लॉ' च म्हटले आहे. या अर्थी धर्म म्हणजे आचार.

(अ) शेवटीं वरील आचार वगळून मनुष्यामनुष्यांतील जे केवळ ऐहिक प्रकरणींचे व्यवहार असतात त्या व्यक्तीच्या वा राष्ट्राच्या वर्तननियमांसहि पूर्वी धर्मच म्हणत. स्मृतींत युद्धनीति, राजधर्म, व्यवहारधर्म प्रभृति प्रकरणांतून हे गोवलेले असतात. पण आज यांपैकी पुष्कळसा भाग स्मृतिनिष्ठ अपरिवर्तनीय धर्मसत्तेंतून निघून आपल्या अिकडेहि परिवर्तनीय मनुष्यकृत नियमांच्या कक्षेंत, शास्त्रीपंडितांनाही निषिद्ध न वाटावा अितक्या निर्विवादपणे समाविष्ट झालेला आहे. जसें गाडी हाकण्यांचे निर्बंध, शिवीगाळ, चोरी अित्यादिकांचे दंडविधान तो निर्बंधशासनाचा (कायदेशासनाचा) प्रदेश होय. आपल्या अिकडे धर्म शब्द आज जसा 'रिलिजन' ह्या विशेषार्थी राखीव झाला आहे, तसाच अिंग्लिशमध्यें 'लॉ' हा शब्द विशेषार्थी ह्या निर्बंधशासनास आज वाहिला जात आहे. ह्या प्रकरणी धर्म म्हणजे निर्बंध (कायदा, 'लॉ.')

या लेखास अवश्य तेवढा सनातन आणि धर्म ह्या शब्दांच्या अर्थाचा अुलगडा असा केल्यानंतर आतां धर्म शब्दाच्या या वरील विभागापैकीं कोणत्या विभागास सनातन हा शब्द यथार्थपणें लावतां येईल हें ठरविणें फारसें अवघड जाणार नाहीं. सनातन धर्म ह्याचा वर दाखवल्याप्रमाणें आमच्यापुरता तरी आम्ही निश्चित केलेला अर्थ म्हणजे शाश्वत नियम, अपरिवर्तनीय, जे बदलूं नयेत अितकेंच नव्हे तर जे बदलणें मनुष्याच्या शक्तीच्या बाहेरची गोष्ट आहे असे अबाधित; जे धर्म असतील, नियम असतील, त्यांसच

सनातन धर्म ही पदवी यथार्थपणें देता येईल.

हें लक्षण वर धर्माचा जो पहिला विभाग पाडलेला आहे त्या सृष्टिनियमांस तंतोतंत लागू पडतें. प्रत्यक्ष अनुमान आणि त्यांना सर्वस्वीं विरुद्ध न जाणारें आप्तवाक्य या प्रमाणांच्या आधारे सिद्ध होऊं शकणारे आणि ज्यांविषयीं कोणीहि यथाशास्त्र प्रयोग केला असतां त्या त्या कार्यकारणभावाच्या कसोटीस जे पूर्णपणें केव्हांहि अुतरूं शकतात असे मनुष्याच्या ज्ञानाच्या आटोक्यांत जें जे सृष्टिनियम आणि जी जीं वैज्ञानिक सत्यें आज आलेली आहेत त्यांस त्यांसच आम्ही आमचा सनातन धर्म समजतों. निःशेष परिगणनास्तव नव्हे तर दिग्दर्शनार्थ म्हणून खालील नामोल्लेख पुरे आहेत. प्रकाश, अुष्णता, गति, गणित, गणितज्योतिष, ध्वनि, विद्युत्-चुंबक, रेडियम, भूगर्भ, शरीर, वैद्यक, यंत्र, शिल्प, वानस्पत्य, जैव आणि तत्सम जीं प्रयोगक्षम शास्त्रें (सायसेन्स) आहेत त्यांचे जे प्रत्यक्षनिष्ठ आणि प्रयोगसिद्ध नियम आज मनुष्यजातीस ज्ञात झालेले आहेत तोच आमचा खरा सनातन धर्म होय. ते नियम आर्यांसाठी वा अनार्यांसाठी, मुस्लिमांसाठी वा काफरांसाठी, अिब्राअिलांसाठी वा हीदनांसाठी अवतीर्ण झालेले नसून ते सर्व मनुष्यमात्रांस

निःपक्षपातीं समानतेनें लागू आहेत. हा खरा सनातन धर्म आहे. अितकेंच नव्हे तर हा खराखरा मानवधर्म आहे. हा केवळ 'कृतेतु मानवो धर्मः' नाही तर त्रिकालाबाधित मानवधर्म आहे, म्हणूनच त्यांस सनातन हें विशेषण निर्विवादपणे लागूं पडतें. सूर्य, चंद्र, आप, तेज, वायु, अग्नि, भूमी, समुद्र प्रभृति पदार्थ हचा, कोणी लोभाच्या लहरीप्रमाणें

प्रसन्न व रुष्ट होणाऱ्या देवता नसून

हचा आमच्या सनातन धर्माच्या नियमांनी पूर्णपणें बद्ध असणाऱ्या वस्तु आहेत. ते नियम जर आणि ज्या प्रमाणांत मनुष्यास हस्तगत करतां येतील तर आणि त्या प्रमाणात हचा सर्व सृष्टिशक्तींशीं त्याला रोखठोक आणि बिनचूक व्यवहार करतां आलाच पाहिजे– करतां येतोहि. भर महासागरांत तळाशीं भोंकें पडलेली नाव सोडून मग ती बुडूं नये म्हणून जरी त्या समुद्रात प्रसादविण्यास्तव नारळांचे ढीग त्यांत फेंकले आणि अमदीं शुद्ध वैदिक

मंत्रांत जरी टाहो फोडला

कीं 'तस्मा अरं गमाव वो यस्य क्षयाय जिन्वथ । आपो जनयथा चनः ।' तरी तो समुद्र आमच्या 'जनां'सह त्या नावेस बुडविल्यावांचून हजारी नअुर्णे नव्याण्णव प्रसंगी राहात नाहीं, आणि जर त्या नावेस वैज्ञानिक नियमांनुसार ठाकठीक करून, पोलादी पत्र्यांनीं मढवून 'बेडर' बनवून सोडली तर तिच्यावर वेदांची होळी करून शेकणारे आणि पंचमहापातकांस पंचमहापुण्ये समजून दारू पीत, गोमांस खात, मस्त झालेले रावणाचे राक्षस जरी चढलेले असले तरी त्या

बेडर रणनौस हजारीं नअुर्णे नव्याण्णव प्रसंगीं समुद्र बुडवीत नाहीं,

बुडवूं शकत नाहीं; तिला वाटेल त्या सुवर्णभूमीवर तोफांचा भडिमार करण्यासाठी सुखरूपपणें वाहून नेतो ! जी गोष्ट समुद्राची तीच अितर महद्भूतांची. माणसाळविण्याचें महामंत्र शब्दनिष्ठ वेदांत वा झेंद अवेस्तांत, कुरणांत वा पुराणांत सांपडणारे नसून प्रत्यक्षनिष्ठ विज्ञानांत (सायन्समध्यें) सांपडणारे आहेत. हा सनातन धर्म अितका पक्का सनातन, अितका स्वयंसिद्ध नी सर्वरवीं अपरिवर्तनीय आहे कीं, तो बुडू नयें, परिवर्तन पावूं नये, म्हणून कोणताही सनातन धर्म संरक्षक-संघ

स्थापण्याची तसदी कलियुगांतदेखील घ्यावयास नको. कारण या वैज्ञानिक सनातन धर्मास बदलविण्याचें सामर्थ्य मनुष्यांत कोणासहि आणि कधीहि येणें शक्य नाहीं.

हीहि गोष्ट आम्ही जाणून आहोंत कीं, हे सनातन धर्म, हे सृष्टिनियम, संपूर्णपणे मनुष्याला आज अवगत नाहीत– बहुधा केव्हांहि तसे अवगत होणार नाहींत. जें आज अवगत आहेसें वाटतें त्याविषयींचे आमचें ज्ञान विज्ञानाच्या विकासाने थोडे चुकलेलेहि आढळेल; आणि अनेक नवीन नवीन नियमांच्या ज्ञानाची भर तर त्यांत निश्चितपणेच पडेल. जव्हां जेव्हां ती भर पडेल वा तीत सुधारणा करावी लागेल तेव्हां तेव्हां आम्ही आमच्या या वैज्ञानिक स्मृतींत न लाजतां, न लपवितां किंवा

आजच्या श्लोकांच्या अर्थाची अप्रामाणिक ओढाताण न करतां

नवीन श्लोक प्रकटपणें घालून ती सुधारणा घडवून आणूं; आणि अुलट मनुष्याचे ज्ञान वाढले म्हणून त्या सुधारणेचें भूषणच मानूं.

आम्ही स्मृतींस सनातन, अपरिवर्तनीय, समजत नाहीं, तर सत्यास सनातन समजतों, अपरिवर्तनीय समजतों. स्मृति बदलाव्या लागतील म्हणून सत्यास नाकारणे हे घर वाढवावे लागेल म्हणून

मुलामाणसांचीच कत्तल

करण्यासारखें वेडेपणाचें आहे. धर्म या शब्दाच्या पहिल्या विभागात मोडणाऱ्या सृष्टिधर्मास सनातन हे विशेषण पूर्ण यथार्थतेने लागूं शकते हे वर सांगितले. आतां त्या धर्म शब्दाच्या जो दुसरा विभाग आम्ही वर पाडला आहे त्या पारलौकिक आणि पारमार्थिक नियमांचा विचार करूं. या प्रकरणासच आज सनातन धर्म हा शब्द विशेषतः लावण्यांत येतो. ओश्वर, जीवजगत् यांच्या स्वरूपाचे नी परस्पर संबंधाचे अस्तिरूप किंवा नास्तिरूप कांहीं त्रिकालाबाधित नियम असलेच पाहिजेत. त्याचप्रमाणे जन्ममृत्यु, पुनर्जन्म, पूर्वजन्म, स्वर्गनरक यांविषयींहि जी कोणची वस्तुस्थिति असेल ती निश्चितपणे सांगणारे ज्ञानहि त्रिकालाबाधित म्हणवून घेण्यास पात्र असणारच. यास्तव या पारलौकिक प्रकरणींचे सिद्धांतहि सनातन धर्म म्हणजे शाश्वत, अपरिवर्तनीय धर्म होत यांत शंका नाहीं.

परंतु त्या प्रकरणीं जी माहिती नी नियम मनुष्यजातीच्या हातीं आज असलेल्या यच्च यावत् धर्मग्रंथांतून दिलेले आढळतात, त्यांतील एकासहि सनातन धर्म,

अपरिवर्तनीय निश्चित सिद्धांत असे म्हणतां येत नाहीं. निश्चित झालेल्या वैज्ञानिक नियमांप्रमाणे धर्मग्रंथांतील हें पारलौकिक वस्तुस्थितीचे वर्णन प्रत्यक्षनिष्ठ प्रयोगांच्या कसोटीस मुळींच अुतरलेले नाही. त्यांची सारी भिस्त बोलूनचालून अेक्या शब्दप्रामाण्यावर, आप्तवाक्यावर, विशिष्ट व्यक्तीच्या आंतर – अनुभूतीवर अवलंबून असते. त्यांतहि फारसे बिघडले नसते. कारण काहीं मर्यादेपर्यंत प्रत्यक्षानुमानिक प्रमाणांस अविरुद्ध असणारे शब्दप्रामाण्य, आप्तवाक्य हेहि अेक प्रमाण आहेच आहे. पण केवळ या प्रमाणाच्या कसोटीस देखील

या धर्मग्रंथांतील पारलौकिक विधान लवलेशहि उतरत नाही.

प्रथम आप्त कोण ?– तर आमच्या अिकडचे धर्मग्रंथच म्हणतात कीं, चित्तशुद्धीने सत्त्वोदय झालेले ज्ञानी भक्त आणि समाधिसिद्ध योगी. चालेल; या पूर्णप्रज्ञ आप्तांत शंकराचार्य, रामानुज, मध्व, वल्लभ यांचा तरी समावेश केला पाहिजे ना ? महाज्ञानी कपिलमुनी, योगसूत्रकार पतंजलि यांना हिणाळणे अशक्य. अुदाहरणार्थ अितके आप्त पुरेत. आप्तवाक्य, शाब्दप्रामाण्य असेल तर हयांचा त्या त्या विशिष्ट वस्तुस्थितीचा अनुभव अेकच असला पाहिजे. पण पारलौकिक आणि पारमार्थिक सत्याचे जे स्वरूप आणि जे नियम ते प्रत्येकी सांगतात ते प्रत्येकी भिन्नच नव्हेत तर प्रत्येकी परस्परविरुद्ध असतात ! कपिलमुनि सांगणार– पुरुष नी प्रकृति हीं दोनच सत्ये आहेत; अीश्वरबीश्वर हम कुछ नही जानते ! समाधिसिद्ध पतंजलि सांगतात – 'तत्र' पुरुषविशेषो अीश्वर : !' शंकराचार्य सांगतात – पुरुष वा पुरुषोत्तम अीश्वर हे मायोपाधित आणि मायाबाधित असून 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवोब्रह्मैवनापर : ।' अद्वैत हेच सत्य ! रामानुज सांगतात – साफ चूक आहे हा प्रच्छन्न बौद्धवाद ! विशिष्टाद्वैत हेच सत्य ! मध्व–वल्लभ म्हणणार, जीव आणि शिव, भक्त आणि देव, जड आणि चेतन अेक म्हणतां तरी कसे ? द्वैत हेच सत्य ! अशा या महनीय साक्षीदारांच्या स्वानुभूत शब्दांसरशी गोंधळून बुद्धी जर अुद्गारली –

"पाहियलें प्रत्यक्षचि ! कथितों पाहियलें त्याला" ॥
"वदति सारे ! आप्तचि सारे ! मानूं कवणाला ?" ॥

तर त्यांत तिचा काय दोष ? तरी आम्हीं या योगसिद्धांच्या साक्षींत त्या परम योगसिद्धाची – त्या तथागत बुद्धाची साक्ष काढली नाही ! देवविषयक हा

यच्चयावत् विधानसमूह त्याच्या समाधिस्थ स्थानुभूतीत निव्वळ 'ब्रम्हजाल' म्हणून टाकाऊ ठरला ! समाधिमय ज्ञान, स्वानुभूति ही ह्या पारलौकिक वस्तुस्थितीस अबाधित नी विश्वासार्ह प्रमाण कसे होऊं शकत नाही, निदान अजून शकले नाही, तें असें पाहिल्यावर अितके सांगणें पुरे आहे कीं, शब्दप्रामाणाचीहि स्थिती वरील आप्तप्रामाणासारखीच आहे. अपौरुषेय वेद ज्या कारणांसाठी अपौरुषेय मानावे त्याच कारणांसाठी तौलिद, अिंजिल, बायबल, कुराण, अवेस्ता, स्वर्णग्रंथ – अक कां दोन ! जगांत जवळ जवळ जे पन्नासअेक ग्रंथ तरी आजहि अीश्वरप्रदत्त म्हणून प्रख्यात आहेत, तेहि सर्व अपौरुषेय मानणें भाग पडतें. आणि त्या प्रत्येकांत देवाने प्रत्येक तदितर अपौरुषेय धर्मग्रंथांतील पारलौकिक वस्तुस्थितीच्या दिलेल्या माहितीशीं आणि नियमांशीं विभिन्न, विसंगत नी विरुद्ध माहिती दिली आहे. वेद सांगतात, स्वर्गाचा अिंद्र हाच राजा ! पण बायबलच्या स्वर्गांत

अिंद्राचा पत्ता टपालवाल्याला देखील माहीत नाहीं.

देवपुत्र येशूच्या कंबरेस साऱ्या स्वर्गाची किल्ली ! देव नी देवपुत्र दोघे अेकच ! Trinity in Unity, Unity in Trinity', ! कुराणांतील स्वर्गांत 'ला अल्ला अिल्लिल्ला आणि महंमद रसुलल्ला !" तिसरी गोष्ट नाही. रेड अिंडियनांच्या स्वर्गांत डुकरेंच डुकरें, घनदाट जंगले ! पण मुस्लिम पुण्यवंतांच्या स्वर्गांत असली 'नापाक चीज' औषधाला देखील सांपडणार नाहीं ! आणि ह्या प्रत्येकाचे म्हणणें हे कीं

स्वर्ग मी सांगतों तसाच आहे.

प्रत्यक्ष देवाने हे सांगितलें, नव्हे, महंमदादि पैगंबर तर वर जाअून, राहून, स्वतः ते पाहून, परत आले नी त्यांनींहि हेच सांगितले ! तीच स्थिती नरकाची ! पुराणांत मूर्तिपूजक नी याज्ञिक तर काय, पण यज्ञांत मारलेले

बोकड देखील स्वर्गांतच जातात

असा त्यांचा मेल्यानंतरचा पत्ता दिला आहे. पण कुराण शपथेवर सांगते की, नरकांतल्या जागा, कितीही दाटी झाली तरी, जर कोणाकरितां राखून ठेवल्या जात असतील तर त्या ह्या मूर्तिपूजक आणि अग्निपूजक सज्जनांसाठीच होय ! मेल्यानंतरचा त्यांचा नक्की पत्ता नरक ! शब्दाशब्दांत भरलेली अशी विसंगति कुठवर दाखवावी ! हे सारे धर्मग्रंथ अपौरुषेय यास्तव खरे धरावे तरीहि त्यांत

सांगितलेली पारलौकिक वस्तुस्थिति शब्दप्रमाणाने देखील सिद्धांतभूत ठरत नाहीं– अन्योन्य व्याघातात् ! ते सारे मनुष्यकल्पित म्हणून खोटे मानले तर ती सिद्धांतभूत ठरत नाहींच नाहीं– वदतो व्याघातात् आणि त्यांपैकी खरे आणि काहीं खोटें मानावे तरीही ते तसे नी हे असे कां, हे ठरविण्यास स्वतःच्या शब्दांवाचून दुसरे प्रमाणच नसल्यामुळे, ती सिद्धांतभूत ठरत नाही ती नाहीच – स्वतंत्र प्रमाणाभावात् !!

यास्तव प्रत्यक्ष, अनुमान वा शाब्द यांपैकी कोणच्याहि प्रमाणानें पारलौकिक वस्तुस्थिति आजचें अुपलब्ध असणारे वर्णन हे सिद्ध होत नसल्यामुळे, त्यास सनातन धर्म त्रिकालाबाधित नी अपरिवर्तनीय सत्य, असे म्हणतां येत नाहीं. तशा कोणच्याहि विधेयास तसें सिद्धांतस्वरुप येताच तेही आमच्या सनातन धर्माच्या स्मृतीत गोवले जाअीलच; पण आजतरी तो विषयच प्रयोगावस्थेत आहे आणि आप्तांची वा अपौरुषेय ग्रंथांचीहि तद्विषयक विधाने सिद्धांत नसून क्लृप्ती (हायपॉथेसीज) आहेत; फार तर सत्याभास आहेत; पण सत्य नव्हे ! तें जाणण्याचा प्रयत्न यापुढेहि व्हावयास पाहिजे. तथापि त्याविषयी शक्य त्या क्लृप्ति योजून ते स्वर्गीय अूत आणि अनृत प्राप्त करून घेण्यासाठी अितका अतिमानुष प्रयत्न करून,

अितक्या दिशांना तरी त्यांचा पत्ता लागत नाहीं

हे सिद्ध केल्याविषयीं आणि आपल्या देवतुल्य अवतारांनी अखिल मानवजातीचा कुसुवा धन्य केल्याविषयी नाचिकेतापासून तों नानकापर्यंतच्या या पुण्यश्लोकांचे आणि प्रेषितांचे, या श्रुतींचे आणि या स्मृतींचे, आम्हां मानवांवर जे नानाविध अुपकार झालेले आहेत ते मात्र केव्हाहि फेडतां येणार नाहीत; ही कृतज्ञ जाणीव अिथे व्यक्तविल्यांवाचून आम्हांस पुढचे अक्षर लिहवतच नाहीं !

शवटी राहता राहिले धर्माचे शेवटचे दोन अर्थ. आचार आणि निर्बंध. या दोन्ही अर्थीं धर्म शब्दास सनातन हे विशेषण लावतां येत नाहीं. मनुष्याचे जे अैहिक व्यवहार त्याच्या पारलौकिक जीवनास अुपकारक आहेत असे समजले जाअी, त्यांस आम्ही आचार हा शब्द योजतों. अर्थात वर दर्शविल्याप्रमाणे पारलौकिक जीवनासंबंधीं अस्तिपक्षीं वा नास्तिपक्षीं अजून कोणताहि नक्की सिद्धांत मनुष्यास कळलेला नसल्याने त्याला कोणता अैहिक आचार अुपकारक होअील हे ठरविणे अशक्य आहे. हिंदुंच्याच नव्हे तर मुस्लिम, ख्रिश्चन, पारसी, यहुदी प्रभृति झाडून साऱ्या धर्मग्रंथांतील परलोकांपेक्षा कर्मकांडाचा पाया असा वाळूच्या ढिगावर अुभारलेला आहे. 'क्ष' भू हें बेट की गांव, रान की वैराण, पूर्वेस की उत्तरेस, आहे कीं नाहीच, हेंच जिथे निश्चियले गेलें नाही, तिथें त्या 'क्ष' भूमध्ये सुखानें नांदतां यावे म्हणून कोणच्या वाटेनें जावे आणि कोणाची शिधाशिदोरी तिथं

अुपयोगी पडेल ह्याचे वारीकसारिक अपरिवर्तनीय नियम ठरविणें किती अपमान-धपक्याचें काम ! तसेंच हें यास्तव अमुक अैहिक आचाराने परलोकी अमुक अुपयोग होतो असे सांगणाऱ्या कोणत्याही नियमांस आज तरी सनातन धर्म म्हणजे, शाश्वत, अपरिवर्तनीय, नी अबाधित नियम असे मुळींच म्हणतां येणार नाही. बाकी प्रश्न अुरला निर्बंधाचा (कायद्याचा); आणि मनुष्यामनुष्यांतील शिष्टाचाराचा. यांसहि स्मृतीत जरी 'अेष धर्मस्सनातनः' म्हणून म्हटलेलें असले तरी तें

सर्वथैव परिवर्तनीयच होते आणि असलेच पाहिजेत.

स्मृतीतहि सत्यादि युगांतील सनातन धर्मांपैकीं कांहीं कलिवर्ज्य म्हणून पुढे त्याज्य ठरविलें. म्हणजे काय ? त्याचप्रमाणें बहुतेक 'अेष धर्मस्सनातनः' पुढच्याच अध्यायांतून आपद्धर्माच्या अनुष्टुपाने खरडून टाकले जातात. म्हणजे काय ? म्हणजे हेच कीं आपद् वा संपद् प्रसंगी किंवा युगभेदानें परिस्थितीभेद झाला की हे निर्बंध बदलणेच अिष्ट होय. अर्थात् ते अपरिवर्तनीय, सनातन नसून परिवर्तनीयच होत. मनूने राजधर्मांत युद्धनीतीचा सनातन धर्म म्हणून जो सांगितला त्यात चतुरंगदळाचा सविस्तर अुल्लेख आहे. पण तोफखान्याचा वा वैमानिक दळाचा नामनिर्देशहि नाहीं. आणि सैन्याच्या अग्रभागी शौरसेनी लोक असावेत असें जें सांगितलें तें मनूच्या काळी हितावह होतें म्हणूनच सांगितलें असलें तरीहि या नियमास अपरिवर्तनीय सनातन धर्म समजून जर आमचे सनातन धर्मसंघ आजहि केवळ धनुर्धरांना पुढे घालून आणि आठघोडी रथ सजवून अेखाद्या युरोपच्या अर्वाचीन महाभारतांत शत्रूस – थरारविण्यासाठी अगदी श्रीकृष्णाचा पांचजन्य फुंकीत चालून गेले तर

पांचजन्य करीतच त्यांना परत यावे लागेल.

हें का सांगावयास पाहिजे ! हिंदुसेनेच्या अग्रभागी मनुनिर्दिष्ट शौरसेनीय प्रभृति सैनिक होते तोंवर हिंदूंस मुसलमान धूळ चारीतच पुढे घुसत आले; पण मनुस्मृतींत ज्यांचे नांवगांवहि नाहीं ते मराठे, ते शीख, ते गुरखे जेव्हां हिंदुसेनेच्या अग्रभागीं घुसले तेव्हां त्याच मुसलमानांस तीच धूळ खावी लागली ! आचार, रूढि, निर्बंध हे सारे मनुष्यामनुष्यांतील अैहिक व्यवहाराचे नियम

परिस्थिती पालटेल तसे पालटीतच गेले पाहिजेत.

ज्या परिस्थितींत जो आचार वा निर्बंध मनुष्याच्या धारणास आणि अुद्धारणास हितप्रद असेल तो त्याचा त्या परिस्थितीतील धर्म, आचार, निर्बंध.

'नहि सर्वहितः कश्चिदाचारः संप्रवर्तते, ते नैवान्य : प्रभवति सोपरो साध्वते पुनः ।।'
(म. भा. शांतिपर्व)

सारांश (१) जे सृष्टिनियम विज्ञानास प्रत्यक्षनिष्ठ प्रयोगांतीं सर्वथैव अबाधित शाश्वत, सनातन असे आढळून आले आहेत तेच काय ते खरे सनातन धर्म होत.

(२) पारलौकिक वस्तुस्थितीचें असें प्रयोगसिद्ध ज्ञान आपणांस मुळीच झालेले नाहीं. यास्तव तो विषय अद्याप प्रयोगावस्थेंत आहेसें समजून त्याविषयीं अस्तिरूप वा नास्तिरूप कांहींच मत करून घेणें अयुक्त आहे. त्या पारलौकिक प्रकरणीं नाना कल्पित सांगणारे कोणचेहि धर्मग्रंथ अपौरुषेय वा ईश्वरदत्त नसून मनुष्यकृत वा मनुष्यस्फूर्त आहेत. त्यांच्या कल्पित प्रमाणहीन असल्यानें त्यांस सनातन धर्म, शाश्वत सत्य असे म्हणतां येंत नाहीं.

(३) मनुष्याचे झाडून सारे ऐहिक व्यवहार, नीति, रीति, निबंध हे त्यास या जगांत हितप्रद आहेत कीं नाहींत या

प्रत्यक्षनिष्ठ कसोटीनेंच ठरविले पाहिजेत,

पाळले पाहिजेत, परिवर्तिले पाहिजेत, व 'परिवर्तिनि संसारे' ते मानवी व्यवहार धर्म सनातन असणेंच शक्य नाहीं, अिष्ट नाहीं. महाभारतामध्ये म्हटले आहे तेच ठीक कीं, 'अतः प्रत्यक्ष मार्गेण व्यवहारविधिं नयेत्."

– सावरकर साहित्य- भाग पहिला 'खरा सनातन धर्म कोणता ?' सनातन शब्दाचा मुख्य अर्थ... मार्गेण व्यवहारविधिं नयेत्" पृष्ठे ३२ ते ४३

धर्मग्रंथांचा ऐतिहासिक दृष्टीने अभ्यास करावा

मनस्मृती हें आपल्या हिंदु समाजाचें आजहि तत्त्वतः तरी पुष्कळ अंशी प्रमाणभूत मानलें जाणारें 'धर्मशास्त्र' आहे. ।। धर्मशास्त्रं तुवै स्मृतिः ।। यांत, आजच्या परिभाषेंत फोड करून सांगायचें म्हणजे, निबंध (कायदा) आणि आचार हया दोन्हींचा समावेश असतो. पुरातन परंपरेप्रमाणे हीं दोन्हीं सारखींच अनुल्लंघ्य मानलेली असतात; आणि मनुस्मृतींत सांगितलेले हे धर्मशास्त्र त्रिकालाबधित नी अपरिवर्तनीय आहे असें समजलें जातें. त्यांतहि मनुस्मृतीचीच प्रतिज्ञा अशी आहे कीं, वेदाबाहेर ती कांहींहि सांगत नाहीं. ती स्पष्टपणे म्हणते,

यः कश्चित्कस्यचिद्धर्मो मनुना परिकीर्तितः ।।
स सर्वोभिहितो वेदो सर्वज्ञानमयोहि सः ।।(अ. २, ७)
या वेदबाह्याः स्मृतयोयाश्चकाश्च कुदृष्टयः ।
सर्वास्ता निष्फलाः प्रेत्य तमोनिष्ठाहि ताः स्मृताः ।। (अ. १२, ९५.)

वेद अपौरुषेय आहेत नी जे वेदांत सांगितले तेच मनुस्मृतीत; अर्थात् ते धर्मशास्त्रहि अपौरुषेय आज्ञासारखेंच त्रिकालाबाधित नी अनुल्लंघ्य आहे अशी पुरातन विचारसरणी 'ही 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' प्रवृत्ति, थेट मनुस्मृतीच्या कालापासूनच चालत आलेली आहे. मनुस्मृतीचे म्हणणें हें, कीं तींत जें धर्मशास्त्र सांगितलें तें अनुल्लंघ्य कां, ग्राह्य कां, तर ते श्रुतीला धरून आहे म्हणून! – अपयुक्त आहे कीं नाहीं, कोणच्या परिस्थितींत ते अपयुक्त, एखाद्या परिस्थितींत ते राष्ट्रधारणास अनुपयुक्तच, नव्हे तर चक्क हानिकारक ठरलें तर, बदलावें वा गाळावें की नाहीं, हे सारे प्रश्न दुय्यम, नव्हे अप्रमादर्शक! तशी चर्चा, मीमांसा, हीहि संशयार्थ, तरी सर्वस्वीं निषिद्ध! श्रुतींत आहे म्हणूनच ते अनुल्लंघ्य, त्रिकालाबाधित. तेंच स्मृतींत म्हणून तीहि अनुल्लंघ्य, अमीमांस्य, हा स्वतः मनुस्मृतीचाच स्पष्ट दंडक आहे आम्हीं वर दिलेल्या वचनांसह हीं खालील वचने वाचावीं–

श्रुतिस्तु वेदो विज्ञेयो ऽ धर्मशास्त्रं तु वै स्मृतिः।
ते सर्वार्थेष्वमीमांस्ये ताभ्यां धर्मोहि निर्बभौ ॥
योवमन्येत ते मूले हेतुशास्त्राश्रयाद् द्विजः।
स साधुभिर्बहिष्कार्यो नास्तिको वेदनिन्दकः ॥ (अ. १०–११)

आपल्या प्राचीन परंपरेप्रमाणें तरी जी आद्य स्मृती मानली जाते आणि प्राचीन तरी आहेच आहे त्या स्मृतींतहि ही 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' प्रवृत्ति अशी स्पष्टपणे अभिमानपुरस्सर अंगिकारली असतां प्रो. अळतेकरांसारखे कांही विद्वान तीं मुसलमानी कालापासूनच काय ती अंगिकारली गेली असें 'केसरी' सारख्या पत्रांतून म्हणतात तरी कसे ते कळत नाहीं! ती प्रवृत्ति बांगली कीं वाओट, ती ठेवूनहि सुधारणा झाल्या कीं नाहीं, तिचे परिणाम हितावह झाले कीं अहितावह, हे प्रश्न अगदीं स्वतंत्र आहेत. ही प्रवृत्ति आपल्या अेकंदर धर्मशास्त्राची आधारस्तंभच होती कीं नाहीं हा प्रश्न आहे; आणि आम्ही सुधारक मंडळी त्या प्रवृत्तीच्या अस्तित्वाची साक्ष देतों त्याहून शतपट अधिक प्रबळतेने आमच्या लक्षावधि प्रबळ शास्त्री-मंडळींचीहि साक्ष या प्रकरणीं आमच्याच बाजूला पडणारी आहे कारण श्रुतींत जे आहे ते स्मृतींत आहे म्हणूनच अनुल्लंघ्य धर्मशास्त्र होय. तेच स्मृतींत नी तेच पुराणांत आहे. त्यात सुधारणा होणेच शक्य नाहीं; कारण ते मुळीं 'असुधारणीय– अपरिवर्तनीय– आहे!' ही प्रतिज्ञा जो नाकारील तो मुळीं सनातनीच होऊं शकत नाही!

धर्मशास्त्र म्हटलें म्हणजे ते वर दिलेल्या ह्या 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' भावनेनेंच वाचावयाचें अशी ही समजूत अजूनहि बहुसंमत असल्यानें आम्ही या लेखांत स्त्रीवर्गाविषयी मनुस्मृतीचे काय काय दंडक आहेत, त्या प्रकरणीं तीं काय म्हणते, ते स्पष्टविण्यासाठीं त्यांतील वचनें जीं देणार आहोंत तीं त्याप्रमाणेच आजहि स्त्री-

स्त्रीविषयक विचारांचे नी आचारांचे अधिकारांचे नी कर्तव्याचे नियमन झाले पाहिजे अशा बुद्धीनेच देत आहोंत की काय असे पुष्कळांस वाटण्याचा संभव आहे. अुलट पक्षी ते दोन अडीच हजार वर्षांपूर्वीचे त्या परिस्थितींत बरे वाटलेले, अत्यंत अुत्कृष्ट वाटलेले आचार वा विचार महिलावर्गाचे आजहि तसेच्या तसेच नियमन करण्याचे कार्यी किती अप्रयोज्य, असमर्थ नी अपायकारक आहेत हेंच दाखविण्यासाठीं आम्ही तीं वचनें अिथे देत आहोंत असेहि पुष्कळांस वाटूं शकेल. पण या लेखांत आमचा तसे कांहींहि सिद्ध करण्याचा हेतु नाहीं. मनस्मृतीच्या काळीं महिलावर्गाविषयीं काय कल्पना, भावना आणि दंडक असत ही नुसती वस्तुस्थिती काय ती दाखविण्यासाठीं हा लेख लिहिला आहे. मनुस्मृतीतील हीं वचने अनुल्लंघ्य दंडक म्हणून, आजहि तसेच वागणे अवश्य आहे, श्रेयस्कर आहे, म्हणून आम्ही देत नाहीं. मनुस्मृतीस धर्मशास्त्र म्हणून न मानता तो अेक त्याकाळचें आमचें समाजचित्र दाखविणारा सामाजिक अितिहासग्रंथच आहे– याच नात्याने काय ते या लेखांत आम्हीं त्याचा उपयोग करणार आहोंत. मनुस्मृतीतील महिला कशी होती ? तर अशी, अितकेच हा लेख सांगतो. ती तशी होती हे चांगले की वाअीट, ती आजहि तशीच असावी कीं काय, अित्यादि प्रश्नांचा अूह त्याच्या कक्षेत मुळीच पडत नाही. दुसरे असे, की अनुल्लंघ्य धर्मशास्त्र असे आम्ही मनुस्मृतीस जें मानींत नाही ते त्या थोर ग्रंथाविषयीची मान्यता लोकांत कमी व्हावी म्हणून नव्हे, तर ती अूलट केव्हाहि वास्तविक आहे त्याहून कमी होअूं नये म्हणूनच होय.

आपल्या वेदस्मृतिप्रभृति महान ग्रंथांची योग्यता अितकी मोठी आहे, कीं तिला टिकविण्यासाठी ते ग्रंथ अपौरुषेय वा त्रिकालाबाधित वा सर्वज्ञ आहेत अशा कांहीच्याबाहीच अर्थवादांचें वा व्यर्थवादांचें स्तोम रचणें हिमालय पर्वत गडमगूं नये म्हणून त्याच्या पायथ्याला बांबूचे टेकू अुभारण्याअितकेच अनावश्यक, अनिष्ट नी हास्यास्पदच व्हावे ! अितकेच नव्हे, तर त्यांस, ते आहेत तसेच, पौरुषेय, परिस्थिति-सापेक्ष, त्या काळच्या भावभावना, नियमनिर्बंध, आचारविचार, प्रदर्शविणारे आमचे प्राचीन धर्मग्रंथच या दृष्टीने संबोधण्याने त्यांच्याविषयीची पूज्यता चिरकाल टिकूं शकते, जगन्मान्य राहूं शकते. त्यांस आपण मूर्ख अट्टाहासानें

त्रिकालाबाधित मानले नाहीं तरच त्यांची मान्यता त्रिकालीं अबाधित राहील !

ज्यावेळी कोणी राजांचे खरोखरच महाराज होते त्या वेळी त्यांना महाराज ही शोभत असलेली पदवी, ते स्वतःच दुसऱ्याचे मांडलिक झाले असतांहि जुन्या महाराजपणास लावूं जातां जशी त्या पदवीची अुलट विटंबनाच होते; आणि मांडलिक झालेल्या परिस्थितीत महाराज म्हणवून घेण्यांत तो मनुष्य महाराज न

होतां तो महाराज शब्द मात्र मांडलिक या शब्दाचा पर्याय होऊन बसतो; तशीच केविलवाणी स्थिति प्राचीन परिस्थितीत अनुल्लंघ्य धर्मशास्त्रत्व पावलेल्या त्या काळी सर्वज्ञ वाटलेल्या या पूज्य ग्रंथांस आजच्या काळीहि अनुल्लंघ्य धर्मशास्त्र, त्रिकालाबाधित निर्बंधग्रंथ, 'सर्वज्ञानमयोहि सः' अशा स्तोमाने जगांत मिरवले असतां या ग्रंथांचीहि झाल्यावांचून राहात नाही. वेद काय, मनुस्मृति काय, कुराण-बायबल-अवेस्ता- तौलिद हे ग्रंथ पौरुषेय मानले असतां त्यांच्या कर्त्याविषयी, त्या परिस्थितीत त्यांनी केवढी प्रगति केली ते पाहून, कितीतरी जनहित साधले ते ध्यानी घेऊन, आश्चर्याने मन थक्क होते; योग्य तो आदर वाटल्यावाचून राहात नाही; आणि त्यांच्यात आपलेपणा दिसतो तो अगदी क्षम्यच नव्हे, तर अगदी मनुष्यसुलभ ती साहजिक वाटू लागतो. त्यामुळे त्यांची योग्यता मुळीच कमी वाटत नाहीं. पण या वेद-अवेस्तांस, कुराणा-पुरणांस, तौलिद-बायबलास ओश्वरी आदेश म्हटले, अक्षर ती अक्षर त्रिकालाबाधित सत्य, अनुल्लंघ्य ओश्वरी आज्ञा म्हटले की त्यायोगें त्या ग्रंथांना ते ओश्वरीय पूर्णत्व येण्याचे ठायी अुलट ओश्वरासच अेखाद्या मनुष्यासारखे स्खलनशील दुर्बलत्व चिकटविले जाते; तो ग्रंथकर्ता मनुष्य ओश्वर-प्रेषित होण्याचे ठायी ओश्वरच मनुष्य होऊन बसतो ! आणि ते ग्रंथहि अुपहासास्पद बनतात, हानिकारक होतात !!

राष्ट्राची परिस्थिति जशी बदलत गेली तसे मनुभगवानांचे कांही निर्बंध (कायदे) राष्ट्रहितार्थ बदलणें योग्य वाटूनच पुढील शास्त्रकारांनी त्यांच्या मते लोकहितास हव्या नवीन परिस्थितीत ज्या अवश्य त्या नवीन सुधारणा घडवून आणण्यासाठी नवीन निर्बंध स्मृतीत घातले. हव्या हेतूने जे श्लोक मनुस्मृतीत वेळोवेळी घातले गेले ते प्रक्षिप्त असले तरी ते घालणाऱ्यांचा हेतू राष्ट्रहितकारकच होता, लबाडीचा नव्हता. व्यक्तिशः त्यांना त्यामुळे काही विशेष लुबाडायचे नव्हते; हें आपण विसरतां कामा नये. मूळच्या निर्बंधांच्या विरुद्ध असे जे श्लोक मागाहून घातलेले दिसतात ते बहुधा नीति-कल्पनांचा आणि सात्त्विक संयमाचा विकासच व्यक्तविणारे आहेत ही गोष्टच त्या प्रक्षेपकांच्या सद्हेतूचा बळकट पुरावा आहे. असल्या श्लोकांचे प्रक्षेपक हे त्या त्या काळचे सदिच्छ सुधारकच होते.

अुदाहरणार्थ नियोगाची रीत घ्या. आर्य राष्ट्र अल्पसंख्य होते, त्यांच्या शत्रूंचा वेढा अजित होता. राष्ट्रवृद्धीस निर्जन पण सुपीक भूमी वाटेल तितकी पुढे मोकळी होती- तेव्हा राष्ट्राचे संख्याबळ वाढविणे हितकर होते. यास्तव कुमारीपुत्र (कानीन), लग्नाचे वेळीं पूर्वगर्भ असलेल्या कुमारीचा पुत्र (सहोढ), स्वतःच्या पत्नीने पतीस न कळवितां परपुरुषापासून अुत्पादिलेला पुत्र मानून प्रतिपाळण्याचा अुदारपणा राष्ट्रहिताकडे दृष्टी देअून दाखवावा आणि त्या योगे आर्यबीजाचा कण नी कण राष्ट्रीय संख्याबळ वाढविण्याकडे अुपयोजिला जावा हेच राष्ट्रहिताचे होतें. पत्नी ही पतीचें क्षेत्र; त्यांत जे अुत्पन्न ते पतीच्याच स्वामित्वाचे आहे हा

सूत्रान्वये हे सारे पुत्र पुत्रांप्रमाणे प्रतिपाळले जावे ही प्रवृत्ति अशा काळी राष्ट्रीय संख्याबळास हितकारकच होती. वंशक्षय होऊं नये म्हणूनच धर्म्य मानिलेल्या नियोगाचेहि हेच समर्थन होय. आजकालच्या जर्मनी, फ्रान्स, अिटली, रशिया प्रभृति राष्ट्रांवर जेव्हां जेव्हां संख्याक्षीणतेचें संकट कोसळले तेव्हां तेव्हां वैवाहित निर्बंध असेच ढिले करावे लागले. आणि विवाहबाह्य संततीहि या वा त्या सूत्रान्वये नैर्बंधिक [Legitimate and legal] मानली गेली; अुत्तेजनार्ह ठरली.

ती परिस्थिती पालटून आर्यराष्ट्र जिकडे तिकडे फैलावल्यावर संख्याबळाचा प्रश्न विचारांत घेतला जाईनासा झाला; नियोगादि चालींत तोच मुख्य हेतु होता याची जाणीवहि पुसट झाली; त्या वैवाहिक ढिलेपणाचे शल्य मनांस बोचूं लागले; त्या प्राचीन रुढीचे दुष्परिणामच तेवढे ठळकपणे दिसू लागले आणि समाजापुढे वैवाहिक नीतीचा उच्चतम आदर्श ठेवणेच त्याच्या हिताचे आहे असे त्या वेळच्या सुधारकांना वाटू लागले. वाढत्या नीतिमत्तेचा हा विकासच होता. यास्तव त्या वेळच्या ब्राह्मणक्षत्रियांनी, ब्रह्मर्षींनी आणि राजर्षींनी, वैवाहिक जीवनास नी स्त्री-पुरुष संबंधास शक्य तितके अेकनिष्ठ, प्रामाणिक नी संयत करणारे नवीन निर्बंध प्रचलविले नी नियोगादिक पूर्वधर्म वर्ज्य मानले. त्या वैवाहिक उच्चतर आदर्शाचे समर्पक श्लोक मनुस्मृतीतील पूर्वश्लोकांच्या आगेमागें प्रक्षेपून त्या निर्बंधासहि मनूच्या नावाचा आसरा घेतला. या मद्यनिषेध, नियोगत्याग, मांसासनत्याग-यज्ञहिंसानिषेध, कानीनादि पुत्रांचा निषेध प्रभृति प्रकरणी तरी सत्ययुगांतील पूर्वाचार्यांपेक्षा अर्वाचीन आचार्यांचा, धर्माचा नी नीतीचा आदर्शच अधिक समयशील, दयादाक्षिण्यशील नी सत्यशील असलेला आढळतो. सत्ययुगीत निर्बंधांनी ज्या भोगांना ते प्रकटपणे भोगू शकत अशा अनेक स्वैरभोगांस या नव्या आचार्यांना त्यांच्या स्वतःच्या या कडक नव्या निर्बंधांमुळे आंचवावें लागलें. पण हे कळत असूनहि त्यांनी आपल्या स्वैरतेवर आपण होऊन कडक बंधने घालून घेतली हे त्या ब्राह्मण शासनकारांच्या नी क्षत्रियशास्त्रगोप्यांच्या समाजहितार्थ केलेल्या त्यागाचे नी अुच्चतम नीतिमत्तेचेच दर्शक आहे. खरोखर, सत्ययुगीन धर्मच अधिक धर्मशील आहेत, कारण ह्या प्रक्षेपक अर्वाचीन आचार्यांनी प्राचीनांत जे अेकंदरीत वर्ज्य तेच बहुधा कलिवर्ज्यांत वर्ज्य ठरविलें आहे.

ह्या गडबडगुंड्याचा सारा दोष आमच्या 'शब्दनिष्ठ सनातन' प्रवृत्तीचाच आहे !

प्रक्षेपकांचा हेतु चांगलाच होता हे वर दाखविलें. आता सगळ्यांत मोठा दोष म्हणजे त्यांनी त्यांना चांगल्या वाटणाऱ्या सुधारणा स्वतःच्या श्लोकांत स्वतःच्या नांवावर न प्रसिद्धितां प्राचीन मनुस्मृतीतच मनूच्या नांवे दडपून दिल्या

हा होय. त्या योगे त्या साऱ्या ग्रंथांची खिचडी होऊन मूळ मनु काय म्हणतात नी प्रक्षेपकांचे प्रक्षिप्तमत कोणते हे निश्चितपणे सांगणेंच दुर्घट झाले. ही धादांत लबाडी होती. परंतु ती करण्यांतहि त्या प्रक्षेपकांचा हेतु अेकंदरीत परोपकाराचाच होता. कारण जे जे नवीन ते ते चांगले म्हणून न स्वीकारतां, ते श्रुतिपुराणोक्त असले तरच स्वीकार्य होय असा दंडक अगदी मनुपासूनच आमच्या रोमरोमी खिळलेला होता. "वेदांत आहे तेच मी सांगतों" अशा खऱ्याखोट्या शपथा मनूलादेखील वारंवार हव्या स्मृतीत घ्याव्या लागल्या तेव्हा मनुस्मृती धर्म्य ठरूं शकली. स्वतः मनुस्मृतीतहि 'अितर स्मृती खोट्या आहेत, त्या पाळू नका' हे सांगताना अगदी शेवटच्या १२ व्या अध्यायांत ९६ व्या श्लोकांत सांगितले आहे, की

'तान्यर्वाक् कालिकतया निष्फलान्यनृतानि च'

त्या मनुस्मृतीहून अितर स्मृति त्याज्य आहेत. का ? त्यांतील निर्बंध समाजहितास बाधक आहेत असे सिद्ध होते म्हणून नव्हे तर मुख्यत्वेकरून त्या अेकाच महाकारणासाठी ! अर्वाक्कालितया ! त्या अर्वाचीन आहेत म्हणून ! ! जे जे अर्वाक्कालीन, अद्यतन, अद्यावत् ते ते टाकाऊ असलेच पाहिजे – हा मनूचाच दंडक ! त्यामुळे पुढच्या शास्त्रकारांना आपल्या सुधारणा लोकांच्या गळी अुतरविण्यास आपले श्लोक मनूच्या प्राचीन स्मृतींतच दडपण्यावांचून गत्यंतर अुरले नाहीं ! हा दोष मुख्यतः त्या प्रक्षेपकाचाच नसून त्याचे खापर पुष्कळ अंशी हव्या आमच्या पूर्वापार 'शब्दनिष्ठ सनातन' प्रवृत्तीवरच फोडले पाहिजे !

अैतिहासिक दृष्टीनें मात्र ही अडचण मुळींच पडत नसून सारा अुलगडा समाधानकारकपणें होतो.

परंतु कोणाचा श्लोक प्रक्षिप्त, कोणचा मूळ, कोणचा वेदनिष्ठ नी कोणचा वेदबाह्य, ही भानगड अैतिहासिक दृष्टीनें हा ग्रंथ वाचणाऱ्या आम्हासारख्यांस मुळींच नडत नाहीं. तो अैतिहासिक चर्चेचा विषय अितकेंच त्याचे महत्त्व. राष्ट्राच्या आजच्या परिस्थितीत राष्ट्रधारणास जो श्लोक अुपयुक्त वाटेल तो, मनूचा असो, प्रक्षिप्त असो, तो आम्ही आचरूं. जेथे तो परवडणार नाहीं तेथें राष्ट्रहितसाधक असे अद्यावत् ज्ञानाच्या कसोटीस अुतरणारे नवीन निर्बंध करूं. खरेंखोटें, चांगले वाअीट, हे ठरविण्याची 'अर्वाक कालिकता' ही अेकमेव कसोटी आहे हे आम्हांस मुळींच मान्य नाही. जुनें तें सोनें हें जसें कधी खरें असतें तसें जुनें तें शिळें हेंहि खरेंच असतें.

मनूचें अक्षर नी अक्षर खरेंच, ती स्मृति सुसंगत आहे असे मानणाऱ्या शब्द-निष्ठ सनातन्यांनाहि तींतील शेंकडों धडधडीत अन्योन्यविरुद्ध श्लोकांच्या समन्वय लावतां नाकी नव येऊन शेवटीं प्रत्येक टीकाकार मनुस्मृतीचे श्लोक जरी बदलत नाहीत तरी अर्थ बदलून बदलून अेकेक नवीन मनुस्मृति लिहितो. मनूंत मांस खाणें धर्म्य आहे असे म्हणून ब्राह्मणांच्या कांही जातीच्या जाती मांस खातात, कांही मांस वर्ज्य पण मासे धर्म्य म्हणून मासे खातात, काही मनू दोन्ही वर्ज मानतो असा समन्वय लावून केवळ शाकाहार करतात ! ही गाचीन परंपरा आजहि चालवून कोणी अनुलोम विवाहहि मनूंच्या नांवें अधर्म्य समजतात तर कोणी त्याच मनूच्या नांवें आज धडधडीत प्रतिमोल विवाह 'शास्त्रोक्त' मानून ब्राह्मणाची मुलगी वैश्यास देतात ! अशी बिचाऱ्या मनूच्या शब्दाशब्दाची कुतरओढ होऊन आजहि मनुस्मृतीच्या श्लोकांची अेकच प्रत असतां तिच्या अर्थाच्या पांचशेंजणांनीं पांचशें मनुस्मृत्या करून सोडल्या आहेत !

पण अैतिहासिक दृष्टीच्या वाचकांना तसा दुसराहि शब्दच्छल करण्याचें कारणच पडत नाहीं. आजचीं मनुस्मृती अेकटाकी, सुसंगत, अेका ग्रंथकाराची मूळ स्मृति नाही, ती एक भिन्नमतांची संकल्पित संहिता आहे. वेदकाळच्या अितिहासा-प्रमाणें ज्या रूढि अत्यंत प्राचीन ठरतात त्यांचे समर्थक श्लोक पाहिले, त्यानंतरच्या अितिहासकालांत ज्या रूढी गळलेल्या आढळतात त्यांचे नियोग, मांसाशनप्रभृति निषेधाचे श्लोक, त्यानंतरचे प्रक्षिप्त, अशा अितिहासाच्या स्वतंत्र पुराव्याने प्रक्षिप्त श्लोकांची छाननी अेकंदरीत बरोबर करता येते. तरीही अमुक श्लोक मूळचा वा प्रक्षिप्त आहेच आहे असा दुराग्रहहि धरणें दुर्घट आहे – अितकी ती खिचडी शिजून अेकजीव झालेली आहे – हेहि अैतिहासिक वाचक विसरत नाहीं. शेवटी कोणाचाहि श्लोक मूळचा म्हणूत चांगला, प्रक्षिप्त म्हणून वाअीट, वा स्मृतींतला म्हणूनच अनु-ल्लंघ्य असें मानीत नाही. तर आजच्या राष्ट्रीय परिस्थितीत हितकारक असेल तर मानतो नाहीतर तसा हितकारक तो नवीन निबंध नवीन म्हणून चक्क सांगून स्वीकारतो. विज्ञाननिष्ठ, प्रत्यक्षनिष्ठ, अद्यावत प्रवृत्ति ती हीच. ह्याच प्रवृत्तीने नी ह्याच अैतिहासिक दृष्टीने मनुस्मृतीच नव्हे, तर श्रुतीही वाचल्या असतां त्यांच्या अर्थाची दुर्दशा न होतां तो पुष्कळ अधिक सरळपणे लागतो, त्या ग्रंथाची नसती विटंबना टळते.

शेवटीं, या लेखमालेच्या आरंभी दिलेल्या कारणासाठीं या प्राचीन नी पूज्य महद् ग्रंथाची थोरवी आठवून नी त्याचे आमच्या हिंदुराष्ट्रावर शतकानुशतके झालेले अुपकार स्मरून, अेका काळीं जपानपासून यवनद्वीपापर्यंत (ग्रीसपर्यंत) धर्मग्रंथ व निबंधशास्त्र म्हणून मूर्धाभिषिक्तत्व पावलेल्या नी शत भाषांतून भाषांतरिलेल्या त्या मनुस्मृतीस नी मनुभगवानांसच नव्हे, तर भृगुसंहितेस नी भृगुअृषीसहि वारं-वार वंदून आम्ही ही लेखमाला संपवतों.

सावरकर साहित्य : भाग ४

मनुस्मृतींतील महिला

मनूस्मृति हें आपल्या हिंदु ..... हानिकारक होतात !! .....
राष्ट्राची परिस्थिती जशी ..... आम्ही ही लेखमाला संपवतो.
पृष्ठे ९६ ते १०१ व पृष्ठे १५० ते १५५.

विभाग चौथा

अंदमानातून परतल्यानंतरच्या काळात सावरकर हिंदुराष्ट्रवादाचा हिरिरीने प्रचार करू लागले. 'हिंदुत्वाची व्याख्या आणि हिंदू शब्दाचा सत्प्रयोग आणि अपप्रयोग' या लेखात आरंभी हिंदू शब्द परकीयांनी काढलेला नसून तो ऋग्वेदकालीन सप्तसिंधु या प्राचीनतम राष्ट्रीय अभिधेतच कसा आहे हे सावरकरांनी दाखवून दिले आहे. हिंदुत्व म्हणजे एक धर्ममत नव्हे असे बजावून "आसिंधुसिंधु भारत भूमिका ही ज्याची पितृभू नि पुण्यभू आहे तो हिंदु' अशी त्यांनी हिंदू शब्दाची व्याख्या केली आहे. हिंदुसमाज जातिव्यवस्थेवर आधारलेला आहे. जातिभेदामुळे हिंदुसमाज पोखरला गेला आणि दुबळा बनला. शूद्रांना वेदाध्ययन करण्यास किंवा वेदोक्त संस्कार करण्यास घातलेली बंदी, व्यवसायबंदी, स्पर्शबंदी, समुद्रपार करण्यास केलेली बंदी, परमधर्मीयांना हिंदू करून घेण्यास घातलेली बंदी, रोटीबंदी तसेच बेटीबंदी या सात स्वदेशी बेडया तोडल्याखेरीज बलशाली, एकसंध हिंदू राष्ट्राचा उदय होणार नाही असे सावरकरांचे मत होते.

हिंदुत्वाची व्याख्या

॥ आसिंधुसिंधुपर्यन्ता यस्य भारतभूमिका ॥
॥ पितृभूः पुण्यभूश्चैव स वै 'हिंदु' रिति स्मृतः ॥

हिंदु हा शब्द हिंदुसंघटनाचा केवळ पायाच होय. त्यामुळें त्या शब्दाचा अर्थ ज्या मानाने व्यापक वा आकुंचित, बळकट वा ढिला, चिरंतन वा चंचल त्या प्रमाणांतच त्या पायावर उभारलेलें हें हिंदुसंघटनाचे प्रचंड बांधकाम व्यापक, भक्कम, टिकाऊ ठरणारें आहे. हिंदुमहासभा काय नि तिनें हातीं घेतलेले हिंदुसंघटनाचें महत्कार्य काय, त्यांचे, हिंदु कोण ह्या प्रश्नाचें निश्चित उत्तर दिल्यावांचून, अेक पाऊलहि दिशाभूल न होतां पुढें पडणें अशक्य आहे, अनर्थावह होणारें आहे.

यास्तव हिंदुसंघटनाचें कार्य ज्यांनी ज्यांनी हातीं घेतलेलें आहे त्यांच्या उपयोगासाठी या अत्यंत महत्त्वाच्या हिंदु शब्दाविषयीं जी काहीं माहिती आमच्या मतें प्रत्येक हिंदूला अगदीं मुखोद्गत असणें अवश्य आहे असें वाटतें ती सूत्ररूपानें या लेखांत देण्याचा आमचा उद्देश आहे. ती देतांना कराव्या लागणाऱ्या त्या सूत्रमय विधानांचे स्पष्टीकरण नि समर्थन देण्याची सोयहि अशा अेका स्फुट लेखांत करतां येणे दुर्घट असल्यामुळें आम्हीं आरंभींच वाचकांना विनवतों कीं ज्यांना तें स्पष्टीकरण नि समर्थनहि पहावेंसे वाटेल त्यांनी ते आमच्या Hindutva ह्या अिंग्रजींतील मूळ ग्रंथांत किंवा निदान मराठी भाषांतराच्या, तिसऱ्या आवृत्तींत अवश्य पाहावें. किंबहुना तो मूळ ग्रंथ वाचल्याविना या लेखांतील सूत्रमय विधानांना घाअीनें आक्षेपूं नये. कारण त्या पुस्तकाच्या वाचनाने त्या आक्षेपांतील कित्येक आक्षेप अनायासेंच निरसले जातील असें आम्हांस वाटतें.

हिंदु शब्दाचे पुरातनत्व

१) हिंदु शब्द मुसलमानांनी काढलेला नाही किंवा आमच्या राष्ट्रास तो प्रथमतः मुसलमानांनी लावलेला नाही – ज्या काळीं हिंदु शब्दाच्या अुत्पत्तीचें नीटसें संशोधन झाले नव्हतें त्या काळची ही दुष्ट दंतकथा ! ती कशी ते खालीं दिलेल्या 'हिंदु' शब्दाच्या ऐतिहासिक उत्पत्तीवरून दिसून येईल.

२) हिंदु, हिंदुस्थान, हिंद या प्राकृत शब्दांचा मूळ अुगम ऋग्वेदकालीन सप्तसिंधु या आपल्या स्वतःच्या प्राचीनतम राष्ट्रीय अभिधेतच आहे –

ऋग्वेदांत 'सप्तसिंधवः' हा शब्द दैशिक आणि राष्ट्रीय अर्थी आपल्या वैदिक कालच्या पूर्वजांनी राष्ट्रीय अभिधा म्हणून स्वतःस लावला आहे.

त्या प्राचीन कालीं आपल्या शेजारचीं इराण, बाबिलोन, प्राचीन अरब प्रभृति राष्ट्रें हीं आपणांस त्या आपल्या 'सप्तसिंधु' याच राष्ट्रीय अभिधेनें ओळखीत. पारसिकांनीं अडीच हजार वर्षांपूर्वीच्या त्यांच्या धर्मग्रंथांत आपल्या राष्ट्रास 'हप्तहिंदु' असेच म्हटलेले आहे. त्या काळच्या प्राचीन बाबिलोनियन ग्रंथांतून आपल्या अिकडून गेलेल्या झिरझिरीत नी सुरेख वस्त्रांना 'सिन्धु' किंवा 'सिन्धच' म्हटलेलें आहे.

अलेक्झांडरचेहि पूर्वी दोनशे वर्षें होअून गेलेला ग्रीक अितिहासकार हेकाटे-ऑस हाही आपल्या प्राचीन राष्ट्रास आपल्या स्वतःच्याच सिन्धु शब्दाचें ग्रीक रूप जें Indu India या नांवानेच अुल्लेखित आहे. बौद्धकालीं हिन्दुस्थानांत येअून गेलेला चिनी प्रवासी ह्युअेनत्संग हाहि आपल्या राष्ट्रास सिन्धु हचा शब्दाचा चिनी अपभ्रंश जो 'शिन्दु' त्याच अभिधेने संबोधिता झाला. फार काय, महंमद पैगंबर जन्मास येण्यापूर्वी आरब लोक जेव्हां शैव नि शाक्त पंथांशी सदृश्य असलेल्या अेका धर्माचे अनुयायी असत आणि जेव्हां मुसलमानी धर्माचें ठावठिकाणदेखील आरबांना ठाअूक नव्हते तेव्हांच्या दोन हजार वर्षांपूर्वीच्या अेका आरब ग्रंथांत आपल्या राष्ट्राविषयीं बोलतांना हिन्द व हिन्दु हीं नावें गौरवाने उच्चारलेलीं आहेत. उदाहरणार्थ लबी बीने अखतफ बीने तुर्कीच्या खालील ओळी पहा :–

।। अया मुबारकल अर्जे यो शैयेनोहा मिनल हिंदे ।।
।। वा अरा दक्कला हो मअीयो नज्जेला जिक्रतुन ।। १
।। व हल्ल तज्जली यतुन बैनक सहवि अरब अतुन जिक्रा ।।
।। व हाजे हिब्बोम लज्जेल्हुर रसूला मिनजा अनल 'हिन्दजुन' ।।

दुसरा आरब कवि; आरबांच्या मुसलमानपूर्व धर्मांचा अभिमानी असा अुमर बीने हाशीम अबुल हकम, महादेवाच्या स्तुतिपर कवितेंत लिहितो :–

।। व अह लोलहा अजरु अरमीमन 'महादेअु' व मनाजेला अिल मुददीने

मिनहुम व सेयतरू ॥ १ ॥ म अस्सेर अखलका न असानन कल्ल हुम यन हुवा नजू मुन अजाअत सुम्मा गाबुल ' हिन्दु ' ॥ २ ॥ व सहबी कया माफिल मका मिल ' हिन्दे ' यौमना यकूलूना लात हुज्ज न फअिन्नकतो वज्जरु ॥ ३ ॥

भविष्यपुराणाचा आधार

येणेंप्रमाणे सिंधुकाठीं निवसणाऱ्या आपल्या वैदिक काळाच्या राष्ट्राची आपली स्वतःची जी अभिधा ' सप्तसिंधु ' तीपासूनच आपली हप्तहिंदु, हिंदु, शिंदु, सिंधु; Indus हीं प्राचीन विशेषनांवें पडलेलीं आहेत. अुच्चार भिन्न पण मूळ शब्द सप्तसिंधु हाच. त्याची अेक साक्ष अद्यापहि जी जशीच्या तशी अुरलेली आहे ती म्हणजे सिंधुकांठच्या आपल्या राष्ट्राच्या अेका प्रांतास तरी आपले स्वतःचें प्राचीनतम सिंधुदेश हेंच नांव अद्यापहि जसेंच्या तसेच राहून गेलेलें आहे.

३) हिंदु, हिंदुस्थान हीं प्राकृत रूपें सप्तसिंधु, सिंधु, सिंधुस्थान हया संस्कृत नि स्वकीय अशा आपल्या प्राचीन अभिधांचींच प्राकृत रूपें होत ही गोष्ट आपल्या पुरातन पंडितवर्गालाहि ठाअूक होती. हयाविषयीं भविष्यपुराणांतील खालील अुल्लेख जितके कौतुकांवह तितकेच अुद्बोधक आहेत. सप्तसिंधूचेंच प्राकृत रूप ' हप्तहिंदु ' हें होय असें त्या पुराणांतील खालील श्लोकांत सांगितले आहे:—

॥ जानुस्थाने जैनशब्दः सप्तसिंधुस्तथैव च ॥ हप्तहिंदुर्यावनीति पुनर्ज्ञेया गुरुण्डिका ॥१॥

पुढे शालिवाहन कुलांतील राजांच्या कथा सांगतांना तें पुराण म्हणतें :—

॥ जित्वा शकान् दुराधर्षान् चीनतार्तरिदेशजान् ॥ बाल्हीकान् कामरूपांश्च रोमजान् खुरजान् शठान् ॥ तेषां कोशान्गृहीत्वा च दंडयोग्यानकारयत् ॥ स्थापिता तेन मर्यादा म्लेंच्छार्याणाम् पृथक्पृथक् ॥ सिंधुस्थानमिती प्राहूराष्ट्रमार्यस्य चोत्तमम् ॥ म्लेंच्छस्थानं परम् सिंधोः कृतं तेन महात्मना ॥

(भविष्यपुराण प्रतिसर्गपर्व, अ. २)

(भावार्थ : बाल्हीक, चीन, तार्तारादिक म्लेंच्छ शत्रूंचें पारिपत्य केल्यानंतर त्या भूपतीनें आपल्या अुत्तम अशा आर्य राष्ट्राची सिंध ही सीमा ठरवली. सिंधूच्या अलिकडील तें आमचें सिंधुस्थान व सिंधुपलिकडील तें म्लेंच्छस्थान होय अशी मर्यादा स्थापली.) अटक अुल्लंघूं नये असा नियम जो प्रचलित झाला तोही याच काळापासून. ' नागन्तव्यं त्वया भूप पैशाचे देशधूर्तके ' या भविष्यपुराणांतील श्लोकांत ही सिंधु ओलांडण्याची बंदी सांगितली आहे.

तिकडे ती सिंधु आणि अिकडे हा सिंधु हे दोनहि अुल्लंघूं नयेत; ते अुल्लंघितांच परदेशगमनाचें निषिद्ध कृत्य घडतें. ही सिंधूबंदीची सहस्त्र दीडसहस्र वर्षांची पुरातन शास्त्राज्ञाहि हेंच दर्शविते की त्या प्राचीन काळापासूनच आपल्या

हचा 'सिंधुस्थानाची' मर्यादा 'आसिंधुसिंधुपर्यंता' हीच समजली जात होती.

४) सप्तसिंध, सिंधुदेश, सिंधुस्थान प्रभृति शब्दांचे 'हिंदु' हें प्राकृत रूपहि आपल्याच प्राकृतीकरणाच्या नियमानुरूप आपल्या प्राकृतांत रूढावलें -- संस्कृत शब्दांतील 'स'चा आपल्या प्राकृतांत विकल्प 'ह' होतो. मारवाडीप्रभृति बोलींत हचाचीं भरपूर उदाहरणें आहेत. जसें केसरी = केहरी; सप्ताह = हप्ता; दश = दहा. अस्मि, असि, स्मः प्रभृतींचीं प्राकृत रूपें ही याचीच प्रत्यंतरें होत. आपल्या प्राकृताप्रमाणेंच पुरातन पारसी हीही संस्कृताचीच अेक प्राकृत भाषा असल्यामुळें अनेक रूपें आपल्याप्रमाणेंच तींतही साधलेलीं सापडतात. अेवढ्याचसाठी तीं रूपें तिकडूनच आलीं असें होत नाही किंवा तेवढ्याचमुळें परकीय ठरत नाहीत. हिंदी-मधील आज जीं अगदी चंदभाटापूर्वीची जुन्यांतील जुनी कविता समजली जाते तींतसुद्धा हिंदुस्थान हा शब्द गौरवानें वापरलेला आहे.

॥ अटल थाट महिपाट अटल तारा गढ थानम् ॥ अटल नगर अजमेर अटल 'हिंदव-अस्थानम्' ॥१॥

'पृथ्वीराज रासा'त पृथ्वीराजाचे समकालीन चंदभाट हचांच्या काव्यांत तर आपल्या राष्ट्राचें 'हिंदु' हे अभिधान अत्यंत अभिमानाने आपलें सारें राष्ट्र मस्तकीं मिरवूं लागलें असल्याचें दृश्य पानोपानी आढळतें ! हिंदुत्वाच्या अभिमानाने रसरसलेलीं हीं चरणें पाहा :-

॥ धनि (धन्य) हिंदु पृथिराज ! जिने रजवट्ट अुजारिय ॥ धनि हिंदु पृथिराज ! बोल कलिमझ्झ अुगारिय ॥१॥ धनि हिंदु पृथिराज ! जेन सुविहानह संध्यो ॥ बारबारह गुहिमुक्की अंतकाल सरबंध्यो ॥२॥ आज भाग चहुवान घर आज भाग हिंदवान ॥ अिन जीवित दिल्लीश्वर गंज न सक्कै आन ॥३॥

'हिन्दु' हा शब्द राष्ट्रीयच

यानंतरच्या काळाविषयीं तर बोलणेंच नको ! आर्यावर्त, भारत प्रभृति यच्यावत् अभिधानांहूनहि 'हिंदु' नि 'हिंदुस्थान' हेच शब्द आमच्या राष्ट्राचे नि राष्ट्रीय जीवनाचे मूर्धाभिषिक्त आदर्श, अभिमान नि अभिधान होऊन बसले. प्रासादापासून पर्णकुटीपर्यंत 'मी हिंदू' ही जाणीव रसरसूं लागली. मी आर्य, मी भारतीय हे न जाणणारे लाखों लोक सांपडले असते पण मी 'हिंदु' ही जाणीव झोपडीझोपडीपर्यंत कोटचानुकोटि हिंदूंत मुरूम गेली. श्रीगुरु गोविंदसिंगानी तिकडे पंजाबात आपले जीवनकार्य स्वतःच्याच शब्दांत जें सांगितलें तें हेंच की; '॥ सकल जगतमें खालसा पंथ गाजें ॥ जगें धर्म 'हिंदु' सकल भंड भाजे ॥' अिकडे महाराष्ट्रीय समर्थांची तळमळ होती तीहि हीच की 'या भूमंडळाचे ठायी। 'हिंदु' ऐसा उरला नाहीं ॥' तेजबहादुरसारख्या सहस्रावधि हुतात्म्यांनी 'हिंदु' शब्द

सोड; नाहीं तर प्राण तरी सोड ! अशी शत्रूची धमकी ऐकताच प्राण सोडले, पण हिंदु हा शब्द सोडला नाही ! लाखों वीरपुरुष अटक ते रामेश्वरापर्यंत या 'हिंदुत्वा'चे मानास्तव पिढ्यानुपिढ्या समरोसमरीं झुंजले, झगडले, रणीं राहिले. पण शेवटी अहिंदूची पादशाही न् पादशाही पायाखाली तुडवून जेव्हां ते हिंदुपदपादशाही स्थापिते झाले तेव्हां साऱ्या राष्ट्रभर विजयदुंदुभींनीं जी ग्वाही फिरवली तीहि हीच कीं, 'बुडाला औरंग्या पापी, 'हिंदुस्थान' बळावलें ॥ अभक्तांचा क्षयो झाला आनंदवनभुवनीं ॥'

५) वर रेखाटलेल्या हिन्दु शब्दाच्या इतिहासावरून हें स्पष्ट होते कीं हिंदु शब्द मूलतः नि मुख्यतः दैशिक नि राष्ट्रीय आहे. कोणत्याहि विशिष्ट धर्ममताचाच काय तो निर्देशक नव्हे :– मूळ सप्तसिंधू हा वेदकालीन शब्दच त्या देशाचा नि त्यांत निवसणाऱ्या राष्ट्राचाच मुख्यतः द्योतक होता. सिंधुदेश हें आपलें त्या बाजूच्या अेका प्रांताचें नांवहि मुख्यतः दैशिक नि राष्ट्रीयच आहे. परकीयांनी आपलें तेंच नांव त्याच अर्थी आपणास लावले.

हिंदुत्व म्हणजे अेक धर्ममत नव्हे

वेद हया धर्म-ग्रंथापासून त्याचे अनुयायांचे नांव वैदिक हें जसें पडलें; बुध्द हया नांवावरून त्या धार्मिक अनुयायांचे नांव जसें बौध्द; जिनमताच्या अनुयायांचे जैन; नानकांच्या धर्मशिष्यांचें नांव जसे शिख; विष्णुदेवतेचे अुपासक, वैष्णव; लिंगपूजक ते जसे लिंगायत; तसें हिंदु हें नाव कोणत्याहि धर्मग्रंथावरून. धर्मसंस्थापकावरून वा धर्ममतावरून मुख्यतः वा मूलतः निघालेलें नसून आसिंधुसिंधु विस्तारलेल्या देशास नि त्यांत निवसणाऱ्या राष्ट्रासच मुख्यतः निर्देशणारें आहे, आणि अनुषंगानें त्याच्या धर्मसंस्कृतींनाहि.

यासाठीच हिंदु शब्दाची व्याख्या कोणत्याहि धर्मग्रंथाशीं वा धर्ममताशींच तेवढी बांधून टाकण्याचे यत्न दिशाभूल करणारे ठरतात. हिंदु शब्दाच्या व्याख्येचा मूल अैतिहासिक पाया आसिंधुसिंधु भारतभूमिका हीच असली पाहिजे. तो देश नि त्यांत निपजलेल्या धर्माच्या नि संस्कृतींच्या बंधनांनी अनुप्राणित झालेलें राष्ट्र हेच हिंदुत्वाचे दोन प्रमुख घटक होत. म्हणूनच हिंदुत्वाची अितिहासाला शक्य तों धरून असलेली व्याख्या अशीच केली पाहिजे की, आसिंधुसिंधु भारत भूमिका ही ज्याची पितृभू नि पुण्यभू आहे तो हिंदु. यांतील पितृभू नि पुण्यभू हया शब्दांचा कोणत्याही व्याख्येंत योजलेल्या शब्दांना असतो तसा, थोडासा पारिभाषिक अर्थ आहे.

पितृभू म्हणजे जींत आपले आजीबाप तेवढेच निपजले ती, असा अर्थ नव्हे; तर प्राचीन कालापासून ज्या भूमींत परंपरेने आपले जातीय नि राष्ट्रीय पूर्वज

निवसत आले ती, असा अर्थ आहे. कांही जण फटकन शंका घेतात कीं, आम्ही दोन पिढ्या आफ्रिकेंत आहोंत, मग आम्ही हिंदु नाहीं कीं काय ? ती शंका यामुळेंच अगदीं अथळ ठरते. आमच्या हिंदूंनी साऱ्या पृथ्वीवर जरी अद्यां वसाहती स्थापल्या तरी त्यांच्या प्राचीन, परंपरागत, जातीय नि राष्ट्रीय पूर्वजांची पितृभू अशी ही भारतभूमीच असणार !

'पुण्यभू'चा अर्थ अिंग्लिश 'Holy land' हचा शब्दांतील अर्थ होय. ज्या भूमींत अेखाद्या धर्माचा संस्थापक ऋषि अवतार वा प्रेषित (पैगंबर) प्रकटला, त्या धर्मास अुपदेशिता झाला, त्याच्या निवासानें त्या भूमीस धर्मक्षेत्राचें पुण्यत्व आले; ती त्या धर्माची पुण्यभू. जशी ज्यूंची वा ख्रिश्चनांची पालेस्टाअिन, मुसलमानांची अरेबिया. अशा अर्थींच हा पुण्यभू शब्द वापरलेला आहे, नुसत्या पवित्रभूमि या अर्थीं नव्हे.

पितृभू नि पुण्यभू शब्दांच्या हचा पारिभाषिक अर्थी, ही आसिंधुसिंधु भारतभूमिका ज्याची ज्याची पितृभूमि आणि पुण्यभूमि आहे तो तो हिंदु !

हिंदुत्वाची ही व्याख्या जितकी ऐतिहासिक तितकीच आजच्या वस्तुस्थितीला अगदी धरून आहे. ती जितकी सत्य तितकीच अिष्ट आहे; जितकी व्यापक तितकीच व्यावर्तकहि आहे.

अपसमजाचें मूळ

हिंदुत्वाची ही व्याख्या जर अगदीं आरंभीच सापडली असती तर शीख, जैन, फार काय आर्यसमाजीसुद्धां जे स्वतःला हिंदु म्हणवून घेण्यास मधूनमधून बिचकत आले ते कधींहि मुळातच बिचकते ना. अिंग्लिशांच्या राजवटीपूर्वी आपल्या साऱ्या पंथोपपंथांना व धर्मसंघांना हिंदुत्वाच्या कक्षेंतच अेकवटावें लागलें होतें – आणि बहुधा तेंच अभिधान आपलें अत्यंत गौरवास्पद कुलभूषण म्हणून आपलें सारें राष्ट्र मिरवीत आलें. किरकोळ अपवाद सोडले असतां मुसलमानांच्या परधर्मद्वेषाने; त्यांना नकळत, आपलें सारें हिंदू राष्ट्र अेकजीव करण्यांत, हिंदुत्वाची जाणीव यच्चयावत् हिंदूंत रसरसवून त्यांना अेकवटण्यांत फारच मोठें साहाय्य केलेलें आहे. हिंदुस्थानातील कोटि कोटि लोकांचे त्या मुसलमान राजवटीनें स्वतःच्याच सोयीसाठीं धर्मवेडाच्या नशेंत दोनच तुकडे काय ते पाडले, हिंदु आणि मुसलमान. जो जो मुसलमान नाही तो तो हिंदु ! ही त्यांची आडदांड व्याख्या ! – पण योगायोगानें तीच अचूक ठरत गेली, आम्हांस हितकारक झाली. कारण त्या योगें (अपवाद वजा जातां) जो जो मुसलमान नव्हता तो तो हिंदुत्वाच्या ध्वजाखालीं येअून अेकवटला. परंतु अिंग्रजी राजवटीपासून हचा बहुसंख्यत्वानें डोईजड झालेल्या हिंदुराष्ट्राच्या अेकवटलेल्या गटांतच फाटाफूट ज्या योगें होईल असे बुद्धिपुरस्सर यत्न विपक्षा-

संबंध ३१९३ ३५१८५ २१७१८९

कडून होऊं लागले. आणि तेव्हांपासून हिंदु नांव ही व्याख्या करण्याचेहि यत्न बुद्धिपुरस्सर आमच्याही लोकनायकांना करावे लागले. त्यावेळी दुर्दैवाने आरंभापासून अेक मोठी दिशाभूल झाली ती ही कीं, हिंदु शब्दाचा संबंध हिंदुधर्माशींच काय तो जोडला जाऊन, **हिंदुत्वाची व्याख्या न करतां, हिंदुधर्माची व्याख्या आम्ही करूं लागलों.** हिंदुत्वाची सर्वांगीण व्याख्या राष्ट्रीय नि सांस्कृतिक न करतां, त्याच्या त्या मुख्य अंगाकडे दुर्लक्ष होऊन, त्याची धार्मिक व्याख्याच जो तो करूं लागला. आणि हिंदुसमाजातील बहुसंख्य लोक अद्यापदेखील वेदानुयायीच असल्यामुळें ती व्याख्या सहाजिकपणेंच, वेदानुयायी तो हिंदु अशी करण्यांत आली; अितकेंच नव्हे तर बहुजनसमाजांत मूर्तिपूजा, शेंडी राखणें, गोपूजन प्रभृति, हिंदूंचे जे अनेक आचार आहेत, त्यांतून ज्याला जें पटेल तेंच हिंदुधर्माचें वैशिष्ट्य असें समजून, तें मानील तो हिंदु अशा अनेकांच्या अनेक व्याख्या पुढें आल्या. पण तो धर्मग्रंथ, धर्मपंथ, धर्ममत न मानणारे पण हिंदुराष्ट्राचे पूर्वापार अंगभूत असणारे अेकेक भाग त्या व्याख्येमुळेंच हिंदुत्वाबाहेर पडूं लागले! हिंदुत्व हे मुळांत हिंदूंमध्ये प्रचलित असलेल्या कोणत्याही धर्ममताहून व्यापकतर असल्यामुळे त्याला बहुसंख्यांकांच्या धर्ममताशीं समानार्थक समजतांच अल्पसंख्यांकांना तो हिंदु शब्द अप्रिय नि अनिष्टही वाटूं लागला.

विपक्षाचा डाव कसा सफल झाला ?

हिंदु शब्दाची व्याख्या कोणी 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त सनातन धर्म' मानणारा तो 'हिंदु' अशी केली कीं, स्मृतिपुराणादिकांना सर्वस्वीं न मानणारे किंवा मुळीच न मानणारे आर्यसमाजीयप्रभृति निव्वळ वैदिक, त्या 'हिंदु' शब्दास त्यागूं पाहत. बरें, हिंदु म्हणजे जो वेदान्तच तेवढे प्रमाण मानतो तो, अशी व्याख्या केली तर आर्यसमाजीय प्रभृति वैदिक तितका त्यायोगें हिंदु ठरे, पण म्हणूनच शीख, जैन, बौध्द प्रभृति वेदप्रामाण्य न मानणारे पण हिंदुराष्ट्राचे रक्ताबीजाचे सख्खे भाऊ भाऊ 'तर मग आम्ही मुळी हिंदु नाहींच' म्हणून निषेधून अुठत. शीख, जैन, बौध्द, आर्यसमाज. ब्रह्मोसमाज, देवसमाज प्रभृति अनेकानेक धर्म वा पंथ मधून-मधून हिंदु शब्दास जे नाकारून अुठले त्याचें मुख्य कारण हेंच होतें कीं, हिंदुत्वाची व्याख्या धार्मिक दृष्टाकोनांतूनच काय ती घडविण्याची दिशाभूल झाली. हिंदुत्व आणि हिंदुधर्म हे दोन्ही शब्द अेकच असें समजलें गेलें. या फाटाफुटीच्या मुख्य कारणांत विपक्षीयांच्या राजकीय कारस्थानांचीहि भर पडली. परिणाम असा होत गेला कीं, हिंदु शब्दाची बुध्दिपुरस्सर व्याख्या जोंवर घडविण्याचा यत्न होत नव्हता तोंवर जे केवळ परंपरागत भावनेनेंच हिंदुराष्ट्रांत प्राचीन कालापासून सर्वस्वीं सामावलेले होतें तें हिंदुत्वाची धर्मनिष्ठ व्याख्या करूं जातांच अेकेक बुध्दिपुरस्सर

रागाने फुटूं लागले– त्यांना फोडण्याचा विपक्षाचा डाव सफलूं लागला.

बहुसंख्यांक अशा वैदिक धर्मासच हिंदुधर्म समजणाऱ्यांनी हिंदु शब्दाची व्याख्या कोणत्याही कुटिल हेतूनें केली नव्हती. संघांतील बहुसंख्यांकांच्या लक्षणासच त्या संघाचें लक्षण स्वभाविकपणेंच बहुधा सर्वत्र समजलें जातें. अतकेंच नव्हे, तर हिंदु राष्ट्रांतून अेकहि हिंदु फुटूं नयें, अुलट तें राष्ट्र अधिक अधिक संघटित व्हावें असाच त्या पूर्वाचार्यांचा, हिंदु शब्दाच्या धर्मनिष्ठ व्याख्या करण्यात सद्हेतु होता. पण विशाभूल न कळत झाली, इच्छेविरुद्ध दुष्परिणाम झाला.

परंतु हिंदुत्वाच्या लेखाच्या या मथळ्यावर दिलेल्या व्याख्येमुळें आतां त्या गैरसमजाचे मूळावरच कु-हाड घातल्यासारखी होते. व्याख्या म्हटली की अखंडांत खंड पाडणें. अगदी भौगोलिक प्रदेशाच्या सीमादेखील अुभयपक्षी सामान्यच राहतात. मुसलमानी धर्मांतहि असे अनेक पंथ आहेत कीं जे मुस्लिम की गैरमुस्लिम हा वाद व्याख्येनें मिटत नाहीं. अुदाहरणार्थ सध्याच पंजाबमध्यें फणफणलेला कादियानी पंथाचा वाद पाहा ! मुस्लिमपणाच्या व्याख्येंत ते सामावत नाहींत म्हणून अेक पक्ष म्हणतो, सामावतात म्हणून दुसरा म्हणतो, मारहाण होण्यापर्यंत पाळी आली आहे. ख्रिस्त्यांतहि तीच स्थिति; मार्मोन पंथियांचे अुदाहरण पाहा. त्याप्रमाणें प्रत्येक व्याख्येचा सीमान्त हा विवादास्पद असतो तसा हया व्याख्येचाही असला तथापि अधिकात अधिक सत्य, हित नि सुलभ अशी आज तरी हिंदुत्वाची तीच अेक व्याख्या उपलब्ध आहे. तिच्यायोगे धर्मविषयक प्रश्नांच्या दुर्लंघ्य दलदलीला साफ बगल देअून हिंदुमात्र तितुका अेकाच हिंदुध्वजाखालीं अेकवटण्याचा राजमार्ग मोकळा करून दिला गेला.

हिंदु कोण नि अहिंदु कोण ?

श्रुतिस्मृतिपुराणोक्त प्रमाण मानतात ते 'सनातनी.' केवळ श्रुति प्रमाण मानतात ते 'वैदिक.' स्वतःच्या धर्मास वैदिक धर्माची शाखा वा विकासहि न मानतां अगदीं स्वतंत्र धर्म मानणारे जैन, शीख, बौध्द (भारतीय बौध्द)प्रभृतीपैकीं कोणालाही त्याची धर्मनिष्ठा लवलेशहि न सोडता हिंदुत्वाच्या व्याख्येप्रमाणें आपण हिंदु आहोंत हें सुखासमाधानाने मानतां येते, किंबहुना नाकारतांच येत नाहीं. त्याचप्रमाणें मुसलमान, ख्रिस्ती, ज्यू प्रभृति जे अहिंदु आहेत ते तसें कां हेहि निर्विवादपणें सांगतां येतें. कसें तें पहा :–

जैन हिंदु कां ? – तर अगदीं वैदिक कालापासून त्यांच्या पितरांची परंपरागत पितृभू ही भारतभूमिका आहे आणि ज्यांच्या तीर्थंकरादिक धर्मगुरूंनीं त्यांचा धर्म हचाच भारतभूमींत प्रकटविल्यामुळे ती त्यांची पुण्यभू–Holy land ही आहेच आहे. हचा अर्थी नि हचा अर्थीच काय ते आपण हिंदु आहोंत हें आमचे

बहुसंख्य जैन बांधव समाधानपूर्वक मानतील. कारण तें ऐतिहासिक सत्य आहे, आणि त्यांच्यापैकीं ज्यांचा असा विश्वास आहे कीं त्यांचा धर्म हा वैदिक धर्माची शाखा नसून अगदीं स्वतंत्र वा अवैदिक आहे त्यांच्या त्या निष्ठेला या व्याख्येमुळें मुळींच धक्का लागत नाहीं. हिंदु म्हणजेच वैदिक असा त्या शब्दाचा चुकीचा अर्थ सहजीं होत होता तेव्हा मात्र तशा स्वतंत्र धर्मवादी जैनांना त्या अर्थी स्वतःस हिंदु म्हणवणें हें विषम वाटणें अपरिहार्य होतें.

शीख हिंदु कां ? – कारण अगदी वैदिक सप्तसिन्धूपैकींच सिंधु ते सरस्वती-पर्यंतच्या आर्यांच्या मूलस्थानांत त्यांचा परंपरागत निवास आजहि असल्यामुळें त्यांची पितृभूमि भारतभूमि आहे आणि त्यांच्या नानकादिक धर्मगुरूंनी तो शीख-धर्म प्रथम हयाच भूमींत प्रकटल्यामुळें, त्यांच्या धर्माचें मूळच हया भूमींत घरलेलें असल्यामुळें, ही भारतभूमि त्यांची पुण्यभूमि आहे, Holy land आहे ! म्हणून शीख हिंदु आहेतच आहेत; मग ते वेद मानोत वा न मानोत. मूर्तिपूजा करोत वा न करोत.

आर्यसमाजीय हिंदु कां ? – तर ते कोणासहि हया पितृभूमीच्या अभिमानांत, ममत्वात हार जाणारे नाहींत आणि हया भारतभूमीला पुण्यभूमित्वाचा मान सर्वांआधीं देतात. ते हिंदु आहेतच आहेत; मग पुराणें नि स्मृत्या मानोत वा न मानोत !

तीच गोष्ट लिंगायत, राधास्वामीय प्रभृति आमच्या यच्चयावत् धर्मांची वा धर्मपंथांची होय. फार काय भिल्ल, संताळ, कोलेरियन प्रभृतींपैकी जे कोणी भूत, प्रेत वा पदार्थपूजक (Animists) असतील त्यांची देखील परंपरागत पितृभू भारतच; आणि त्यांचे पूजापंथहि मुळापासून माहिती मिळते त्या अवधींत तरी याच भारत-भूमीस पुण्यभूहि मानीत आलेले; यास्तव तेहि हिंदुच होत. अशा प्रकारें हिंदु तितका व्याख्येंत सहजी सामावला जातो.

पण मुसलमान-क्रिस्ती-ज्यू हे हिंदु कां नाहींत ? – तर यद्यपि त्यांपैकी कित्येक बाटलेल्यांची परंपरागत पितृभूमि ही भारतभूमिच असली तरी त्यांचे धर्म अरबस्थान, पालेस्टाइन प्रभृति भारतबाह्य देशांत उपजल्यामुळें, ते त्या भारतबाह्य देशांनाच आपली Holy land पुण्यभू मानणार. ही भूमि त्यांची पुण्यभू नाहीं म्हणून ते हिंदु नाहींत.

तसेंच चिनी-जपानी-सयामी प्रभृतिहि पूर्णपणें हिंदु कां नाहींत ? – तर ते धर्माने जरी हिंदु (बौद्ध) असले, म्हणजे भारतभूमि जरी त्यांची पुण्यभू असली तरी भारतभूमि ही त्यांची पितृभू नाहीं त्यांचे आमचे धर्माचें नातें. पण राष्ट्रभाषा वंश, इतिहास प्रभृति सर्वथा भिन्न; त्यांचें आमचें राष्ट्राचें नातें मुळापासूनच नाहीं म्हणून ते हिंदूधर्माचे अंतर्गत असले तरी संपुर्ण हिंदुत्वाचे अधिकारी होऊं शकत

नाहींत. वस्तुस्थितिहि अगदीं तशीच आहे. जपानी, चिनी हे स्वतःस हिंदुधर्माचे अनुयायी बौध्द या नात्याने म्हणवतील पण हिंदु राष्ट्राचे अंगभूत राहाणार नाहींत, अंकित तर म्हणवणार नाहींतच नाहींत. हिंदुधर्मपरिषदेंत ते समानतेने सामावले जाऊं शकतील– पण हिंदुमहासभेत, म्हणजेच आमच्या हिंदुराष्ट्रसभेंत ते सामावं शकणार नाहींत. यांच्या राष्ट्रसभेंत आम्ही सामावूं शकणार नाही. पण वैदिक, शीख, भारतीय बौध्द, जैन, सनातनी प्रभृति आम्ही, हिंदुत्वाचे पूर्णपणें अधिकारी असलेले आम्ही, अेकराष्ट्रीयहि आहोंतच आहोंत, कारण भारतभूमि आमची नुसती पुण्यभूच नसून पितृभूहि आहे.

शुद्धीकृतांचा प्रश्नही ह्या व्याख्येनें तसाच सोडवला जातो; जे पूर्वी हिंदुच होते ते शुद्ध होतांच पूर्णपणें हिंदुत्वाचे अधिकारी होतात. कारण त्यांची पितृभू नि पुण्यभू भारतभूमीच होते. परंतु जे अमेरिकन, अिंग्लिश प्रभृती परराष्ट्रीय, ज्यांची पितृभू भारतभूमी नाही, ते हिंदुधर्म स्वीकारतांच **धर्माने हिंदु होतील, पण राष्ट्रीय** दृष्टया निराळेच राहणारे असल्यामुळें संपूर्ण हिंदुत्वाचे अधिकारी होणार नाहींत, कारण त्यांची पुण्यभू भारतभूमी झाली तरी पितृभू दुसरीच असणार. त्यांच्यांतील जे कोणी शरीरसंबंधाने आमच्याशीं विवाहबद्ध होतील -- म्हणजेच वंश, जाति, राष्ट्र ह्या दृष्टीनें आमच्यात रक्तबीजांनी अेकवटून जातील किंवा हिंदुस्थानचें नागरिकत्व संपादून त्याला पितृभू मानतील ते मात्र पूर्णपणें हिंदुत्वाचे अधिकारी होतील. साऱ्या जगभर हिंदु धर्माचा प्रचार करण्यास ही व्याख्या कोणतीही आडकाठी घालीत नाहीं.

अुपसंहार

अेका लेखाच्या मर्यादेंत शक्य तितक्या विस्ताराने हिंदु शब्दाची फोड करून त्याच्या प्रस्तुतच्या व्याख्येने हिंदु कोण नि अहिंदु कोण हा प्रश्न बहुतांशीं निर्विवादपणें कसा सोडवितां येतो हें दाखविलें. अर्थातच आतां तो हिंदु शब्द त्या सुनिश्चितार्थीच आपण वापरण्याची अतोनात काळजी घेतली पाहिजे. त्याचा प्रयोग योग्य अर्थी कसा नि कां करावा हे वर विशदिल्यामुळे त्याचे अपप्रयोग कसें टाळावें तेंहि अनायसेंच त्यांत दिग्दर्शिले जातें. परंतु तथापिहि त्याचा **अत्यंत आत्मघातक अपप्रयोग** जो आपणांस अगदीं कसोशीनें टाळला पाहिजे तो तेवढा स्वतंत्रपणें उल्लेखिणें भाग आहे. ज्यांना हिंदुसंघटनेची अत्यंत तळमळ आहे अशा पुढाऱ्यांचें तोंडीं, वृत्तपत्रांतून, इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष हिंदुमहासभेतील वाक्पीठावरूनहि 'हिंदु आणि जन,' 'हिंदु आणि शीख,' 'हिंदूंची अस्पृश्यांना सहानुभूति' असे शब्दप्रयोग केवळ पूर्वापार संवयीमुळे झटकन् योजलेले आढळतात. वाक्यें अशी असावयास पाहिजेत कीं 'स्पृश्यांनीं अस्पृश्यांना देवळें उघडावी.' हिंदूंनी अस्पृश्यांना

उघडावीं हा अपप्रयोग होय; कारण दोघेही हिंदूच ! 'शिखांना शीखेतर हिंदूंची सहानुभूति आहे; पंजाबांत वैदिक नि शीख हयांनी अेकजुटीनें मुसलमानी आक्रमणास प्रतिकारावें' अशी वाक्यें पाहिजेत. शीखांना हिंदूंची सहानुभूति आहे; शीखांनी आणि हिंदूंनी मुसलमानांस प्रतिकारावें; हे घातक उपप्रयोग होत. **कारण त्यांत जें सिद्ध करावयाचें तेंच असिद्ध होतें**; शीख नि हिंदु हे पृथक् होत, शीख हिंदु नाहींत, हे नको तेंच सूचित होतें. फार काय, वृत्तपत्रांतून अशीं वाक्यें देखील येतात कीं, 'जैनांना आम्हां हिंदूंची अशी विनंती आहे कीं, त्यांनी आपण हिंदु नाही असा दुराग्रह धरूं नये !' हया वाक्यातून वदतोव्याघाताचें उदाहरण तें दुसरें काय द्यावें ! जुन्या सवयीनें गंजलेल्या लेखण्या आतां आम्ही फेकून दिल्या पाहिजेत. हिंदु हा शब्द वैदिक वा सनातनी अशा कोणत्याहि पाक्षिक अर्थी न वापरता तो त्याच्या स्वतंत्र, व्यापक नि निश्चितार्थीच वापरावा. कालच्याच दैनिकांत प्राहा; 'हिंदु व शीख हे दोनहि समाज जिन्हांशी चर्चा करीत आहेत' अशीं वाक्यें किती घातक आहेत बरें ? पण ती प्रत्यहीं वापरण्यांत येतात ! धार्मिक दृष्टीच्या पोटभेदांस व्यक्तविणें तर जैन, शीख, वैदिक, आर्य, सनातनी हे तदर्थक विशिष्ट शब्द योजावेत. हिंदु नि आर्यसमाजी असे न म्हणतां सनातनी नि आर्यसमाजी म्हणावें.

हिंदुत्वाची व्याख्या सरकारांतही नोंदवून घ्यावी

त्याचप्रमाणे आपल्या लहरीसरशी शिरगणपतीमध्ये वाटेल त्यास 'हिंदु विभागातून' फोडून वाटेल त्यास निराळें नोंदण्याचा सरकारी प्रघात, हिंदुत्वाची आपली कोणतीहि निश्चित व्याख्या नव्हती म्हणून जो अितका बळावला त्याला आळा घालण्यासाठीं ही सत्य, सोपी आणि आतां पुष्कळ संस्थांनी मानलेली हिंदुत्वाची व्याख्याच आम्ही अेकमुखानें पुढें करावी आणि येत्या शिरगणतीचें आधी ती नोंदवून घ्यावी, म्हणजे तुमची व्याख्याच नाहीं हें निमित्त तरी कोणास सांगता येणार नाही.

प्रत्येक हिंदूला हे तोंडपाठ झालें पाहिजे कीं आसिंधुसिंधु भारतभूमिका ही ज्याची ज्याची पितृभू नि पुण्यभू आहे तो तो हिंदु ! संध्येसारखा हा मंत्र आमच्या मुलांकडून प्रातःस्मरणांत जपवला पाहिजे कीं :

।। आसिंधु-सिंधुपर्यन्ता यस्य भारतभूमिका ।।
।। पितृभूः पुण्यभूश्चैव स वै हिंदुरिति स्मृतः ।।१।।

[हिंदुत्वाचे पंचप्राण : हिंदत्वाची व्याख्या आणि हिंदु शब्दाचा सत्प्रयोग आणि अपप्रयोग. पृष्ठें १ ते १३.]

सात स्वदेशी बेड्या

तस्मान्न गोऽश्ववत् कश्चिज्जातिभेदोऽस्ति देहिनाम् ।
कार्यभेदनिमित्तेन संकेतः कृत्रिमः कृतः ॥१॥

– भविष्यपुराण अ. ४०

नव्या जुन्या मतांच्या अनेक लोकांकडून वारंवार असें विचारण्यात येतें की, अहो हुचा तुमच्या जन्मजात जातिभेदोच्छेदक आंदोलनाचे घटक तरी कोणचे, कार्य करायचे तरी काय हचा जाति मोडायला, जाति मोडणे म्हणजे तरी नक्की काय, मोडणें नि काय ठेंवणें, सूत्र काय, कार्यक्रम काय ?

अशा अगदी योग्य, सहज नि अपरिहार्य शंकांचे वा आक्षेपांचे समाधनार्थ हचा लेखात आम्ही आज आपल्या हिंदुराष्ट्रास छिन्नविछिन्न करून टाकण्यास कारणीभूत झालेल्या आणि होणाऱ्या या आजच्या पोथीजात जातिभेदास अुच्छेदिण्यास्तव आपण हिंदूंनी जें आंदोलन केलें पाहिजे. जी अेक सामाजिक क्रांति घडवून आणली पाहिजे, तिची मुख्य सूत्रे नि कार्यक्रम यांची केवळ रूपरेखा 'निर्भीड'च्या वाचकवृंदासाठी देत आहोंत.

अ) आज आपल्या हिंदूंत जो जन्मजात म्हणून म्हणविला जातो तो जातिभेद निव्वळ पोथीजात आहे. मद्रासी ब्राह्मणापेक्षां महाराष्ट्रीय चांभार गोरे असतात. महारांत चोखामेळ्यासारखे संत नि डॉ. आंबेडकरांसारखे विद्वान निपजतात, तर

अुत्तर हिंदुस्थानातील शेकडो ब्राह्मण पिढीजात शेतकीचा धंदा करता करता निरक्षरचे निरक्षरच रहातात. ब्राह्मण शिप्यांचीं, सोनारांचीं, कातडयाचे बूट विकण्याचीं दुकानें चालवितात, तर शिंपी-सोनार-वाण्यांत आय. सी. अेस्., अेम्. अे. पदवीधर होतात. जाट लोकांस राजपूत अजूनही अितके हीनजाति मानतात की जाटांने क्षत्रियाचा घोडयावर बसण्याचा हक्क छिनाबल्यास जातिबहिष्कार्य पाप समजून हाणमार होते; पण त्याच जाटांची शेकडा पन्नासावर भरती होअून जो शीख समाज बनला तो आज क्षत्रियांतील तिखट क्षत्रिय म्हणून गाजत आहे; पठाणांसारख्यांची रग रजपुतांनी कधीही जिरवली नाही अशी जिरवून काश्मीर-काबूलपर्यंत राज्यें तो चालवून राहिला आहे. जाटच नव्हेच तर पंजाबांतील अनेक खालच्या शूद्रवर्गीय जातींतूनही हजारो लोक शीख समाजांत शिरले आणि सिंग-'सिंह' झाले ! शीख समाजात निदान तत्त्वतः तरी जातपात नाही. तरीही आमच्या 'छापा'च्या क्षत्रियांहून त्यांचे बळ, तेज, नि पराक्रम कमी नाही. कायस्थ, 'शूद्र' पण बंगल्यातील विवेकानंद, अरविंद, सारे पाल, घोष, बोस कायस्थ; बुद्धींत, विद्येंत बंगाली ब्राह्मणांच्या रेसभर पुढेंच ! पानपतचा सेनानी भाअू ब्राह्मण, 'यातिशूद्र वंश' तुकाराम परमसंत. या सर्व प्रतिपदींच्या अखंडित पुराव्यावरून हे सिद्ध होत आहे कीं, पूर्वी पांच हजार वर्षांचे आधी काय होतें नि नव्हतें, तें असो वा नसो, आज ज्या जाति विभिन्न म्हणून मानल्या जातात त्यांत वर्ण वा गुण वा कर्म हयांच्या कसोटींत संभवः असा कोणाचाही ठाम 'जन्मजात' भेद आढळत नाही. त्या जाति 'जन्मजात' नसून आज निव्वळ 'पोथीजात' काय त्या झालेल्या आहेत. कोणतीही जन्मजात खरीखरी अशी विशिष्ट अुच्चता अंगी नसताही पोथीने 'अुच्चजात' म्हणून अेक जुनाट पार ठोकलेल्या घरात जन्मला म्हणून हा ब्राह्मण, हा क्षत्रिय ! ही वस्तुस्थिती यथार्थपणें व्यक्तविण्यास्तव आम्ही 'पोथीजात' हा शब्द बनविला, आजचा जातिभेद हा जन्मजात म्हणविला जात असला तरी तो जन्मजात नसून आहे निव्वळ पोथीजात ! -निव्वळ मानीव खोटा !

आ) यास्तवच कोणचीही जात वा व्यक्ति केवळ अमक्या पोथीजात गटात गणली वा जन्मली अेवढयाचसाठी अुच्च वा नीच मानली जाऊ नयें. ज्याची त्याची योग्यता त्याच्या त्याच्या प्रकट गुणांवरूनच काय ती ठरविली जावी. आणि त्या स्वभावाचा गुणविकास होण्याची नि करण्याची संधी सर्वांस समतेने दिली जावी. गुणविकासाचा आनुवंश (Heredity) हा अेकच घटक नसून परिस्थिती (Environment) हाही एक महत्त्वाचा घटक आहे, अमक्याचा पडपणजा बुद्धिमान् व शूद्र होता म्हणूनच त्याचा पडपणतू, प्रत्यक्षपणें मूर्ख वा भ्याड असताही, तो बुद्धिमान वा शूर असलाच पाहिजे असें गृहीत धरून त्यास, पंतप्रधान व सरसेनापति नेमीत रहाणारे राष्ट्र धुळीस मिळालेंच पाहिजे. मोटारीत बसायचे तर त्या मोटार हाक्यास मोटारीचें प्रमाणपत्र मिळालें आहे का हेंच विचारले पाहिजे. त्याच्या पण-

ज्याला मोटार हाकता येत होती म्हणूनच केवळ, आनुवंशाने तो मोटारहाक्या असलाच पाहिजे असें गृहीत धरून नि त्या मनुष्यास मोटार हाकण्याची कला स्वतः प्रत्यक्षपणे येत नसताही त्याला मोटारीवर हाकण्यास बसवून तीत प्रवासास निघणें हा जसा आत्मघातक मूर्खपणा आहे, तसाच अमक्या पोथीजात जातीत जन्मला म्हणून अमुक अुच्च नीच मानणें आणि त्याला त्याला ते ते जन्मजात विशिष्टाधिकार देणें हाही राष्ट्रघातक मूर्खपणा आहे. प्रकट गुणावरून आनुवंश अनुमानला जावा. केवळ मानीव आनुवंशावरूनच गुण गृहीत धरला जाऊ नये.

(ख) मनुष्यकृत, परिवर्तनीय नि प्रसंगीं परस्परविरोधी ग्रंथांत काय सांगितलें आहे त्यावरूनच काय ती कोणतीही सुधारणा योग्य कीं अयोग्य हें ठरवीत न बसतां 'ती विशिष्ट सुधारणा त्या विशिष्ट परिस्थितींत राष्ट्रधारणास हितकारक आहे कीं नाहीं' हें प्रत्यक्ष प्रमाणच काय तें विचारात घेतलें जावें, आणि परिस्थिति बदलेल तसे निर्बंधही (कायदेही) बेधडक बदलीत जावें.

अु) हचा जुन्या धर्मग्रंथांतील काही किंवा सारे निर्बंध वा विचार आजच्या परिस्थितींत जरी त्याज्य वाटले तरीदेखील मागच्या त्या त्या परिस्थितींत राष्ट्रधारणाचें अुपयुक्त कार्य करण्यास त्यांपैकीं कित्येक आचार नि विचार कारणीभूत झाले असल्यामुळें, ती राष्ट्रीय ग्रंथसंपत्ती आम्ही ऐतिहासिक कृतज्ञतेने नि साभिमान ममत्वाने आदरणीय नि संरक्षणीय मानली पाहिजे. अितकेंच नव्हे तर जगांतील त्या काळच्या राष्ट्रांशी तुलना केली असतां आमच्या राष्ट्रानें संपत्तीचें, सामर्थ्याचें नि संस्कृतीचें अत्युच्च शिखर जें गाठलें त्या आमच्या राष्ट्रीय पराक्रमाचें नि यशाचें हे श्रुतिस्मृतिपुराणेतिहास प्रभृति प्रचंड संस्कृत वाङ्मय अेखाद्या हिमालयासारखें मूर्तिमंत स्मारकच असल्यानें त्यास त्या दृष्टीने आम्ही पूज्य नि पवित्रही मानलें पाहिजे.

(अे) अेतदर्थ आपल्या श्रुतिस्मृतिप्रभृतिमागील सर्व शास्त्रांचा अगाध अनुभव नि विविध प्रयोग यांचे तात्पर्य जमेस धरून परंतु त्यांच्या बेडया पायांत ठोकून न घेतां या पोथीजात जातिभेदास तोडण्यासाठीं आजच्या परिस्थितीच्या विज्ञानाच्या कसोटीस अुतरतील त्या समाजसुधारणा आपण तत्काळ घडवून आणल्या पाहिजेत. अमक्या सुधारणेस 'शास्त्राधार' आहे का? हा प्रश्न दुय्यम. आपल्या हिंदुराष्ट्राच्या संघटनास नि अभ्युदयास अमकी सुधारणा आजच्या परिस्थितींत अवश्य आहे ना? — हा प्रश्न मुख्य; मग त्यास शास्त्राधार असो वा नसो. मागील भूतकालाचा राष्ट्रीय अनुभव ध्यानीं घेतां नि शक्यतों भविष्यकालाच्या क्षितिजाची छाननी करतां, आजच्या परिस्थितींत विज्ञानाच्या कसोटीस अुतरतील त्या त्या समाजसुधारणा आपण तत्काळ घडवून आणल्या पाहिजेत. ज्या अर्थी या पोथीजात जातिभेदाने आपल्या हिंदुराष्ट्राची हानिच हानि होत आहे, त्या अर्थी या पोथीजात जातिभेदाने मंदिरांतून, मार्गांतून, घरांतून–दारांतून, नोकऱ्यां-

तून, ग्रामसंस्थांतून, नगरसंस्थांतून, विधिमंडळांतून, विधिसमितींतून (कौन्सिलांतून, असेंब्लीतून) हिंदुजातीचीं शकलें अुडवून, आपसांत कलहच कलह माजवून, अहिंदु आक्रमणास तोंड देण्याची संघटित शक्ती हिंदुराष्ट्रांत अुत्पन्न होणेंच दुर्घट करून सोडलें आहे; आणि ज्याअर्थी या कुजलेल्या पोथीजात जातिभेदापासून जे कोणते लाभ आजही होत आहेतसें वाटतें, ते अेरवीं होणाऱ्या अमर्यादित राष्ट्रीय प्रगतीच्या मानानें अगदी तुच्छ आहेत, त्याअर्थी हा पोथीजात जातिभेद आमूलाग्र अुच्छेदिणें हेंच आजच्या आपल्या खऱ्या हिंदुराष्ट्राच्या अुद्धाराचें अेक अपरिहार्य साधन होअून बसलेलें आहे. सारा युरोप, सारी अमेरिका, या पोथीजात जातिभेदाच्या व्याधीपासून मुक्त असतांही किंवा मुक्त आहे म्हणूनच अेकसारखी समर्थ, स्वतंत्र, सबल अशी भरभराट पावत आहे. आणि आम्ही त्यास कवटाळून बसलों आहोंत म्हणूनच, अेकसारखे विघटित, परतंत्र, दुर्बल होत चाललो आहोंत ! यावरूनही राष्ट्रीय बलसंवर्धनास नि अभ्युदयास त्या व्याधीची अपरिहार्य आवश्यकता नसून अुलट आडकाठीच येते हें अुघड आहे. यास्तव मागचे शास्त्राधार असोत वा नसोत, आजची आवश्यकता म्हणूनच हा पोथीजात जातिभेद अजिबात अुच्चाटिलाच पाहिजे.

सात स्वदेशी शृंखला

तो अुच्चाटिण्यास्तव आपल्याला सात बेड्या तोडल्या पाहिजेत. आपल्या राष्ट्राच्या पायांत ज्या बाहच विदेशी आपत्तींच्या बेड्या आहेत त्या तोडण्याचें सामर्थ्य हव्या आपल्या पायांत आपणच हौशीनें, धर्म म्हणून ठोकून घेतलेल्या 'स्वदेशी' बेड्या तोडल्यानें अधिक संचरणारें आहे. त्यांतही हव्या सात स्वदेशी बेड्या तोडणें हें सर्वस्वी आपल्या स्वतःच्याच हातीं आहे. 'तूट' म्हटलें की त्या तुटणाऱ्या आहेत. हव्या पायांत आहेत तोंवर आपणांस चालतां चढतां ठोकरीमागून ठोकरी खाण्यास विपक्षाला लावता येतें. पण आपण त्या तोडून टाकूं निघालों तर त्या बळेंच आपल्या पायांत डांबून टाकण्याचें सामर्थ्य मात्र विपक्षांत नाहीं. अस्पृश्यता आम्ही ठेवीत आहोंत तोंवर आमच्या हिंदुराष्ट्रांत स्पृश्य नि अस्पृश्य हे भेद विकोपास नेअून जातवार प्रतिनिधित्व देअून परस्पर कलह पेटवून राष्ट्रशक्तींची शकलें विपक्षीय अुडविणारच. पण जर आम्ही, जें बोट कुत्र्यास विटाळ न मानतां लावतों, तेंच आपल्या स्वतःच्या बीजाच्या, धर्माच्या, राष्ट्राच्या सहोदरांस, त्या अस्पृश्यांना लावून हव्या अत्यंत सोप्या युक्तीनें ती अस्पृश्यताच काढून टाकली नि स्पर्शबंदीची बेडी तोडून टाकली, तर ते तीन-चार कोटी धर्मबंधु आपणांपासून कोणचा विपक्ष विलगवू शकेल ? स्पृश्य-अस्पृश्य हा एक विघटक विभाग तरी

चुटकीसारखा बोट लागताच नामशेष होऊं शकेल. तीच गोष्ट अितर विघटक व्यादींची होय !

जातीभेद मोडण्यासाठीं दुसरें कांहीं करावयास नको

हया सात बेडया तोडल्या पाहिजेत. पण त्या बेडया आपल्या आपणच आपल्या पायांत ठोकून घेत आलों आहोंत – कोण्या विदेशीय शक्तीनें त्या ठोकलेल्या नाहींत. तसें असतें तर त्या तोडणें कठीण गेले असतें. पण त्या आपणच केवळ हौशीनें पायांत वागवीत आहोंत. म्हणून तर त्यांस ' स्वदेशी ' बेडया म्हणावयाचें. ती हौस आपण सोडली की त्या तुटल्याच. ज्याने त्याने आपापल्यापुरता तरी ' मी खालील सात बेडया माझ्या राष्ट्राच्या पायांतून तोडून टाकीन ' अितका निर्धार केला आणि त्या निर्धाराप्रमाणें आपापल्या व्यवहारांत या सात बेडया नुमानल्या नाहीं कीं झालें ! पोथीजात जातिभेद अेक मनाचा रोग आहे. मनाने तो मानला नाही की झटकन् बरा होतो. ज्या सात स्वदेशी बेडया तोडतांच हया पोथीजात जातिभेदाच्या व्यादीपासून, भूतबाधेपासून, हें हिंदुराष्ट्र मुक्त होऊं शकतें त्या सात बेडया अशा :–

१) **वेदोक्तबंदी**– ही पहिली बेडी तोडली पाहिजे. सर्व हिंदुमात्रांस वेदादिक यच्चयावत् धर्मग्रंथांवर समान हक्क असला पाहिजे. वेदांचे अध्ययन व वेदोक्त संस्कार ज्यास अिच्छा होअील त्यास करता आले पाहिजे. म्लेंच्छ लोक जर वेद वाचतात तर स्वत:च्या क्षत्रियादिक धर्मबंधूंनासुद्धा वेदाचा अधिकार नाही असें म्हणणारी भटबाजी यापुढे चालता कामा नये. तशीच क्षत्रियादिक ' स्पृश्यांची ' ' अस्पृश्यांवर ' चालणारी दंडेबाजी बंद झाली पाहिजे. अुलट वेदादि ग्रंथ मनुष्यमात्राला अुघडे करून आध्रुवध्रुव वैदिक अध्ययन चालू करण्यांतच ' वैदिक ' धर्माचा धार्मिक दृष्टीनें देखील खरा विजय आहे !

२) **व्यवसायबंदी**– ही दुसरी बेडी तोडली पाहिजे ! ज्या व्यक्तीस जो व्यवसाय करण्याची धमक नि अिच्छा असेल त्यास तो करता आला पाहिजे. अमक्या पोथीजात जातींत जन्मला म्हणून त्याने अमका धंदा केलाच पाहिजे, नाहीं तर तें जातिबहिष्कार्य पाप होय अशी सक्ती चालता कामा नये. चढाओढीची भीति नसली की जन्मानेंच पटकावले जाणारे राखीव धंदे नि कार्यें ते ते वर्ग योग्य दक्षतेनें पार पाडीतासे होतात. जसे भट, पुजारी, भंगी, राजे प्रभृति. यापुढें पुरोहितही पौरोहित्यास योग्य ती विद्या नि परीक्षा पारंगतेल, तर वाटेल त्या जातीचा असला तरी चालला पाहिजे. जो भट-कामाची परीक्षा अुतरेल तो भट, जो भंगी-कामाची अुतरेल तो भंगी. समाजोपयोगी सारे धंदे निर्दोष आहेत. आज व्यवसायबंदी तुट-

लेलीच आहे. केवळ भट नि भंगी हें मात्र मुख्यत्वें जातिबद्ध धंदे आहेत. तीही बंदी तुटली पाहिजे. व्यवसाय हे जातीच्या मानीव योग्यतेवर न ठेवतां त्या त्या व्यक्तीच्या प्रकट गुणांवरच सोपविले म्हणजे योग्य मनुष्य योग्य कामीं लागून राष्ट्रकार्ये अधिक दक्षतेनें पार पाडण्याचा अधिक संभव असतो. डॉ. आंबेडकर महार म्हणून जर त्यांना म्हाराचें ढोरें ओढण्याचेंच काम करणें भाग पाडलें असतें तर आपलें राष्ट्र अेका अुत्कृष्ट निर्बंधपंडिताला नि राज्यकारणधुरंधराला आंचवलें असतें. अुलटपक्षीं ज्या भटाची वा मराठ्यादिक स्पृश्याची योग्यता ढोरें ओढण्याचीच त्याला पुरोहित वा सैनिक नेमणें म्हणजे त्या कार्याची धुळधाण अुडविण्यासारखेंच होतें. राष्ट्रीय शक्तीचा मितव्यय नि क्षमता वाढविण्याचें अुत्कृष्ट म्हणजे ज्याच्या त्याच्या प्रकट गुणानुरूप ज्याचे त्याचेकडे तें काम सोपविणें हेंच साधन होय. आजच्या चांभाराचा मुलगा गुणोत्कर्षाने अुद्या मुख्य प्रधान होऊ शकेल; जसा स्टॅलिन रशियाचा झाला. अुलट आजच्या मुख्य प्रधानाचा मुलगा अुद्या चामड्यांचा मोठा कारखाना चालवू शकेल – चांभार होअील.

३) **स्पर्शबंदी** – ही तिसरी बेडी तोडून जन्मजात अस्पृश्यतेचें समूळ अुच्चाटन झालें पाहिजे. विटाळ केवळ त्याच स्पर्शाचा मानावा की ज्यायोगें आरोग्यास हानि पोचते. सोवळें तें कीं जें वैद्यकाच्या प्रत्यक्ष नि प्रयोगसिद्ध पुराव्यानें आरोग्यासाठीं आवश्यक आहे, नुसतें अमक्या पोथींत अमुक शिवूं नये, अमक्याचा विटाळ मानावा असें सांगितलें आहे म्हणूनच काय ते वैज्ञानिक पुरावा त्यास समर्थीत नसतांही विटाळ विटाळ म्हणून प्रतिपदीं ओरडणाऱ्या धार्मिक कोलाहलास जुमानूं नये; अस्पृश्य जातीची अस्पृश्यता ही तर निव्वळ मानीव, पोथीजात, माणुसकीचा कलंक. ती तर तत्काळ नष्ट झाली पाहिजे. हुषा अेका सुधारणेसरशी कोटिकोटि हिंदुबांधव आपल्या राष्ट्रात अेकजीव होअून सामावले जातील. आपल्या गोटांत अितके अेकनिष्ठ सैनिक वाढून हिंदुराष्ट्राच्या चढाअींत नि लढाअींत झुंजू लागतील.

४) **सिंधुबंदी**– ही चौथी बेडी तोडून परदेशगमनाची अटक साफ काढून टाकावी. परदेशगमन जातिबहिष्कार्य पाप ठरविण्याची अवदसा ज्या दिवशीं वा ज्या कालीं आम्हांस आठवली त्या कालीं आमचें हिंदुराष्ट्र मेक्सिकोपासून मिसरपर्यंत पसरलेल्या आपल्या जागतिक हिंदुसाम्राज्यास आंचवलें. परदेशीय व्यापार ठार बुडाला, नाविक बळ बुडालें; परदेशीय शत्रूंच्या मुळावरच, ते सिंधु ओलांडून अिकडे स्वाऱ्या करण्याअितके बलवत्तर होण्याच्या आधींच, तिकडे जाअून कुऱ्हाड घालणें अशक्य झालें, परदेशीय विद्यांचे संजीवनीहरण दुर्घट झालें. आजही जें लक्षावधि हिंदु लोक देशोदेशीं वस्ती करून आहेत, त्यांच्याशी संबंध अभंग न ठेवला तर हिंदुसंस्कृति नि हिंदुधर्म यांची बळकट बंधने तुटून तेही आपणांस अंतरतील नि अहिंदूंच्या पोटांत गडप होअून विपक्षांचें बळ वाढवतील. हजारों धर्मोपदेशक, हिंदु संघटक, हिंदु व्यापारी, योध्दे, विद्यार्थी यांचे तांडेच्या

तांडे परदेशात आले, गेले, वसले पाहिजेत.

५) शुद्धिबंदी– ही पांचवी बेडी तोडून पूर्वी परधर्मांत गेलेल्या किंवा जन्मतःच परधर्मी असलेल्या अहिंदूंना हिंदुधर्मांत घेतां आलें पाहिजे. अितकेंच नव्हे तर त्यास हिंदुराष्ट्रांत ममतेनें नि समानतेनें संव्यवहार करून आत्मसात करून सोडलें पाहिजे. मुसलमान-ख्रिश्चनांत हिंदु स्त्रीपुरुष बाटून जाताच जसा पाण्यासारखे मिसळून जातो तसें आपण शुध्दीकृतांना समाजांत आत्मसात् करून सोडू तर अेका दहा वीस वर्षांचे आंत अेक कोटी अहिंदु लोक तरी शुध्द होअून हिंदुधर्मांत येअूं शकतील. ही गोष्ट वसअी, राजपुताना, आसाम, कान्हदेश, बंगाल प्रभृति ठिकाणीं शुध्दिकार्य करणाऱ्या थोर थोर कार्यकर्त्यांनी वारंवार सांगितली आहे. मंदिरबंदी, रोटीबंदी, बेटीबंदीच्या अडसरामुळेंच त्या परमधर्मांत अडकलेल्या हिंदूंच्या मनांत असतांही अहिंदूंच्या गोटांतून फुटून अेवढे मोठें संख्याबळ आपल्या शिबिरांत येअूं शकत नाहीं.

६) रोटीबंदी– यासाठींच रोटींबंदीची सहावी बंदीही तत्काळ तोडली पाहिजे. किंबहुना ही अेक बेडी तोडली, खाण्यानें जातच जाते, धर्म बुडतो, ही अत्यंत खुळचट, राष्ट्रघातक नि मळमळी भावना सोडून दिली, म्हणजे बाकीच्या वरील सर्व बेड्या अेकदमच तुटल्या जातात. कारण ह्या रोटीबंदीच्या पायींच कोट्यावधि हिंदु लोकांना, दुष्काळांत मिशनऱ्यांच्या हातांनी खाल्लें म्हणून, घरावर गोमांसाचा तुकडा फेकला म्हणून, मुसलमानांनीं बळेंच दंग्यांत, शेकडों लोकांच्या तोंडात अन्न कोंबलें म्हणून, जो तो हिंदु बाटले ! बाटले ! म्हणून बहिष्कारता झाला. वंशपरंपरा हिंदुत्वास ते कोटि कोटि लोक मुकले !! शुध्दिबंदी, सिंधुबंदी हीं ह्या रोटीबंदीचींच राक्षसी अपत्यें होत ! अशी ही रोटीबंदीची व्याद सहभोजनाच्या टोल्यासरशी हाणून पाडलीच पाहिजे. खाणेंपिणें हा वैद्यशास्त्राचा प्रश्न. वैद्यकशास्त्राच्या दृष्टीने जें आरोग्य देतें तें तें, वैद्यक दृष्टीने भोज्यान्न अशा कोणत्याही मनुष्याबरोबर खाण्यास व पिण्यास हरकत नाही, त्याने जात जात नाही. धर्म बुडत नाही. जात ही रक्तबीजांत असते. भाताच्या पातेल्यांत नव्हे ! धर्माचें स्थान हृदय, पोट नव्हे !! जें रुचेल नि पचेल तें जगांत कोणचेंही, कुठेंही नि कुणाबरोबरही खुशाल खा. मुसलमानाबरोबर हिंदु जेवल्यानें हिंदूंचाच कां मुसलमान व्हावा ? मुसलमानाचा हिंदु कां होअू नये ? साऱ्या जगानें हिंदूंचे अन्न खाअून टाकलें. ते ' बाटले ' नाहीत, हिंदु होत नाहीत !! म्हणून आता यापुढे तरी त्याच न्यायें हिंदूंनो, आपलें अन्न वाचवा ! आता पराक्रमें जिंकून जगाचे अन्न खा नि हिंदूंचे हिंदुही रहा !! तर आता जगाल !!

७) बेटीबंदी– हिंदुराष्ट्राचीं शकलें शकलें पाडण्यास कारण झालेली ही सातवी स्वदेशी बेडी आहे. ही बेटीबंदीहीं तोडून टाकली पाहिजे, म्हणजे प्रयेक ब्राह्मण-मराठ्याच्या वधूनें वा वराने महारमांग वराशीं वा वधूशींच लग्न केलें

पाहिजे असा हचाचा विपर्यस्त अर्थ नव्हे ! तर गुण, शील, प्रीति हचांही अनुरूप असेल तर नि सृजनदृष्टचा अुन्नततर संततीस बाध येत नसेल तर वाटेल त्या हिंदुजातीच्या वरवधूशीं विवाहबद्ध होण्यास जन्मजात जातीची अशी कोणतीही आडकाठी नसावी. असा विवाह बहिष्कार्य न मानतां हिंदुसमाजांत तें दांपत्य पूर्णपणें संव्यवहार्य समजलें जावें. पण अहिंदूंशी विवाह करणें तर मात्र, प्रस्तुत परिस्थितींत, त्या अहिंदु व्यक्तीस हिंदु करून घेतल्यानंतरच काय तो विवाह व्हावा ही मर्यादा मात्र हिंदुराष्ट्राचे हितार्थ आज अपरिहार्य आहे. जोंवर मुसलमान मुसलमानच राहूं अिच्छितात, ख्रिती ख्रिस्ती, पारशी पारशी, ज्यू ज्यू तोंवर हिंदूनेंही हिंदूच रहाणें भाग आहे, अुचित आहे, अिष्ट आहे. ज्या दिवशी तें विधर्मीय गट आपलीं आकुंचित कुंपणें तोडून अेकाच मानवधर्मांत वा मानवराष्ट्रांत समरस होण्यास समानतेने सिद्ध होतील त्या दिवशीं हिंदुराष्ट्रही त्याच मानव धर्माच्या ध्वजाखाली मनुष्यमात्रांशी समरस होअील, किंबहुना असा 'मानव' धर्म हीच हिंदुधर्माची परिसीमा नि परिपूर्णता मानलेली आहे.

वरील सात 'स्वदेशी' बेडचा – म्हणजे आपणच ज्या आपल्या पायांत हौशीनें ठोकून घेतल्या आणि ज्या तोडणें आजही आपल्याच हातीं आहे, त्या तेवढचा तोडल्या कीं हचा पोथीजात जातिभेदाचा विषारी दात तेवढा तरी अुपटून काढला गेलाच म्हणून समजा. प्रकट गुण अंगीं नसतां, केवळ जातवार जन्मावारीच काय ते, विशिष्ट अधिकार वा विशिष्ट हानि कोणाच्याही वाटचास आली नाही म्हणजे झालें. मंग हीं जातींचीं नावें अुपनांवांप्रमाणेंच वा गोत्रांप्रमाणे आपापल्या घरकुल्यातून आणखी कांहीं काल चालत आलीं तरी राहोत !

हचा पोथीजात जातिभेदाच्या प्राणघातक विळख्यांना तोडून फोडून अेकदां का आपल्या हिंदुराष्ट्राच्या संघटित सामर्थ्याचे हातपाय मोकळे झाले म्हणजें ज्या बाहच आपत्तीनें, ज्या विदेशी बेडचांनीं, आज आपणांस चीत केलें आहे, डांबून टाकलें आहे, त्या संकटाशींही अुलट खाअून पुन्हा अेकदा टक्कर देण्यास आपलें राष्ट्र आज आहे त्याहून शतपटीनें अधिक शक्त झाल्यावाचून राहणार नाहीं हें नक्की !

[पोथीजात जातीभेदोच्छेदक सामाजिक क्रांतिघोषणा ! तोडून टाका हचा सात स्वदेशी बेडचा ! समग्र सावरकर वाङ्मय खंड – ३ : निबंध. पृष्ठें – ४९३–५०० निर्भीड.]

विभाग पाचवा

हिंदू समाजातील अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या जातींवर हजारो वर्षे अन्याय झाला. त्यामुळे हिंदुसमाज दुबळा बनला. रत्नागिरीस तेरा वर्षे स्थानबद्ध असताना अस्पृश्यता निवारणासाठी सावरकरांनी कसोशीने प्रयत्न केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'समता' पत्रात प्रकाशित झालेल्या सावरकरांच्या पत्रात आपल्याला जातिभेद नको असला तरी हिंदुत्व हवे आहे असे त्यांनी म्हटले आहे.

हिंदू समाजाला मिळणाऱ्या अन्याय्य व विषम वागणुकीचा निषेध म्हणून अस्पृश्य समजल्या गेलेल्यांनी हिंदुधर्माचा त्याग करून अन्य धर्म स्वीकारण्याचा विचार बोलून दाखवला तरी सावरकरांना तो रुचत नसे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३५ साली धर्मांतराचा विचार बोलून दाखवताच डॉ. आंबेडकर मुसलमान किंवा ख्रिस्ती होतील असे वाटल्याने सावरकर फार अस्वस्थ झाले. दहा वर्षांत अस्पृश्यतेचे उच्चाटन होईल म्हणून दहा वर्षे डॉ. आंबेडकरांनी दम धरावा असे सावरकरांनी त्यांना आवाहन केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९५६ साली हिंदू धर्माचा त्याग करून

बौद्धधर्म स्वीकारला. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राज्यघटनेने अस्पृश्यता नष्ट झाल्याची घोषणा केली. पण अस्पृश्यतेचे उच्चाटन तर झाले नाहीच, उलट अस्पृश्य समजल्या गेलेल्या लोकांवरील अत्याचार वाढतच राहिले. डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेण्याचा निर्णय जाहीर केला आणि त्यानंतर १४ ऑक्टोबर १९५६ रोजी विजयादशमीच्या दिवशी हिंदुधर्माची सीमा आलांडून बौद्ध धर्म स्वीकारला. बाबासाहेबांच्या निर्णयामुळे संतापलेल्या सावरकरांची तीव्र प्रतिक्रिया या विभागातील शेवटच्या दोन उताऱ्यांत व्यक्त झालेली आहे. 'नगरांतून नि सुशिक्षित वर्गांतून आज अस्पृश्यता बव्हंशी उखडली गेली आहे.' असा सावरकरांचा दावा होता. धर्मांतराने अस्पृश्य समजल्या गेलेल्या लोकांचे प्रश्न सुटणार नाहीत असे सावरकरांचे म्हणणे होते. सर्व धर्मांप्रमाणेंच बौद्धधर्मांतही भाकडकथा, भाबडेपणा वगैरेंचा बुजबुजाट आहे असें सांगून हिंदुसमाजात राहूनच अस्पृश्यतेचे उच्चाटन करण्याचे प्रयत्न व्हावेत असा सावरकरांनी युक्तिवाद केला आहे.

जातिभेद नको; हिंदुत्व हवें

(डॉ. आंबेडकरांच्या पक्षाची 'समतासंघ' नांवाची अेक संस्था असे. त्यांचें मुखपत्र 'समता'. त्यात 'आमचा माणूस' म्हणून जातिभेदोच्छेदक विषयावर काही लेख आले. त्यातील विधेयांना बॅ. सावरकरांनी खालील अुत्तर टाकलें तें 'समते'च्या २४ ऑगस्ट १९२८ च्या अंकात समग्र प्रसिद्धिलें गेलें.)

रत्नागिरीहून बॅ. विनायक दामोदर सावरकर यांचे खालील पत्र प्रसिद्धीकरितां आलें आहे–

१) श्री. संपादक 'समता' यांस, न. वि. वि. समतासंघाचे प्रमुखपत्र जें 'समता' त्याचे अंक आपण मजकडे धाडता त्याविषयी आभार आहेत.

२) त्या पत्रांत आपण अनेक लेखांतून असें भासविण्याचा यत्न करीत असता की मी जातिभेदाचा मोठा अभिमानी असून त्याचे निर्मूलनार्थ प्रयत्न करण्याच्या कल्पनेचा, निश्चयाचा नि तदनुरूप आचरणाचा मक्ता जो आपण आपल्याकडेच आहे असें समजता त्यात माझा कांहीं अेक संबंध नाहीं. अितकेंच नव्हे तर त्या सुधारणेचा मी पूर्ण आणि क्वचित् प्रच्छन्न विरोधी आहे.

३) जर ही गोष्ट खरी असती तर तुम्ही केलेल्या टीकेविषयीं ती प्रामाणिक आहे म्हणून मी कांहींच दोष दिला नसता. परंतु तुम्हांस प्रत्यक्ष भेटींत माझें मत जातिभेदाच्या निर्दालनास पूर्णपणें अनुकूल असून त्याचप्रमाणें मी स्वतः रोटीबंदी व्यवहाराच्या सुधारणा आचरणांत येतील तितक्या आणत असतों–आणि अितरांकडून आणवीत असतों, ही गोष्ट माहीत झालेली आहे. तरी देखील ज्या अर्थी तुम्ही 'समतें'त माझ्या नावाचाच अुल्लेख करून मी त्याविरुद्ध आहे असें

भासविता त्याअर्थी आपल्या टीकेचा हेतु दुसराच काही तरी असला पाहिजे. तसें असेल तर ज्या कार्यावर आपण प्रेम करतां, त्या कार्यासाठी तरी निदान आपण यापुढे जाणूनबुजून लोकांत अशी भ्रममूलक समजूत पसरवू नये असें मी आपणांस देशबंधुत्वाच्या नि धर्मबंधुत्वाच्या नात्यानें सुचवितों.

४) तरीही वृत्तपत्र जर तुमच्या व्यक्तीचे असतें, तर मी तुम्हांस माहीत असलेलें जातिभेदाविरुद्धचे माझें मत आणि आचार तुम्हांसच पुन्हा सांगत बसण्याचे श्रम न घेता तो प्रश्न वैयक्तिक सत्यनिष्ठेवर सोपवून तिकडे दुर्लक्ष केले असतें; पण समता संघाचे मुखपत्र म्हणून 'समता' निघत असल्यानें मी हें स्पष्टीकरण करणें अवश्य समजतों की –

५) हिंदुसमाजांतून जन्मजात जातिभेदाचें आमूलात् उच्चाटन करणें अत्यंत आवश्यक आहे. त्यांचें अस्तित्व कोणत्याही आनुवंशिक स्वरूपांत असमर्थनीय आणि राष्ट्रीय शक्तीस हानिकारक आहे. हिंदुसमाजांत प्रांतिक किंवा जातीय असे कोणतेच भेद न मानिता पंक्तीव्यवहार आणि विवाहव्यवहार चालू झाले पाहिजेत. अन्नव्यवहार केवळ वैद्यकीय, आरोग्यीय आणि रुचिभिन्नतेनेच काय ते मर्यादित असावेत. शुद्ध, आरोग्यप्रद आणि उचित अन्नपाणी असलें तर तें कोणीही आणि कुठेही शिजवलें असलें किंवा आणिलें असलें तरी खाण्यास आणि पिण्यास हरकत नाहीं. जातीचा म्हणून त्यात कोणचाही प्रश्न नसावा; आणि विवाह केवळ वधूवरांच्या योग्यायोग्यतेवर, आरोग्यप्रदत्वावर आणि परस्परप्रीतिभाजनतेवर अवलंबून असावा. त्यांतही जातीपातीचा काही संबंध नसावा.

६) अर्थात् वरील स्पष्टीकरण केवळ हिंदुराष्ट्रांतील अंतर्गत व्यवहारापुरतेंच आहे.

७) जातिभेदाच्या निर्दालनासाठी वरील मताप्रमाणें मी शाळेत होतों तेव्हांपासून, प्रकटपणें वागत आलों आहे. कॉलेजमध्यें मी हा अघड अुपदेश देअी. शिक्षायतेत तर बोलावयासच नको, पुढे अंदमानांतही तोच अुपदेश देअो आणि तो प्रत्यक्ष व्यवहारांत आणीत मी शेकडों लोकांच्या जातिभेदमूलक दुष्ट समजुती पालटल्या आहेत कारागारांतून बाहेर येतांच मी तीव्र लोकद्वेषास तोंड देअूनही जातिभेदाच्या निर्दालनाचे यत्न प्रकटपणे, व्याख्यानांतून, लेखांतून, चर्चेतून करून माझ्या व्यक्ती पुरतें तसें आचरण प्रकटपणें केलें आहे, याविषयी माझा शब्दाचाही पुरावा पुरे होता; पण पण त्रोटकपणे दोनचार घटनाही उल्लेखितों. 'अंदमानाचीं पत्रें' प्रसिद्ध झालीं आहेत, मी त्यांत त्या काळींही जातिभेदाचे हानिकारकत्वावर वेळोवेळीं लिहिलें असून रोटीबेटी व्यवहार सर्व हिंदूंत चालू व्हावेत म्हणून अुत्कट अिच्छा प्रकट केलेली आढळेल. 'जन्मठेपेंत प्रकरणेंची प्रकरणें या विषयास वाहिलीं असून हिंदु तेवढा अेक, हिंदु ही अेकच जात आम्हांस माहित आहे–असा अुपदेश आणि आचार यांचा तिकडे कसा सारखा प्रयोग मी चालविला होता हें लिखित

आहे. भगूरला मी प्रसिद्धपणें माझ्या पूर्वास्पृश्य बंधूंसह (त्यास अस्पृश्य म्हणणें देखील मला पाप वाटतें.पूर्वास्पृश्यही निरुपाय म्हणून म्हणतों) दूध आणि चहा प्यायलों. नाशिकला हजारों लोकांच्या अुघड सभेंत ही घटना सांगून मी प्रामाणिक पणें अिच्छा प्रकट केली कीं, माझ्या प्रेतास ब्राह्मण, मराठा, महार आणि डोंब, अशा माझ्या सर्व हिंदुबंधूंनीं खांदा देअून अस्पृश्यता आणि जातिभेद मेला असें दाखविलें तर माझा आत्मा सुख पावेल. हया गोष्टी तत्कालीन 'स्वधर्म' आदिक पत्रांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत. 'श्रद्धानंदा'त लेखणी थके तों रोटीव्यवहाराविरुद्ध लिहिलें जात आहे. 'धर्माचें स्थान हृदय-पोट नव्हें !' हें वाक्य श्रद्धानंदाच्या लिखाणाने मराठी भाषेत म्हणीसारखें परिचित होत आहे. माझ्या घरीं अेक वेळ नव्हे तर प्रत्येही सहभोजनें होतात. रत्नागिरीस शेकडो लोक भंग्यांचे मुलांबरोबर चहा चिवडा घेतात. मी अुघडपणे ब्राह्मण, मराठे, वैश्य अित्यादि माझ्या हिंदु बंधूकडें जेवतों. आणि अंदमानापासून आतांपर्यंत अनेक आंतर्जातीय विवाह घडवून आणण्यांत मी अुघड आणि यशस्वी खटपट केली आहे.

८) अितक्या अुल्लेखांसही अवश्य म्हणून अुच्चारणें भाग पडलें. अक्षरशः हजारों हजार लोकांस मी जातिभेद मोडण्यास अुपदेशिले आहे. शेकडोंचीं मतें त्याला अनुकूल करून घेतली आहेत. प्रत्यही मी तसा वागत आहे. कोणाचे प्रमाण-पत्र (सर्टिफिकेट) मिळवण्यासाठी नव्हे तर प्रामाणिक गैरसमज असल्यास तो राहू नये म्हणून अितकें लिहिणें भाग पडलें.

९) जातिभेदांचें आमूलात् निर्दालन करणें आपल्या हिंदुराष्ट्रास हितकारक असल्याने मी त्या कार्यापुरतें 'समतासंघा'चे अभिनंदन करतों.

१०) केवळ अितकेंच बजावितों कीं मला जातिभेद नको असला तरी आज हिंदुत्व हवें आहे. आणि म्हणून रोटीव्यवहारावरील आरोग्यादिक अटीप्रमाणे कोणीही अहिंदुशी तो करण्यास हरकत नाही हें जरी आज मी समर्थितो तरी बेटी-व्यवहाराविषयीं मात्र आणखी काही काळ हिंदूंनी अहिंदूस मुली देअू नयेत असें मला वाटतें. अहिंदु मुली करण्यास हरकत नाहो अशी समजूत आणि रूढि हिंदूंत पुष्कळ अंशाने बद्धमूल झाली की मग अशा मुक्त विवाहसही मी समर्थीन. आज नुसत्या मुली जातील – त्यांच्या वंशास अंतरू ही भीति आहे. शुद्धि, जातिभेद-निर्मूलन आणि अंतर्गत संघटन पक्केपणी बद्धमूल झालें म्हणजे मग बेटीव्यवहारही अहिंदूंशीं – ते ज्या प्रमाणात मुक्तपणे वागतील त्या प्रमाणांत – करण्यास आपणही सिद्ध होअूं.

११) अितकेंच नव्हे तर जर मुसलमानत्व, ख्रिश्चनत्व, अित्यादि 'त्वें' अितर सोडीत असतील तर मग माझे हिंदुत्वही मानुषकतेत विलय पावेल. जसें माझे राष्ट्रीयत्वही – हिंदीपणही – मानवराष्ट्रात तेव्हा विलय पावेल की जेव्हां अिंग्लिशपण, जर्मनपण अित्यादि 'पणा' लुप्त होअून मनुष्यपणा तेवढा जगात

मनुष्यमात्रांत नांदू लागेल. आजदेखील जो खरा मनुष्यवादी (Humanitarian) असेल त्याच्यापुरतें त्याच्याशीं मी सर्व भेदभाव सोडून वागेन.

१२) तेव्हा मी हिंदुत्व सध्या राखू अिच्छितों हें मत ज्या कोणास मान्य नसेल त्यानें त्याविषयी मजवर वाटल ती टीका करावी. ती प्रामाणिकपणाची होअील, परंतु यापुढे मी जातिभेद राखू अिच्छितों म्हणून मात्र कोणी आपला समज करून घेअू नये. तशी टीका अप्रामाणिक ठरेल. समता संघाच्या त्या अुद्देशास मी अनुकूल आहे हें प्रसिद्ध झाल्याने जें थोडें बहुत बळ त्या जातिभेदनिर्दालनास मिळणारें आहे, तें मिळावें म्हणून हें पत्र प्रकटपणें (जाहीर रीतीनें) मी लिहित आहे. हें 'समतें'त जसेंच्या तसें छापून आपण निःपक्षपणें या स्पष्टोक्तीस स्वीकाराल अशी मला आशा आहे. आपणांस जातां जातां हेंही बजाविलें पाहिजे की, 'श्रद्धानंदा'त माझ्या नांवाने आलेल्या लेखांतील मतांपुरताच मी अुत्तरदायी आहे. कळावें. लोभ असावा ही विनंती.

आपला

वि. दा. सावरकर

रत्नागिरी

१४।८।१९२८

[बॅ. सावरकरांचे 'समतासंघा'स पत्र : समग्र सावरकर वाङ्मय, निबंध, पृष्ठें ६४१ – ६४४]

धर्मांतर

डॉ. आंबेडकर यांनीं हिंदुधर्म सोडण्याचा निश्चय केला आहे. या बातमीचें मला तितकेसें आश्चर्य वाटलें नाहीं कीं – जितकें, ते हिंदुधर्मापेक्षा कोणता तरी चांगला धर्म शोधून काढण्याचा प्रयत्न करीत आहेत, या बातमीचें वाटलें ! हिंदुधर्म सोडण्याचीं कारणें त्यांनी दिलेलीं जीं प्रसिद्ध झालेलीं आहेत, तीं अत्यंत संदिग्ध असल्यामुळें त्यांचा हेतु अमुकच अेक आहे असें सांगता येत नाही. तरी जर ते हिंदु धर्म बुद्धिवादाच्या (Rationalism च्या) कसोटीस पूर्णपणें अुतरत नाहीं, म्हणून धर्मत्याग करीत असतील तर त्या गोष्टीचा अर्थ काही तरी ध्यानांत येण्यासारखा आहे. – Ism या अर्थी धर्म म्हटला कीं, त्यात बुद्धिबाहच अशी कांहीं विशिष्ट श्रद्धा असणारच ! बुद्धीला जें पटत नाहीं अशी श्रद्धा ठेवणें ज्यांना आवडत नाही अितकेंच नव्हे तर तर्काला विरुद्ध जाणारीं धर्ममतें हीं अशा अंधश्रद्धेच्या आज्ञेनें अुराशीं धरून ठेवणें हें ज्यांना निष्बळ अप्रामाणिकपणाचें वाटतें. धर्म म्हटला कीं ज्यांत काही जुनाट आणि आजच्या परिस्थितींत निरर्थक नव्हेत तर अनर्थकही झालेले असे आचार आणि संकेतही जे असतातच त्यांना लोक हितासाठीं सुधारणें हें ज्यांना आपलें कर्तव्य वाटतें आणि पारलौकिक म्हणून समजल्या जाणाऱ्या गोष्टींवरही जें प्रत्यक्षनिष्ठ तर्काच्या पलिकडे जाऊन विश्वासू अिच्छित नाहीत; अशा Positivists किंवा Rationalists प्रभृति बुद्धिवाद्यांनीं अेखादा धर्म सोडला तर त्याचें कारण सहज ध्यानात येतें. त्याअर्थी जर डॉ. आंबेडकर हे Hinduism सोडीत असतील तर त्यात कांहीं मोठेसें आश्चर्य नाहीं !

हवा तर अेक नवा 'बुद्धिवादी संघ' स्थापा !

परंतु ज्या बुद्धिवादाचे कसोटीनें हिंदुधर्म सोडावासा वाटतो, ती कसोटी लावली असतां जगांतील आजचा अेकही धर्म ग्राह्य ठरणें अशक्य आहे. उदाहरणार्थ, मुसलमान व ख्रिस्ती धर्म घ्या. वेद अपौरुषेय आहे, अग्निपूजेनें स्वर्ग मिळतो, प्रभृति हिंदुधर्मी मतें ज्या बुद्धिवादास निव्वळ अंधश्रद्धेचें थोतांड वाटतें त्या बुद्धिवादास मुसलमान धर्माची जी अगदीं मूलभूत प्रतिज्ञा की महंमदसाहेब हे शेवटचे पैगंबर, त्यांच्या कुरणांतला शब्द नि शब्द हा ओश्वराच्या टेबलावर जगाचे आधींच लिहून ठेवलेल्या अेका प्रचंड पुस्तकांतून पानेंची पानें फाडून देवदूताच्या हस्तें महंमदास धाडण्यांत आला; आणि महंमदाला सर्वश्रेष्ठ पैगंबर जो मानणार नाही तो तो नरकांत अखंडपणे पिचत राहील; इत्यादि मतें मी मानतो असें शपथेवर सांगण्याचा अप्रामाणिकपणा कसा करवेल ! किंवा जीझसला कुमारी मेरी देवीच्या उदरीं ओश्वरी तेजानें अपौरुषेय संभोगानें जन्मास घातलें, आणि त्याचा प्रत्येक शब्दही अनुल्लंघनीय ओश्वरी आज्ञा होय, ही प्रतिज्ञा तरी कशी करता येईल ? तेव्हा जर डॉ. आंबेडकर हे बुद्धिवादाच्या कसोटीस अुतरत नाहीत म्हणून हिंदु धर्म सोडीत असतील तर त्यांनी बुद्धिगम्य नसलेल्या, श्रद्धेच्या पायावर अुभारलेल्या, घडघडीत पौरुषेय असलेल्या ग्रंथास अपौरुषेय मानणाऱ्या आणि अनेक भाकडकथांनीं भरलेल्या कोणत्याही अितर धर्मास, धर्म ही एक टूम (Fashion) घरच्या बंगल्यात असलीच पाहिजे अशा मोहास बळी पडून स्वीकारूं नये. तर आजच्या परिस्थितींत लोकहितास प्रत्यक्षपणें साधणारे असे नियम हाच ज्यांचा आचार, तर्कनिष्ठ आणि प्रत्यक्षागत तत्त्वज्ञान हींच ज्याचीं अुपनिषदें, आणि विज्ञान (Science) हीच ज्याची स्मृति, असा बुद्धिवादी संघ स्थापावा आणि त्याच्या अनुयायांस अंधश्रद्धेच्या आणि भाकडकथांच्या पिंजऱ्यांतून सोडवून अेका सटक्यासरशी अद्ययावत् अशा वैज्ञानिक बुद्धिस्वातंत्र्याच्या अुच्चतम आणि आरोग्यप्रद वातावरणांत नेअून सोडावें हेंच अिष्ट आहे. परंतु हिंदुधर्म हें भोळेपणाचें अेक लाकडी लोढणें आहे म्हणून फेकून देअून त्याचे जागी ख्रिस्ती किंवा मुसलमानी धर्मबेडाची नि धर्मोन्मादाची भली थोरली दगडी धोंड ते स्वतःच्या आणि त्यांच्या अनुयायांच्या गळ्यांत बांधूं अिच्छित असतील तर त्यायोगें माणुसकीच्या दृष्टीनें झाला तर त्यांचा अधःपातच होणार आहे. काहीं झालें तरी बुद्धिवादाच्या दृष्टीनेही अेकंदरीत धर्मास ग्राह्यतम धर्म असेल तर तो हिंदुधर्म होय ! 'किर्लोस्कर' मासिकांत जुलै नि ऑगस्ट (१९३५ सालच्या) अंकांत मुसलमानी धर्मोपपंथांवर आम्ही जें दोन लेख लिहिले आहेत ते धर्मतुलनेच्या प्रश्नीं प्रत्येकानें अवश्य वाचावे !

सध्याच्या स्थितींत धर्मांतरानेंच अस्पृश्यांची अधिक हानि होणार आहे !!

आतां डॉ. आंबेडकर जर केवळ अस्पृश्यांची माणुसकी वाढविण्यासाठीं आणि आत्मसन्मान रक्षिण्यासाठीं हिंदुधर्मास सोडीत असतील तर त्यांनीं हें ध्यानांत धरावें कीं, येत्या दहा वर्षांत अस्पृश्यता हिंदुसमाजांतून बुच्चारली गेल्यावाचून कधींही राहणार नाहीं. आणखी दहा वर्षें त्यांनी दम धरावा. ही गोष्ट येवढी मोठी राष्ट्रीय सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीनें अगदीं कर्तव्यच आहे. कारण आज अस्पृश्यतेचा प्रश्न सर्व बाजूंनीं सुटण्याच्या अितका निकट आला असतां, शतको-शतकांचे हिंदुसमाजाशी निगडित झालेले महारादिकांचे संबंध तोडून परधर्मांत जाताना त्यांना जो आर्थिक आणि सामाजिक त्रास आणि हानि भोगावी लागणार आहे त्यामानानें तरी, आहे त्या स्थितींतच दहा वर्षें राहून अस्पृश्यतेची बेडी तोडून टाकणें अधिक सुलभ नि मानाचें आहे. कांहीं झालें तरी पूर्वास्पृश्यांतील लाखांत (१०) दहा आणि महारांतील हजारी (१०) माणसें देखील डॉ. आंबेडकरांच्या मागोमाग आपला पूर्वपरंपरागत संतरोहिदासाचा नि चोखामेळ्याचा हिंदुधर्म सोडतील ही गोष्ट शक्य दिसत नाहीं.

असें धर्मांतर हेंही माणुसकीस काळिमाच लावणारें आहे !

पुन्हा, माणुसकीच्या दृष्टीनें पाहिलें तरी मुसलमानी वा ख्रिस्ती धर्मांत जाताना त्यांस जी अपरिहार्य प्रतिज्ञा करावी लागणारच की, 'महम्मदावर किंवा येसूवर विश्वास न ठेवतां जे जे मेले ते ते चिरंतन नरकांतच पडले.' ती प्रतिज्ञा करणें तरी माणुसकीस काळीमा लावणारे नव्हे काय ? कोणीही माणुसकी असणारा मनुष्य अेखाद्या नोकरीकरितां वा लाभाकरितां आपल्या मातापितरांस भरचौकांत १० शिव्या हासडू शकेल काय ? मग आपल्या जातीचे सत्तर पिढ्यांतील सारे पूज्य वाडवडील आणि साधुसंत हे, त्यांनी महम्मदावर किंवा येसू ख्रिस्तावर विश्वास ठेवला नाहीं म्हणून, घोर नरकांत पिचत आहेत असें सांगून ज्यांच्या पोटी आपण जन्मलों त्या आईबापांचे पांग फेंडण्याचें नीच धाडस डॉ. आंबेडकरांच्या किंवा त्यांच्या अनुयायांच्या हातून घडलें तर तें तरी माणुसकीचें कृत्य होअील काय ?

मनुष्य मुसलमानांत किंवा ख्रिश्चनांत गेला म्हणजे अस्पृश्यतेंतून अेकदम मुक्त होतो असें म्हणणेंही खोटें आहे. बंगालमध्यें मुसलमानांतही अस्पृश्य मुसलमान (हलाल) आणि स्पृश्य मुसलमान (अश्राफ) यांचा वाद अितका तीव्र

झाला आहे की, बंगाल विधिमंडळांत अस्पृश्य मुसलमानांनीं स्पृश्य मुसलमानांच्या लाटबाजीपासून संरक्षणासाठीं राखीव जागा मागितल्या आहेत. अितर प्रांतांतही अनेक ठिकाणीं सय्यद प्रभृति स्पृश्य मुसलमान जाति अस्पृश्य मुसलमानांबरोबर बेटीव्यवहार करीत नाहीत. आणि त्रावणकोर प्रभृति दक्षिण हिंदुस्थानांतील ख्रिश्चनांत अस्पृश्य ख्रिश्चनांस स्पृश्य ख्रिश्चन हिंदु स्पृश्यांसारखेच शिवत नाहीत, नाशिकच्या पुजाऱ्यांप्रमाणेंच स्पृश्य चर्चांत येऊं देत नाहीत. अस्पृश्य ख्रिश्चनांनीं स्पृश्य ख्रिश्चनांविरुध्द त्रावणकोरच्या विधिमंडळात स्वतंत्र प्रतिनिधित्व मागितलें आहे ही गोष्ट डॉ. आंबेडकरांचे कानीं गेली नाहीं काय ? तेव्हा अस्पृश्यतेच्या आणि समतेच्या दृष्टीने पाहिलें असताही महारप्रभृति अस्पृश्यांनीं सामाजिक मुलथापालथीच्या अखंड त्रासदायक खडुचांत पडण्यापेक्षां आणखी १०।१२ वर्षांनीं आपल्या धर्मबंधु असलेल्या हिंदूंतील जात्युच्छेदक सुधारकांशीं सहकार्य करून अस्पृश्यतेचाच नव्हे तर जातिभेदाचाही प्रश्न सोडवावा यांतच त्यांचें खरें सामाजिक आणि आर्थिक हित साठविलेलें आहे.

आता स्पृश्य हिंदूंस अेकच शब्द कीं, त्यांनीं असल्या अपरिहार्य आपत्तीनें मुळीच न डगमगतां जन्मजात म्हणवणाऱ्या पण निव्वळ पोथीजातच असणाऱ्या या अस्पृश्यतेच्याच नव्हे तर आजच्या जातिभेदाच्याच दुष्ट रूढीचे मुळावर कुऱ्हाड शक्य तितक्या लवकर घालावी. डॉ. आंबेडकर जावोत वा राहोत ! आजवर मोठमोठे पंडित नि राजे हिंदुधर्मास सोडून परधर्मांत जाण्याचा धर्मद्रोह करीत आले, या नीचतेचे घाव सहन करूनही या हिंदुराष्ट्राच्या कुंडलिनी कृपाणांकितां भगव्या ध्वजाखाली अजूनही वीस कोटी कट्टर अनुयायी प्राणपणाने अुभे आहेत ! तेव्हा न डगमगतां परंतु केवळ सनातनपणाच्या भंगड गुंगीत झोपतही न पडत. आपल्या राष्ट्रदेहाच्या अंगांत मुरलेल्या या आजच्या जातिभेदाच्या रोगावर शस्त्र क्रिया केली पाहिजे. त्यापायी असले काही रक्ताचे बिंदू वा धारा गळून पडणारच. कांहीं मांसाचे तुकडे तुटून जाणारच. परंतु जर ही जात्युच्छेदक सुधारणेची शस्त्र-क्रिया आपण कुशलपणे करूं तर गळलेल्या रक्तापेक्षां शतपट शक्तिशाली असें नवें रक्त आपल्या नसानसांत सळसळूं लागेल नि हे झालेले घाव भरून निघतील.

शुद्धीचा दरवाजा – आता काय चिंता !

कांहीं ५०-७५ वर्षांपूर्वी आंबेडकर परधर्मांत गेले असते तर त्यांची जितकी चिंता वाटावयास पाहिजे होती तितकी देखील आज वाटावयास नको आहे. कारण आतां शुद्धीचा दरवाजा सताड अुघडा झालेला आहे. जसे गोमंतकातले ७ पिढ्यांपूर्वीचे दहा हजार ख्रिश्चन लोक आज परत आले, किंवा साठ हजार मलकाना रजपूत परत हिंदू झाले किंवा आता गेल्या महिन्यात दिल्लीस ४०० ख्रिश्चन लोक

हिंदुधर्मात शुद्ध करून घेतले, तसेंच या संक्रमणाच्या गडबडीत हे धर्मद्रोह करणारे हजार वा दोन हजार वा लाख दोन लाख लोकही बायबलांतील अुधळ्या पुत्राप्रमाणेंच बापाचें घर शोधीत अुद्या परत हिंदुधर्मात येतील, शुद्ध करून घेतले जातील ! आंबेडकरांचें कुटुंब रत्नागिरी जिल्ह्याकडीलच आहे. जरी आंबेडकर आणि त्यांचे अनुयायी आज परधर्मात गेले तरीही, हिंदुसंघटनेच्या जात्युच्छेदक संजीवनीने नवप्राणित झालेल्या हिंदुधर्मात आपणांस पुन्हा शुद्ध करून घ्या अशी विनंती डॉ. आंबेडकरांचे चिरंजीव थोड्क्या वर्षांनीं रत्नागिरी हिंदुसभेकडे करतील असाच संभव अधिक !

जसा तो राष्ट्रद्रोह – तसाच हा धर्मद्रोह

वर आम्ही, काहीं तात्कालिक लाभासाठीं हिंदु त्यागाच्या या कृत्यास धर्मद्रोह म्हटलेलें आहे, तें जर कोणास अन्यायाचे वाटत असेल तर त्यास आम्ही असें विचारतो की, जर हिंदुस्थानचे काही नागरिक या भारतराष्ट्रास आज अधःपतित झालेले पाहून आपल्या स्वतःच्या खिशांत चार रुपड्या अधिक पडाव्या यासाठी हिंदुराष्ट्राच्या शत्रूस जाऊन मिळाले किंवा रशियाच्या दुर्दिनात आपल्या राष्ट्रासाठीं सर्वस्व पणाला लावून न झुंजता जर अेखादा लेनिन रशियन देशबंधूंशी आपले सारे संबंध तोडून देऊन जर्मनीचे वा अमेरिकेचें नागरिकत्व पत्करून तेथील मोठा अधिकारी झाला असता तर त्या नामर्द मनुष्याच्या स्वार्थी कृत्यास तुम्ही राष्ट्रद्रोह म्हटलें असतें कीं नाही ? तो जसा राष्ट्रद्रोह तसाच हा धर्मद्रोह. तें जसें माणुसकीचें कृत्य नव्हे, तसें हेंहीं नव्हे.

[डॉ. आंबेडकरांचे चिरंजीव परत हिंदुधर्मांतच येतील !
पाहिजे तर बुद्धिवादी निधर्मी व्हा !
–पण धर्म असा हिंदुधर्माहून चांगला सांपडणार नाहीं !!
समग्र सावरकर वाङमय— निबंध : पृष्ठें ५७१—५७४
निर्भीड – दि. ३–११–१९३५]

डॉ. आंबेडकर आणि बौद्ध धर्म

वर्तमानपत्रांत असें प्रसिद्ध झालें आहे की, डॉ. आंबेडकर येत्या दसऱ्याच्या मुहूर्तावर नागपूरला समारंभपूर्वक बुध्दधर्माची दीक्षा घेणार आहेत. ही बातमी खरी ठरो ! कारण डॉ आंबेडकरांनी असले अनेक निश्चय अनेक वेळा गाजावाजाने प्रसिध्द केलेले आहेत. परंतु त्यांचा आजचा निश्चय अुद्याला टिकतोच असें काही बहुधा घडलेलें नाहीं. आतां तरी हा त्यांचा निश्चय खरा ठरेल आशी आशा आहे. डॉक्टर महाशय बुद्ध संप्रदायातील नुसत्या गृहस्थी अुपासकाची दीक्षा घेणार आहेत कीं बुद्ध भिक्षूचेच दीक्षा घेऊन मुंडनादिक संस्कारपूर्वक गृहदारादि संसाराला विटल्यामुळें गृहस्थजीवन सोडून आणि कोण्या बुद्धमठांत जाऊन भिक्षुव्रतास आचरणार आहेत सें कांहीं स्पष्ट झालेलें नाहीं, तथापि कोणत्याही प्रकारानें का होअीना, ते बौद्ध धर्माचा अंगीकार करणार असल्यास तो निश्चय त्यांनीं आतां तरी पार पाडावा. शुभस्य शीघ्रम् !

हिंदुसमाजाच्या द्वेषानें सदोदित भडकत राहिलेल्या डॉ. आंबेडकरांच्या हृदयास त्यांच्या मताप्रमाणें केवळ प्रेममय असणाऱ्या बुद्धधर्माच्या अुपदेशानें तरी शांतता मिळो, आराम पडो, हीच आमची सदिच्छा आहे. म्हणून शुभस्य शीघ्रम् ! यापेक्षां हिंदुजगतानें या वैयक्तिक गोष्टीस कोणचेंही महत्त्व देण्याचें कांहीं अेक कारण नाहीं. अहो, जेथें प्रत्यक्ष बुद्धानें वयाचीं चाळीस वर्षें स्वत: त्याचा धर्मोपदेश दिला आणि त्याच्यानंतर आज २५०० वर्षें म्हणजे अक्षरी दोन सहस्त्र पांचशें वर्षें बौद्ध धर्माच्या गाथा, जातकें, पुराणें, पीटिका, हीं बौद्धांची जीं कांही विशिष्ट मतें

म्हणून समजलीं जातात त्यांचा अुपदेश करीत आलीं आहेत तेथें आतां भिक्षु आंबेडकरांनीं त्या बौद्धमतांविषयीं अधिक सांगावयाचें असें अुरलें आहे तरी काय ? आणि त्या गेल्या २५०० वर्षांपूर्वीच्या जुनाट वचनांच्या, त्यांतील अर्थांना पिळून पिळून निःसार झालेल्या अक्षरांना नि वाक्यांना भिक्षु आंबेडकरांच्या चरकांतून पुन्हा अेकदा पिळलें तरी आणखी नवें सार असें तें काय निघणार आहे ? जें कांहीं अमृत वा विष त्या बुद्धकालीन वचनांत होतें तें सारें आधींच पिअून नि पचवून हा हिंदुधर्माचा हिमालय अढळचा अढळपणें, विशिष्टपणें नि गरिष्ठपणे पाताळापर्यंत खोल गेलेल्या आपल्या पक्क्या पायावर आकाशापर्यंत अुंच अुभारलेल्या आपल्या शिखरांना मिरवीत आजही अुभाचे अुभाच आहे.

जेथें अेकदा कोटी कोटी मानव बौद्धधर्माचे अनुयायी म्हणून म्हणवीत होते त्या भारतात आज त्या बौद्धधर्माचा मागमूसही जो अुरला नाही. तो का ? त्या कारणांचा अभ्यास जोवर डॉ. आंबेडकर प्रांजलपणें करीत नाहींत तोंवर पुन्हा अेकदा साऱ्या भारतावर मी बुद्धाचा ध्वज हिंदुधर्माचें नांवसुद्धा पुसून टाकून फडकविणार आहेत अशा ज्या वल्गना आंबेडकर करीत आहेत त्यांच्यामुळे कोण्याही ममंज्ञ हिंदूस लवलेश भीति वाटण्याचें ठायीं हसूं मात्र कोसळल्यावाचून राहत नाहीं.

धर्मांतरानें काय होईल ?

तेव्हां डॉ. आंबेडकर व्यक्ति भिक्षु आंबेडकर झाली तरी त्याचें कोणाही हिंदूस कोणचेंच विशेष सोयरसुतक वाळगण्याचें कारण नाही. ना हर्ष ना विमर्ष, जेथे बुद्धाने हात टेकले तेथे आंबेडकर कोण्या झाडाचा पाला !

परंतु डॉ. आंबेडकर हे त्यांना बुद्धाप्रमाणे संसाराचा अुबग आल्यामुळे किंवा निर्वाणपदाची सात्त्विक ओढ लागल्यामुळे बुद्धधर्म स्वीकारू पहात आहेत असें मुळीच नाही. तसें असतें तर ते कोणच्याही वडाच्या झाडाखाली बसून बुद्धाप्रमाणे अेकांतांत तत्त्वचिंतनानें ते निर्वाणपद संपादिण्याचा यत्न करते. परंतु ते जो बौद्ध-धर्म स्वीकारणार आहेत तें हिंदुधर्माचे समूळ अुच्चाटन करण्यासाठीच काय तें होय असें गर्जून गर्जून ते स्वतः सांगताहेत.

हवा आपल्या अुद्दिष्टासाठीं आंबेडकरांनीं यद्यपि साऱ्या जगास निमंत्रिलें आहे कीं तुम्ही सारे मानवप्राणी माझ्या मागें या नि बुद्ध व्हा. तथापि साऱ्या मानवजातीला त्यांचें तें आवाहन ऐकूं जाण्याचा सुद्धा लवलेश संभव नाही. फार काय त्यांची महार जात सुद्धा सारीच्या सारी त्यांच्यामागें जाण्याचाही संभव नाहीं. तथापि त्या महार जातींतील शक्य तितके लोक आपल्यामागें यावेत आणि त्यांच्या बाडबडिलांनी पुजलेल्या हिंदुदेवतांना आणि संतमहंतांना पाखंड म्हणून

धिक्कारून आणि त्यांच्या भजनी लागलेल्या त्या स्वतःच्या वाडवडिलांनाही मूर्खांत काढून त्यांनी बौध्दधर्म स्वीकारावा यास्तव डॉ. आंबेडकर यांच्या वृत्तपत्रांतून नि व्याख्यानांतून हिंदुधर्माची खोटचा आणि हलकट भाषेत सुध्दा निंदा करीत आहेत. आणि त्या महारांना सांगत आहेत कीं तुम्ही बुध्द होतांच तुमची अस्पृश्यता नाहींशी होअील. तुमच्या पायांतील जातिभेदाच्या बेडचा जादूप्रमाणें गळून पडतील. तुम्ही महारांचे माणूस व्हाल, माणसांचे देव व्हाल, नियति नि निर्वाण तुमच्या घरीं पाणी भरूं लागेल. पण जर का तुम्ही हिंदु रहाल तर तुमची अस्पृश्यता कधींही जाणार नाहीं. तुम्ही ऐहिक आणि पारलौकिक नरकांत पडल्यावाचून कधीही रहाणार नाहीं. हचा त्यांच्या गर्हणीय, अन्याय्य, असत्य नि हिंदुद्वेषी भुलभुलावणीला आज आमचे धर्मबांधव असलेले अनेक महारबंधु बळी पडण्याचा मात्र कांहीं संभव आहे. त्यामुळें डॉ. आंबेडकरांच्या हचा धर्मांतराला केवळ व्यक्तिविषक स्वरूप राहिलेलें नसून त्याला काहीसें सार्वजनिक स्वरूप आलेलें आहे. आणि म्हणूनच आमच्या आजवरच्या महार जातींतील हिंदुधर्मबांधवांना या धर्मांतराच्या धोक्यापासून सावध करण्यासाठी आणि शक्यतों रोखण्यासाठीं या लेखाची चेतावणी देणें हें 'हिंदु' आपले धर्मकर्तव्य समजत आहेत.

जन्मजात अस्पृश्यतेचें आणि जातिभेदाचें अुच्चाटन करण्माचें ब्रीद आम्ही प्रथमपासूनच धारण केलेलें आहे. हिंदुसंघटनेचें तें अेक अनिवार्य अुपांग आहे. पण हिंदुराष्ट्राला पोषक असणाऱ्या हचा सुधारणा हिंदु राहूनच काय त्या शक्य होणाऱ्या आहेत आणि त्या तशा झाल्या तरच त्या सुधारणांना सुधारणा म्हणता येअील. आज अस्पृश्यता जी मरूं घातली आहे ती हिंदुत्वाभिमानी सुधारकांच्या निःसीम प्रयत्नानेंच होय, नगरांतून नि सुशिक्षित वर्गांतून आज अस्पृश्यता बव्हंशी अुखडली गेली आहे. नैबंधिक दुष्टचा घटनेनेंच ती निषिध्द केली आहे. स्वतःस कट्टर हिंदु समजणारे सहस्रावधि हिंदुत्वनिष्ठ नेते आणि अनुयायी आज जातिभेद किंवा अस्पृश्यता मानीत नाहींत; अितकेंच नव्हे तर रोटीबंदीच्याही बेडचा प्रत्यक्ष आचरणांतही तोडून टाकीत आहेत. हिंदुजगतांतील आर्यसमाजासारखे लक्षावधि अनुयायी असलेले अनेक मोठमोठे संप्रदाय अस्पृश्यता पाळणारा किंवा जातिभेद मानणारा असलाच पाहिजे किंवा हिंदुधर्माचा त्याग केल्यावाचून अस्पृश्यता कधींही जाणार नाहीं ही जी वटवट डॉ. आंबेडकर आजन्म करीत आलेले आहेत ती जितकी खोडसाळ तितकीच खोटी आहे. म्हणूनच पूर्वास्पृश्यांपैकीं, चांभार, मांग, ढोर अित्यादि कोणत्याही जातीचा हिंदुधर्म सोडण्याचे दुष्कर्मी आंबेडकरांना पाठिंबा मिळालेला नाहीं. आणि ज्या काही भांबावलेल्या नि भुरळलेल्या महारांचा पठिंबा आज त्यांना मिळूं पहात आहे तोही हें वरील सत्य त्यांच्यापुढे ठामपणें मांडलें असतां ढासळल्यावाचून रहाणार नाहीं. आमच्या महार बंधूनी हें पक्कें ध्यानांत

ठेवावें कीं जर ते हिंदु राहतील तरच त्यांची अस्पृश्यता सुलभपणें नाहींशी होअील. आणि त्यांना त्यांच्या या हिंदुबांधवांच्या सहनशक्तीस पारखें होऊन पडावें लागणार नाहीं. हिंदुराष्ट्रावर आज त्यांचा जन्मसिद्ध अधिकार आहे. त्यामुळें त्यांची ही शक्ति राष्ट्रशक्तीच्या अुपांगभूत असलेल्या बळानें वाढणारी आहे. हिंदुधर्मातून डॉ. आंबेडकरांच्या मागे लागून आमचे महारबंधु बुध्द होऊन फुटून निघाले तर त्यांच्या आज आधीच मूठभर असलेल्या महारजातीचेही तुकडे होतील. ते महार डॉ. आंबेडकरांच्या सांगण्यावरून बुध्द झाले तरी ते होणार होणार म्हणजे किती ? सरदघाची धाव कुंपणापर्यंत. फार फार तर अेक लक्ष महार बुध्द झाला असें समजा. तेही गांवगन्ना दहा-पाच विखुरलेले. त्यामुळे हचा कोटीकोटीजनसंभूत-हिंदुराष्ट्राला कोणचीही घातक दुर्बलता येण्याचा लवलेशही संभव नाही. परंतु जे हचा हिंदुराष्ट्रांतून मूठभर महार खोटचा आश्वासनाला भाळून विनाकारण फुटून निघतील आणि बुध्द होतील ते मात्र अितके अल्पसंख्य नि तिरस्कृत होअून पडतील की मागें बौध्दांची संख्या कोटीकोटींनी मोजता येणारी असूनही पूर्वीप्रमाणे त्यांची ढुगंति झाल्यावाचून रहाणार नाहीं. गोमीचे दोन पाय गळले तरी गोम लंगडी होत नाही, पण ते गळून गेलेले दोन पाय मात्र निर्जीव होअून पडतात.

हिंदु राहून अस्पृश्यता आणि जातिभेद कधीं नष्ट होणार नाहीं ही आंबेडकरांची थाप वर दाखविल्याप्रमाणें जशी खोटी आहे तशीच तुम्ही बौध्द झालांत कीं तुमची अस्पृश्यता खेडचापाडचांतून सुध्दा तत्काळ नाहींशी होअील, जातिभेद मरून जातील, ही डॉ. आंबेडकर मारीत असलेली दुसरी थापही समूळ खोटी आहे. त्यांच्या कोणच्याही अनुयायाने क्षणभर शांत विचार करावा की, आज ज्या खेडचांत कांहीं अस्पृश्यता अुरली आहे त्या खेडचांत जर मी गेलों आणि त्या अडाणी लोकांच्या शाळेंत जाअून म्हणालों कीं आता मी बौध्द झालेलों आहे, आतां माझ्या मुलाला शाळेंत सरमिसळ बसूं द्या, तर ते खेडवळ माझ्या मुलाला तेवढचासाठीं काय ते शाळेत सरमिसळ बसूं देतील काय ? किंवा मी गांवच्या विहिरीवर गेलों आणि म्हटलें कीं आतां मी बौध्द झालों आहे, आत्म्याला मानीत नाहीं, मी अीश्वराला मानीत नाहीं, मी हिंदुधर्म मानीत नाहीं तर तेवढचामुळें ते गावकरी मला विहीरीवर पाणी भरूं देतील काय ? तें अितकेंच विचारतील की तू महार आहेसच ना ? तर मग विहीर बाटवूं नकोस ! पुष्कळ महार ख्रिस्ती झाले, मुसलमान झाले, त्यांची काय स्थिति झाली ? खेडचापाडचांतून ख्रिस्ती-महार, मुसलमान-महार म्हणून त्यांना नवीन नांव काय तें मिळालें. अुलट हिंदुमहारांनीसुध्दां त्यांच्यावर बहिष्कार घातला. त्रावणकोरसारख्या ठिकाणीं ख्रिस्ती-अस्पृश्यांना शाळेंत सरमिसळ बसूं देत नाहींत. चर्चमध्येसुध्दा त्यांना निरनिराळचा कोपऱ्यांत बसविण्यांत येतें. फार काय, स्वतःला बौध्द म्हणवून घेणाऱ्या सिंहल-

–द्वीपातील खेडेगांवातही बौध्द–अस्पृश्यांना शाळेंत नि विहिरीवर बहुधा बहिष्कृत म्हणून आजही मानण्यांत येतें. प्रत्यक्ष तेथें जाऊन पहा.

पण त्याहूनही विशेष हें की बौध्द झाले तरी स्वतः महारांच्या मनांतील तें ज्या चांभार, मांग, ढोर अित्यादि लोकांना अस्पृश्य मानीत आहेत, त्यांना खालच्या जाती म्हणून समजत आहेत, तो जातिविषयक अहंकार अेका दिवसांत गळून जाअील असें हचा बौध्द होणाऱ्या महारांना तरी शपथेवर सांगतां येईल का ? मुळींच नाहीं. ख्रिस्ती झालेले महार, ख्रिस्ती झालेल्या चांभारांना किंवा ढोरांना आपल्या मुली देत नाहींत, त्यांच्या घेत नाहीत. केवळ धर्मांतरानें, हिंदूचा बौध्द झाल्यानें महारांची अस्पृश्यता जाणार नाहीं, किंवा स्वतः ते महार ज्यांना अस्पृश्य समजतात त्या मांग, ढोरांना समव्यवहार्य समजू लागणार नाहींत.

अहो, प्रत्यक्ष बौध्दांच्या अशोक नि हर्षासारख्या बौध्द सम्राटांच्या काळांत-सुध्दां चांडालादिकांना त्या बौध्द सम्राटांनींच अस्पृश्य म्हणून गावाबाहेर हुसकून दिलेलें असे. पण तें अैतिहासिक विवरण आम्ही सध्यापुरतें बाजूला सारतों.

सारांश असा कीं आजच्या डॉक्टर आंबेडकरांच्या किंवा होअू घातलेल्या अुद्याच्या भिक्षु–आंबेडकरांच्या जाणीव थापांना किंवा प्रामाणिक वल्गनांना बळी पडून आमच्या महारबांधवांनीं आपला हिंदुधर्म सोडूं नये. आपल्या स्वतःच्या पन्नास पिढ्यांच्या हिंदु पूर्वजांना स्वतःचं पाखंड्यांत, पतितांत किंवा मूर्खांत काढू नये. आज कोणताही महार बौध्द झाला तरी त्या दिवसाची ती गाजावाजाची अूर्मि तो दिवस मावळतांच ओसरून जाअील, अुद्यां तो त्याच्या झोपडींत जसा पूर्वी होता तसाच वसलेला आढळेल. तो बौध्द झाला म्हणून त्याच्या अर्ध्या भाकरीची पूर्ण भाकरी झालेली त्याला आढळणार नाहीं. जीं तुकारामासारख्या साधुसंतांचीं नीतिवचनें त्याचे वारकरी बंधु गात आहेत, त्यापेक्षां अेकही नवें नीतिवचन त्याला बौध्दांच्या भारुडांत शिकण्यासारखें आढळणार नाहीं. किंवा जे हिंदु काल त्यास अस्पृश्य समजत होते ते त्याला स्पृश्य समजणार नाहींत. अुलट आज अस्पृश्य असले तरी ते आपले धर्मबांधव आहेत, त्यांना आपण समानतेनें आणि स्वधर्मप्रेमानें धर्मबंधु म्हणून अहिंपेक्षा जवळ केले पाहिजे ही जी लज्जा आज हिंदुसंघटनाच्या नि मानव्याच्या अुपदेशानें हिंदुजगतांत बळावत चालली आहे, आणि जीमुळें आज अस्पृश्यता पूर्वीपेक्षां शतपटीनें अुणावत आहे, रोटीबेटीबंदीसुध्दां तोडण्याअितका जातिभेद मऊ घातला आहे–ही जाणीव मात्र दुखावल्याखेरीज राहणार नाहीं. महार हिंदु आहेत तोंवरच त्यांची अस्पृश्यता स्पृश्यांच्या नि त्यांच्याही मनातून अधिक

सुलभतेनें आणि अधिक शीघ्रतेनें नाहीशी होण्याचा अुत्कट संभव आहे, नाहीशी होतच आहे. हिंदु समाजांतून अस्पृश्यतेचाच काय पण जन्मजात जातिभेदाचाही संपूर्ण नायनाट करण्याची आम्ही संघटनी हिंदूंनीं प्रतिज्ञा केलेली आहे. हिंदुत्वाच्या ध्वजाखालीं आपण सारे अुभे आहोंत तोंवर धर्मप्रेमाच्या ममतेनें आपण अधिक संघटित होअूं, बलिष्ट होअूं, पण आपल्यापैकीं जर कोणी त्या धर्मप्रेमास लाथाडून धर्मांतराच्या खड्डयात अुडी टाकून पाहील तर तो या सामूहिक हिंदुराष्ट्रशक्तीला आंचवून स्वतःच लुळापांगळा झाल्यावाचून राहणार नाहीं.

[समग्र सावरकर वाङमय : निबंध. बौद्धधर्मस्वीकारानें तुम्हीच असहय्य व्हाल ! पृष्ठ ६८०-६८४, हिंदु दि. १-१०-५६.]

बौद्धधर्माचें स्वरूप

होतकरू भिक्षु आंबेडकरांनीं बौद्धं धर्म हा साऱ्या जगातील श्रेष्ठ धर्म आहे नि त्यांत कोणत्याही भाकडकथांचा पुनर्जन्म, पूर्वजन्म, देव, ईश्वर, आत्मा इत्यादि 'ब्रह्मजालाचा' पसारा लवलेशही आढळत नसून तो निर्भेळ नि प्रखर प्रत्यक्षावलंबी बुद्धिवादावरच काय तो आधारलेला आहे अशी वलगना त्यांच्या जनता, प्रबुद्ध भारत इत्यादी वृत्तपत्रांतून नि त्यांच्या भाषणांतून वारंवार करण्याचा नि त्यांच्या शिष्यांकडून करविण्याचा सपाटा चालविला आहे. जर तें सारें त्यांचें म्हणणें खरें असतें तर आम्हांसही आनंद वाटला असता; कारण कोणत्याही धर्मातील अनुयायांमध्यें भाबडेपणा, धर्मभोळेपणा, तर्कशून्यता, बुवाबाजी, असमानता इत्यादी दोष जेथें जेथें आढळतात त्या दोषांचा निषेध करण्यास मग ते हिंदु लोकांमध्येंही आढळत असले तरी, आम्ही केव्हांही मागेंपुढें पाहिलेले नाहीं, परंतु आज तरी अशी वस्तुस्थिती आहे की आम्ही हिंदुधर्मीय काय, ख्रिश्चन धर्मीय काय, मुसलमान धर्मीय काय, किंवा वरील कोटी कोटी लोक ज्यास अनुसरत आहेत त्या मोठमोठ्या धर्मांवाचून जे इतर अल्पसंख्य धर्म आज जगांत प्रचलित आहेत त्यांच्या अनुयायांतही त्या त्या धर्मातील उदात्त नि मनुष्य जातीस हितावह असलेल्या तत्त्वां. प्रमाणें किंवा आचाराप्रमाणेंच अनेक भाकडकथा नि भाबड्या समजुती रूढ झालेल्या आढळतात. सर्वसामान्य लोकच नव्हेत तर त्या धर्मांतील आचार्यही अनेक

तर्कशून्य भाकडकथांना अगदी गृहीत सत्याप्रमाणेच (Axioms) चिकटून राहिलेले असतात. मुस्लिम धर्मासारख्या काही धर्मांच्या अनुयायांत तर धर्मभोळेपणाच नव्हे पण प्रसंगी धर्मवेडेपणाही पराकोटीला पोचलेला आढळतो. जर या दोषांचा निषेध करायचा तर आमच्या होतकरू भिक्षु-आंबेडकरांनीं बौद्धधर्मासुद्धा सगळ्याच धर्मांतील धर्मभोळेपणाचा, धर्मवेडेपणाचा नि भाकडकथांचा निर्भेळ बुद्धिवादाच्या दृष्टीनें निषेध करावयास हवा होता. तसें त्यांनीं केले असतें तर त्यांच्या तशा निःपक्षपाती टीकेचा आम्ही योग्य तो गौवरच केला असता.

परंतु हिंदुधर्माच्या द्वेषानें पछाडलेल्या डॉक्टर आंबेडकरांनीं येतां जातां केवळ हिंदुधर्मावरच काय तो शिव्याशापांचा वर्षाव चालविलेला आहे. जर त्यांच्या म्हणण्याप्रमाणे बौद्ध धर्म हाच इतर सर्व धर्मांपेक्षा निर्दोष, बुद्धिनिष्ठ आणि सर्वतोपरी श्रेष्ठ आहे तर त्यांनीं ख्रिस्ती नि मुसलमान धर्मांच्या अनुयायांतही ज्यांना ते हिंदुधर्मातील भाकडकथा किंवा बुरसट आचार म्हणून निंदिताहेत तशाच प्रकारच्या चालू असलेल्या 'दोषां'साठी तसेंच कडाडून आक्रमण करावयास हवें होतें. उदाहरणार्थ मुस्लिम आणि ख्रिश्चन या दोन्ही धर्मांत गुलामगिरीची मनुष्याला पशूहूनही हीनतम लेखणारी क्रूर प्रथा त्या त्या धर्माच्या संस्थापकांनीही त्यांच्या धर्मग्रंथांत धर्म्य मानली आहे. पण अशा दोषांविषयीही मुस्लिम किंवा ख्रिश्चन धर्मास अेका शब्दानेंही दोष देण्यास त्यांची लेखणी किंवा जीभ सहसा धजत नाही; ती तेथें अेकदम लुली पडते. कारण अुघडच आहे, भीति ! तशा त्या समर्थनीय निंदेसाठीसुद्धां ते ते समाज आंबेडकरांची धिंड काढण्यास सोडते ना ! परंतु हिंदुधर्माच्या अनुयायांत जी धार्मिक सहिष्णुता केव्हां केव्हां तर सोसाळूपणाच्या दोषाहूं मर्यादेपर्यंत आढळून येते त्यामुळे हिंदुजगतातील धर्मतत्त्वांविरुद्ध, धर्माचारांविरुद्ध कोणीही वाटेल तशी जीभ सैल सोडली तरी तिकडे हिंदु लोक सहसा लक्ष देत नाहींत. 'कुत्ता भुंकता है भुंकते दो' या म्हणीप्रमाणे तशा निर्लज्ज आक्षेपकांकडे अुपेक्षाबुद्धीनें पाहण्याची हिंदूंची साधारणतः प्रवृत्ति असते. तिचा अन्याय्य लाभ घेतां येत असल्यामुळें आंबेडकरांच्या वृत्तपत्रांतून नि त्यांच्या भाषणांतून केवळ हिंदुधर्माची वृथा तशी कुचाळकी ते करीत आले आहेत. आणि आमच्या बौद्धधर्मात मात्र हचा हिंदूंच्या पुराणांतील, आचारांतील धर्मभोळेपणांतील लवलेशही सापडत नसल्यानें तो बौद्धधर्म महारांनी स्वीकारावा, सगळ्या मानवजातीनें स्वीकारावा म्हणून दवंडी पिटीत आहेत.

हिंदुधर्मांतच नि समाजातच तेवढ्या भाकडकथा, भाबडेपणा नि अनाचार यांचा बुजबुजाट झालेला आहे, आणि बौद्धधर्म आणि समाज मात्र त्यांच्यापासून अगदी अलिप्त आहे असा अगदी असत्य प्रचार आंबेडकरी पक्षानें अेकसारखा चालविला असतां आणि राम-कृष्णादिकांची निंदा हलकट भाषेंतसुद्धा करण्यास

मागेंपुढें पाहिलें नसता त्यांच्या त्या अपप्रचाराचा कडक समाचार घेण्यास आज चालूं असलेल्या शेकडों मोठमोठ्या हिंदुपत्रांतून जे कोणी पुढें आलें नाहीं त्याचें कारण बहुसंख्य हिंदु समाजाच्या अंगात मुरलेली ही सोसाळू वृत्तिच होय. शिव्या देणाऱ्याला अुलट असे अरेस कारे करणें हें असभ्यपणाचें लक्षण असून सभ्यपणा म्हणजे खालीं मान घालून शिव्या अैकत शांतपणें बसणें होय असें हिंदूंतील अनेक शिष्टांना वाटतें. परंतु आम्हांस हा असला सभ्यपणा हा बुळगेपणाचा नि दुबळेपणाचाच काय तो प्रतिशब्द वाटतो. आम्ही ज्या गुरूचे शिष्य आहोत त्या श्रीकृष्णाच्या 'ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् !' या नीतिसूत्रासच आम्ही न्याय्य आणि धर्म्यही समजतो. यथा यक्षस्तथा बलिः । या न्यायानें आंबेडकरी पक्षाच्या वरील खोडसाळ टीकांचा समाचार घेण्यांत आणि त्यांच्या बौद्धस्तुतींतील भोंदूपणा अुघडकीस आणण्यास आम्ही कचरणार नाहीं. बौद्ध धर्म हा केवळ बुद्धिनिष्ठेवरच आधारलेला आहे या आंबेडकरांच्या थापेबाजीला बळी पडणाऱ्यांना, म्हणजे विशेषतः आमच्या आजही हिंदु असलेल्या महार बंधूंना, बौद्ध धर्माची आणि बौद्ध जगताची माहिती जवळजवळ नाहीच म्हटलें तरी चालेल. शेळयांत लंगडी गाय प्रधान तसेंच बऱ्याच अशिक्षित नि मागासलेल्या लोकांस आंबेडकर दाखवितील तसेंच बौद्ध धर्माचें रूप आहे असें वाटणें साहजिक आहे. ह्यासाठीं आम्ही जगांतील लाखों बौद्धांच्या धार्मिक समजुती, आचार, बौद्ध पुराणांतील नि पीटिकांतील बुद्धीहीनपणा अित्यादि अुपांगांपैकीं केवळ वानगीसाठीं कांहीं गोष्टी खाली देत आहोंत. आंबेडकरांच्या पाठीं हुरळून धावण्याच्या आधीं आमच्या महार प्रमुख हिंदुबांधवांनी प्रथमतः बौद्ध धर्माची ही दुसरी ओंगळ बाजूही अवश्य अभ्यासावी. होतकरू भिक्षु-आंबेडकरांनाही आम्ही असें हटकून विचारतों की ज्या गोष्टीसाठीं तुम्ही हिंदुधर्माची खोटीनाटी निंदा सतत करीत आलां आहांत तशाच प्रकारच्या खालीं दिलेल्या बौद्ध धर्माच्या भाकडकथा नि तुमचीं कृत्यें ज्या बुद्धिनिष्ठतेचा तुम्ही डौल मिरवितां त्या बुद्धिनिष्ठतेच्या कसोटीवर कशीं सार्थ्यतां तें सांगा पाहूं.

१) कर्ण हा कुंतीच्या कानांतून जन्म पावला ही दंतकथा सांगून आंबेडकरी प्रचारक हिंदूंच्या गुणांचो टिंगल करतात. परंतु बौद्धपुराणांत स्वतः बुद्धाच्याच जन्मासंबंधी जो खालील कथा दिलेली आहे ती मात्र ते कां दडवून ठेवतात ? बौद्धांतील लाखों लोकांची अशो श्रद्धा आहे की, गौतम बुद्धाचा जन्म अतिमानुष रीतीनें झाला. बौद्ध पुराणें सांगतात कीं बुद्धाच्या आअीला म्हणजे राणी मायादेवीला तिच्या पंचेचाळिसाव्या वर्षी कोणत्याही पुरुषाचा संपर्क झाला नसतांही गर्भ राहिला जगत् कल्याणार्थ तुझ्या पोटी दैवी तेजानें हा गर्भ राहिलेला आहे अशी आकाशवाणी तिनें ऐकली. तिला कोणतीही प्रसूतिवेदना वा क्लेश न होता या दैवी गर्भापासून जो पुत्र झाला तोच गौतम हा होय. गौतमाच्या जन्माच्या वेळीं

अनेक चमत्कार घडले, अंधळ्यांना दिव्य दृष्टी प्राप्त झाली, त्याचे दर्शनास जातां यावें म्हणून लंगड्या लोकांचे पाय खडखडीत बरे झाले. एका दिव्य ऋषीनें राजगृही येऊन भविष्य कळविलें की हें मूल एक अलौकिक पुरुष होईल.

बुद्धिनिष्ठेचा टेंभा मिरविणारे आंबेडकर नि त्यांचे अनुयायी हया भाकडकथेवरही विश्वास ठेवणारे आहेत का ? आणि अशा काही भाकडकथा बौध्द लोकांतही धार्मिक कथा म्हणून विश्वासिल्या जात आहेत एवढ्यासाठी बौध्दधर्म म्हणजेच एक भाकडकथा आहे असें म्हणतील काय ?

२) स्वत: डॉ. आंबेडकर येतां जातां मोठ्या डौलानें सांगतात आणि त्यांचे अनुयायी तें एक मोठें शतकृत्य समजतात कीं, त्यांनीं एकदा हिंदूंचा जो एक अभिजात धर्मग्रंथ ती मनुस्मृती जाळली होती. कोणत्याही धर्मपुस्तकाची एखादी प्रत जाळून टाकणें ही वस्तुत: बर्बरता आहे, तें अपकृत्य होय. शतकृत्य नव्हे. परंतु आंबेडकर ज्या अर्थी त्याला एक शतकृत्य म्हणून स्वत:च मिरवीत असतात त्याअर्थी त्यांना हेंही मानावेंच लागेल की जेव्हां मागे मुसलमानांनीं बौध्दांचा एकच ग्रंथ नव्हे तर सहस्रावधि ग्रंथ, नालंद विहारातील बौध्दधर्मीय ग्रंथालयेंच्या ग्रंथालयें जाळलीं, धम्मपदांना नि त्रिपीटकांना पायाखाली तुडवून, फाडून, जाळून राखरांगोळी करुन टाकली, आणि तीही एकदा नव्हे तर सिंधकाबूलपासून पूर्व बंगालपर्यंत बौध्द विहार दिसला की लाव आग नि जाळ ग्रंथ असा प्रळय मांडला होता, तेव्हा मुसलमानांची तीं कृत्यें आसुरी अपकृत्यें नसून, शतशत कृत्येंच होतीं ! आणि जर बौध्द ग्रंथ जाळण्याचे हे मुसलमानी अत्याचार–आम्ही त्याला अत्याचारच म्हणतों–शतकृत्यें म्हणून गौरवाई नसतील तर आंबेडकरांनी मनुस्मृतीची एक प्रत जाळली हयात कोणतेंही शतकृत्य केलें नसून एक अत्याचार केला हेंही त्यांस मानावें लागेल.

३) बुध्दधर्म देव-देवता, आत्मा, पुनर्जन्म आदि मानीत नाहीं असें आंबेडकर महारबंधूंना सांगतात. आणि म्हणून तो धर्म स्वीकारा असें उपदेशितात. परंतु जगतांत आज मांचुरियापासून ते हिंदूचीन (Indochina) पर्यंत महायान जे कोटीकोटी बौध्द लोक आहेत ते देव मानतात, इतकेंच नव्हे, तर त्यांनी बुध्दालाच देवाधिदेव बनवून ठेवलेलें आहे. आणि हिंदु धर्मांतील इंद्र, वरुण, लक्ष्मी, सरस्वती, यक्ष, किन्नर इत्यादी सर्व देवदेवतांनाही ते कोटीकोटी बौध्द मानतात, आणि गौतम बुध्दाला त्या सर्व देवदेवतांचा अधीश्वर म्हणून मानून त्याची प्रत्यही पूजाअर्चा आज बौध्द जगतांत चालू आहे. हें सत्य आंबेडकर पक्षीय कां दडपून ठेवतात ?

४) स्वत: बुध्दही पूर्वजन्म मानीत होते, कारण आपण पूर्वजन्मीं माणसांचेच नव्हे तर पशुपक्ष्यांचेही जन्म घेतलेले आहेत असें स्वत: गौतमबुध्द सांगत आणि

त्यांचे त्या त्या योनींतील त्या पूर्वजन्माचे इसापनीतींतील गोष्टीप्रमाणें वर्णन केलेले अनुभवही सांगत. बौध्दांच्या पवित्र धर्मग्रंथामध्यें बुध्दांनीं सांगितलेल्या हया त्यांच्या पूर्वजन्मांच्या गोष्टी जातकें म्हणून ध्येय मानलीं जातात. ही गोष्ट खोटी आहे काय ?

बौध्दांच्या हया भाकड धर्मकथांचे नि कर्मकथांचे गुन्हाळ सांगण्यापूर्वी जातां-जातां एवढें सुचवून ठेवतों कीं हिंदुत्वाच्या खऱ्या नि तर्कशुध्द व्याख्येप्रमाणें कोणाही बौध्देतर हिंदूनें बौध्दमत स्वीकारलें असतां त्यास धर्मांतर म्हणणे हीच मुळांत चूक आहे. तें धर्मांतर नसून संप्रदायांतर काय तें होईल. पण तें विधेंय पुढे यथास्थली विशदविलें जाईल. सध्यां आंबेडकरपक्षीय वृत्तपत्रांतून नि भाषणांतून योजिला जाणारा धर्मांतर हा चालचलाऊ बाजारी शब्दच त्यांना सहज समजावा एवढयासाठीं काय तो हया लेखांतून आम्ही योजीत आलों आहोत.

५) बुध्दाचा मोठ्यातला मोठा पराक्रम म्हणून जो हे बौध्द धर्माचे पक्षपाती भाट येताजाता सांगत सुटले आहेत तो म्हणजे हा कीं यज्ञयागांत ब्राह्मण क्षत्रियादि वैदिक धर्मीय जी पशुहत्या करीत असत ती बुध्दानें बंद पाडली. 'प्राणिमात्राची हत्या करूं नका, देवाच्या नांवानें यज्ञामध्यें तुम्ही पशूंना मारतां पण त्या पशूच्या मांसावर मात्र आपणच ताव मारतां हें कृत्य किती दुष्ट, निर्दय नि ढोंगीपणाचे आहे' असा कडक निषेध यज्ञांतील पशुहत्येविरूध्द स्वत: बुध्द आणि नंतर त्यांचे पीठाचार्य जो सतत करीत गेले त्यामुळें बुध्दानंतर मोठमोठाले यज्ञ असे झालेच नाहींत. पशुहत्या बंद पडली. प्राणिमात्रांना बुध्दांनी जीवदान दिलें ! आणि म्हणून हा हिंदुधर्म सोडा आणि अहिंसाप्रधान बौध्द धर्मात या असा टाहो हे पक्षपाती भाट आजही फोडीत आहेत. परंतु या प्रश्नाची दुसरी बाजू ते चुकूनसुध्दां उल्लेखित नाहींत ! यज्ञयाग हे प्रस्तुतकाळी आचरणीय आहेत कीं नाहींत हा प्रश्न अगदीं स्वतंत्र आहे. त्याची चर्चा इथे अप्रस्तुत म्हणून सोडून देतों. परंतु प्रस्तुत असलेल्या वरील पक्षपाती बुध्दस्तोमाविषयीं इतकेंच सांगणें पुरें आहे कीं प्राणिमात्राच्या दयेनें द्रवून बौध्द-धर्माच्या वरील विरोधापूर्वे देवाच्या नांवानें यज्ञातून पशुहत्या बंद झाली असें क्षण-भर गृहीत धरलें तरी बुध्दाच्या नांवाने भिक्षुसंघातून चाललेल्या पोटपूजपायीं लक्षावधि पशु, पक्षी मत्स्यादि प्राणिमात्रांची हिंसा बुध्दाच्या काळापासून तो अगदी आजच्या क्षणापर्यंत सहस्रावधि वर्षे चाललेली आहे त्याविषयी आंबेडकरपक्षीय जे अगदी मूग गिळून बसतात तें कां ?

बुध्दाच्या पूर्वीपासूनही यज्ञयाग, पशुहत्या, आणि मांसाशन यांचा निषेध करणारे आणि देवही न मानणारे पन्नास साठ पथ तरी भारतांत प्रचलित होते हें बौध्दग्रंथांतही उल्लेखलेलें आहे. 'अहिंसा परमो धर्म: ' हें बोध प्रत्यक्ष आचरणांत आणून सोडण्याचा प्रयत्न जैन धर्मीयांनी बुध्दाच्याही पूर्वीपासून चालविला होता.

तो किती साधला तें पाहण्याचें हें स्थल नव्हे. मांसाशनाच्या प्राणिहत्याविरोधक निषेधापुरतें पहावयाचें तर जैनधर्मानें तें व्रत आपल्या आचरणांतही पाळलेलें आहे हें मान्य केलें पाहिजे. त्याविषयींच्या त्यांच्या उपदेशांत आणि आचरणांत सुसंगति तरी होती. परंतु यज्ञांत देवाचे नांवे पशुहत्या करणे निंद्य आहे असें सांगणाऱ्या बुध्दानें पोटाच्या नांवाने पशुपक्षी मत्स्यादिकांची हत्या करण्यास अप्रत्यक्षपणें कां होईना पण विरोध केला नाहीं ही केवढी दांभिक विसंगति आहे पहा ! प्रत्यक्ष बुध्दाचा उपदेश असे कीं कोणीही बौध्दानें स्वतः प्राणहिंसा करूं नये. पण जर इतर कोणी पशुपक्षी मत्स्यादिक खाद्य प्राण्याला मारून त्याचें मांस शिजवून आणून वाढलें तर बौध्द गृहस्थांनींच काय पण भिक्षूनींही तें रुचिर अन्न खाण्यास कोणचाही धार्मिक प्रत्यवाय नाहीं ! सहस्रावधि भिक्षूंसह स्वतः बुध्द इतस्ततः प्रवास करीत तेव्हां गावागावांतील लोक त्यांच्या आहारासाठीं अनेक प्रकारच्या रुचिर मांसान्नांच्या राशीच्या राशी वाढीत, आणि बुध्दासह त्यांचे ते भिक्षुभिक्षुणीसंघ तें मांसाशन मिटक्या मारून खात. प्राणिमात्रांच्या दयेनें द्रवलेल्या बुध्दाची धर्मांज्ञा इतकीच आहे कीं प्राण्यांना अन्नासाठी मारा म्हणून तुम्ही आपण होऊन आणून दिलें तर तें निःशंकपणें खात जा. त्यात कांहीं अधर्म्य नाहीं. स्वतः चोरी करूं नका, परंतु चोरी करून आणलेल्या वस्तूंना त्या चोरी करून आणल्या आहेत हे धडधडीत दिसत असतांही त्यांना निःशंकपणें हडपण्यास नि दडपण्यास कांही एक प्रत्यवाय नाहीं असा उपदेश देण्याइतकाच हा बुध्दाच्या मांसाशनाच्या उपदेश अपराधी नाहीं काय ? पोटबाबूपणाचा नाहीं काय ? प्राणिमात्रांच्या दयेसाठीं यज्ञांतील होणारी हिंसा बुध्दधर्मानें बंद केली म्हणून डांगोरा पिटणाऱ्या बुध्दाच्या पूजकांनी हेंही सत्य सांगावयास हवें होतें कीं ज्या यज्ञान्तर्गत पशुहिंसेची बुध्दांनीं निंदा केली त्याच बुध्दाच्या सहस्रावधि भिक्षुसंघातील आयतोबा भिक्षूंचीं पोटें भरण्यासाठीं यज्ञांत मारल्या जाणाऱ्या प्राण्याहून दसपट पशु पक्षी, मत्स्य बुध्द जिवंत असतांही मारले जात असत. आणि हे सहस्रावधि भिक्षूंचे तांडे त्या पशूंचे ताजें ताजें मांसान्न मिटक्या मारीत खाण्याची प्राणिमात्रावर दया करीत असत. स्वतः बुध्द भगवानांचा अंत कोणत्या रोगानें झाला ? अजीर्णानें ! आणि तें अजीर्ण कशानें झालें ? तर अत्यंत वृद्धापकाळीं आपल्या अनेक भिक्षूंसह एका मोठ्या शिष्याकडे बुध्द भोजनास गेले असतां ताजें ताजें मटन म्हणजे डुकराच्या मांसाचें पक्वान्न तें त्यांना सांगून सवरून करण्यात आलें होतें तें त्यांनी नको इतकें खाल्लें. त्यामुळे अजीर्णानें असह्य व्यथा होऊन त्यातच बुध्दांना मृत्यु आला. त्या प्राचीन कालच्या गोष्टी सोडल्या तरी अगदी आजही प्राणिमात्रावर दया करणाऱ्या आणि त्या दयेच्या नांवें यज्ञसंस्थेची निंदा करणाऱ्या ह्या बौध्दधर्माचे चीन, जपान, मांचुरियापासून तो हिंदचीनपर्यंत पसरलेले कोटीकोटी अनु-

यायी, विशेषतः महायानपंथी अगदी उघड उघड खाटकांचीं दुकानें स्वतः थाटून प्रकटपणें लक्षावधि पशु, पक्षी, मत्स्य स्वतः मारून घरोघर त्यांचे ताजे मांसान्न खाताहेत. आणि त्यांत आपण बौध्दधर्माविरुद्ध कांहीं आचरण करीत आहोंत याची शंकासुद्धा त्यांना येत नाहीं. ते स्वतःला कट्टर बौध्दपंथीच समजतात. आजच्या ह्या बौध्दांच्या ' प्राणिमात्रांच्या दयेच्या कचाटयांतून पशु, पक्षी, मासे तर काय, पण खेकडे आणि उंदिरसुध्दा सुटलेले नाहींत. खेकड्यांचीं लोणचीं उंदरांच्या पिल्लांची लोणचीही उपाहार गृहागृहांतून इतर स्वादिष्ट पदार्थांप्रमाणेंच ह्या बौध्द देशांतून विक्रीस ठेवलेली असतात आणि आवडीनें पंक्तींत खाल्लीं जातात. आमचे वारकरी महारबंधु अशा ह्या बौध्दधर्मांत जाऊन प्राणिमात्रावर अशीच ' दया ' करणार आहेत काय ? आज हिंदुधर्मांत असलेले आमचे वारकरी महार नि वारकरी डोंबसुद्धा मांसाशनाच्या प्रकरणी, खऱ्या खऱ्या प्राणिमात्रावर दया करण्याच्या प्रकरणीं असल्या ढोंगधत्तुरी अहिंसेच्या भ्रष्टाकारापासून अितके अलिप्त आहेत कीं तें कोणच्याही प्रकारचें आणि दुसऱ्यानें मारलेल्या पशुपक्ष्यांचें सुध्दा मांस असें खात नाहींत ! अितकेंच नव्हे तर वारकरी पंथाप्रमाणें कांदा नि लसूण सुध्दां खात नाहींत. मांसाशन निषिध्द हें गृहीत धरलें तर आमच्या ह्या हिंदु वारकऱ्यांचेच आचरण अहिंसेचा डांगोरा पिटणाऱ्या बुध्दभिक्षूंपेक्षा शतपटीनें अधिक सुसंगत, प्रामाणिक नि सोज्वळ आहे.

६) बुध्दानंतर त्याच्या अुपदेशाच्या प्रभावानें पुन्हां मोठमोठे यज्ञ असे झाले नाहींत ही आंबेडकर पक्षीयांची विधानेंही निव्वळ थापेबाजी आहे. बुध्दानंतरच काय पण यज्ञयाग बंद पाडण्यासाठीं अशोकाने आपली सारी साम्राज्यशक्ति पणास लावून तो निधन पावल्यानंतरही मोठमोठे यज्ञयाग शतशत वर्षे भारतखंडभर धुमधडाक्याने चालू होते. अशोकाच्या राजधानींत त्याच्या निधनाच्या मागोमाग ग्रीकांना जिंकून आपलें साम्राज्य स्थापन करणाऱ्या ब्राम्हणकुलोत्पन्न सम्राट पुष्यमित्रानें अेक सोडून दोन यज्ञ साजरे केले. कलिंगांत आणि आंध्रांत राजसूयादी महायज्ञ होतच होते. शकांच्या परकीय आक्रमणापासून भारताला मुक्त करणाऱ्या क्षत्रियकुलावतंस गुप्त सम्राटांनीं अशोकाच्या राजधानींत अश्वमेधामागून अश्वमेध गाजविलेले आहेत. सम्राट् चंद्रगुप्त, समुद्रगुप्त, चंद्रगुप्त विक्रमादित्य; हूणांना पायबंद घालणारा सम्राट् स्कंदगुप्त या प्रत्येक सम्राटानें पाटलिपुत्रांत परकीय शत्रूंवर मिळवलेले आपले विजय अनेक अश्वमेध यज्ञ करून अुद्घोषित केले आहेत. हूणांतक यशोधर्मन् प्रभृति अनेकानेक क्षात्रियवीर अगदीं सातव्या शतकापर्यंत, म्हणजे बुध्दानंतर अुण्यापुऱ्या अेक सहस्र वर्षांपर्यंत, अश्वमेधादिक अनेक महायज्ञ करीत आले हें अितिहासप्रसिध्द आहे. यज्ञयागाची प्रथा, जी आज लुप्त झालेली आहे ती केवळ बुध्दाच्या अुपदेशामुळे झालेली नसून ती कालप्राप्त अशा

अनेक राजकीय नि धार्मिक कारणांमुळें झालेली आहे. बुध्दाच्या आधीं वैदिकांतच यज्ञसंस्थेविषयीं दोन मतें असत. 'प्लवाः ह्येते अदृढाः यज्ञरूपा' हे बुध्दपूर्व वैदिकांचेच वचन आहे, प्राचीन काळापासूनच भागवत धर्माची आणि भक्तिमार्गाची तशीच प्रवृत्ती होती. मुसलमानांच्या स्वाऱ्यांनंतरचा अराजकीय प्रळय हेंही यज्ञप्रथा लुप्त होण्याचें बलवत्तर कारण होतें. तथापि येथें तो विषय प्रस्तुत नाही म्हणून सोडून देऊं. अथें अितकेंच सांगणें पुरें आहे कीं बुध्दानंतर महायज्ञ असा झालाच नाहीं अशी विधानें डॉ. आंबेडकरांचा पक्ष जो ठोकीत आहे तीं बौध्दधर्माचें नसते स्तोम माजवितांना अितर प्रकारणीं जी त्यांनी थापेबाजी चालवली आहे तिचीच अेक निंदनीय बानगी आहे.

ब्राह्मण लोकांनी केवळ दक्षिणा अुपटण्यासाठीं आणि लाडू-जिलाब्या झोडण्यासाठी वास्तुपूजा, सत्यनारायणादिक व्रतवैकल्यांच्या पोथ्या खरडल्या; म्हणून तुम्ही हा पौराणिक हिंदुधर्म सोडून बौध्दधर्म स्वीकारा अशी दौंडी जी आंबेडकर त्यांच्या प्रचारकांकडून आमच्या पूर्वास्पृश्य हिंदुसमाजांत सारखी पिटत आहेत त्यांना आमचें आव्हान आहे की ब्राह्मणांनीं केवळ स्वतःच्या पोटपूजेसाठीं असल्या पोथ्या खरडल्या हे वादासाठीं गृहीत धरलें तरी भाबड्या लोकांची होणारी ही लुबाडणी बौध्द धर्मांत जाअून कशी टळणार ? कारण बौध्द धर्मांत ब्राह्मणांच्या दक्षिणेची निंदा करता करतांच त्या ब्राह्मण दक्षिणेहूनही आपल्या लक्षावधि आयतोबा आणि भिकमाग्या भिक्षूंच्या अुदरभरणाचा जो बोजा समाजावर बौध्दांनी टाकला त्यापायी होणारी समाजाची लुबाडणी ही शतपटीने अधिक होती. अेकवेळ 'दक्षणा' पुरवली पण ही ह्या भिक्षुकांच्या टोळधाडीची 'भिक्षणा' नको असें शेतकरी, व्यवसायी, व्यापारी अित्यादी समाजांतील कष्टकरी वर्गास होअून गेलें होतें. कारण हे सहस्त्रावधि, लक्षावधि, बौध्दभिक्षुभिक्षुणी आपापल्या टोळ्या करून देशभर भिक्षा मागत हिंडत. भिक्षूंना दान देणें, त्यांना मोठमोठे विहार बांधून देणें, अुत्तमोत्तम वस्त्रें देणें हा निर्वाणपदप्राप्तीचा अेकमेव राजपथ आहे अशा थापेबाजीनें बौद्धांच्या पोथ्या आणि प्रवचनें काठोकाठ भरलेलीं असत नि आहेत. ज्यांना कष्टावाचून पोट फुगेतो भरावयास हवें त्यांनी सरळ भिक्षू व्हावें असा धुमधडाका बौद्धकाळीं हया राष्ट्रात अुडालेला नव्हता का ? जर म्हणाल कीं त्या भिक्षूंच्या तांड्यांत सज्जन नि समाजसेवक भिक्षूही नव्हते की काय तर मग आम्ही विचारतों की यच्चयावत् ब्राह्मणवर्ग हा दक्षिणेसाठीच काय तो समाजास लुबाडत आलेला आहे असा अुलट्या काळजाचा सरसकट शिवराळपणा करणारे तुम्ही बौद्धभिक्षुंचे म्होरके तरी तो प्रश्न कोणत्या तोंडानें विचारूं शकतां ? स्वतःच्या डोळ्यांत मुसळ असतांना दुसऱ्याच्या डोळ्यांतील कुसळासाठीं जेव्हां तुम्ही त्याची टवाळी करूं जातां तेव्हां तुम्हांला लज्जा कशी वाटत नाहीं ?

७) वृक्षपूजेसंबंधी तुम्ही हिंदूंस हसतां. पण तुम्हा बौद्धांनी बोधिवृक्षाचें जें प्रस्थ माजविलेलें आहे त्याचें काय ? बोधिवृक्षाखालीं बौद्ध तत्त्वचिंतन करीत जेव्हां बसले तेव्हां त्या वृक्षाखालीं अनेक पशुही रवंथ करीत बसलेले असतील. आणि त्याच्या शाखांवर काळे नि घुबडें रहात असतील; पण त्यांना काही तत्त्वज्ञान झाले नाही. बुध्दाला तेवढें झालें, अर्थात् तत्त्वज्ञानबोधि प्राप्त करून देण्याचा कोणताही दिव्यगुण त्या झाडांत नव्हता. तें झाड कोणत्याही अितर वडासारखें अेक झाड होतें; मग त्याला भंपक नांव देअून तें झाड दहादां सुकून निर्जीव होत आलें असतां त्याखालीं शेकडो दुधाच्या घागरी ज्या तुम्ही बौध्द ओतीत असतां, त्याच्या फांद्या देशोदेशी नेअून लावून तो पवित्र वृक्ष म्हणून जे तुम्ही पूजीत असता आणि तो मूळ कधीच वठून गेला असतां त्याची कोणची तरी फांदी पुन्हा तेथेंच लावून बुद्धानें तपस्या केली तोच हा बोधिवृक्ष म्हणून यात्रेकरूंना तुमचे तेथील पुजारी भिक्षू जे शतकोशतकें सांगत आले आहेत त्यापेक्षां वृक्षपूजेच्या अधिक धर्मभोळेपणाचें अुदाहरण जगात तरी दुसरें कोठें सापडेल का ?

८) तीच गोष्ट पुनर्जन्मादिक निष्ठेची. अशा धर्मभोळ्या नि तर्कातीत निष्ठा आमच्या बौध्द धर्मात नाहींत अशा थापा तुम्ही ह्याविषयीं अगदीं अज्ञानी असलेल्या आमच्या महारादिक हिंदुबंधूंत जाअून मारीत आहां, पण बौध्द धर्मातही अशा निष्ठांचा किती बुजबुजाट झालेला आहे हें सिध्द करण्यासाठीं हें अेक अुदाहरणही देणें पुरें आहे.

तिबेटातील बौध्द समाजाचें जें आद्य धर्मगुरुपीठ आहे, त्याच्या धर्मप्रमुखास 'दलाअी लामा' म्हणतात. तोच तिबेटचा राज्यप्रमुखही असतो. त्याची निवड कशी करतात तें ठाअुक आहे का ? अेक दलाअी लामा मरतांच तो तिबेटांत कोठेंतरी तत्काळ जन्माला येतो अशी त्या बुध्दसंप्रदायाची निष्ठा आहे. म्हणजे पुनर्जन्म मानणारे बौध्दसंप्रदायही आहेत. नाहींत असें जें डॉ. आंबेडकरवादी म्हणतात तें त्यांचें अज्ञान तरी आहे, नाही तर थाप तरी आहे. दलाअी लामा मरतांच तो तत्काळ कोठें जन्माला आला तें हुडकून काढून त्या नवजात दलाअी लामास शोधून आणण्यासाठीं साऱ्या तिबेटांत लामाच्या कारभारी मंडळांतील निरनिराळे विरोधी पक्ष मूळचा दलाअी लामा ज्या क्षणीं मरतो त्या क्षणीं जन्मास आलेली मुलें कोठें सापडतात म्हणून साऱ्या तिबेटभर आपले निर्वाचक भिक्षु धाडतात. त्या दिनांकाला जितकीं मुलें जन्माला आलेलीं सापडतील त्या सर्वांना भिक्षूंचें कारभारी मंडळ अेकत्र आणवून त्यांची परीक्षा घेतात. मेलेल्या दलाअी लामाच्या आकृतीच्या आणि हस्तसामुद्रिकादिक अनेक लक्षणांच्या आधारें शेवटी जें मूल कारभारी मंडळ निवडील, त्या मुलास नवा दलाअी लामा म्हणजे तिबेटचा धर्मप्रमुख म्हणून निवडण्यांत

येतें. अर्थातच त्या कारभारी मंडळांतील भिक्षूंच्या निरनिराळ्या सत्तापिपासू गटांत आपापल्या वशिल्याच्या कुटुंबातील मुलालाच निवडलें जावें म्हणून तंटेबखेडेही होतात. कारण नवीन दलाई लामा म्हणून जें मूल निवडलें जातें तें वयांत येण्याच्या आधीचीं दहावीस वर्षे त्या सर्व धर्मराज्याचा कारभार पालक म्हणून हेच भिक्षूंच्या कारभारी मंडळाच्या हातींच असतो. धर्मगुरु निवडण्याची हयाहून भावडी, आंधळी आणि बहुतेक समयी भोंदूपणानें बुजबुजाटलेली पध्दति ती कोणती असणार ? म्हणूनच आम्ही म्हणतों कीं बौध्द धर्माचारांतही धर्मभोळेपणाचा नि धार्मिक भोंदूगिरीचा बुजबुजाट झालेला आहे.

[समग्र सावरकर वाङ्मय खंड ३ : निबंध पृष्ठे ६८४ ते ६९३. (हिंदू, दि. ८ नि १५ ऑक्टोबर १९५६) बौध्दधर्मातही भाकडकथा, भावडेपणा, भंगड अचार नि अनाचार इत्यादींचा बुजबुजाट झालेला आहे.]

विभाग सहावा

'अठराशे सत्तावनचे भारतीय स्वातंत्र्यसमर' हा स्वातंत्र्यवीर सावरकरांचा विख्यात ग्रंथ प्रसिध्द होण्यापूर्वीच जप्त करण्यात आला होता. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात 'गदर' पक्षाचे लाला हरदयाळ, पंजाबातील भगतसिंग व त्यांचे सहकारी नेताजी सुभाषचंद्र बोस आणि त्यांचे आझाद हिंद सेनेतील सहकारी वगैरेंनी या पुस्तकाच्या आवृत्त्या काढल्या आणि असंख्य लोकांनी हे पुस्तक लपवून छपवून वाचले. इतिहासकाराने क्रांतीचा इतिहास लिहिताना तिच्या मुळाशी असलेल्या तत्त्वाचे विवरण केले पाहिजे असे मत व्यक्त करून स्वधर्म व स्वराज्य ही १८५७ च्या क्रांतीमागची मूलतत्त्वे सावरकरांनी विशद केली आहेत. १८५७ चे स्वातंत्र्ययुध्द अयशस्वी का झाले याची सावरकरांनी केलेली मीमांसाही या विभागात समाविष्ट केलेली आहे. आयुष्याच्या अखेरच्या वर्षात सावरकरांनी हिंदू राष्ट्राच्या इतिहासातील सहा सोनेरी पाने कोणती हे सांगितले. हिंदुस्थानचा इतिहास म्हणजे पराभवामागून पराभवांची जंत्री हे मत सावरकरांना मान्य नव्हते. परशत्रूंना पराभूत करून स्वातंत्र्यलढ्यात जेव्हा जेव्हा हिंदूंनी विजय मिळविला तेव्हा तेव्हा इतिहासातील सोनेरी पान म्हणून त्याचा गौरव करण्यात आला असे सावरकरांनी या विभागातील अखेरच्या उताऱ्यात म्हटले आहे.

स्वधर्म नि स्वराज्य

धर्मासाठी मरावें, मरोनि अवघ्यांसि मारावें ।
मारिता मारिता घ्यावें, राज्य आपुलें ।। ... रामदास

अेखादें लहान घर बांधावयाचें असलें तरीही त्या घराचा तोल सांभाळला जावील अिसका भक्कम पाया बांधण्यात येतो. पाया भक्कम व घराच्या वजनाचा, तोल संभाळणारा असल्याशिवाय त्या पायावर अुभारलेलें घर हें पत्त्यांच्या तंबूहून जास्त भव्य व विशाल कधींही अुठविता यावयाचें नाही, हें अगदीं अशिक्षित मनुष्यासही समजत असतें. परंतु हे अगदीं मनुष्यालाही अवगत असणारें व्यवहारज्ञान विसरून जाअून जेव्हा अेखादा लेखक प्रचंड क्रांतिरचनेचा अितिहास देतांना त्या क्रांतीची ती भव्य व विशाल अिमारत तोलण्यास मूलभूत असणारा पाया कोणचा होता याची मीमांसा करीत नाहीं किंवा तें प्रचंड क्रांतिमंदिर अेखाद्या गवताच्या काडीवर अुभारलेलें होतें असें बरळत सुटतो तेव्हां तो बेडगळ तरी असतो, किंवा भामटा तरी असतो, व हचा दोहोंतून तो कोणत्याही विशेषणाला पात्र असला तरी अितिहासलेखनाच्या पवित्र कृत्यास तो सर्वथैव नालायक ठरतो.

मोठमोठाल्या धर्मक्रांत्या किंवा राज्यक्रांत्या यांच्या वरवरच्या स्वरूपास असणाऱ्या असंबद्धतेची किंवा विभिन्नतेची साखळी त्या क्रांत्यांचे मुळाशी असणाऱ्या तत्त्वांस समजून घेतल्याशिवाय कधींही जुळविता यणार नाहीं. अनेक चक्रें व अनेक लोहभाग यांनी युक्त असणारें अेखादें भव्य यंत्र प्रचंड शक्तीचीं कामें करीत असतांना ती शक्ति कोणच्या यंत्रशास्त्रीय नियमानें अुत्पन्न केलेली आहे हें पूर्ण

रीतीनें कळल्याशिवाय प्रेक्षकांमध्यें आश्चर्यानें अुत्पन्न होणारी विस्मयता अुद्भवेल. परंतु ज्ञानाने येणारी मार्मिकता मात्र कधीही आढळणार नाहीं. फ्रेंच राज्यक्रान्ति किंवा हॉलंडमधील धर्मक्रान्ति यांसारखीं अद्भूत कृत्यें जेव्हा वाचकांना व लेखकांना आपल्या भव्यतेनें चकित करतात तेव्हां त्या त्यांच्या भव्यतेनें गोंधळून जाअून वाचकांची दृष्टि व लेखकांची लेखणी ही त्यांचे मुलभूत असणाऱ्या शक्तींना विवरण करण्यास क्षजत नाही. परंतु या मूलशक्तींच्या विवरणाशिवाय त्या क्रांतींचें खरें रहस्य कधींही लक्षात येणारें नसल्यानें अितिहासशास्त्रांत नुसत्या विवरणापेक्षां मूलविवरणालाच अधिक महत्त्व दिलेलें आहे.

हे मूलविवरण करीत असतांना पुष्कळ वेळा अितिहास लेखकाची आणखी अेक चूक घडत असते. प्रत्येक कार्यास काही प्रत्यक्ष व काही अप्रत्यक्ष, काही विशिष्ट व कांहीं सामान्य, कांहीं आकस्मिक व कांहीं प्रधान कारणें कारणीभूत झालेलीं असतात, व त्यांचे वर्गीकरण करण्यांतच अितिहासकाराचें खरें कौशल्य असतें. परंतु पुष्कळ अितिहासकारांची या वर्गीकरणांत तारांबळ अुडून जाअून आकस्मिक कारणांनाच प्रधान कारणांचें स्वरूप देण्यात येतें व अेखाद्या घराला आग लागली असतां ती आग लावणाऱ्या मनुष्याचे अेवजीं त्याच्या हातांतील आगकाडीवर सर्व जबाबदारी लादणाऱ्या मूर्ख न्यायाधिशाप्रमाणें तो अितिहासकार हास्यास्पदतेला पात्र होतो. निमित्तकारणांनाच प्रधान समजून अेखाद्या अैतिहासिक प्रसंगाचा अितिहास लिहूं लागल्यानें त्या प्रसंगाचें खरें महत्त्व कधींही लक्षात येत नाहीं. किंबहुना ते अद्भुत व क्रांतिकारक प्रसंग असल्या क्षुल्लक कारणांकरितां घडले हें पाहून त्या प्रसंगांबद्दल व त्यातील व्यक्तींबद्दल अयथार्थबुद्धि अुत्पन्न होअूं लागत. यासाठी अैतिहासिक प्रसंगांचा व विशेषतः क्रांतिकारक प्रसंगांचा अितिहास लिहितांना त्यांचें नुसतें वर्णन देअून त्यांची बरोबर कल्पना देतां येत नाहीं किंवा त्यांचा अुगम त्यांच्या निमित्त-कारणापर्यंतच शोधून माघारें फिरल्यानेंही त्यांचें यथार्थ स्वरूप जाणतां येत नाही; तर ज्याला सत्य, निःपक्षपाती व मार्मिक अितिहास लिहावयाचा असेल त्यानें त्या प्रसंगांची व त्या क्रांतींची अुभारणी कोणत्या पायाबर केलेली होती, त्यांच्या मुळाशी काय तत्त्व होतें व त्यांचीं प्रधान कारणें काय होतीं यांचें पर्यालोचन अवश्य केलें पाहिजे.

प्रत्येक क्रांतीच्या मुळाशी कोणतें तरी तत्त्व असलेंच पाहिजें असें अिटलीचा प्रख्यात तत्त्ववेत्ता व देशभक्त मॅझिनी ह्याने कार्लाअिलच्या फ्रेंच राज्यक्रांतीवरील पुस्तकावर टीकात्मक लेख लिहितांना म्हटलें आहे. क्रांति म्हटली म्हणजे अितिहासातील मनुष्यजातीच्या आयुष्याची अुलथापालथच होय. लाखो व्यक्ति ज्यासाठीं झटतात, राजांचीं सिंहासनें ज्यासाठीं डळमळू लागतात, असलेले मुकुट फुटले जाअून नसलेले मुकुट ज्यासाठीं अुत्पन्न होतात, स्थापिलेल्या मूर्तीचा भंग व

नवीन मूर्तींची अुत्थापना हीं ज्यासाठीं होतात व ज्याच्यापुढें रक्ताचे पूर वाहविण्याची कांहींच कथा नाही, असे प्रचंड समूहांना वाटू लागतें अशा अेखाद्या क्षोभकारक तत्त्वाशिवाय दुसऱ्या कोणत्याही क्षुल्लक व क्षणिक पायावर क्रांतीची अिमारत अुभारली जाणें शक्य नाही. प्रत्येक क्रांतीच्या मुळाशी असणारें हें तत्त्व ज्या मानानें पवित्र किंवा अपवित्र असेल त्या मानानें त्या क्रांतीतील कार्यकर्त्या व्यक्तींची स्वरूपें व कृत्यें पवित्र किंवा अपवित्र ठरत असतात. हेतूंवरून कृत्यांची परीक्षा जशी व्यवहारांत केली जाते त्याचप्रमाणें अितिहासांतही व्यक्तींच्या किंवा राष्ट्रांच्या हेतूंवरून त्यांच्या कृत्यांचें स्वरूप ठरत असतें. ही कसोटी सोडून दिली असतां अेखाद्या व्यक्तीनें दुसऱ्या व्यक्तीला मारणें व अेखाद्या सैन्यानें दुसऱ्या सैन्याला मारणें ह्यांत कांहींच भेद राहणार नाहीं. साम्राज्यासाठीं झालेल्या शिकंदराच्या स्वाऱ्या व अिटलीच्या स्वातंत्र्यासाठीं झालेल्या गॅरिबाल्डीच्या स्वाऱ्या हया सारख्याच किंमतीच्या ठरतील. ह्या भिन्न कृत्यांचें यथायोग्य परीक्षण होण्यास जसा त्यांचा हेतू समजावून घेतलाच पाहिजे त्याचप्रमाणे प्रत्येक क्रांतीचें यथायोग्य विवेचन होण्यास तिचा हेतु काय होता, तिच्या अंतर्यामीची अिच्छा काय होती, कोणत्या तत्त्वांतून ती अुद्भवली होती हे अवश्य पाहिलें पाहिजे.

सारांश, अैतिहासिक क्रांतीच्या अितिहासलेखकानें त्या क्रांतींतील वरवर असंबद्ध दिसणाऱ्या प्रसंगांना किंवा तिच्या अद्भुततेला पाहून तिथेंच स्मितित होअून न बसतां तिच्या अुगमाकडे शोध करीत गेलें पाहिजे. अितकेंच नव्हे, तर त्या शोधांत भलत्याच व आकस्मिक निघालेल्या फाट्यांस सोडून अगदी मूलतत्त्वापर्यंत शोध लावला पाहिजे, व मग त्या तत्त्वाची दुर्बीण येअून त्या क्रांतीच्या विस्तीर्ण प्रदेशाचें निरीक्षण केलें पाहिजे. अशा रीतीनें आरंभ केल्यास अनेक असंबद्ध प्रसंगांत पूर्ण संबद्धता दिसूं लागते, वक्ररेषा सरळ भासू लागतात, व सरळ रेषा वक्र भासू लागतात. अंधकारांत प्रकाश दिसू लागतो व प्रकाशांत अंधकार दिसूं लागतो, नीचतेंत अुच्चता व अुच्चतेंत नीचता दृग्गोचर होते. विद्रूपतेंत सुरुपता व सुरुपतेंत विद्रूपता आढळते व अपेक्षित किंवा अनपेक्षित रीतीनें परंतु स्पष्ट स्वरुपानें ती क्रांति ही अितिहासाच्या दृष्टोत्पत्तीस येते.

[समग्र सावरकर वाङमय, खंड ८ वा, स्वातंत्र्यसमर विभाग. पृष्ठ २५-२७. स्वधर्म नि स्वराज्य.]

१८५७ च्या क्रांतीचीं प्रधान कारणें

जर काडतुसांची भीति नसती किंवा अयोध्येचें राज्य खालसा केलें गेलें नसतें तर १८५७ ची क्रांती घडली नसती. परंतु या समजाहून वेडगळ व भ्रामक असा दुसरा समज सांपडणें शक्य नाहीं. काडतुसांची भीति अस्तित्वांत आली नसती तरी क्रांति घडलीच असती. कारण त्या भीतीच्या मुळाशीं असणारें तत्त्व हें दुसऱ्या अेखाद्या प्रसंगांत दृग्गोचर झालें असतें व अयोध्येचें राज्य खालसा झालें नसतें तरीही हें क्रांतियुद्ध झालेच असतें, कारण त्या राज्याच्या खालसा करण्याच्या मुळाशी असलेलें तत्त्व आणखी दुसऱ्या अेखाद्या राज्याच्या खालसा करण्यांत प्रादुर्भूत झालें असतें. फ्रान्स देशांतील राज्यक्रांतीचें प्रधान कारण जसें धान्याच्या वाढलेल्या किंमती किंवा बॅस्टाअिल किंवा राजाचें पॅरिस सोडून जाणें, किंवा मेजवानीचा रंग हें नव्हे, तद्वतच वरील आकस्मिक व विशिष्ट प्रसंग हीं ह्या प्रचंड क्रांतीचीं प्रधान कारणें नसून केवळ निमित्तभूत निमित्तें होत. सीताहरण हें रामायणाचें जसें केवळ निमित्त झालें त्याचप्रमाणें वरील सर्व कारणें ही निमित्तें असून मुख्य प्रधान कारणें म्हटलीं म्हणजे त्यांच्या मुळाशीं असलेलीं तत्त्वेंच होत.....

..... हीं १८५७ च्या क्रांतीचीं प्रधान कारणें असलेली दिव्य तत्त्वें म्हणजे 'स्वधर्म व स्वराज्य' हीं होत. आपल्या प्राणप्रिय धर्मावर, भयंकर विघातक व कपट प्रचुर हल्ला आलेला आहे असें यथार्थ रीतीनें दिसूं लागतांच स्वधर्मरक्षणार्थ

जी 'दीन दीन' ही गर्जना सुरू झाली. त्या गर्जनेंत व आपल्या निसर्गदत्त स्वातंत्र्याला कपटीपणानें छिनावून आपल्या पायांत राजकीय गुलामगिरीच्या शृंखला घातल्या गेल्या हें पहातांच स्वराज्यसंपादनाच्या पवित्र अिच्छेनें त्या दास्यशृंखलेवर केलेल्या प्रचंड आघातांत या क्रांतियुद्धाचें मूळ आहे. स्वधर्मप्रीति व स्वराज्यप्रीति हीं तत्त्वें हिंदुस्थानच्या अितिहासांत जितक्या स्पष्टतेनें व अुदात्ततेनें दिसतात त्याहून अधिक कोणत्या अितिहासांत दिसणार आहेत? परकीय व आपमतलबी अितिहासकारांनीं त्या दिव्य हिंदभूचें चित्र कितीही घाणेरड्या रंगात काढलेलें असलें तरी जोपर्यंत आमच्या अितिहासाच्या पानांवरील चितोडचें नांव पुसलेलें नाही, सिंहगडचें नांव पुसलेलें नाही, प्रतापादित्यांचें नांव पुसलेलें नाही किंवा गुरु गोविंदसिंगाचें नांव पुसलेलें नाही तोपर्यंत ही स्वधर्म व स्वराज्याचीं तत्त्वें हिंदुस्थानच्या रक्तामांसांत खिळून राहणारीं आहेत! त्यांच्यावर क्षणभर गुलामगिरीच्या भ्रमाचे ढग येवोत–सूर्यावरदेखील ढग येतात–परंतु तो क्षण संपतो न संपतो तों त्या तत्त्वसूर्याच्या अुष्णतेनें ते वितळून जातील यांत मुळींच शंका नाहीं.

स्वराज्यासाठीं हिंदुस्थानने कोणचे प्रयत्न केलेले नाहींत व स्वधर्मासाठीं हिंदुस्थाननें कोणचें दिव्य अंगीकारलें नाही? "सूरा सो पचाजिये जो लढे दिनके हेत। पुरजा पुरजा कट मरे तबहू न छोडे खेत!" (गुरु गोविंदसिंह). अशा रीतीनें स्वधर्मासाठीं रणांगणावर तिळतीळ तुकडे झाले तरी ते हटत नाहींत अशा प्रसंगांनीं भरतभूमीचा अितिहास आपूर्ण भरलेला आहे.....

..... स्वधर्म व स्वराज्य यांचा परस्परांशीं अर्थाअर्थी संबंध नाहीं अशी तिदान पौर्वात्यांची तरी केव्हांही समजूत नव्हती. मॅझिनीच्या म्हणण्याप्रमाणें स्वर्ग व पृथ्वी यांच्यात अेक जंगी आडकाठी अुभारलेली नसून अेकाच वस्तूचीं हीं दोन टोकें आहेत अशीच पौर्वात्य मनाची पूर्वापार यथार्थ व परिपक्व समजूत आहे. आमची स्वधर्माची कल्पना ही स्वराज्याहून भिन्न नाही. ती दोन्ही साध्य-साधन नात्यानें संलग्न आहेत. स्वधर्माशिवाय स्वराज्य तुच्छ होय व स्वराज्याशिवाय स्वधर्म बलहीन होय. स्वराज्य ही अैहिक सामर्थ्याची तरवार स्वधर्म हचा पारलौकिक साध्यासाठीं सदोदित अुपसलेली असावी हा पौर्वात्य मनाचा कल अितिहासांत पदोपदीं आढळून येअील. पौर्वात्यांच्या अितिहासांत झालेल्या क्रांत्यांना धार्मिक स्वरूप कां मिळतें, किंबहुना धार्मिक पावित्र्य असल्याशिवाय व धर्मसंलग्नता असल्याशिवाय प्रचंड क्रांती होणें हें पौर्वात्यांच्या अितिहासाला मुळीच ठाअूक कां नाहीं याचें बीजही या धर्मांच्या विश्वव्यापक स्वरूपांतच आहे. हिंदुस्थानच्या अितिहासांत आजपर्यंत अखंडत्वानें व्यक्त होत आलेलें हें स्वराज्य व स्वधर्म यांच्या साधनसाध्यत्वाचें तत्त्व या १८५७ च्या क्रांतियुद्धांतही व्यक्त झालें यांत काहीं नवल नाहीं.

[समग्र सावरकर वाङमय, खंड ८, स्वातंत्र्यसमर विभाग पृष्ठे ३०–३२).

१८५७ अधील अपयशाचीं कारणें

येथवर १८५७ क्रांतीयुद्धाची चर्चा वारंवार केलीलीच आहे. त्यांतून अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यांपैकीं एक प्रमुख प्रश्न क्रांतियुद्धाची सर्व सिद्धता पुरी होण्यापूर्वीच अकस्मात् लवकरच क्रांतीचा उठाव झाला का ? हया प्रश्नांचें उत्तर स्पष्ट आहे कीं नाहीं ! तसें झालें नाही. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धांत जेवढी पूर्व-तयारी झालेली होती तेवढी तयारी कित्येक विजयी झालेल्या क्रांतीचे वेळींही झालेली नव्हती. शिपायांच्या पलटणीमागून पलटणी, राजेरजवाडे, प्रचलित सरकारचे वरिष्ठ अधिकारी, पोलीस, मोठमोठी शहरें, सर्व एका पाठोपाठ उठावाचीं वचनें देत असतां कोण बंडाला तत्काल प्रारंभ करणार नाहीं ? शिवाय, बहुतेक प्रसंगीं सुरवातीलाच अडचण असते आणि एकदा आरंभ झाला कीं, सर्व देश आपो-आप उठतो. हा अनुभव विचारांत घेतला तर हें स्पष्ट होईल कीं, क्रांतिकारकांच्या पुढाऱ्यांनीं उगीच घाई केली नव्हती. उलट असें म्हणावें लागेल इतकी अनुकूल परिस्थिति असताना उठाव करण्याचें धाडस ज्यांना होत नाहीं ते क्रांतीचा उठाव कधींही करू शकणार नाहींत !

मग असा प्रश्न पडतो की, त्यांचा पराभव कां झाला ? हया ग्रंथांत वेळोवेळीं त्या ठिकाणीं अनेक किरकोळ तत्कालिक कारणें सांगितलीं आहेतच. पण मुख्य कारण दिसतें ते असें की, हया क्रांतीसाठी विघातक भागाची जरी व्यवस्थित आखणी केली होती तरी त्यानंतर उत्पन्न होणाऱ्या परिस्थितीमध्यें कसें वागलें पाहिजे त्याविषयीं विधायक आकर्षक व सुव्यवस्थित आखणी केली गेली नव्हती. इंग्रजी सत्ता उखडून नष्ट करावी यावर सर्वांचें एकमत होतें; पण त्यानंतर काय ? पूर्वीचींच तीं परस्परविघातक भांडणें, पुन्हा तेच मोंगल, तेच मराठे आणि तींच जुनीं भांडणें – आणि अशा परिस्थितीला कंटाळूनच वेडाच्या झटक्यांत परक्या शत्रूंना आंत घेण्याची तीच जुनी पद्धत अवलंबावयाची असेल तर आपलें रक्त व्यर्थ कशाला सांडावयाचें असें सर्वसाधारण जनतेला वाटूं लागल्यास नवल काय ! त्यामुळें झालें काय, कीं क्रांतीचा विघातक भाग तेवढा यशस्वीपणें पार पडला; परंतु नंतर जेव्हा विधायक राजवटींचा प्रश्न उत्पन्न झाला तेव्हां आपापसांतील मतभेद, परस्परांविषयीं वाटणारी भीति आणि आत्मविश्वासाचा अभाव हें सर्व दुर्गुण उफाळून आले. क्रांतीनंतर जर लोकांच्या कल्पनेला व विचारांना पटेल असा आकर्षक कार्यक्रम ठेवण्यात आला असता तर क्रांतीनंतर होणारी स्वातंत्र्यवाढीची विधायक वृत्ति बळावून प्रारंभाप्रमाणेंच क्रांतीचा शेवटही यशस्वीपणें सिद्धीस गेला असता.

पूर्ण संहारानंतर निर्मिति चालू होते, दुष्टांच्या निर्दालनानंतर चांगली

राजवट चालूं करतां येते, येवढें जरी हया लोकांनीं नीट लक्षात ठेवलें असतें तरीही क्रांतीचा विजय झाला असता. नव्या निर्मितीचा विचार तर दूर राहिला, पण ती जनता परकीय राजवटीचा विनाशही पूर्णपणे करू शकली नाहीं ! यांचें कारण उघड आहें की हया देशांतून विश्वासघात आणि भीरुता हे दोन महान् दुर्गुण अजून पूर्णांशाने नष्ट झाले नव्हते. पराभवाचें मुख्य कारण म्हणजे ज्या लोकांना पूर्वीच्या कोणत्याही स्वदेशी राजवटीपेक्षां परकीय इंग्रजांची राजवट ही अधिक वाईट आहे हें कळलेंच नाहीं, आणि ज्यांच्या अंगीं स्वदेशी बांधवांविरुद्ध परक्यांना साहाय्य नाकारण्याइतकी देशभक्ति व प्रामाणिकपणा नव्हता त्या लोकांनी केलेला स्वदेशबंधूंशीं विश्वासघात !

आणि म्हणूनच हया पराजयाचें सर्व पाप असल्या विश्वसघातक्यांच्याच कपाळी फुटतें ! जर त्यांच्यापुढें स्वच्छ आणि आकर्षक ध्येय ठेवलें गेलें असतें तर हेच विश्वासघातकी देशभक्त बनले असते. कारण देशभक्तिच जेव्हा मिळकतीची लाभदायक वाटू लागते तेव्हा लज्जास्पद व धोकादायक विश्वासघात आपण होऊन कोण करण्यास धजेल ? विश्वासघातांत विशेष गुण कांहीं नसतो. स्वराज्यापेक्षा परकीय सत्ता अधिक वाईट व घातक असते हें लक्षात घेऊन त्यानुसार वर्तन करणाऱ्या वीरांना उज्ज्वल श्रेय लाभतें मग तें स्वराज्य लोकमतानुसार चालणारें असो (Democratic), राजमतानुसार चालणारें असो (Monarchial) किंवा अनायकानुसार चालणारें असो (Anarchial). स्वातंत्र्याची अभिलाषा केवळ देश संपन्न व सुखी व्हावा एवढयासाठीं नसते तर स्वातंत्र्यांतच आत्म्याला खरें समाधान प्राप्त होतें; नफ्यातोटयापेक्षां स्वत्वाची भावनाच महत्त्वाची असते. पारतंत्र्याच्या सोनेरी पिंजऱ्यापेक्षां जंगलात असलेलें स्वातंत्र्यच शतपट श्रेष्ठ होय ! सुभाषितकार म्हणतात—

फळें मधुर खावया असति नित्य मेवे तसे ।
हिरेजडित सुंदरी कनक पंजरीही वसे ॥
अहर्निश तथापि तो शुक मनांत दुःखें झुरें ।
स्वतंत्र वनवृत्तिच्या घडी घडी सुखातें स्मरें ॥

ज्यांना हें स्वातंत्र्याचें तत्त्व समजलें, स्वधर्माकरितां व स्वदेशाकरितां ज्यांनीं आपलें कर्तव्य पार पाडलें, स्वधर्म स्वराज्यासाठीं ज्यांनीं आपल्या तरवारी उपसल्या, आणि कदाचित् जयासाठी नाहीं पण कर्तव्यबुद्धीनें ज्यांनी मरणही पत्करलें, त्यांचीं नांवें चिरंजीव राहोत ! त्यांना शतशः सहस्रशः प्रणाम असोत ! केवळ मतभेदानें व अस्थिरबुद्धीनें ज्यांनीं वर अुल्लेखिलेल्या वीरांना सहकार्य केलें नाही त्यांची देशाला आठवणही राहणार नाहीं. आणि त्यांतूनही भयावह प्रकारें जे प्रत्यक्ष शत्रूलाच जाऊन मिळाले व स्वदेशबंधूंशींच शत्रूसह लढले त्यांचा शतशः नव्हे तर

सहस्रशः धिक्कार करावा तेवढा थोडाच होणार आहे ! १८५७ ची क्रांति म्हणजे हिन्दुस्थानची ऐक्याच्या, स्वातंत्र्याच्या व जागृत जनशक्तीच्या दिशेनें कितपत प्रगति झाली आहे हें पारखून पाहण्याची एक कसोटीच होती. अपयशाचा दोष ज्यांनीं देशाला पारतंत्र्यात ढकललें अशा नामर्द, आळशी व विश्वासघातकी लोकांवरच येतो. परंतु स्वतःच्या उष्ण रक्तात ज्यांनीं आपल्या तरवारी बुचकळून काढल्या, क्रांतीच्या त्या नाट्यप्रयोगांत अग्निमंचकावर धिटाईनें प्रवेश केला आणि साक्षात् मृत्यु पुढें उभा असता त्याची पर्वा न करता जे त्या मृत्युमुखांतही थयथय नाचले, त्यांना दोष देऊन कोणीही आपल्या जिभा विटाळूं नयेत ! ते वेडे नव्हते; ते उतावीळही नव्हते, झालेल्या पराजयांत त्यांचा कांहींही भाग नव्हता; ते अविचारी नव्हते; आणि म्हणून त्यांना दोष देणें केव्हांही उचित होणार नाहीं. त्यांनीं मारलेल्या हाकांनींच हिंदमाता आपल्या गाढ झोपेंतून जागी झाली आणि आपलें पारतंत्र्य नष्ट करण्यासाठीं ती धावून गेली. पण जेव्हां तिच्या कांहीं सुपुत्रांनीं जुलुमाच्या टाळक्यावर जबरदस्त प्रहार केला तेव्हांच, दुर्दैवानें तिच्याच कांहीं कुपुत्रांनीं तिच्या हृदयांत खंजीर खुपसला ! तो जखमी हिंदमाता जमिनीवर पुन्हां कोसळून पडली ! आता तिच्या दोन पुत्रांपैकी कोण क्रूर, विश्वासघातकी व तिरस्करणीय आहे ? आणि कोण वीर, साहसी, देशभक्त व आदरणीय आहे ?

दिल्लीचा बादशहा बहादुरशहा हा एक कवि होता. क्रांतियुद्ध अगदी ऐन रंगांत असतांनाच त्यानें एक गझल रचला होता, त्याला कोणीतरी विचारलें कीं—

दुमदुमाये दम नही अब खैर मांगो जान की
अय जफर अब ठंडी हुओ समशेर हिंदुस्थानकी

" दिवसेंदिवस व प्रतिक्षणीं तू थकत चाललेला आहेस, तेव्हां हे बादशहा, आतां इंग्लिशांपुढें पदर पसरून प्राणांची भीक माग. कारण आता हिंदुस्थानची तरवार कायमची बोथट व थंड झालेली आहे !"

असें सांगतात कीं, त्याला उत्तर देतांना बादशहा म्हणाला—

गाझियोंमें बू रहेगी जबतलक ईमानकी
तब तो लंडन तक चलेगी तेग हिंदुस्थानकी

" आमच्या वीरांच्या अंतःकरणात स्वत्वाचा आत्मविश्वास व देशभक्तीचा बिंदू शिल्लक असेल तोंवर हिन्दुस्थानची तरवार धारदारच राहील, आणि एक दिवस असा येईल कीं ती प्रत्यक्ष लंडनचे दरवाजे ठोठावील ! "

इतिहासांतील सोनेरी पान कोणतें ?

अितिहासाचें मुख्य लक्षण म्हणजे त्यांतील वर्णनांतील नि घटनांतील स्थल नि काल हीं जवळजवळ निश्चितीनें तरी सांगता आलीं पाहिजेत, आणि त्यांतील घटनांना परकीय वा स्कीय अवांतर पुराव्यांचें शक्यतों पाठबळ मिळत असलें पाहिजे.

अशा कसोटीस बहुतांशीं अुतरणारा आपला प्राचीन काळचा वृत्तांत हा बुद्ध कालापासून मोजतां येतो. यास्तव अनेक भारतीय नि पाश्चात्य प्राच्यविद्यावेत्ते आपल्या भारताच्या 'अितिहासा'चा आरंभ हया बुद्धकालापासूनच सध्या समजत आहेत. हया प्राच्यविद्यावेत्त्यांच्या सतत चालणाऱ्या परिश्रमामुळें आज आपण ज्याला पौराणिक काल म्हणतो त्यातलाही काहीं भाग नवीन संशोधन झाल्यास हया अितिहासकालांत समावेशिता येअील. पण तोपर्यंत तरी बुद्धकाल हाच आपल्या 'अितिहासा'चा आरंभ म्हणून समजणें भाग आहे.

त्यांतही कोणत्याही प्राचीन राष्ट्राचा निर्भेळ अितिहास निश्चितपणें ठरविण्याच्या कामीं तत्कालीन जगांतील तदितर राष्ट्रांच्या साहित्यादिक लिखणांत सांपडलेल्या अुपोद्बलक अुल्लेखांचा फार अुपयोग होतो. आज अुपलब्ध असलेल्या आणि निश्चितार्थ ठरलेल्या जगांतील अैतिहासिक साधनांमध्यें भारताच्या ज्या प्राचीन कालखंडाला असा भारतेतर राष्ट्रांचा सुनिश्चित साधनांचा पाठिंबा मिळतो तो आपल्या अितिहासाचा कालखंड सम्राट चंद्रगुप्ताच्या काळाच्या आगेमागेंच सुरू होतो. कारण अलेक्झांडरची स्वारी जेव्हा भारतावर झाली तेव्हांपासूनच्या ग्रीक अितिहासकारांच्या नि पुढे पुढें चीन देशांतील प्रवाशांच्या प्रवासवर्णनाच्या लेखांतून भारतांतील त्या त्या पुढील घटनांचे अैतिहासिक कसोटीस बव्हंशी अुतरणारे असे अनेक अुल्लेख सापडतात.

सोनेरी पान कोणतें ?

हया आपल्या अैतिहासिक कालांतील ज्या सोनेरी पानाविषयीं मी चर्चा करणार आहे तींच पानें काय तीं सोनेरी म्हणून निवडण्यासाठीं मी कोणची कसोटी वापरीत आहे ? तसें पाहता आपल्या हया अैतिहासिक कालांत काव्य, संगीत, प्राबल्य, अैश्वर्य, अध्यात्म प्रभृति अवांतर कसोटींना अुतरणारीं शतावधि गौरवार्ह पानें सापडतात. परंतु कोणत्याही राष्ट्रावर पारतंत्र्यासारखें प्राणसंकट, जेव्हा गुदरतें, आक्रमक परशत्रूच्या प्रबळ टाचेखालीं तें राष्ट्र जेव्हा पिचून गेलेलें असतें किंवा जाअू लागतें तेव्हां तेव्हां त्या प्रबळ शत्रूचा पाडाव करून नि

पराक्रमाची पराकाष्ठा करून स्वराष्ट्रास त्या पारतंत्र्यांतून मुक्त करणारी, त्या पारतंत्र्यांतून सोडविणारी आणि आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचें आणि स्वराज्याचें पुनरुज्जीवन करणारी जी झुंझार पिढी, तिच्या नि तिला झुंजविणारे जे धुरंधरवीर नि विजयी पुरुष, त्यांच्या त्या स्वातंत्र्ययुद्धाच्या वृत्तांताचें जें पान त्या पानास मी अिथे सोनेरी पान म्हणून संबोधित आहे. कोणत्याही राष्ट्रांत त्याच्या अशा परंजयी स्वातंत्र्ययुद्धाचीं अैतिहासिक पानें अशींच गौरविलीं जातात. अगदी अमेरिकेचेंच अुदाहरण पहा. रणांगणात अिंग्लंडला चीत करून ज्या समयीं अमेरिकेनें आपलें स्वातंत्र्य छिनावून घेतलें त्या विजयी दिवसालाच अमेरिकेच्या अितिहासांतील सोनेरी दिवस म्हणून सणासारखें गौरविलें जातें, आणि त्या युद्धाच्या अितिहासाचें पान हें अमेरिकेच्या अितिहासांतील सोनेरी पान गणलें जातें.

प्रत्येक मोठ्या नि प्राचीन राष्ट्रावर पारतंत्र्याचें संकट केव्हांतरी कोसळलेलेंच असतें

त्यांतही अमेरिकेच्या राष्ट्राचा जन्मच मुळीं कालचा ! म्हणून त्यांच्या टीचभर अितिहासांत त्यांच्यावर अेकच काय तें प्राणसंकट गुदरावें आणि तें निवारणारें अेकच काय तें सोनेरी पान असावें हयांत काही विशेष नाही. परंतु चीन, बाबिलोनियन, पर्शियन, अिजिप्शियन, प्राचीन पेरू, प्राचीन मेक्सिकन, ग्रीस, रोमन प्रभृति जीं पुरातन राष्ट्रें सहस्त्रावधि वर्षें नांदत राहिलीं त्यांच्या त्या विस्तृत राष्ट्रीय जीवनांत प्रबलतर परकीयांच्या आक्रमणाखालीं चेचले जाण्याचे अनेक प्रसंग त्यांच्यावर साहजिकपणेंच येअून गेले. तशा प्राणसंकटांतून त्यांतील कांहीं राष्ट्रांनीं आपल्या पराक्रमानें पुन्हां पुन्हां सुटकाहा करून घेतली. आणि त्यांच्या त्या त्या परशत्रूंना दातीं तृण धरावयास लावलें. सहस्त्रावधि वर्षें आपले राष्ट्रीय अस्तित्व नि प्राबल्य टिकवून धरणाऱ्या अशा राष्ट्रांच्या अितिहासांत वेळोवेळो पुनः पुन्हा स्वातंत्र्यसंपादनार्थ केलेल्या रणांगणांचीं नि त्यांत मिळविलेल्या वीजयांचीं अेकाहून अधिक अशीं सोनेरी पानें सन्मानिलीं गेलेलीं आहेत. भारताचा अितिहास तर त्या प्राचीनतम कालापासून आजपर्यंत अखंडपणें चालत आलेला ! त्याच्या प्राचीन काळांत भरभराट असलेलीं वराल बहुतेक राष्ट्रें नि राज्यें आज नामशेषसुद्धां होअून गेलेलीं आहेत. अेक चीनचें महान राष्ट्र तेवढें भारताच्या महनीयतेचें पुरातन साक्षी म्हणून आज अुरलेलें आहे

चीन आणि भारत ही दान्हीहा राष्ट्रें अति विस्तृत असल्यामुळें आणि अतिप्राचीन कालापासून सततपणें आजपर्यंत आपलें स्वातंत्र्य आणि सामर्थ्य टिकवून नांदत आलेलीं असल्यामुळे त्यांच्यावर अनेक वेळां अितर अल्पजीवी राष्ट्रांपेक्षां

अधिक प्रसंगी परदास्याची प्राणसंकटें कोसळलेलीं आढळतात यांत कांहीं आश्चर्य नाही. चक्रनेमिक्रमाचा अटळ नियम त्यांनाही होताच. हिंदुस्थानावर ज्याप्रमाणें शक, हूण, मोंगलादिकांच्या अनेक चढाया झाल्या त्याचप्रमाणें चीनवरही त्या आणि अितर परराष्ट्रांच्या अनेक चढाया झालेल्या आहेत. हूणांच्या प्रलयापासून बचाव करण्यासाठीं तर चीनने त्यांच्या राष्ट्राभोवतीं ती जगप्रसिद्ध तटबंदी, ती Chinese Wall बांधली होती. पण तिलाही वळसे घालून किंवा अुल्लंघून चीनच्या शत्रूंनी त्याला पादाक्रांत करावयास सोडलें नाही. बहुधा अंशतः पण कांहीं वेळा तर संपूर्णतः चीनही परकीय राजसत्तेच्या जोखडाखाली संत्रस्त होऊन पडलेला होता. तथापि त्या त्या वेळी ते महान राष्ट्र पुनःपुनः नवतेजानें नि चैतन्यानें अनुप्राणित होऊन त्या परकीय सत्तेला अुलथून पाडूं शकलें, आपलें जीवित, सत्त्व नि स्वातंत्र्य राखू शकलें, आणि आजही पुन्हां अेक स्वतंत्र नि सामर्थ्यशाली राष्ट्र म्हणून नांदत राहिलें आहे, हेंच खरें अैतिहासिक आश्चर्य होय! भारताच्या अितिहासाचें मूल्यमापन करताना या प्रकरणीं तोच मानदंड वापरला पाहिजे. परंतु विशेषतः अिंग्रजांच्या परकीय सत्तेखाली जेव्हा हिंदुस्थान दबला होता तेव्हां अनेक अिंग्रजांनीं भारताचा अितिहास अशा विकृत पद्धतीनें लिहिला आणि त्यांनीं काढलेल्या शाळामहाशाळांतून तरुणांच्या दोनतीन पिढ्यांकडून त्या विकृत अितिहासाची अितकीं पारायणें करून घेतलीं कीं, जगाचाच नव्हे तर आपल्या स्वतःच्या लोकांचाही त्या प्रकरणी बुद्धिभ्रंशच व्हावा. हिंदुस्थानचें राष्ट्र हें सतत हयां वा त्या परसत्तेखालीच दडपलेलें होतें; हिंदुस्थानचा अितिहास म्हणजे हिंदूंच्या पराभवामागून पराभवांचीच काय ती जंत्री आहे अशी धडधडीत असत्य, अुपमर्दकारक आणि दुष्ट हेतूंनी केलेलीं विधानें चलनी नाण्यांसारखीं परकीयांकडूनच नव्हे तर कांही स्वकीयांकडूनही बेखटक व्यवहारिलीं जात आहेत. त्यांचा प्रतिकार करणें हें स्वराष्ट्राभिमानाच्याच दृष्टीनें नव्हे तर अैतिहासिक सत्याच्या दृष्टीनेंही अत्यंत आवश्यक आहे.

[समग्र सावरकर वाङमय : खंड ४ : वाङमय विभाग : पृष्ठे ५८३–५८६]



विभाग सात

सैनिकीकरणाप्रमाणेच सावरकरांनी औद्योगीकरणाचा नेहमीच जोरदार पुरस्कार केला. देवभोळेपणा जसजसा घटत जातो तसतसा यंत्रशीलपणा वाढत जातो असे सावरकरांचे मत होते, युरोप आज अजिंक्य झाले आहे ते मुख्यतः यंत्रबळामुळे ! यंत्र हा शाप नसून विज्ञानाने माणसाला दिलेला तो वर आहे. बेकारीची समस्या यंत्रामुळे वाढत नाही तर संपत्तीच्या विषम वाटपामुळे वाढते. या विभागातील यंत्राची महती वर्णन करणारे दोन उतारे म्हणजे सावरकरांनी गायिलेली यंत्रयुगाची स्तोत्रेच आहेत.



यंत्र हें शाप कीं वरदान ?

आपला देश आज ज्या युगात प्रवेशूं लागला आहे तें युग युरोपमध्य दोनशें वर्षांपूर्वी चालू झालें म्हणजे युरोपच्या दोनशें वर्षें आपण मागें पडलेलों आहोंत. ह्या युगाचें अर्थशास्त्रीय नांव यंत्रयुग ! युरोपमध्यें हें यंत्रयुग दोनशें वर्षांपूर्वी जेव्हां बाष्पशक्तिप्रभृति शोधांमुळें आविर्भवलें, तेव्हा त्या यंत्रप्रभावाच्या धक्क्यासरशीं तिकडेहि त्या वेळच्या रूढ विचारांना नि आचारांना चक्कर आल्यासारखे होऊन गेलें. मनुष्यजातीवर हे यंत्रयुगाचें भयंकर संकट आलें आहे. त्यामुळें मनुष्य माणुसकीसच मुकल्यावाचून राहाणार नाहीं, धर्माचें वाटोळें होणार, मनुष्याचें जीवन यंत्रासारखेंच हृदयशून्य, कृत्रिम नि कलाहीन होऊन त्याचें शरीरदेखील दुबळें नि परतंत्र बनणार, फार काय, ज्या आर्थिक संपन्नतेच्या नि सुखसोयींच्या लालसेनें मनुष्य यंत्राच्या मागें लागला ती आर्थिक लालसाही यंत्राच्या चाकांत सापडून चूर होईल, ह्या यंत्रामुळे मनुष्य पोटभर खाऊपिऊं न लागता उलटा भिकेस लागेल; अशी एकच कोल्हेकुई त्या वेळच्या पुराणप्रिय स्थितींतील नि धर्मभोळचा अशा वर्गानें साऱ्या युरोपांत चालू केली होती. 'Back to Nature' हें त्यांचें सूत्र होतें. 'यंत्रामुळें बेकारी वाढते आणि मनुष्य भिकेस लागतो.' असे बुद्धे अर्थशास्त्री ओरडले. 'यंत्र ही सैतानाची युक्ति ! देवाच्या थोरवीस कमी आणणारी ही रावणी हाव !' धर्मशास्त्री किंचाळले !

न्यूनाधिक दोनशें वर्षांपूर्वी यंत्रशक्तीचा प्रबळ आविर्भाव युरोपांत झाला तेव्हां त्याचा असा जो विरोधच विरोध त्या लोकांमध्ये जिकडेतिकडे झाला, त्याचीच पुनरावृत्ति आज आपल्या या दोनशें वर्षें मागाहून, प्रगतीच्या त्या बिंदूवर येऊन पोचलेल्या लोकांत चालू झाली आहे. यंत्र हें मनुष्यास मिळालेलें वरदान

नसून शाप होय, अशी ही ओरड किती तथ्य वा अतथ्य होय हें विवेचिण्याच्या कार्यी आपणांस योजावे लागणारे कोटिक्रम आणि द्यावे लागणारे पुराव्ये युरोपच्या आजच्या जनतेला अगदीच शिळे आणि बुरसलेले लागतील; कारण कीं ते आक्षेप प्रत्याक्षेप, ते वाद-विवाद त्यांच्याकडे नामशेष झाल्यासही शेदीडशें वर्षे उलटून गेलीं आहेत. पण युरोपकडे आज अगदी शिळचा, अडाणी, बेडगळ ठरलेल्या त्याच त्याच आक्षेपांना अगदी नवीनांतील नवीन म्हणून ठिकठिकाणचे अनेक गांवढळ संप्रदाय आपल्या इकडे प्रचार करू लागले असल्यामुळें, यंत्रशक्तीवरील त्या आक्षेपांना खोडून काढण्यासाठी यंत्रनिष्ठ प्रगतीलाही युरोपमध्यें पूर्वी दिल्या गेलेल्या त्याच त्याच प्रत्युत्तरांची पुनरुक्ति करणें भाग आहे.

देवभोळेपणा घटतो त्या मानानें यंत्रशीलपणा वाढतो.

आपल्या लोकांत अजूनही यंत्रशीलपणा जो इतका कमी आहे त्याचें मुख्य कारण म्हणजे आमच्या समाजांतील देवभोळेपणा अजूनही उतास जात आहे, हेंच होय. दोनशें वर्षांपूर्वी युरोपही ख्रिश्चन धर्मानुसार असाच देवभोळा होता; तेव्हां त्यांतही यंत्रशीलपणा नव्हता. लिस्बनला मोठा भूकंप अठराव्या शतकांत झाला तेव्हां त्याचें कारण रोमन क्याथोलिक धर्ममतांविरुद्ध उभारलेलें प्रॉटेस्टंटांचें पाखंड हेंच होय, असे युरोपियन लोकांच्या मोठमोठ्या धर्मगुरूंनी नि सामान्य जनतेनें ठरविले. प्रॉटेस्टंट लोकांत भिक्षुणींनीं लग्ने लावलीं, पाद्री लोक बायका करतात, पोपच शब्द अस्खलनीय (infallible) नि शिरसावंद्य मानीत नाहींत, या 'पापा' मुळे भूकंप झाला, असे निदान ठरवून त्या धर्मभोळ्या लोकांनीं भूकंप होऊ नये म्हणून प्रॉटेस्टंटांचा नायनाट हा उपाय शोधून काढला. अशा देवभोळ्या वृत्तीला भूकंपाची, खरी भौतिक कारणें शोधण्याची बुद्धिच होणे दुर्घट; मग भूकंपाचे नियम समजावून घेऊन त्यांचे धक्के कधी वा कुठें बसणार ते आगाऊ सुचविणारें भूकंपसूचक यंत्र बनविण्याचें काम जन्मोजन्मीदेखील सुचणेंच शक्य नाहीं! युरोपमध्यें ही देवलसी वृत्ति हाणून पाडणारी विज्ञानवृत्ति जेव्हां अुगवली तेव्हांच काय ती त्या विज्ञानाच्या नियमांवर अधिष्ठिलेली यंत्रशीलता युरोपमध्यें भरभराटू शकली. पण हिंदुस्थानांत आजही अगदीं राष्ट्राचे 'सर्वाधिकारी' म्हणून गाजणारे गांधीजींसारखे अनेक पुढारीदेखील बिहारमधल्या भूकंपाचें कारण अस्पृश्यतेचें 'पाप' म्हणून 'आंतल्या दैवी आवाजाच्या' शपथेवर सांगत आहेत; आणि क्वेट्टाच्या भूकंपाचें कारण मनुष्यजातीचें कोणतें पाप असावें याविषयी या 'आंतील आवाजा'स कोल लावीत आहेत! – तर तिकडे शंकराचार्यादि धर्माचे सर्वाधिकारी ते भूकंप अस्पृश्यतानिवारणाच्या शापामुळें घडतात म्हणून शास्त्रांची शपथ घेअून सांगत आहेत! ज्या राष्ट्राचे सर्वाधिकारीच अितके धर्मभोळे त्या राष्ट्रांतील सामान्य जनतेच्या देवभोळ्या भाबडेपणाचें वर्णन काय करावें? युरोप-

मध्यें आज १९३६ वा सन चाल आहे तर आमच्या अिकडे प्रगतीचा १७३६ वा !

देवभोळेपणा म्हणजे प्रत्येक घटनेचें कारण देवाची लहर, राग वा लोभ. आणि त्या घटनांपैकीं संकटघटना टाळण्याचा अुपाय म्हणजे देवाला प्रसादविणें ! अर्थात त्याचें यंत्र म्हणजे प्रार्थना, पूजा, सत्यनारायण, जपजाप्य, छा छू ! पाअूस पडत नाहीं ? ऋग्वेदांतील मंडूक सूत्र म्हणून बेडूक देवतेस आराधा ! नौका बुडते आहे ? वरुणसूक्त जपून समुद्रास नारळ वहा ! प्लेग आला ? बहिरोबापुढे बोकड मारा ! नाहींतर 'अीडला' गाअीची कुरबानी करा; खुदा भला करेगा !

परंतु यंत्रशीलपणा हा, या सृष्टींतील भौतिक व्यापार ठराविक सृष्टिनियमांचे फलित होय, आणि जर त्या नियमाप्रमाणें आपण ते ते घटक जुळवून आणूं शकलों तर तें तें कार्य घडलेंच पाहिजे, ह्या निष्ठेवरच काय तो अधिष्ठानिलेला असणार. अमुक अंशापर्यंत पाण्याचे अुष्णतामान वाढविले की, त्याची वाफ झालीच पाहिजे, मग त्यावेळी तो यांत्रिक निमाज पढण्याचें विसरल्यामुळें अल्ला रागावलेला असो वा संध्या करण्याचे टाळल्यामुळे देव चवताळलेला असो. त्या ठराविक पाण्याची त्या ठराविक अुष्णतेचा स्पर्श होतांच ठराविक प्रमाणाची वाफ झालीच पाहिजे. देवानें का म्हणाना, पण जें सृष्टिनियम अेकदा घालून दिले त्यांत देवदेखील पुन्हा बदल करूं शकत नाहीं. आंब्याचे चार पेटारे भेटीस धाडले की आपल्या वतीचा निकाल देणाऱ्या अेखाद्या यःकश्चित कलेक्टरालाही आपण अन्यायी नि लाचखाअू मानतो, पण चार बोकड बळी न दिले की सगळ्या गावाला, त्यातील मुलांलिकरांसुद्धा प्लेगनें ठार मारण्याइतका भयंकर लाचखाअूपणा देवाच्या माथी मारण्यास जो सोडीत नाही तो धर्मभोळेपणा देवाच्या देवपणास खरा काळिमा लावणारा असून ठराविक सृष्टिनियम लाचलुचपतवारी देव कधींही बदलत नाही ही यथार्थ निष्ठाच जितकी सत्य तितकी धर्म्यही आहे. अशी विज्ञानजन्य निश्चिति हीच यंत्रशीलपणाची जननी असते. यामुळेंच लोकांतील देवभोळेपणा ज्या मानानें घटतो त्या मानानें विज्ञाननिष्ठ यंत्रशीलपणा त्यांच्यांत वाढतो.

नाना फडणविसांची अेक गोष्ट

वर अुल्लेखिलेल्या तत्त्वाचें अुदाहरण म्हणून पेशवाअीतील अेक लहानशी गोष्ट अगदी सांगण्यासारखी आहे. ज्याच्या अतुल बुद्धिबळानें हिंदुपदपादशाहीची सूत्रें त्याच्या हातीं टिकलीं तोंवर तरी 'जलचर, हैदर निजाम अिंग्रज रण करिता थकले ॥ ज्यांनी पुण्याकडे विलोकिले ते संपत्तीला मुकले ॥' असा मराठ्यांच्या सामर्थ्याचा दरारा यच्चयावत् अहिंदूंवर वसविला होता, त्या नाना फडणविसांची अशी अेक गोष्ट अैतिहासिक कागदोपत्रीं सांपडली आहे की– नानांनी अेकदां काशीस काही पुण्यकृत्य करावें या हेतूने कर्मनाशिनी नावाच्या तेथील नदीवर पूल

बांधविण्याचें काम चालू केलें. पण आरंभींच वाळू नि पाणी यांच्या अडथळ्यानें पाया काही टिकेना. ज्यांच्याकडे ते काम सोपविलें होतें, त्या काशीच्या हस्तकांनीं (गंगामाय प्रसादविण्याचा नि तिच्यावर पूल बांधून घेण्यास ती मान्य व्हावी म्हणून त्या रुसलेल्या गंगामायीला चुचकारण्याचा त्यांच्या परिपाठांतला जो ठराविक अुपाय तो योजून) ब्राह्मणांकरवीं तारीख ६-९-१७९५ या दिवशीं अनुष्ठानास आरंभ केला ! अनुष्टुपांची भर टाकून टाकून ते ब्राम्हण थकले, पण पाया घर धरीना. बिचाऱ्या ब्राह्मणांच्या तोंडचें पाणी पळालें, पण पायाखालचे पाणी पळेना, आटेना ! पायाखालीं वाळू नि पाणी याची अडचण आली आहे आणि ती निवारण्यासाठीं अनुष्ठानाचा अुपाय योजिला आहे, ही बातमी अिकडे नानांना जेव्हां पुण्यास कळली तेव्हां त्यांनी अनुष्ठान बंद करविलें आणि अिंग्रजांकडून बेकर नामक यंत्रज्ञ (अिंजिनियर) आणविला. त्यानें कळीचे बंब कलकत्त्याहून मागविले आणि ते लावून पाणी बोलतां बोलतां आटवून, वाळू आटवून पक्का पाया टाकून पूल अुभारला ! जलदेवतेची कळ जिथें पाहिजे तिथें दाबली जातांच ती झटकन शुद्धीवर आली ! धर्मभोळेपणाच्या अनुष्ठानानें जे भौतिक सृष्टिनियम त्यांच्या व्यापारांत लवलेश फरक होत नाहीं. पण त्या नियमांची जी 'कळ' त्यांना राबविणारें जें मंत्र ती कळ दाबतांच त्यांचें व्यापार हवे तसे चापून करून घेता येतात. देवाची अिच्छा ही संज्ञा यंत्रशास्त्राच्या कधीच खिसगणतीत नसते.

वरील लहानशा गोष्टींत देवभोळेपणा जसजसा घटत जातो तसतसा यंत्रशीलपणा वाढत जातो हे तत्त्व किती चटकदारपणें विशद झालें आहे ते पहा ! त्या जुन्या काळीं नानांना 'कळीचें' हे महत्त्व कळावें हें जितकें त्यांच्यासारख्या अेकटचादुकटचाच्या कुशाग्र नि प्रगतीपर बुद्धीचें घोतक आहे तितकेंच ती पाणी आटविण्याच्या बंबासारखी साधी कळ साऱ्या मराठी साम्राज्यांत न सापडता कलकत्त्याच्या अेका अिंग्रजाकडून आणवावी नि चालवावी लागावी ही गोष्ट आपल्या राष्ट्राच्या त्यावेळच्या अेकंदरीतल्या सामुदायिक अडाणीपणाच्या नि भाबडचा वृत्तीचेंच दर्शक नव्हे काय ?

वास्तविक पहातां यंत्रशास्त्राचा मूळ सिद्धांतच असा कीं, त्याच्या पाठांत (फार्म्युल्यांत) अीश्वराच्या अिच्छेचा वा धर्मशास्त्रीय पापपुण्यांचा वा ज्योतिषी शकुनाचा कोणताही घटक दमडीच्या अुधारीनेंही गणलेला नसावयाचा. अितका ऑक्सिजन, अितका हायड्रोजन, अितका उज्ज, मिसळला की पाणी झालेंच, मग तो संयोग शुभमुहूर्तावर घडो वा न घडो; बोकड न मिळाल्यामुळे बहिरोबा, किंवा अीदला गाय न मारल्यामुळें खुदा त्यावेळीं रागावलेला असो वा नसो; तें रसायन डुक्कर खाणारा ख्रिश्चन करो की न खाणारा मुसलमान करो, तें रसायन सिद्ध झालेंच पाहिजे. यंत्रशास्त्राचा मूळ सिद्धांतच असा देवभोळचा धर्मशास्त्राचा

ताठ विरुद्ध ! पण आश्चर्य असे की आमच्यांत ज्या कांहीं जुन्यापुराण्या यंत्राची माहिती आहे, जें कांहीं जुनेपुराणें यंत्रशास्त्र आहे त्यालाच आम्ही देवभोळ्या लोकांनीं धर्मशास्त्राच्या मांडीवर दत्तक देऊन टाकण्यास सोडलें नाहीं !

यंत्रशास्त्राचा अजस्त्र नि भक्कम पोलादी पुतळा धर्मशास्त्राच्या ठिसूळ लुकणाच्या पायावर अुभारण्याचा आमचा हा यत्न किती हास्यास्पद आहे म्हणून सांगावें ! घराचें आढें जर पक्केपणीं ठोकलें तर मग ते शकुनावर ठोकलेलें असो वा नसो, त्याची पूजा केलेली असो वा नसो, ते त्या आढ्याच्या शिल्पशास्त्रीय बळकटीपेक्षां अधिक वा अुणें ठरणें शक्य नाहीं. परंतु आढे ठोकताना त्याला समंत्रक पूजल्यावाचून त्या घराची शकुनावर मुहूर्तमेढ रोवल्यावाचून, वास्तुशांति केल्यावाचून आमच्या मनाला ते घर भक्कम झाल्यासारखें केव्हांही वाटणार नाहीं. महिनोगणती आम्ही या घरांत रहायला जाणार नाहीं, कारण वास्तुशांति झाली नाहीं ! आमचे मन आम्हास सारखे खात राहणार, भीत राहणार ! पण आमच्या हे ध्यानांत येईल की, मुहुर्ताला भीक न घालतां नि वास्तुशांत न करता अुभारलेले हिंदुस्थानातील अिंग्रजांचे राजवाडे, राज्य कार्यालयें, प्रवासी बंगले, गावच्या चौक्या देखील आमच्या तशा बांधकामाहून कधींतरी कमी बळकट ठरल्या आहेत काय ? किंवहुना अगदी सुमुहूर्तावर बांधलेले आणि वास्तुशांत शास्त्रोक्तपणे केलेले आमचे शनिवारवाडे आज ढासळून मातीस मिळाले असतां, विनशकुनी, विनवास्तुशांति, विनधर्मी अशा या अिंग्रजांची 'गव्हर्नमेंट हाअुसें' भक्कमची भक्कम ! त्यांचे ढेकुळदेखील, त्या अुणीवेनें म्हणून, ढासळत नाहीं ! अुलट त्या शास्त्रोक्त वास्तुशांत केलेल्या हिंदुपदपादशाहीच्या श्रीमंत पंतप्रधानांचे वा महाराजांचे वाडे, त्या वास्तु, 'अगदीच धुळधाण होअू देऊं नका, त्यावर स्मृतिपट तरी अेखादा लावा अशी हृदयद्रावक विनवणी करीत त्या अिंग्रजांच्या त्याच विनवास्तुशांत, विनमुहूर्ती, विनधर्मी, गव्हर्न्मेंट हाअूसच्या दारापुढें आम्हांस अुभे राहावें लागत आहे !

आम्ही आमचे सिंहगड, सिंधुगड, रायगड असले शेकडो प्रचंड दुर्ग; आणि मुसलमानी आणि त्यांचे दिवाणी आम नि दिवाणी खास आमच्या हिंदू आणि मुस्लिम शास्त्रानुसार शकुनवंती नि रमल पाहून, वेदांतील सूक्तें नि कुराणांतील आयतें निर्विघ्नतेसाठी मितीभितीवर कोरून चित्रून धर्मशास्त्रदृष्ट्या शक्य तितके बळकट केले, पण आज आढी पुजून पुजून मुहूर्तावर बांधलेले प्रचंड दुर्ग नि दिवाणखाने धुळीस मिळालेले आहेत ! परंतु शकुन, रमल, वेद, कुराण काय, तर प्रत्यक्ष देवासही न मानणाऱ्या Anti-God रशियाचे प्रचंड दुर्ग, ती विमानें नि वियानें अक्षरशः वाऱ्यावर देखील बळकटपणे तरंगत आहेत ! खरोखर, खडकावर बांधलेल्या आमच्या विशाळगडापेक्षा त्यांचे वाऱ्यावर बांधलेले विशाळगड आज अधिक बळकट ठरत आहे.

यावरून या जगातील भौतिक संपत्ति नि सामर्थ्य हें तरी भौतिक सृष्टिविज्ञानाच्याच अढळ पायावर अुभारलेलें असल्यास टिकतें, धर्मशास्त्रीय देवभोळेपणाच्या डोलाऱ्यांचे नि देव्हाऱ्यांचे विज्ञान अेका ठोकरीसरशीं ठिकऱ्या ठिकऱ्या अुडविल्याबाचून राहत नाही, हे स्पष्ट होत नाहीं काय ?

आणि विज्ञानाची व्यष्टि, व्यक्ति, म्हणजे यंत्र !

आगगाडीचें अिंजिन म्हणजें काय ? त्या प्रकरणी जे बाष्पगति–स्थिति–विज्ञानाचे ठाम सृष्टिनियम वैचारिक क्षेत्रांत होते त्यांची ती घनवटलेली मूर्तिच व्यवहारांत अवतरली ! जोंवर त्या ठाम नियमानुसार ते यंत्र घडलेलें नि चालविलेलें आहे तोवर आमच्या अिच्छेबाहेर त्या यंत्राला स्वतंत्र अशी अिच्छाच नाहीं. देवानें जर मनुष्य घडविला असेल तर त्या अर्थी मनुष्य हाच यंत्राचा देव म्हणावयास हरकत नाही. परंतु आमच्या देवभोळेपणाचा वेडगळ अतिरेक अितक्या थराला गेलेला आहे की, ज्याचा मनुष्य हाच वरील अर्थी देव आहे–त्या यंत्राला सुद्धां आम्ही आमचाच अेक देव मानू लागलों ! आजदेखील आमच्या लाखों लोकांत यंत्रांची नि हत्यारांची पूजा होत आहे !

यंत्रें तितकीं दैवतें ! जितकीं हत्यारें तितके देव !!

सुतार रंध्याची, गवंडी करणीची, सैनिक भालाबरचीची, गवळण रवीची, घरघणीण अुखळ–मुसळाची घरोघर पूजा करीत आहेत. बाळंतखोलीत केवळ सटवाअीचीच पूजा नसते, तर नाळ कापावयाच्या कातरीस देखील दैवतासारखी मांडून पूजावी लागते ! जणू काय त्या कातरीला स्वत:ची अशी अिच्छा लागते, राग-लोभ-मान-अपमान कळतात, आणि म्हणून त्या कात्रीला न तुष्टविल्यास ती रागानें नाळ कापायचें सोडून पटकन् बाळाचा गळाच कापणार आहे ! आता मात्र सटवाअीशीं अेक नवीनच तडजोड झाल्यासारखी दिसत आहे; ती ही कीं, घरच्या बाळंतखोलींत तेवढे सटवाईचे राज्य. तिये बाळंत झाल्यास कातर पुजणें प्रभृति जुन्या मानपानपूजा पार पडल्या पाहिजेत; पण सार्वजनिक प्रसूतिगृहात बाळंत झाल्यास तिथें त्या सगळचा गोष्टींची सटवाईनें सूट द्यावी, प्रसूतिगृहांतील कातर न पुजली तरी तिनें नि सटवाईने हुं की चू करतां कामा नये. प्रसूतिगृहांतील ती चकचकणारी डॉक्टरी चाकू–सुऱ्या आदि शस्त्रें पहातांच सटवाअीच गर्भगळीत होतेशी दिसते ! सारे मानापमान, ठोकरणाऱ्या प्रसूतिगृहांतील बाळंतपणाकडे ढुंकून बघायलादेखील ती भिते. तेथील बाळबाळंतिणी सटवाईचें काही एक लागत नाहीत ! न सोयर न कातरपूजा, न शांतिपाठ; पण तिथें बाळबाळंतिणींना अुगीच सतावण्याची सटवाईची काय छाती आहे ! तिची आठवणदेखील डॉक्टरी प्रसूतीगृहाचा अुंबरा ओलांडून आंत येत नाहीं.

युरोप जें आज अजिंक्य झालें आहे, तें मुख्यतः यंत्रबळें!

जोंवर युरोप असे आमच्यासारखेच देवभोळे होतें, तोवर तेही आम्ही आज आहों असेच दुबळे होतें. दोनशें वर्षांच्या आगेमागें, त्यांचा देवभोळेपणा हटत चालला तसतसे त्यांचें बळ, संपत्ती, साम्राज्य भरभराटत चाललीं. पण हिंदुस्थानच नव्हे, तर अवघा आशिया त्याच देवभोळेपणाच्या गुंगींत खितपत पडला; त्यामुळे विज्ञानाची वाट त्यास सापडलीच नाहीं. युरोप सृष्टिशक्तींना आपल्या प्रगतीच्या रथास घोड्यासारखे जुंपून भरधाव दिग्विजय करीत चालला असतां, आशिया त्या सृष्टिशक्तींना पूजीतच राहिला. त्यामुळें आशियात यंत्रशीलपणा असा आलाच नाही. पहा, गेल्या हजार वर्षांमध्यें हिंदूत काय किंवा मुसलमानांत काय, अेंकंदरीत वैज्ञानिक शोध असा अेकही लागलेला नाहीं! नवीन यंत्र असे, हत्यार असे, कळ अशी गेल्या हजार वर्षांत आम्ही जवळजवळ एकही उद्भवली नाही! साधी आगपेटी साधी चाकी (सायकल), साधें घड्याळ, साधा शिळाछाप, साधे छायाचित्र – पण युरोपनें शोधलें तेव्हां सुचलें. आम्हांस काही सुचलें नाहीं, हिंदु धर्मभोळेपणा नि मुसलमान धर्मवेडेपणाची नशा पिऊन झिंगून पडलेला. मुसलमानांच्या दिल्लीच्या बादशहाला शस्त्रवैद्य अिंग्रजांकडून मागवावा लागला, तर अेका पुलाखालचे पाणी आटवावयासाठीं हिंदुपतीच्या फडणिसाला अेक यंत्रशिल्पी–अेक अिंजिनियर अिंग्रजांकडून मागवावा लागला! मुसलमानांचे सारे देववेडे पीर, मुल्लाहकिम, गंडाताअीत जी व्याधी बरी करू शकले नाहींत, ती त्या अिंग्रज शस्त्रवैद्यानें बरी केली. अनुष्ठान, जपतपांनी जो पुलाचा पाया हिंदूंना घालता आला नाहीं, तो त्या अिंग्रज अिंजिनियरनें घालून टाकला! पण तरीदेखील अिंग्रजांच्या यंत्रशीलपणानें त्यांचें विज्ञान कसे वाढत चाललें आहे, त्यांची अेकेक कळ त्यांचे बळ कसे दुर्जय बनविते आहे हें त्यावेळी आमच्याकडे कोणाच्या लक्षांत यावे तसें झालें नाहीं. यंत्रविद्येचा ओनामादेखील शिकावयास कुणी युरोपमध्यें गेला नाहीं. जात जाते ना आमची समुद्र ओलांडल्यानें!

पण आमच्यांत सामर्थ्य असतांही आम्ही जगावर चालून गेलों नाही. याचें प्रायश्चित आम्हांस देण्यासाठीं जग आमच्यावर चालून आले. युरोपच्या अवाढव्य यंत्रबळाच्या कैचींत आमच्या राष्ट्राचा, स्वत्वाचा आमच्या अेका गोष्टीवाचून अितर साऱ्या गोष्टींचा चुराडा अुडाला! अेक गोष्ट तेवढी जी आमची म्हणून अजूनहीं टिकून आहे, तिला युरोपचें यंत्रबळही अजून चिरडू शकलें नाहीं, ती म्हणजे आमचा धर्मभोळेपणा! भौतिक संकटे निवारण्याचें, सृष्टिशक्तींना राबविण्याचें भौतिक सामर्थ्य संपादिण्याचें विज्ञान आणि साधन म्हणजे यंत्र हे अजूनही आम्हांस कळत नाहीं. अजूनही भूकंपावर अस्पृश्यता निवारण हा अुपाय, सर्व राष्ट्रीय अरिष्टांवर अनुष्ठान हा अुपाय, कोणी कमला नेहरू आजारी पडल्या तर त्यांच्या क्षयावर

प्रार्थना हा अुपाय, साथ घालविण्याला बोकड मारणें हा अुपाय; मशीनगन्सचा मारा थांबवायचा तर तिच्यापुढें तिच्या गोळ्यांच्या टप्यात शांतपणें बसून मरून जाणें आणि त्या मरणानें त्या मशिगनला दया आणणें हा अुपाय ! अजूनही आमच्या राष्ट्राचें देवभोळेपण सुटलें नाहीं. आणि म्हणूनच या नव्या यंत्रयुगाचें धीटपणें स्वागत करून युरोपच्या अजिक्य सामर्थ्याची ती किल्ली युक्तिप्रयुक्तीने फिरवून घेण्याच्या ठायीं हे लोक त्या यंत्रयुगासच अेखाद्या संकटासारखे भिअून भूतकाळाच्या भुयारांत अधिकच खोलखोल जाअून दडत आहेत ! यंत्रानें मनुष्य दुबळा होत आहे, यंत्राने मनुष्य भुका मरत आहे, अशी या देवभोळ्या लोकांची कोल्हेकुअी सारखी चालली आहे ! जणूं काय ज्याच्या टाचेखालीं आम्ही ठेचले जात आहो ते युरोप यंत्रबळाचे धुरीण, तें युरोपच दुबळें आहे, भिकेस लागलें आहे ! आणि आमचीं पाय्यांची पितरें सबळ आहेत ! हे अर्धपोटी, अर्धनग्न, दुष्काळग्रस्त, नि रोगग्रस्त आमचें राष्ट्र– यंत्रयुगाच्या शेदोनशें वर्षे अजून मागें रेंगाळत आहे, म्हणूनच बलिष्ठ नि सुखी नि संतुष्ट आहे !

या लेखाच्या आरंभीं पहिल्याच छेदकांत यंत्राविरुद्ध आमच्या जुनाट भाबडे–पणानें घेतलेल्या या आक्षेपांना अुल्लेखिले आहे. त्यांना शक्य तितक्या लवकर प्रतिकारलें पाहिजे. समाजकारणांत विज्ञानाचें वर्चस्व स्थापिले पाहिजे, तसेंच आपल्या राष्ट्राच्या अर्थकारणांतही त्याच विज्ञानाची पूर्ति जें यंत्र त्या यंत्राचें वर्चस्व स्थापि पाहिलेंजे.

कापडाच्या गिरण्या हे यंत्र; अर्थातच त्याच्यामुळे देशावर भयंकर संकट ओढवले आहे; त्या गिरण्यांतील कापड वापरूं नका ! अशी आरडाओरड गल्लोगल्ली चालली होती, चालली आहे. टकळी चालविणाऱ्या आत्मबळाच्या सेना 'टकळी' च्या प्रभावे जपानचें सारें यंत्रबळ तुच्छविण्यास सजल्या आहेत. केवळ चरख्याच्या चढाओढीनें लँकेशायरच्या नि साऱ्या जगातील गिरण्यांना कुलपे ठोकलीं जातील अशी प्रतिज्ञा करणाऱ्या सेनानीचा तांडाचा तांडा राष्ट्रीय सभेच्या अुच्चासनावर चरखे फिरवीत बसला आहे, आणि आतां त्याच्या जोडीला दळणकांडणाच्या यंत्राच्या संकटापासून या देशास रक्षावयासाठी कंबर कसून आलेल्या नव्या सेनानींचा तांडा त्या राष्ट्रीय सभेच्या अुच्चासनावर जाण्यानें हाती दळीत नि कुणी अुखळात तांदूळ हाती कांडीत व्यग्र झालेले आढळण्याचाही संभव आहे. अर्थकारणांतील या मंडळींच्या पक्षाची मुख्य हाकाटी म्हणजे 'यंत्र नको !'

धर्मशास्त्रांतील भाबडेपणाप्रमाणेंच या अर्थशास्त्रांतील भाबडेपणासही, आजच्या जगांत, ह्या यंत्रयुगांत जर जगावयाचे असेल तर, आपल्या राष्ट्रानें ठोकरून दिलेच पाहिजे. राष्ट्रीय प्रचाराचीं सूत्रें या देवभोळेपणाच्या, धार्मिक वा आर्थिक श्रुतिस्मृतिपुराणोक्ताच्या, या पुरातनाच्या हातून छिनावून घेऊन तीं

विज्ञानाच्या, अद्यतनाच्या हातीं दिलीं पाहिजेत. यंत्रयुगाविरुद्ध त्यांच्या चाललेल्या भावडचा हाकाटीची छाप ज्यायोगें राष्ट्रावर पडणार नाही आणि यंत्रबळाची माहिती ज्यायोगें राष्ट्रास पटून ते विज्ञाननिष्ठ होअील, यंत्रशील होअील, असा शक्य तितक्या नेटानें, निःस्पृहतेनें आणि निकडीनें आता आरंभिलाच पाहिजे.

यंत्र हें शाप कीं वरदान ?

यंत्राचें साधन मनुष्याच्या हातीं असल्यामुळे मनुष्याची हानिच हानि होत आहे, तो दुबळा बनत आहे, दुःखी बनत आहे, दरिद्री बनत आहे. यंत्र हा मनुष्य-जातीला शाप होय, अशी यंत्राविरुद्ध जे ओरड करतात त्यांनीं हें लक्षात ठेवावें कीं, यंत्र, हत्यार, कळ म्हणजे शतपटीनें अधिक कार्यक्षम झालेले मनुष्याचे अेकेक अिंद्रियच आहे ! कळ म्हणजेच अिंद्रियाची वाढलेली कार्यक्षमता. हत्यार म्हणजेच हाताहून दसहत्यारी असा आपला अेक जोड हात. यंत्रें म्हणजे आपल्या मूळच्या शक्तीपेक्षां लक्षपटीनें शक्तिमान झालेली आपली बहिश्चर अिंद्रियें ! जर हत्यार कळ, यंत्र नसते तर मनुष्य सृष्टिशक्तींवर आज चालवीत असलेली सत्ता चालवू शकता ना ! अितकें सांगणें म्हणजे यंत्रशक्तीच्या अुपयुक्ततेचें अगदी त्रोटक वर्णन होय. यंत्रावाचून, कळीवाचून मनुष्य या जीवनकलहांत जगूच शकता ना. कोल्हा, कुत्रादेखील त्याला भारी होता, फाडफाडून खाता ! मनुष्यास झालेल्या यंत्रबळाच्या साहाय्याविषयीं असें म्हटले तरी देखील अतिशयोक्ती होणार नाहीं कीं शरिरानें पाहिलें तर मनुष्य हा अत्यंत दुबळा, कळीनेंच काय तो प्रबळतम ठरला !

अरण्यांत मनुष्याला उभा केला तर त्याच्या स्वतःच्या देहाच्या बळें त्याला किती श्वापदांपुढें टिकाव धरतां येईल ते अेकदा कल्पून पहा ! सिंहासारखी नखें नाहींत, दंष्ट्रा नाहींत, दात नाहींत, नुसत्या गर्जनेनें सारे रान हादरून सोडील असा भीषण आवाजही नाहीं वाघाला तर म्हसरू मारण्यास जितकी दंतनखरें शिणवावीं लागतात, तितकी देखील या माणसाचा दुबळा कोवळा कंठ फोडून टाकण्यास शिणवावी लागणार नाहींत ! आपणापुढें जशी कोवळी काकडी तसा माणूस वाघापुढें ! मनांत येतांच कचकच चावून टाकावा. माणूस नुसत्या त्याच्या देहाअितका दुबळा, वाघास प्रतिकारील असा अेकही अवयव माणसास नाहीं. हत्तीपुढें तर माणूस म्हणजे मुंगी ! नुसत्या पायाच्या प्रचंड दाबाखाली चिरडावा किंवा त्या अजस्त्र शुंडेंत धरून दगडावर नारळासारखा आपटावा ! तरस, लांडगे, रानडुकरें यांच्यासुद्धां समोर अुभे राहण्याची त्याला छाती नाही; रानडुकराच्या दाताला प्रतिकारील असा त्याला अेकही अवयव नाहीं. मोठचा शिकारी कुत्र्याचीदेखील त्याला वाघासारखीच भीती वाटते ! माणूस चावला वा बोचकरू लागला तरी शिकारी कुत्रा अेका झेपेसरशीं माणसास फाडून काढण्यास सोडणार नाहीं. फार काय, अगदी दुबळी, दीन, निरुपद्रवी जी गाय तिची देखील

जर मनुष्याशी झुंज लागली तर तीच आपल्या शिंगांनीं त्याचे पोट बोलतां बोलतां फाडूं शकेल ! रानरेडे, रानबैल यांच्या त्या डुरकण्यासरशी माणसाला पळ काढण्या वाचून जगण्याचा दुसरा मार्गच नाहीं. लहान मधमाशी ! पण त्या माशा त्याला अेकदा का झोंबल्या, की त्यांच्या विषारी दंशाच्या भयंकर वेदनांनीं तडफडत माणूस मरून जातो, पण त्यांना कांहीं माणूस अुलट डसूं वा गिळूं शकत नाहीं, त्यांच्या मागें अुडू शकत नाहीं. कावळा देखील माणसाच्या रक्ताळ घावावर वा डोक्यावर पशूंवर मारतो तशा चोची मारून अुडून जाअून काव काव करीत माणसाला अुलट वेडावूं शकतो ! अजगर त्यास नुसत्या आपल्या अजस्त्र देहाचे वळसे घालून चरकासारखा पिळून काढतो. टीचभर फुरसें तें काय, पण त्याच्या पायाला कोठून कसें डसेल नि त्याला बोलतां बोलतां ठार मारील याचा नियम नाहीं ! समुद्रनदनद्यांमध्यें तर माणसाची दुर्दशा विचारायलाच नको ! आत पाय घसरला की माणूस सुसरींच्या नि मांसाहारी माशांच्या आहारी गेलाच म्हणून समजावें ! माणसाला मूळचें असे तीक्ष्ण सुळे नाहींत, पोट चिरून फाडून टाकणारी शिंगें नाहींत, कोंबडीची कोंबडी किंवा गवत, पाला, पाचोळा, रक्त, हाडें जें मिळेल तें पचवून टाकणारें पोट नाहीं, थंडी निवारील अशी लोकरीची शाल अंगीं नाहीं, किंवा राठ कातडें नाहीं. घारीसारखी दृष्टि नाहीं, मशकासारखे सुद्धा पंख नाहींत, गरुडासारखी क्रकचतीक्ष्ण चोंच वा कंठच्छेदक नखरें वा रक्तलिप्सु पंजे नाहींत, विषारी दांत नाहींत, दंश नाही, नांगी नाही. हिंदी लोकांना अिंग्रजांनीं निःशस्त्र केलें होतें त्यांच्या कितीतरी युगें आधी माणसाला सृष्टीनें निःशस्त्र केलें होतें ! वरिष्ठ श्वापदांहूनच नव्हे तर पक्षीमत्स्यमक्षिकांहूनही माणूस मुळांत पाहिलें तर केवळ अंगानें असा अत्यंत दुबळा आहे ! अक्षरशः गाअीहून गाय आहे !

पण तो आज या पृथ्वीतलावरतरी साऱ्या प्राण्यांचा राजा, शास्ता, जेता, होअून मिरवूं लागला; सृष्टिशक्तींशीच मल्लयुद्ध करण्यास दंड थोपटून ठाकला. बाष्प, चुंबक, विद्युत्, रेडियम यांना काही प्रमाणात तरी माणसाळवून त्यांच्या अजस्त्र बळावर समुद्र, पृथ्वी नि आकाश या मानवी जगताच्या तिही खंडांत दिग्विजय करीत चालला आहे. कशाच्या बळावर हा अगदी अत्यंत दुबळा माणूस अितका प्रबळ झाला ? कळीच्या, हत्याराच्या, यंत्राच्या ! ! !

त्याच्या अंगच्या पिसपिशीत बुक्कीला कुत्रादेखील भीक घालत नव्हता; पण ज्या दिवशीं माकड-माणसानें पहिला दगड अुचलून फेकला त्या दिवशीं त्याला अेक नवी बुक्कीच फुटली. दगड दुरून फेकायचा, त्या हत्यारासरशी माणसाची पिसपिशीत बुक्की कृतांताच्या बुक्कीसारखी असह्य बनून निराळी होअून अुभी राहिली. हातानें अुचलून फेकलेली किंवा ढकललेली शिळा म्हणजे 'कृतान्तस्य मुष्टिः पृथगिव स्थिता !' माकड-माणूस झाडांच्या फांद्या घेऊन पशूंचे कळप झोडपीत, साप, सापसुरळ्या, विंचू ठेचीत चालला. त्याचे विष न बाधणारे नवे हात

जे त्याला सापडले त्याच त्या फांद्या, त्या काठ्या, त्या लाठ्या, ते सोटे होत. माणसाला रानडुकरासारखे सुळें नव्हते त्याची अणीव भाल्यानें भरून काढली, रेड्यासारखे टक्करमारु डोकें नव्हतें, त्याने गदेचें डोकें टरकावून त्या साऱ्यांची खोड मोडून टाकली. सिंह, वाघ त्याला जेव्हां तेव्हां नखाग्रांनीं भेडसावीत; पण माणसाला बरची, खंजिरे, कट्यार, खड्गकृपाण असलीं भयंकर नखें फुटतांच वाघसिंह चळचळ कापू लागले ! कारण खड्ग म्हणजे आपले अेक वाढलेलें नखच नव्हे काय ? अितक्यांत माणसाच्या पाठीशीं धनुष्य नि बाण प्रकटला. सिंहाची झेप, वाघाची अुडी, हत्तीची सोंड, उंटाची अुंची, नव्हे त्या घार–गिधाड–गरुडांच्या चोचीदेखील आणि अुंच अुडणारे पंख– सारी प्राणिसृष्टि माणसाच्या त्या धनुष्याच्या टणत्कारासरशी कुणी चीं चीं करीत तर कुणी शेपट्या घालीत रानोमाळ पळून गेली. कारण जवळ आल्यावर ते लढणार, पण हा धन्वी ते चालून येण्याच्या आधींच त्यांचा कंठच्छेद करणार ! कवच ही माणसाची दुर्भेद्य त्वचाच होय. दुर्बीण हा शतपटीनें दर्शनक्षम नि सूर्यासही पाहतां न दिपणारा असा दुसरा डोळा. दूरध्वनियंत्र हा त्याचा शतपटीनें अधिक श्रवणक्षम झालेला नि मुंबईच्या मितीशी लावला असतां कलकत्त्याच्या वा लंडनच्या मित्राची हाक अैकणारा कान; आणि तो दारू, ती स्फोटकें, त्या गोळ्या, ती बंदुक, ती तोफ, तो विषारी धूर हाच पेटून बाहेर भडकलेला क्रोध ! ही चूल, ही वैद्याची भट्टी, हा स्टोव्ह म्हणजे मनुष्याच्या पोटातील जठराग्नीची अेकेक शाखा, अेक आवेल, जें पोटाला पचेना तें पचवून देणारी पोटें ! खल–अुखळ ही त्याची खालची बळकट दाढ. वरवंटा–मुसळ त्याची वरची दाढ; त्या दोन्ही आता प्रचंड आकार धरून वाफेच्या शताश्वशक्तीनें पूर्वी जसा अेक घास तो माणूस चावी, तसें सहजी धान्याचे पोतेच्या पोते एका चर्वणासरशी पिसून टाकतो. त्याचीं जुनी अिंद्रियेंच काय ती अशीं सहस्त्रपटीनें कळ–हत्यार–यंत्रबळें अधिक कार्यक्षम झाली नाहींत, तर माणसांत अुपजतां अंगीं जी मुळींच नसतात ती नवी अद्भुत अिंद्रियें यंत्रबळे त्याला लाभली आहेत !

लहानशा आडांत बेडूक राहतो तितकेदेखील त्याचे अंग मूळचें जलस्तंभक नाही. पण विज्ञानानें त्याला अकस्मात अेक अदभुत वरदान दिलें आणि कासवाहून कठीण, देवमाशाहून प्रचंड, सुसरींचीं सहस्त्रें ज्याच्या धक्क्यासरशी स्वतःच चक्काचूर होतात असा अेक प्रचंड अद्भुत जलदेह माणसास दिला– तें बेडर, ती पाणबुडी, त्या विनाशिका, त्या प्रचंड वणिक्नौका, बाष्पनौका, आगनावा, वीजनावा ! अेका मशकाअितके माणसाला वर अुडू म्हटले तर अुडतां येत नसे, मूळचा तो मशकाहून धूळबंद, पण विज्ञानास आराधीताच वेदकुराणांतील मोठमोठ्या ऋषिपीरपैगंबरांनाही मनुष्यास जे देववलें नाहीं असें वरदान माणसास मिळालें, आणि प्रत्यक्ष गरुडाच्या बापजन्मीं त्याने कधी पाहिले नसतील असे प्रबळ पंख मनुष्यास फुटले तें विमान, तें हे वियान !

ज्या ज्या सिद्धि, मोठमोठी जपतपें करून देवभोळेपणास मिळाल्या नाहींत किंवा कोणास मिळाल्याशा वाटताच तो अेक अत्यद्भुत, प्रत्यक्ष ओश्वरी नि विशेष कृपाप्रसादी मंत्रबळाची देणगी म्हणून वाटे, त्या त्याहून शतपटीनें अत्यद्भुत अशा सिद्धि आजच्या हाटांत पैशापासरीच्या भावानें यंत्रबळ लुटवीत आहेत ! अतिदर्शन, अतिश्रवण, ध्वनिलेख, बोलपटांतही (Telephone, Talkies) यांनी मनुष्यास अर्पिलेलें अतिस्मरण, महासमुद्राच्या तळाशीं खालीं अवगाहन, विरलस्तरांच्याहीबर आकाश अुड्डयन !

आणि हें सारें अद्भुत प्राबल्य खुदास वा जेव्होव्हास वा देवास दमडीचाही धूप लावण्याची लवलेश आवश्यकता त्या त्या प्रकरणी तरी नसता ! यंत्रानें मनुष्य दुबळा केला नाहीं; उलट दुबळा प्राणी जो होता तो माणूस आज पृथ्वीवरील, अंतराळातील महासागरांतील प्राण्यांत प्रबळतम जो झाला तो, हत्यार कळ यंत्र यांच्याचयोगें होय. मंत्रबळे नव्हे तर यंत्रबळें ! शाप नव्हे ! तर यंत्र हे मनुष्याला अतिमानुष करणारे विज्ञानाचें वरदान होय !

[समग्र सावरकर वाङ्मय : खंड ३ 'यंत्र', पृष्ठे ३८०–३९१]

यंत्रानें बेकारी वाढते

यंत्र हे मनुष्यास मिळालेला शाप नसून वरदान होय. मंत्रबळानें सृष्टिशक्ति मनुष्यास 'पावत' नसून त्या यंत्रबळानेंच मनुष्यास येतात तितक्या तरी गोष्टी राबविता आल्या आहेत. प्राणिसृष्टींत सर्वांत दुबळा नि अक्षरश: गायीहून गाय असलेला मनुष्यप्राणी हा आज जो सर्व प्राणिसृष्टीचा शास्ता नि सर्व प्राण्यांत सबल होऊन बसला आहे, तो हत्यार–कळ–यंत्र यांच्याच प्रादुर्भावामुळे होय; आणि यासाठीं आता आम्ही भारतीयांनीं या यंत्रयुगाचे मन:पूर्वक स्वागतच केले पाहिजे. अशा आमच्या प्रतिपादनाविषयी आपल्या शंका विचारण्यासाठी एक प्रामाणिक पण या प्रकरणीं अपक्व विचाराचे 'ग्रामसेवक' आम्हास भेटून गेले. त्यांनीं काढलेल्या शंका आजच्या ग्रामोद्धाराच्या काही अंशी उपयुक्त असणाऱ्या कार्यी खपत असलेली कितीतरी माणसें व्याख्यानांतून आणि लेखांतून काढीत असतात, आणि यंत्राच्या पाठीमागें लागला तर दुर्बळ व्हाल बेकार व्हाल तो पाश्चिमात्याची राजसी व्याद आपल्या सात्त्विक पौर्वात्य संस्कृतीच्या साधेपणाचा नाश करील इत्यादी विधानें सिद्धान्त म्हणून गांवोगांव पसरवीत जातात. आम्हांस भेटलेल्या या गृहस्थांच्या शंका अशाच साच्याच्या होत्या हे गृहस्थ डबल ग्रॅज्युएट' होते. अर्थात त्यांच्या शंका मूलत: किंवीही अतथ्य असल्या तरीही, विद्वानांनासुद्धां सहजी भुरळ पाडण्या इतक्या लाघवी असू शकतात हें उघड आहे. युरोपमध्यें यंत्रयुगाच्या आरंभी त्याच

प्रकारच्या शंकांनीं आणि आक्षेपांनीं मरेतों विरोध केला. आजही मधूनमधून त्यांची भुतें यत्र तत्र उठताना युरोपमध्येंही आढळत नाहींतच असें नाहीं. मग आपल्या अजूनही देवलसी भाबडेपणाच्या युगांतच खितपतणाऱ्या लोकांत लाखों माणसें त्या वरवर पाहणारास सहज सुचणाऱ्या नि सहज पटणाऱ्या आक्षेपांना बळी पडतात यांत काही आश्चर्य नाहीं. पण म्हणूनच त्या आक्षेपांकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. ते कितीही मूलतः विसंगत असले तरी त्यांची ती विसंगती उघड करून सांगण्याचें काम तुच्छ समजता कामा नये. कारण त्यास उत्तर दिलें जात नाही म्हणूनच ते निरुत्तर आहे असे सामान्य जनतेला वाटू लागतें, आणि यंत्राविरुद्ध असणारे लोकमत बळावत जातें.

हे वरवर सहजी सुचणारे आक्षेप वास्तविक पाहता किती पोळसर असतात तें दाखविण्यासाठी वरील गृहस्थांनी वरात वेळ समयिलेला खालील एक आक्षेप देऊं.

ते म्हणाले, 'यंत्र हीं तुम्ही म्हणता तशी मनुष्याची शतपटीनें स्वकार्यक्षम अशा बहिश्चर इंद्रियेंच आहेत हें जरी खरें धरलें तरीही मनुष्याची मुळचीं इंद्रियें नि त्यांच्या अंगची कष्टसहिष्णुता यंत्राच्या उपयोगाची कुबडी वापरीत राहिल्यामुळे पंगु होत जाते ही गोष्ट स्वतःसिद्ध नाहीं काय ? उपनेत्र (Spectacles) लावल्यानें डोळे अधू होतात; मोटारी, आगगाड्या इत्यादी वाहनांची भरमसाठ वाढ झाल्यानें स्वतःच्या पायानें लांबलांब पल्ले गाठण्याची शक्ती नाहींशी झाली. उठतां बसतां गाडी अशीच लागू लागली तर माणसाची साधी चालण्याची शक्तिसुद्धा पांगुळेल कीं काय अशी भीति वाटते ! यांत्रिक घणाचीं कामें चालल्यामुळें लोहारांचे कठीण दंड पिसपिशीत होत जाणार; यांत्रिक करवती, यांत्रिक शिलाई यांत्रिक विणाई यांच्यामुळे हस्तबळ, हस्तलाघव नि ते ते आनुवंशिक हस्तकौशल्य नष्टणार. यांत्रिक शेतीमुळें हातांनीं नांगर हाकण्याची वारवण्याची, कापाईची; पेरणीची, विणण्याची, सगळी सवय मोडणार. टंकन–मुद्रणामुळें हस्ताक्षरें बिघडलीं, हातीव नि रेखीव पोथ्यापुस्तकें लिहिण्याची कला नामशेष झाली, अशा प्रकारे इंद्रियें नि अंगें स्वतः अक्षम, निष्क्रिय आणि यंत्रविवश झाल्यामुळे जर मनुष्याला पुन्हा यंत्रावाचून राहण्याचा प्रसंग आला तर त्या सुधारलेल्या म्हणून म्हणविणाऱ्या माणसांची इंद्रियें नि अंगें मूळच्या यंत्रहीन रानटी माणसाहून कितीतरी दुबळीं झालेलीं दिसतील ! कुठे तो कडेपठार भरमध्यान्हो चढून जाणारा पोलादी देहाचा रानटी भिल्ल नि कुठे हीं मोटारीत बसल्याबसल्याच थकून जाणारी मर्दाड माणसें !'

यंत्राच्या नित्य उपयोगामुळें मनुष्याच्या अंगची काटकता नि इंद्रियशक्ति पांगुळते या अक्षेपाचा वरील उलगडा वरवर ऐकणारास जितका मार्मिक वाटतो,

तितकाच याची मार्मिकपणें छाननी करू जातांच भांबेडा ठरतो ! डोळा चांगला असतां त्यास ज्या अंतरावर नीट दिसतें त्याकरितां उगीच उपनेत्र लावणारा मूर्खच म्हटला पाहिजे. अशांची दृष्टि न जुळत्या उपनेत्रानें उलट मंदावते. किंवा चालतां यत असतांही कुबडी घेऊन फिरणाराची गति पांगुळते, हा त्या कुबडीचा किंवा उपनेत्रांचा दोष नसून त्या साधनाचा दुरुपयोग करणाऱ्या खुळचा अडाणीपणाचा आहे ! नेत्रांच्या मूळच्या दृष्टीला साहाय्य होतील तेच उपनेत्र. जे डोळ्याला दुरून दिसत नाहीं ते लक्षलक्ष मैलांवरील दाखविते तीच दुर्बीण ! तिचा उपयोग त्या कार्यी ती लावा. बाकीच्या वेळी डोळ्यांची मूळची दृष्टी अक्षुण्ण ठेवून अधिक तेजस्वी व्हावी म्हणून जे जे नेत्रव्यायाम करावयाचे ते करा. नुसत्या नेत्रानें वाचा. उपनेत्र तसे करू नका म्हणत नाहींत. दुर्बीण एकदा लावली की, डोळ्यास पापण्या सारखी नित्याची लगटून राहात नाहीं. तीच स्थिती मोटार–आगगाड्यांची. पूर्वीचे सहस्त्रावधी संतमहंत ऋद्धिसिद्धिबळेंसुद्धा हरिद्वारास जितक्या त्वरेनें कधीही सदेह जाऊ शकले नाहींत, तितक्या त्वरेनें चार रुपड्या फेकतांच वाटेल त्या साध्या माणसाला, देवाला तो पापी की पुण्यवान् हे नावापुरतेसुद्धा न विचारतां, ही मोटार, ही आगगाडी, हरिद्वारला नेऊन पोचविते. अशा प्रकरणीं तिचा योग्य तो उपयोग करून घ्या. मोटार कांहीं लोहचुंबक नव्हे, तुम्ही कांहीं लोखंडाचा तुकडा नव्हे, की एकदां मोटारीत बसले कीं पुन्हा कांहीं तितून तुम्हास उठतांच येऊं नये, सुटतांच येऊं नये ! मग तुम्ही तिचा योग्य तो उपयोग संपताच आपल्या पायांची मूळची गति नि काटकपणा वाढावा; त्यासाठीं प्रत्यही पायी फेरफटका का करीत नाहीं ? दऱ्याखोऱ्यांतून कडेपठारावर चढउतार स्वतःच्या पायावर करूंच नका अशी का मोटार वा आगगाडी चालविताना तुम्हांस शपथ घ्यावी लागते ? मुद्रणानें हाती पोथ्या लिहिण्याची शक्ति म्हणे नष्ट झाली ! पण पोथी छापली म्हणजे हाती प्रती करणे हा दण्डच अपराध कांहीं ठरत नाहीं. व्यासांनी सांगता गणेशजींनी महाभारत लिहिलें, पण एकच प्रत. ते कुल दैवी ठरलें पण हचा मुद्रणाच्या सिद्धिसरशी कोणतेही मूठभर साधे जुळारी प्रत्येक सकाळीं एकेका वृत्तपत्राच्या लाखलाख प्रति ताज्या ताज्या छापून फेकीत आहेत हे अशी ही सवाई दवी सिद्धि प्रत्येक माणसाच्या हाती आली असता जर कोणास जुना बोरू घेऊन जुन्नरी कागदावर सळईसूचि घेऊन ताडपत्रावर हाती वृत्तपत्र काढावेंसेंच वाटलें, किंवा ज्या वेळात बाष्पमुद्रणामध्ये महाभारताच्या एकटाको एक लाख सुंदर प्रति छापून टाकतां येतात, याच वेळात महाभारतीय एक अर्थी काय ती प्रत हाती लिहून काढण्याचीच हुक्की आली, तर त्याचाही हात कोण धरला आहे थोडाच ? छंद म्हणून ज्याला हवें त्यानें हातीच पोथ्या सुखेनैव लिहाव्या ! उन्हातान्हांतून नि पाण्यापावसापासून सुरक्षित राहता यावें म्हणून मोठमोठे वाडे मनुष्य बांधतो, पण जर कोणी म्हटले की, 'उन्हवारापाणी सहण्याची जी गृहहीन भटक्या अंदमानी

प्रमृति रानटी अंगांत शक्ती असते तो हचा गृहवासी लोकांत नाहीं. म्हणून घरें वाडे-बंगले हे सारे पाडून टाकले पाहिजेत, ते शाप आहेत, वरदान नव्हे !' तर त्याचें म्हणणें जितकें खुळेपणाचे तितकेच यंत्रावरील हे आक्षेपही खुळे आहेत !

The machine rides man ! असे म्हणून जे यंत्राचा अरेरावीपणा दाखवू जातात, त्यांच्या हें ध्यानांत येत नाहीं, की त्या आक्षेपानें यंत्राचा अरेरावीपणा व्यक्त न होतां माणसाचा अडाणीपणा काय तो वेशीवर टांगला जातो ! उद्या कोणी रडतराऊत जर माणसांना सांगू लागला की, 'अहो, घोडा हा पशु अगदी भयंकर निरुपयोगी आहे. त्याला कोणी पाळूं नये कारण मी त्याच्यावर स्वारी करावयास गेलों कीं तो घोडाच मजवर स्वारी भरतो !' तर त्या रडतराऊताच्या त्या आक्रोशानें जसा तो स्वतःच एक अडाणी भेकड नि मांडीचा कच्चा ठरतो, घोडा हा पशु एकंदरीत निरुपयोगी ठरत नाहीं, तशीच हचा अर्थशास्त्रीय रडतराऊतांची गोष्ट आहे ! मनुष्याच्या इच्छेबाहेर अशी यंत्राला कांहीं स्वतःची इच्छाशक्ति आहे की काय, की त्याच्या मनात येतांच त्यानें मनुष्याविरुद्ध बंड करून उठावें ! एक वेळ घोडा भडकेल, स्वतः चिडून मनुष्यास लहरीबारी लाथाडील, पण बिचारें यंत्र ! माणसाची इच्छा तीच त्याची इच्छा. त्याला माणूस ते प्रमाण, बनवील तसे होईल, चालवील तसे चालेल ! जर यंत्र कधीं माणसावरच स्वार होत असेल, जर खरोखरच कुठें The machine rides man असा उत्पात घडत असेल तर तें यंत्र माणसाच्या बोकांडी आपण होऊन बसते म्हणून नव्हे तर मनुष्य केव्हा त्यास डोक्यावर बसवून घेतो म्हणूनच होय ! आगगाडीच्या डब्यांत बसण्याचें सोडून कोणी गांवढळ जर तिच्या बंबात जाऊन बसला नि जळाला तर ती आगगाडीचा आगलावेपणा म्हणायचा काय ? यंत्रावरील सारे आक्षेप हे मनुष्य करीत असलेल्या यंत्राच्या दुरुपयोगावरील असतात. चुलींत नीट पेटविलेला अग्नि सैंपाक्यासारखा आपल्या कहचात राहतो; पण कोण्या मूर्खाने त्यास घरावर ठेवले तर घर जळतें ! हा अग्नीचा दोष नसून योजकाचा आहे. मोठमोठे पवत फोडून आपणांस वाट मोकळी करून देणारे बोगदे पाडण्याचे, खाणीच्या भुयारी रत्नभांडारातील रत्नाची रास आपल्या हाताशी आणून देण्याचे, ती वृत्रासुरानें लपविलेली जलें शोधून काढून खडकाळ भूप्रदेशांत पाण्याचे गोड प्रवाह आपल्या वापीकुंपांच्या हौदांत तुडुंब भरून देण्याचें अत्यंत उपयुक्त कार्य करणारी सुरुंगाची माळ जर कोणी आपल्याच पायाखाली पुरून नि पेटवून घेतली तर त्याच्या चिंधड्या उडविण्याचा दोष त्या सुरुंगाच्या युक्तीवर कांहीं लादतां येणार नाही ! तीच गोष्ट यंत्राची.

आमच्याशीं संभाषण करीत असणाऱ्या सद्गृहस्थांनीं प्रत्युत्तर केले, 'हें आपलें म्हणणें आम्ही पुष्कळ अंशी यथार्थ समजतों. परंतु यंत्राने मनुष्यमात्राची जी खरी हानि होणार आहे, ती तर यंत्रें तुम्ही म्हणतां तशीं अगदीं सदुपयोजिलीं

जाऊन जेव्हां सुरळीत चालू होतील तेव्हांच अत्यंत तीव्रतेनें जाणवू लागणारी आहे! समजा, सदुपयोग होऊं लागला, ती यंत्रें आपली कामें राक्षसी प्रमाणावर भराभर करूं लागलीं, आणि मनुष्य स्वश्रमें पदार्थ निपजवूं शकतो त्याहून सहस्त्रपटीनें अधिक परिमाणांत त्या त्या वस्तु यंत्रें निपजवूं लागलीं, कीं त्या त्या धंद्यांतील कामगार नि मोलकरी बेकार होऊन पडतील! आगगाडयांनी जशा बैलगाडया मारल्या नि बैलगाडीवाले बेकार झाले, गिरण्यांनीं एका दिवसात इतका कपडा विणला कीं, चरख्या-मागांवर तो विणण्यास वर्ष लागावें आणि त्यायोगें चरखा-मागांवर पोट भरणारे लक्षावधि लोक पोटापाण्याच्या धंद्यास मुकून जसे बेकार झाले तशीच स्थिती यच्चयावत् धंद्यांची होऊन सारी मनुष्यजाति काम नि कष्ट करण्याचें क्षेत्रच न उरल्याने बेकार होणार! शेतकऱ्यांचीच गोष्ट घ्या. आज कोटयवधि लोक गावागावांतून आपापले नांगर बैल घेऊन राबत आहेत; पोटापाण्यास कांहीं-तरी मिळवून बेकारीच्या भुतापासून स्वतःस कसेबसे बचावताहेत, पण समजा, उद्या प्रचंड यांत्रिक नांगर नि सामुदायिक शेती देशभर चालू झाली, तुमच्या त्या यंत्रांचा अगदी सशास्त्र सदुपयोग करण्यास मनुष्य शिकला आणि त्या यंत्राच्या साहाय्यें त्या सामुदायिक शेतीस एका खेडेगावांत एका दिवसात नांगरून पोखरून पेरून तीं यंत्रे संध्याकाळला मोकळी झालीं-तर तेवढयाच शेतीस नांगरण्या-पोखरण्या पेरण्यासाठी दोन दोन महिने जे शेकडो खेडवळ शेतकरी पूर्वी राबत असत ते बेकार होऊन नुसते हात हालवत बसणार नाहींत काय? कामच करावयास न उरल्यामुळें त्यांचें जीवन किती रद्दड, निष्क्रिय, नि नीरस होईल बरें! पोटाला अन्न नि अंगभर कपडा मिळवण्यासाठीं हस्तश्रम करण्यांत आज जे लक्षावधी शेतकरी, गावकरी आपल्या नांगरावर नि मागांवर मध्यमाशाप्रमाणें जीवनाचें संगीत गुण-गुणत वर्षाचे बारा महिने गुंगून राहिलेले असतात त्यांचा तो भरदार आयुष्यक्रम एकदम हया यंत्रांच्या दात्यांनीं पोखरला जाऊन बेकारीचा तो एकेक दिवस त्यांना एकेका वर्षासारखा जड जाणार नाहीं का? त्यात यंत्रें ज्या भांडवलदाराची असतील त्यांच्या हाती सर्व उत्पादन जाऊन हे शेतकरी, हे विणकरी, हे सोनार, हे लोहार हे शिंपी, हे न्हावी, हे बैलगाडीवाले, परीट, मोलकरी, भारेवाले, सुतार-ज्या ज्या धंद्यांना यांत्रिक शक्ती नि यांत्रिक युक्ति मोठया प्रमाणावर करूं लागेल ते ते सारेच सारे कोटयवधि लोक धंदा बसल्यानें बेकार नि उपाशी नि कष्टहीन आळशी स्थितींत सडत पडतील! 'यंत्रयुग-यंत्रयुग' म्हणून ज्याचें तुम्ही असें स्तोम माजवितां, ते जर तुमच्या अपेक्षेप्रमाणें खरोखरीच कधी भरभराटीस आले तर तें सार्वत्रिक बेकारीचेंच युग असणार!'

काम, काबाडकष्ट नि बेकारी हया तीन शब्दांची फोड

यंत्राची वाढ म्हणजे बेकारीची वाढ हया आक्षेपाची वरील ओरड किती निरर्थक अ हे हे स्पष्टविण्यासाठी आपण प्रथम काम, काबाटकष्ट नि बेकारी हे जे तीन महत्त्वाचे शब्द त्या आक्षेपांत यंत्रविरोधी मंडळी वारंवार त्यांच्या उलट सुलट अर्थाची एकच गल्लत करून उपयोजित असतात, त्यांची ती गुंतागुंत सोडवून हया तीन शब्दांचे तीन निश्चित अर्थ आपल्या या सध्याच्या लेखापुरते तरी प्रथमच ठरवून टाकू, म्हणजे आमचा युक्तिवाद एकमेकास पूर्णपणे पटला जरी नाही तरी निदान परस्परांस स्पष्टपणे समजेल तरी. काम म्हणजे आपल्यांला इष्ट तो आवडीचा उद्योग; काबाडकष्ट म्हणजे जे श्रम आपण आवडीच्या उद्योगांत आपण आवडीनें करतों ते श्रम नव्हेत; तर मनास नकोसे असताही निरुपायामुळे जे श्रम आपणास चरितार्थ वा सक्तीचे म्हणून करणे भाग पडतात ते. आणि बेकारी म्हणजे चरितार्थार्थ किंवा अन्य कारणामुळें आवश्यक असलेली प्राप्ति कमावण्याची संधीच न मिळणें. काबाड कष्ट करावे लागले नाहींत म्हणजे मनुष्य बेकार झाला असें नव्हे, तर मनुष्याला आवश्यक त्या वस्तू संपादिता येईनाशा झाल्या आणि त्यांना संपादिण्यासाठी जे आवश्यक ते सफल कष्टही करण्याची संधी त्याला मिळेनाशी झाली कीं तो मनुष्य खऱ्या अर्थानें बेकार झाला.

आतां वर निश्चयिलेल्या अर्थी यंत्रानें बेकारी वाढते की काय तें पाहणें सोपें आहे. यंत्रामुळें उत्पादन घटतें हा कांहीं यंत्रविरोधकांचा यंत्रावर आक्षेप नाहीं; किंबहुना त्यांचा आक्षेपच मुळीं हा आहे कीं यंत्रानें उत्पादन राक्षसी प्रमाणावर होतें. एक मनुष्य एका वर्षांत जितके सूत वा कापड चरख्यावर वा मागावर काढीत वा विणीत नाहीं, त्याच्या शतपटीनें गिरणी एका दिवसांत काढून, विणून गठ्ठा बांधून फेकून देते. लाकडी हातीव नांगर जितकी शेती एका दिवसात नांगरतो त्याच्या शतपटीनें अधिक शेती यांत्रिक नांगर त्याच वेळात नांगरू शकतो. वैज्ञानिक खतें, जलवायु प्रभृतींच्या साहाय्यें यांत्रिक नि सामुदायिक शेतीचें पीक शंभर शंभर पटींनें, खेडवळ शेतकऱ्यांच्या कसणीनें येणाऱ्या भुक्कड पिकापेक्षां पुष्कळ सरस नि सत्वर निघूं शकतें. टोळधाडीपासून फुटकळ नि खेडवळ शेतीचें रक्षण आज करता येत नाहीं; पण टोळनाशक रसायनें विमानांतून मैलामैलांच्या सलग टापूंवर शिंपडून यांत्रिक शेतीत टोळधाडीस निःपातिता येतें. यांत्रिक वाहतुकीच्या बळें दुष्काळग्रस्त प्रांतांत अधिक असेल तेथून धान्यादि वस्तु पोचविता येतात. एकंदरीनें पाहता मनुष्यास अत्यंत अवश्य त्या अन्न नि वस्त्र आणि त्याचप्रमाणे इतर वाटेल त्या वस्तु बिनयंत्री पद्धतीपेक्षां यांत्रिक पद्धतीनें लक्षलक्षपट अधिक प्रमाणांत उत्पादितां येतात, हव्या तिथे हव्या तेथून पुरविता येतात. तेव्हा अन्नवस्त्रादिक अत्यावश्यक वस्तूंचे वा विलासीय उपभोग्य पदार्थांचे उत्पादनसामर्थ्य

यंत्रशक्तीची जोड मनुष्यास मिळाल्यास पूर्वीहून सहस्रपटीनें वाढतें, घटणें तर शक्यच नाही, ही गोष्ट यंत्राचे शत्रूही मान्य करतात.

पूर्वीहून अगदीं थोड्या श्रमांत मनुष्याला सहस्रपटीनें अधिक अन्नशस्त्रादि आवश्यक वस्तूंचा नि उपभोगांचा पुरवठा जीं यंत्रें करतात, तीं मनुष्याची बेकारी वाढवितात असें म्हणणें किती विपर्यस्त होय. हें आतां सहज ध्यानांत येण्यासारखें नाही काय ?

समजा, एका कुटुंबांतील सहा कर्ती माणसें हस्तश्रम नि खेडवळ पद्धत याही वर्षभर सारखी खपून त्यांना तुटपुंजे अन्नवस्त्र कसेंबसें उत्पादिता येत होतें. त्यांनीं उत्कृष्ट यंत्र आणून तीच शेती नव्या वैज्ञानिक पद्धतीनें केली. त्यामुळें पूर्वीपेक्षां फारच थोड्या श्रमांत त्यांना पूर्वीहून दसपट धान्य नि वस्त्र उत्पादितां आलें म्हणजे पूर्वीहून ती माणसें श्रीमंत, सुखी नि संतुष्ट होऊन त्याविना त्यांचे वर्षाकाठीं कितीतरी काबाडकष्ट वाचले आणि त्यामुळें जर बहुतेक दिवस त्यांना सुखाच्या सुट्टीत घालवितां आले तर त्यांच्या या सुट्टीला 'बेकारी' का म्हणता येईल ? बेकारी म्हणजे काबाडकष्ट करूनही पोटास न मिळणें, आवश्यक वा उपभोग्य वस्तु न मिळणे. परंतु अन्नवस्त्रादि सर्व पदार्थांचा पुरवठा काबाडकष्टावाचून यथेच्छ होत असल्यामुळें काबाडकष्टांची आवश्यकताच न उरणें म्हणजे काही 'बेकारी' नव्हे ! उलटपक्षीं त्या कुटुंबास काबाडकष्टापासून सोडविणारी, सर्व उपभोग्य वस्तूंचा पुरवठा अल्पायासांत, न्यूनतर व्ययांत, दसपटीनें अधिक प्रमाणांत करून देणारी आणि त्यामुळे आपला बहुतेक वेळ काबाडकष्टांच्या त्रासांतून सुटल्यामुळे आनंदाच्या नि हौसेच्या इष्ट त्या त्या कामीं घालविण्यास मोकळा ठेवणारी, ही यंत्रसाहाय्यानें प्राप्त करून दिलेली परिस्थिती म्हणजेच खरी श्रीमंती होय !

आतां समजा, त्या कुटुंबाचे धनधान्यादिक उत्पन्न यंत्रबळें असें दसपटीनें वाढलें असताही जर त्याचा उपभोग त्यातील दोघे-तिघे भाऊच घेऊ लागले, आणि बाकीचे भाऊ नागवले; यंत्रें चालविण्यासही थोडेतरी मनुष्यश्रम जे लागणारच, त्यांचा सारा भार त्या नागवलेल्या भावांवरच टाकला गेला; या अन्यायामुळें त्या नागवलेल्या भावांना इच्छेविरुद्ध अधिक श्रम (म्हणजे काबाडकष्ट) करावे लागून त्या मानानें भरपूर अन्नवस्त्र न मिळून त्यांची पिळवणूक नि छळणूक होत राहिली तर तो दोष त्या यंत्रबळाचा ठरेल काय ? मुळीच नव्हे ! तो दोष यंत्राचा नसून असमान वाटणीचा आहे. यंत्राच्या योगें उत्पादन अत्यल्प श्रमात, न्यूनतम व्ययात, अत्यधिक प्रमाणांत वाढले. बस्स, येथें यंत्राचा संबंध, कार्य, दायित्व (Responsibility) संपलें ! त्या पूर्वीहून अत्यधिक आणि पूर्वीहून अति स्वस्त अशा अन्नवस्त्रादिक उत्पादनाचा योग्य तो तो वाटा योग्य त्या त्यां वाटेकऱ्यास जर न

मिळाला तर तो दोष यंत्राचा नसून वाटणीचा होय. त्या निष्पीडित भावांनीं, पिळणूक व छळणूक झालेल्यांनीं, ती वाटणी सुधारावी, अधिक उत्पादनांतील आपला योग्य वाटा मिळवण्यासाठीं त्या भागीदारांशी भांडावे–यंत्राशी नव्हे ! जी गोष्ट या कुटुंबाची तीच गोष्ट मानवी समाजाची.

बेकारी यंत्रानें वाढत नाहीं, तर विषम वाटणीमुळें वाढते ! आणि विषम वाटणीचा दोष यंत्राचा नसून समाजरचनेचा आहे ! !

यंत्रानें बेकारी वाढते असें म्हणणें म्हणजे पाऊस हवा तसा पडल्यानें दुष्काळ पडतो किंवा जेवावयास यथेच्छ अन्न असल्यामुळें उपासमार होते, असें म्हणण्यासारखाच वदतोव्याघात होय ! सर्व जगांत बेकारी आहे असे म्हणण्यांत अर्थ असा असतो कीं, मनुष्यमात्रास अन्नवस्त्रादिक आवश्यक वस्तूंचा तुटवडा पडलेला असून काबाडकष्ट करुनदेखील त्या उपार्जिता येत नाहींत. परंतु यंत्राच्या सम्यक् उपयोगानें वैज्ञानिक नि सामुदायिक कृषि केली तर अन्नवस्त्रांचें उत्पादन राक्षसी प्रमाणावर वाढू शकतें हाच तर यंत्रविरोधी लोकांचा यंत्रावरील मूळ आक्षेप आहे ! म्हणजे यंत्रामुळें मनुष्यजातीस यंत्रहीन स्थितींत होता त्याहुन ' राक्षसी ' प्रमाणांत अन्नवस्त्रादिकांचा अधिक पुरवठा मनुष्यास होऊं शकणार. फार थोडया श्रमात, काबाडकष्टांची सुद्धां आजच्या इतकी आवश्यकता न लागतां मनुष्यास भरपूर अन्नवस्त्रादि उपभोग्य पदार्थ मिळूं शकणार ! अर्थात यंत्राने काबाडकष्टांची आवश्यकताच न उरतां बेकारी नाहीशी होणार ! अन्नवस्त्र मिळत नाहीं म्हणूनच मनुष्य काबाडकष्ट करूं पाहतो; त्याला काबाडकष्टाची हौस असते म्हणून नव्हे. जर यंत्रामुळे ते अन्नवस्त्रादिक पदार्थ प्रचंड प्रमाणांत आणि आजच्याहून अगदी कमी मनुष्यश्रमानें उत्पन्न होऊं शकतात हे तुम्हीच तावातावाने प्रतिपादितां, तर यंत्रामुळें बेकारी वाढणें मूलतः व अशक्य आहे हें तुम्ही त्या म्हणण्यानेंच सिद्ध करतां. यंत्रानें सगळी कामे होऊं लागलीं म्हणजे कोणास नोकरीच मिळणार नाहीं, करावयास कामच उरणार नाहीं, ही भीति जी तुम्ही प्रदर्शवितां, ती मनुष्य हा काबाडकष्टासाठींच काय तो नोकऱ्या शोधीत भटकत आहे, अन्नवस्त्रादिक उपभोग्य पदार्थ त्यास घरबसल्या मिळाले तरीही तो नोकऱ्या शोधीत हिंडत फिरेल, अशी कांहींशी विक्षिप्त समजूत तुमची नकळत झालेली असते, म्हणूनच ही परस्परविरुद्ध विधानें केलीं जातात. यंत्रानें सर्व कामे होऊं लागून उत्पादन खूप वाढले तर नोकऱ्या मिळणार नाहींत हें खरें; पण त्याचें कारण असें की मनुष्याला आजच्यासारख्या काबाडकष्टांच्या नोकऱ्यांची आवश्यकताच उरणार नाही. थोडया श्रमात, त्याला आज मिळते त्याहून दसपट अन्नवस्त्रप्रभृति उपभोग्य वस्तू स्वस्तांत

हव्या तितक्या मिळूं लागल्यानें काबाडकष्टांच्या नोकऱ्या करण्याची पाळीच माणसावर येणार नाहीं. नोकऱ्या मिळणार नाहींत म्हणजे नोकऱ्या करण्याची आवश्यकताच उरणार नाहीं. काबाडकष्टावाचून आजच्यापेक्षां अधिक सुलभतेनें नि स्वस्ताईनें हवे ते उपभोग्य अन्नवस्त्रादि पदार्थ यंत्रबळें सामाजिक उत्पादन वाढल्याकारणानें प्रत्येकास मिळू लागतील ! हवी ती वस्तु काबाडकष्टाच्या नोकरीवाचून मिळत असल्यामुळें जर कोणीच नोकरी करीनासा झाला तर त्या स्थितीस काही 'सार्वत्रिक बेकारी' म्हणत नाहींत !

घरच्या एक कुटुंबाप्रमाणेंच एका राष्ट्राची स्थिति. त्या राष्ट्रांत यंत्रहीन स्थितींत त्यांतील सर्व लोकांना अन्न, वस्त्र, छत्री, घरदार, गाडया, सुऱ्या, शस्त्रें प्रभृति संसाराच्या अनेक वस्तूंसाठी दिवसा दहा तास खपावें लागे असें समजूं. आता त्या त्या वस्तूंना करणारी यंत्रें आणलीं, तेथील शेती, गिरण्या, कारखाने, नव्या विज्ञानपद्धतीनें यांत्रिक प्रमाणावर चालू झाले, तर त्यांचें उत्पादनही यांत्रिक प्रमाणांवर वाढणार. अन्नवस्त्र, बूट, छत्री प्रभृति त्या त्या साऱ्या वस्तू पूर्वीपेक्षा दसपटीनें अधिक प्रमाणांत, दसपटीनें कमी व्यापांत नि श्रमांत नि म्हणूनच दसपटीनें स्वस्तांत मिळू लागतील. त्यांच्या आवश्यकता अशा प्रकारें भागू लागल्यानें पूर्वीचे काबाडकष्टही दशांशाने कमी होतील. त्यामुळे उरलेला वेळ आपापल्या हौसेच्या कामांत तरी जो तो स्वेच्छेनें घालवील, किंवा विसाव्यांत घालवील. कांहीं झाले तरी त्या त्या वाढलेल्या रिकामपणास बेकारी वाढलेली आहे असें कोणी म्हणणार नाहीं !!

नसते दोष यंत्रावर लादतां येत नाहींत

आता त्या राष्ट्रांत यंत्रबळें असे दसपट अन्नवस्त्रप्रभृति पदार्थ उत्पन्न होऊनही जर ते त्यांतील कांहीं व्यक्तींना मिळाले नाहींत तर तो दोष यंत्राचा का म्हणावयाचा ? पूर्वी मिळत होते त्यापेक्षा दसपट अन्नवस्त्र, त्यापेक्षा कमी काबाडकष्टांत जर उत्पादिले जात आहे, तर यंत्राने त्यातील प्रत्येक व्यक्तीस पूर्वीपेक्षां दसपटीनें सुखी केलें आहे असेंच म्हटलें पाहिजे, बेकार केलें असें नव्हे. येथे यंत्रांचें कर्तव्य संपले. दसपटीने अधिक अन्न उत्पादिलें असतांही काही माणसें इतरांकडून नागवली गेली किंवा दसपट सुखी न होतां भिकारी झालीं, तर तो दोष समाजरचनेचा म्हटला पाहिजे. तीं यंत्रे समाईक ठेवा, ते यथेच्छ उत्पादिलेले अन्नवस्त्र समान प्रमाणांत प्रत्येक व्यक्तीला वाटून द्या, ते कमी लागणारे काबाडकष्ट विशिष्ट वर्गाच्याच डोक्यावर न लादतां सर्वांकडून करून घेऊन सर्वांचाच भार हलका करा. पूर्वीपेक्षा रिकामा राहणाऱ्या वेळांत सर्वांनाच अधिक सुट्टया नि कमी श्रम भोगूं द्या. काबाडकष्टावाचून वाचलेला नि सक्तीचे काम नसलेला वेळ ज्याला त्याला आपल्या लहरीप्रमाणे काव्य कला, व्यायाम, वाचन, परोपकार, इतर उद्योग, शोध-

संशोधन, करमणूक, कसरती, यथा इष्ट तथा घालवू द्या ! यंत्रें सारींच कामें करूं लागलीं तर मग मनुष्यानें करावयाचें तरी काय ? अशा शंकेनें घाबरलेल्यांनीं हें ध्यानात धरावें, कीं मनुष्य जे काबाडकष्ट करतो ते त्यास हवे म्हणून करीत नसतो. यंत्राने काबाडकष्टांची आवश्यकता जितकी कमी होईल तितकें मनुष्यास हलकेंच वाटेल, बरेच वाटेल; पण यंत्रामुळें काबाडकष्ट टळतात म्हणजे मनुष्यानें कोणतेंच आवडतें कामही करू नये, असा काही यंत्रशास्त्राचा निश्चय नाहीं. उलट मनुष्य आपल्याला वाटेल ते काम करण्यास वा न करण्यास स्वतंत्र होईल. कारण यंत्रानें उत्पादन वाढल्यामुळें आज बळें बळें कराव्याच लागणाऱ्या काबाडकष्टांपासून मनुष्याची यंत्रामुळें झाली तर सोडवणूकच होणारी आहे. त्याचप्रमाणें ज्याला साधी राहणी हवी असेल त्याला देखील यंत्रें कांहीं आडवीं येत नाहींत. त्याला हवा तर त्यानें पंचा नेसावा, लंगोटी नेसावी. तो मुळींच कांहीं न नेसला तरी देखील यंत्र त्याला बळेंबळें वीतभर जरीकाठाचे धोतर काही नेसवीत नाहीं ! तो मठींत लोळो, झोपडींत राहो, फळे खावो, उपवास करो ! यंत्रानें साधी राहणी नाहींशी होऊन ती महागडी होते वा विलासी होते, हे म्हणणे असमंजसपणाचें आहे. यंत्र बिचारे बोलून चालून जड, निर्जीव, इच्छाशून्य, परतंत्र ! तें होऊन कांहीं त्यानें उत्पादन केलेल्या पदार्थांचा सारा गठ्ठा कोणाच्यातरी, एका लाडक्या वर्गास देत नाहीं; कोणाचा काढून घेत नाहीं. तेव्हां यंत्रामुळें बेकारी वाढते, साधी राहणी बिघडते, श्रीमंत-भिकारी असा वर्गकलह पेटतो, सारी कामे यंत्रच करू लागलें तर मनुष्य रिकामपणानें गंजून, आळसानें गंजून निकामी होऊन पडेल, काम करण्याच्या निढळाच्या घामानें मिळविलेली भाकरी खाण्याचा आनंदास अंतरेल; तो इन्द्रियांचा दुबळा, मनाचा अनुदार, अंगाचा जरत्कारू बनेल, आणि यंत्राचाच दास होऊन पडेल ! इत्यादि सारी ओरड पूर्णपणे असमंजसपणाची नि भेकडपणाची असून आजच्या समाजरचनेच्या विषमतेचे हे दोष केवळ साहचर्यामुळें हें भावडे अडाणीपण यंत्रांवर लादीत असते ! घराचा आधारस्तंभ असा खांब; पण आचरटपणें किंवा आंधळेपणें डोक्यास धाडकन् लागताच, चिडखोर मूल जसे तो दोष आपल्या अवखळ वर्तनाचा नसून खांबाच्याच मारक्या स्वभावाचा आहे असे समजते आणि खांबासच 'माझ्या डोक्यावर आपटलास काय ?' म्हणून काठीनें सडकू लागते. तसाच हा चिडखोर असमंजसपणा, यंत्राचा सदुपयोग न करतां आल्यामुळें समाजरचनेंतील विषमतेच्या दोषानें वर्गावर्गांचे चाललेले अर्थयुद्ध, निष्पीडन (Exploitation) सत्त्वशोषण, बेकारी, श्रमिकांची पिळणूक, दाटीची राहणी प्रभृति माणसांच्या दोषांचें खापर त्या दोषांशी कोणचाही अपरिहार्य वा अंगभूत संबंध नसलेल्या यंत्राच्या डोक्यावर फोडीत असतों ! त्यातील हेत्वाभास ध्यानीं घेऊन आपल्या राष्ट्रानें लेशमात्रा न विचकतां आतां या यंत्रयुगाचें मन:पूर्वक स्वागत करावें.

यंत्रापासून जो जो आहे तो तो लाभच आहे. यंत्राच्या दुरुपयोगास टाळून सामुदायिक सदुपयोग कसा करावा ह्याचा आर्थिक वस्तुपाठ रशिया आज स्वतः-ला नि जगाला देतच आहे. जर यंत्रानें बेकारी वाढत असती नि मनुष्य दुबळावत असता, तर आज सामुदायिक यंत्रप्रयोगांत प्रचंड प्रमाणावर ज्यांचे सारें राष्ट्रीय बळ एकवटलेलें आहे, तो रशिया, साऱ्या जगांतला भिकार साऱ्या जगांतला बेकार, साऱ्या जगांतील दुःखी नि दुबळा झाला असता. पण आज वीस वर्षांच्या प्रयोगा-नंतरही वस्तुस्थिति अगदी उलट आहे. यंत्रशक्तीमुळेंच रशिया हे आज जगांतील प्रबळांतले प्रबळ, संपन्नांतील संपन्न, प्रत्येक जणास काम, अन्नवस्त्र नि आनंद समतेनें उपभोगूं देणारें राष्ट्र झालेलें आहे !

[यंत्राने बेकारी का वाढते ? समग्र सावरकर वाङ्मय
खंड ३ रा – निबंध विभाग, पृष्ठें ३९१ ते ३०५]

विभाग आठ

स्वातंत्र्यवीर सावरकर थोर क्रांतिकारक तर होतेच. याखेरीज ते एक श्रेष्ठ साहित्यिकही होते. काव्य, निबंध, नाटक, कादंबरी, आत्मकथा वगैरे साहित्याचे विविध प्रकार त्यांनी हाताळले आणि साहित्यसृष्टीत आपले खास स्थान निर्माण केले. १९३८ साली मुंबई येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी केलेले भाषण 'लेखण्या मोडा व बंदुका उचला' या त्यांच्या संदेशामुळे फार गाजले. जसे राष्ट्र तसे त्याचे साहित्य असते. शस्त्रबळ ही राष्ट्राची मृत्युंजय मात्रा असते, साहित्य नव्हे असे साहित्यकांना स्पष्ट सांगून त्यांनी साहित्याचे ध्येय काय असावे या प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे.

साहित्याचें ध्येय काय असावें ?

पुष्कळांनीं विचारलेला एक मुख्य प्रश्न म्हणजे 'साहित्याचें ध्येय काय असतें ?' तो प्रश्न तसा न मांडता 'साहित्याचें ध्येय काय असावें ?' असा मांडला तर त्याचें उत्तर अधिक निश्चितपणें मला देतां येईल.

ध्येय कोणतें ?

ध्येयाचा प्रश्न आला की, त्यांत लहरीच्या, हौशीच्या, वैयक्तिक आवडीच्या अंतर्भावापेक्षां कर्तव्याचाच अंतर्भाव मुख्यतः अनुस्यूत झालेला असणार. अर्थात् जीवनाच्या सामूहिक कर्तव्याची जी व्याख्या तीच, त्या जीवनाचें जे एक उपांग सारस्वत, त्याचीही व्याख्या, त्याचेंही ध्येय असलें पाहिजे. मानवी जीवनाच्या भौतिक ध्येयाची मला पटलेली व्याख्या ही आहे कीं, मनुष्यजातीचें अधिकाधिक हित ज्या योगें साधतां येतें तेंच मनुष्याचे ऐहिक कर्तव्य होय. तात्कालिक कर्तव्यही त्याच न्यायानें असें कीं, प्राप्त परिस्थितींत त्या त्या कालीं मनुष्यजातीचें जें अधिकांत अधिक हित साधतां येईल तें तें साधावें. त्या दृष्टीनें साहित्याच्या परम वा तात्कालिक ध्येयाचीही व्याख्या अशीच असणार कीं, मनुष्य जातीच्या अधिकांत अधिक हितास साधण्यासाठीं जें झटेल तेंच साहित्य श्रेष्ठ, तेच सुप्रासंगिक. आनंद नि करमणूक ही मानव हितास काही प्रमाणांत हितकारकच असल्यामुळे त्यांचाही अंतर्भाव योग्य त्या प्रमाणांत वरील ध्येयांत होतोच. पण केवळ करमणूक हे कांहीं कर्तव्य नव्हे. घरांत आई मरणान्तिक वेदनांनी अंथरुणास खिळली असतां, जर एखादा बहकलेला कलावंत बंगल्यांत नायकिणीच्या नाचांत रमू शकला तर त्यास कलावंत म्हटलें तरी कुलदीपक कांहीं म्हणतां यावयाचें नाहीं ! कारण खऱ्या कलावंताला तशा वेळीं ती कला विकल केल्यावाचून राहणार नाहीं ! तशा स्थितींत

ती त्याला केव्हांही आनंदविणार नाहीं, तर उलट एखाद्या कलाहीन माणसापेक्षां अधिक उत्कटतेनें व्याकुळवील !

वास्तव-वाङ्मय नि ललित-वाङ्मय

माझ्या सोयीसाठीं मी वाङ्मयाचे वस्तुनिष्ठ नि रसनिष्ठ असे दोन भाग करतों. कारण मला विचारलेल्या अनेक प्रश्नांचीं उत्तरें त्यात आपोआपच दिलीं जातील. वस्तुनिष्ठ वाङ्मयांत तत्त्व, गणित, ज्योतिष, विद्युत्, इतिहास इत्यादि विज्ञानांचा समावेश होतो. त्यांत सत्य काय तेंच यथावत्पणें सांगितलें पाहिजे. त्यांतही रस येईल, पण तो आणण्यासाठीं कल्पनेस मुळींत नसलेलें कल्पित रंग भरतां यावयाचे नाहींत. वस्तुनिष्ठ वाङ्मय हें वस्तूचें छायाचित्र; चित्र नव्हे. परंतु ललित वाङ्मय हे कल्पित रंग भरलेलें चित्र होय, रसोत्कर्ष हाच त्याचा विशेष. वस्तुनिष्ठ वाङ्मयांत जो दोष तो, कल्पनेची मनसोक्त भरारी हा, रसनिष्ठ वाङ्मयाचा गुण होऊं शकेल. वस्तुस्थितींत न सापडणारीं पात्रें, भूमिका, रंग यांची ने-आण रसनिष्ठ वाङ्मय आपल्या अभिप्रेत भावनांच्या उत्कर्षास्तव कल्पनासृष्टीतून करू शकतें. नाट्य, काव्य, कादंबरी, कथाकल्पात्मक वाङ्मयाचा हा रसनिष्ठ प्रांत तेंच सारस्वत.

पाविऱ्यविडंबनाची कसोटी

वास्तव वाङ्मयाचें कर्तव्य सत्यकथन. वस्तुस्थिती, वैज्ञानिक परिस्थिति यांचें यथार्थ ज्ञान मनुष्याच्या हितास अत्यवश्य. यास्तव हें वाङ्मय साहित्याच्या आम्ही वर दिलेल्या ध्येयास सुसंगतच असणार. त्यायोगें जुन्या वा नव्या कल्पनांना आणि भावनांनासुद्धा धक्का बसला तरी चालेल. ज्या भावना वा कल्पना, मग त्या जुन्या असोत वा नव्या असोत, सत्यावर अधिष्ठित असतील त्याच टिकाऊ ठरणार. पाविऱ्यविडंबनाचा प्रश्नही याच दृष्टीनें परीक्षिला पाहिजे. पूर्वी कित्येक पवित्र वा धर्म्य वाटणाऱ्या गोष्टी आज सत्य वस्तुस्थिति उमगल्यामुळें चुकीच्या ठरलेल्या आहेत. कुराणांतील, पुराणांतील वा बायबलांतील पृथ्वीच्या आकाराच्या, सूर्य-चंद्रांच्या रचनेच्या, गतीच्या वा ग्रहणांच्या नि त्यावर आधारलेल्या धार्मिक रुढि पहा ! त्या असत्य आहेत म्हणून ज्यांनीं प्रथम म्हटलें, त्यांचा ख्रिस्तीधर्मीयांनीं पाविऱ्य-विडंबनाचे नांवें कसा छळ केला हें आपणांस माहीत आहे. पण आज त्या असत्य आहेत हें मुलाबाळांसही त्याच युरोपांत शिकवण्यांत येत आहे. या प्रकारच्या मागच्या अनेक अनुभवांवरून आपण सर्वांनीं हा धडा शिकला पाहिजे कीं, सत्य-जिज्ञासेनें वा तथ्य-प्रतिपादनाचें जें मत कोणी प्रस्थापूं पाहतो, त्यास शक्यतों प्रतिबंध नसावा; लेखन वा उपदेश यांचे स्वातंत्र्य असावे. त्यायोगें जर पाविऱ्यविडंबन होतें असें कोणास वाटेल तर त्यांनीं त्याचें तें मत चुकीचें आहे, असे उलट

बाजूनें साधार प्रतिपादन करावें, म्हणजें त्याच्या विडंबनाची विटंबना झाल्यावाचून राहणार नाही. त्याचे म्हणणें सत्य वा तथ्य ठरेल तर आपण भलत्याच असत्य वा अतथ्य गोष्टीला पावित्र्य दिलेलें होतें हें आपल्या लक्षांत येईल. सत्याकडे नि तथ्याकडे मनुष्याची अधिक प्रगति होईल.

नवमतवाद नि पुरोगामी वाङ्मय

तीच गोष्ट आज ज्याला नवमतवाद वा पुरोगामी साहित्य इत्यादि नांवें देण्यांत येतात त्याविषयींही लागू आहे. कोणतीही गोष्ट केवळ नवी आहे म्हणूनच ग्राह्य वा त्याज्य ठरत नाहीं. नवें मूल जन्मास आलें म्हणजे ते आईपेक्षां अनुभवी वा बापापेक्षां शहाणें ठरत नाहीं. कोणतेही वाङ्मय नुसतें पुरोगामी आहे म्हणूनच कांहीं सत्य वा तथ्य ठरेलच, असें गृहीत धरतां येत नाहीं. आओच्या पुढें दुडदुड धावत जाणारें पुरोगामी मूल खड्ड्यांतही पडण्याचा संभव असतो लक्ष्याच्या पुढें निघून जाणारी गोळी पुरोगामी असली तरी चुकलेली असते. वास्तव वाङ्मयाचें जें साध्य तें सत्य वा तथ्य; त्याच्या कसोटीस तीं नवमतवादी वा पुरोगामी मतें कितपत उतरतात, कोणत्या तरी नव्या सत्यास वा तथ्यास तीं आविष्कारीत आहेत किंवा नाहींत, या प्रश्नावरच त्यांचा चांगुलपणा वा टाकाऊपणा ठरणार आहे. पण तें ठरवावयाचें तर त्यांना त्यांचा पक्ष यथावत मांडू दिला पाहिजे. तीं नवीं वा पुरोगामी म्हणून हुरळूनही जातां कामा नये, किंवा जुन्याविरुद्ध वा अुच्छृंखल वाटतात म्हणून त्यांची एकदम मुस्कटदाबीही करतां कामा नये. जर तीं अशीं वाटतील तर त्यांच्यांतील तो अुच्छृंखलपणा वा अतथ्य अुघडकीस आणणारे नि जुन्यांतील सत्य प्रस्थापित करणारें विरुद्ध साहित्य प्रतिपक्षानें निर्मावें, हाच त्यावर उपाय. साहित्यांत दोघांनाही स्थान हवें, कारण अनेक वेळां नवीं मतें ही उपद्व्याप न ठरतां जुन्या अपायकारक अंधेरांत घुसलेलीं प्रकाशाचीं नि आरोग्याचीं किरणेंही ठरलेलीं आहेत ! आज आपल्या साहित्यांत नव्यानेंच अुगवलेल्या साम्यवादी वा काम्यवादी मतांचेंही तसेंच स्वागत नि तशीच छाननी झाली पाहिजे. ही साम्यवादी वा काम्यवादी नवमतें चांगलीं की वाअीट याविषयीं जे प्रश्न मला विचारण्यांत आले आहेत तें साहित्यविषयक असणाऱ्या या अशा निबंधाच्या कक्षेबाहेर आहेत. तो प्रश्न अर्थ, समाज, काम नि मानस या शास्त्राचाच होय.

साम्यवादी का काम्यवादी

त्यांतील अेका प्रश्नाचा मात्र साहित्याशी संबंध पोंचतो. मराठी वा कोणतेंही साहित्य केवळ अर्थशास्त्राचा वा केवळ कामशास्त्राचाच प्रपंच आहे, यच्चयावत साहित्याचीं मुळें भांडवलसत्ता नि श्रमिकसत्ता यांच्या विरोधांत वा सुप्त नि जागृत कामवासनांतच काय तीं रुतलेलीं असतात, असा सिद्धांत जर कोणी मांडू लागला तर तो मात्र अेकांगी नि अेककल्ली ठरल्याबाचून रहाणार नाहीं, अितकें

अिथें सांगितलें कीं पुरे. मनुष्य म्हणजे कांहीं त्याचें पोट नव्हे. त्याला अनेक इंद्रियें आहेत, अेकच अिंद्रिय नाही. त्या सर्व अिंद्रियांची, त्यांच्या विषयांची नि त्यांच्या रसाची क्रिया प्रतिक्रिया, विरोध-विकास, मनुष्याच्या जीवनांत साठविला जात आहे तीच स्थिति, त्याच कारणासाठीं, त्याच्या साहित्यांतही प्रतिबिंबित झाली. साऱ्या साहित्याच्या विकसनाची फोड केवळ धनवान नि निर्धन यांच्या किंवा अुत्पादन –साधनांच्या किंवा कामतृष्णेच्या दृष्टिकोनानेंच तेवढी करता येणारी नाहीं. यद्यपि त्या विधेयांचे (Points) धागेदोरेही मनुष्याच्या जीवनांत लांबवर विणलेले आहेत, तरी त्या अेकेरी धाग्यानें कांहीं तें जीवन वा वाङ्मयीन व्यक्तीकरण जें साहित्य, ते विणलेलें नाहीं. ज्ञानेश्वरी हा भांडवलसत्तेचा अेक डाव काय तो होता, किंवा बुद्धाचा राज्यत्याग हा साम्यवादाचाच काय तो पुरस्कार होता, किंवा योग-सूत्रें ही श्रमिकांना धनिकांचा छळ कळू नये म्हणून जाणून बुजून खाअू घातलेली अफूची गोळी होती, किंवा शंकराचार्यांचे महाभाष्य हे त्यांच्या अतृप्त कामवासनांची अेक विकृति काय ती होती, असें समजणें म्हणजे वेदकालांतील अग्निपूजेच्या सर्व स्तोत्रांची अुपपत्ति, भाकरी भाजण्यास अग्नि अुपयोगी पडतो, या अेकाच अेकांगी सत्याची काय ती जाणीव होती असें समजण्यासारखें अगदीं अेकांगी नि अेककल्ली ठरल्यावाचून राहणार नाहीं.

तरीसुद्धां विरोधविकासवादाच्या दृष्टिकोनांतून काही जुनीं सत्यें नव्या मांडणींत थाटण्याच्या वा नवी सत्य जुन्यांच्या दृष्टिपथांत आणण्याच्या कामीं, अशा एकांगी प्रचाराचाही उपयोग होत आहे, आणि म्हणूनच वास्तव साहित्यांत पडणारी त्यांची भर आपण सर्वांनीं प्रथम स्वागतिली पाहिजे, आणि लगोलग त्यांची त्यांची नीरक्षीर–विवेकानें छाननी करणारें वाङ्मयही प्रसिद्धीत राहिले पाहिजे. नुसते पावित्र्यविडंबन म्हणून त्यास शापीत राहण्यात अर्थ नाहीं. कोणा व्यक्तीची वा समाजाची केवळ मानहानि, केवळ अुपमर्द वा केवळ हानि करण्याच्याच दुष्ट बुद्धीनें ओंगळ वा असभ्य भाषेंत जें लिहिले जाईल तेवढेंच वाङ्मय काय ते अनैर्बंधिक (बेकायदेशीर) वा अप्रसिद्धेय समजलें जावें. या सर्वसाधारण सूचनेपेक्षां या विषयाची अधिक फोड करण्यास येथें वाव नाहीं.

रसनिष्ठ वा कल्पनानिष्ठ अशा वाङ्मयाच्या दुसऱ्या भागासही, ललितवाङ्-मयासही वरील चर्चाच बहुतांशीं लागू आहे.

समयक नि निर्यमक काव्य

निर्यमक काव्यविषयीं ज्या मित्रांनी मला कित्येक प्रश्न विचारिले आहेत त्यांना विनंती कीं, यासंबंधी माझीं मतें मी 'रानफुलें' या पुस्तकांत अेक स्वतंत्र परिशिष्ट जोडून त्यात सविस्तर ग्रथिलीं आहेत, तीं जिज्ञासूंनीं पहावीं. मला स्वत:ला अर्थाचा बाध न आणणाऱ्या प्रासांची नि यमकांची भारी हौस आहे. यमक हें रसाला

प्रतिकूल न होतील अशा कौशल्यानें जर सहजासहजींच्या ओघांत योजतां आलें तर तें कवितेची शोभा वाढवितें; रसोत्कर्षाला साहाय्यक होतें. काव्यशैलीचा तो विकास आहे; पूर्वीच्या नियमक कवितेला खुलवणारा तो अेक नवा अलंकार आहे, पण तरीसुद्धां कांहीं सुविशाल गुंफणीच्या आणि वक्तृत्वपूर्ण भावनांना वा विचारांना व्यक्तवण्यास Blank verse सारखी नियमक वृत्तेंच अुपयोगी. सयमक वृत्तांत येणारा अेकसुरीपणा अशा प्रसंगीं टाळतां यावा यास्तवच मी नियमक अशा 'वैनायक' वृत्तांची घडण केली आहे; मुक्तछंदादि वृत्तें हीं नियमकांचीच वृत्तांतरें होत. ती सापेक्षतः दुय्यम चर्चा करण्याची मला संधि मिळती नि आजच्या स्थितींत त्यांतच गुरफटून घेणें अप्रासंगिक वाटलें नसतें तर मी वैनायक वृत्ताचा प्रचार करण्याची माझी हौस फेडून घेतली असती; पण आपल्या बहुमूल्य वृत्तभांडारांत विशिष्ट प्रसंगांना अधिक अनुकूल अशा आणखी अेका वृत्तांची भर,– अितकेंच काय ते मी त्या वैनायक वा मुक्तछंदादि नियमक वृत्तांचें महत्त्व मानीत असल्यानें आणि तें कार्य मला स्वतःपुरतें तरी आजच्या परिस्थितींत अगदीं दुय्यम तिय्यम वाटत असल्यानें मी त्यांत येथें अधिक वेळ घालवत नाहीं.

साहित्याचें सापेक्ष महत्त्व

आणि आतां सरतेशेवटीं मला हें सांगितल्यावाचून गत्यंतरच दिसत नाहीं कीं, केवळ यमक वा काव्य वा कादंबरीच नव्हे तर स्वतः सांगोपांग साहित्य हेंही आपल्या आजच्या राष्ट्राच्या परिस्थितींत मला तरी दुय्यम-तिय्यम कर्तव्यच वाटत आहे! साहित्यिक सज्जनहो, विज्ञहो, सुज्ञहो! राष्ट्रांतील तुम्ही विज्ञ आहांत, सुज्ञ आहांत. म्हणून मी तुम्हांसच विचारतों कीं, साहित्यासाठीं जीवन आहे कीं जीवनासाठीं साहित्य? जर आपलें राष्ट्रीय साहित्य-आणि अशा सामुदायिक संमेलनांत साहित्याचा सामूहिक अूहापोह, मुख्य कर्तव्य असणार!– जर आपलें सामूहिक, आपलें राष्ट्रीय साहित्य हें राष्ट्रीय जीवनाचें अेक अुपांगच काय ते असेल, तर राष्ट्रीय जीवनाचें संरक्षण हीच आपल्या साहित्याची आद्यचिंता मुख्य साध्य असलें पाहिजे. अगदीं कलेसाठीं कलेचा जो कलावन्त अुपासक आहे वा साहित्यासाठींच साहित्याचा जो साहित्यिक भक्त आहे, त्याच्याविषयींही मला आदरच वाटेल. पण असे कलेसाठींच कलेची अुपासना करणारें साहित्यिक अेखाद्या नाट्यगृहांत नाट्य-नृत्यसंगीताच्या भर रंगांत अगदी दंगले असतानासुद्धां जर त्या नाटकगृहास अकस्मात आग लागली तर कलेसाठीं कलेला झिडकारून ते तत्क्षणीं त्या आगींतून जीव बचावण्याच्याच मार्गास तडकाफडकी लागतील, का त्या संगीताचा तन्मय ताल धरीत तेथेंच डुलत राहतील? त्याचप्रमाणें राष्ट्राच्या प्राणावरच बेतली असतां केवळ साहित्याची कथा काय?

परराष्ट्राकडे पहा

आपल्या राष्ट्राची आजची मृत्युंजय मात्रा म्हणजे त्याचे शस्त्रबळ; साहित्य नव्हे ! जपानांत प्रत्येक प्राथमिक शाळेंत मुलामुलींना प्रथम सैनिक शिक्षण सक्तीनें देण्यांत येतें. अलंकारशास्त्राचें नंतर ! आजकाल आयर्लंडात प्रत्येक दैनिकांत पहिल्याच पानावर डी व्हॅलेराच्या आज्ञेनें मोठमोठ्या अक्षरांत प्रसिद्धकें फडकत आहेत– 'Wanted Recruits !" सैनिक हवेत !– साहित्यिक नव्हे !! अिटलींत तर पाळण्यांतील मुलांना काय तें सैनिक शिक्षण अद्याप आवश्यक केलेलें नाहीं ! बाकी बालक पायावर चालू लागलें की 'बालिरत्ना' तुकड्यांतून त्याला लहान बंदूक खांद्यावर घेऊन सैनिक संचलन शिकविलें जातें. तरुणांना मशिनगन्स प्रभृतींची सैनिक तंत्रें ! लघुकथांची तंत्रें नव्हेत ! ऑस्ट्रियाची मरणाची किंकाळी अैकलीत ना गेल्याच महिन्यांत ? शेवटच्या प्राणत्याग-पत्रांत त्याच्या शेवटच्या अध्यक्षानें शेवटचें वाक्य अुच्चारलें ! 'We yield under German swords'– not under German sonnets'! आणि आपण ! जपानच्या, रशियाच्या, मुस्लिम राष्ट्रांच्या बाँबफेकीच्या वैमानिक हल्ल्याची आगलावी काळछाया ज्या मुंबईवर दाट पसरत चालली आहे, त्या मुंबअीत या साहित्य संमेलनांतील नृत्यनाट्यसंगीतांत रंगून गेलों आहोंत ! ज्या मुंबअीत गल्लोगल्लींत जीर्ण साहित्य, नव साहित्य, पुराण साहित्य, पुरोगामी साहित्य, सयमक मंडळें, निर्यमक मंडळें थाटून राहिलेलीं आहेत, लक्षावधि तरुण-तरुणी अेक आणा मालेपासून सोळा आणे मालेपर्यंतच्या कादंबऱ्या वाचण्यांत गढून गेलीं आहेत;– त्या मुंबअीत म्हणण्यासारखा रायफल क्लब असा अेकही नाहीं. सबंध मुंबअी अिलाख्यांत सैनिक कॉलेज औषधालासुद्धां नाहीं. अेका हाताची गुप्ती अेका काँग्रेसवाल्या जवळ सापडली म्हणून परवां पुण्याला त्याला बंदिवासाची कडक शिक्षा काँग्रेसच्या सरकारनें दिली ! सरकार अहिंसक म्हणावें तर सरकारी लाठीमार नि गोळीबार प्रजेवर मात्र प्रत्यही चालू आहेत ! त्यावाचून सरकार चालू शकणार नाहीं असें तेच म्हणतात !

शस्त्रबळ प्रथम, शास्त्रबळ नंतर

चीन मेला तो त्यात वाङ्मयीन साहित्य नव्हते म्हणून मेला नाहीं, तर सैनिक साहित्य नव्हते म्हणून ! आपले हें अेवढें विस्तीर्ण भारतीय राष्ट्र आज जगतात निर्माल्यवत् जें होअून पडलें आहे तें आपलें साहित्य अुणे म्हणून नव्हे– शस्त्रबळ अुणें म्हणून ! ही गोष्ट सगळ्याआधी, साहित्यिकहो, तुमच्या लक्षांत आली पाहिजे ! सगळ्यांत साहित्यिक वर्गच सुज्ञ, विज्ञ असणार ! म्हणून सगळ्या आधीं तुम्ही गर्जून अुठा की, आजच्या परिस्थितींत आमचें राष्ट्रीय साहित्य म्हणजे शस्त्रबळ ! शास्त्रचर्चा नव्हे !! जें थोडें साहित्य हवें तें तुम्ही-आम्ही जे चाळीशीच्या

वर गेलेले लोक ते काय तें हवें तर पुरवतील ! माझा हा साहित्यिक निबंधसुद्धा त्या पाठीचा कणा वाकलेल्या वाक्पीठ वृद्धांपुरताच आहे; शेष जे तरुण, ज्या तरुणी, जी पाठीचा कणा ताठ असलेली पुढची पिढी, त्या सान्यांना माझा या साहित्यपदावरून हाच निर्वाणीचा संदेश आहे कीं,

राष्ट्रास आज साहित्यिक नकोत ! सैनिक हवेत ! !

तरुणहो, आमच्या दुर्बळ पिढीच्या देखोदेखीं सुनीतें नि कादंबऱ्या लिहिण्याकरितां लेखण्या सरसावूं नका, तर त्या जपान, अिटली, जर्मनी, अिंग्रज, आयरिश, तरुणांच्या देखोदेखीं आधीं बंदुका सरसावा ! आज राष्ट्रीय शस्त्रबळ हें मुख्य कर्तव्य राष्ट्रीम साहित्य हें तिय्यम ! राष्ट्रसंरक्षणार्थ प्रथम रायफल क्लबांत घुसा; रडगाण्यांच्या नि रडकथांच्या साहित्य संमेलनांत नंतर, वेळ राहिल्यास !

जसें राष्ट्र तसें साहित्य

साहित्यासाठींसुद्धा आज साहित्याच्या पोथ्या गुंडाळून सैन्याच्या शिबिराकडे वळलें पाहिजे. कारण जें राष्ट्र खुरटें, दुबळें, त्याचें साहित्य खुरटें नि दुबळेंच असणार. ज्या दुबळ्या राष्ट्राला परक्याची प्रबळ दारू आग लावते, त्याच्या साहित्यालाही कशी आग लागते ते तक्षशिलेला विचारा, नालंदेला विचारा ! मुस्लिम तवारिखा अेटींत सांगतात कीं, खिलजी राजवटींत नालंदा विध्वंसिली गेली तेव्हां त्या प्रचंड अेशियाटिक ग्रंथभांडारास त्यांनी जी आग लावली ती तीन महिने धुमसत होती. हजारो ग्रंथ जळत होते ! ! अुलटपक्षीं, त्यांना लिहितां येत होतें कीं नव्हतें याचा पुरावा धुंडाळावा लागतो, अितके शिवराय होते अेक तुच्छ साहित्यिक ! पण म्हणून जर ते युगधर्म न ओळखतां सुनीतें रचीत बसते, किंवा नुसती रणगीतें खरडते तर आज मराठी साहित्याची दुर्गति सिंधी, पंजाबी साहित्यासारखीच होती कीं नाहीं तें ध्यानांत आणा ! तिकडे जसा गायत्रीमंत्रसुद्धां 'अले पे बे' मध्यें उलटा लिहावा किंवा वाचावा लागतो, तसा महाराष्ट्रांतहो वाचावा लागता. 'ज्ञानेश्वऱ्या' ज्ञानेश्वराच्याच भाऊबंदांनीं जाळून टाकून हातीं कुराणें धरलीं असतीं. नेवाशाला ज्ञानेश्वराच्या भितीचो मशीद करूं पहाणारे आजचे कित्येक मुसलमान पूर्वीचे हिंदूच होते हे विसरूं नका ! पण युगधर्म ओळखून शिवाजीनें सरस्वतीचें रक्षणार्थंच सरस्वताकडे काहीं काळ पाठ फिरवून शुंभ. निशुंभ मर्दिनीचीच अुपासना केली; लेखणा टाकून भवानी अुचलली म्हणूनच तर आज महाराष्ट्र–सारस्वत असा कांहीं पदार्थ जिवंत राहिला आहे !

लेखण्या मोडा बंदुका अुचला

तुमच्या डोळ्यांसमोर तुमच्या विद्यापीठांतून श्रीची नि सरस्वतीची विटंबना कां ? विद्यापीठाच्या दाराशीं अष्टायुधधारिणी दुर्गा पहारा देत नव्हती म्हणून !

सरस्वतीचा एक अुपासक या नात्यानें मी तुम्हांस सांगतों कीं, आपल्या तरुण पिढीनें आता लेखणी मोडून टाकावी; आणि बंदूक अुचलावी ! साहित्यिक बनूं नये तर आधीं बनावें सैनिक ! मी ज्या ज्या साहित्य-संमेलनांत अध्यक्ष म्हणून गेलों, त्या त्या ठिकाणीं जातांच शरीराच्या सनकड्या झालेली आमचीं तरुण मुलें, मुली–कोरीकरकरीत कोणती तरी कादंबरी, कथा, काव्य हातांत घेअून जेव्हां लेकड्यांनी येतां जातां मला दिसत, त्यांत दिवस-रात्र तन्मय होतांना आढळत, तेव्हा माझ्या हृदयाला खरोखरच चरका बसत आला; अध्यक्षपदीं मान लाजेनें खालीं घालावी लागली. बाटे, आपणही या पापाचे वाटेकरी होत आहोंत ! यास्तव मी आपणांस स्पष्टपणें सांगतों कीं, राष्ट्राच्या आजच्या परिस्थितीत साहित्याचें सापेक्ष महत्त्व तिय्यम आहे, आणि तरुण पिढीचें पहिलें कर्तव्य आहे सैनिक शिक्षण– दुसऱ्याला उपद्रव देणारें नव्हे, नुसतें वैमनस्य शिलगावणारें नव्हे, तर स्वसंरक्षणाचें नैर्बंधिक (कायदेशीर) कर्तव्य बजाविणारें, असलेल्या वैमनस्यास आपल्याला अुपद्रव देण्याची छातीच ज्यायोगें होअूं नये असें स्वराष्ट्रसंरक्षक शस्त्रबळ आम्हांस हवें आहे.

हें मला पाहवत नाहीं

पुढील दहा वर्षांत सुनीतें रचणारा अेकही तरुण न निघाला तरी चालेल. प्रत्यही साहित्य-संमेलनें न झालीं तरी चालेल, पण दहा दहा हजार तरुण सैनिकांचा वीर-चमू आपल्या खांद्यावर नव्यांतील नव्या रायफली टाकून, राष्ट्राच्या मार्गामार्गांतून, शिबिराशिबिरांतून, टप्‌टप् करीत संचलन करतांना दिसल्या पाहिजेत ! ग्रंथालयाअितकी तरी, बौद्धिक कॉलेजांअितकी तरी, नगरानगरांतून सैनिक कॉलेजें गजबजलेलीं आढळलीं पाहिजेत ! मग अधूनमधून त्यांनी अेखादी कादंबरी वा प्रेमकथा वाचली वा सुनीत लिहिलें तरी चालेल. नेपोलियनही रणांगणावर करमणूक म्हणून शीळ वाजवी. 'दिल्लीच्या बादशहाची दाढी जाळून' आल्यावर पहिले बाजीरावही मस्तानीच्या अंतःपुरात अेखादें पान खातांना आढळत ! पण जन्मभर नुसती झाडांचीं पानेंच चघळणाऱ्या आणि तमाशांतील तबलेच झडत राहिलेल्या दुसऱ्या बाजीरावाचे अेक ब्रह्मावर्तच या राष्ट्रानें बनावें-हें मला पाहवत नाही.

साहित्यिकहो, आजच्यासारख्या प्रसंगीं साहित्यिकांचेही प्रासंगिक कर्तव्य ते हेंच होय असें मीच कांहीं म्हणत नाहीं, तर साहित्यिकांचा सम्राट जो व्यास तोही म्हणतो कीं, शास्त्री–साहित्यिकांचा म्हणजेच जो ब्राह्मणांचा वर्ग त्यासुद्धां–

अमर्यादप्रवृत्ते च शत्रुभिस्संगरे कृते ।
सर्वे वर्णाश्च दृश्येयुः शस्त्रवन्तो युधिष्ठिर ।।
कारण साहित्यापुरतें पाहिलें तरी हेंच खरें आहे कीं–
शस्त्रेण रक्षिते राष्ट्रे शास्त्रचिन्ता प्रवर्तते ।।

[समग्र सावरकर वाङ्मय–खंड ४, पृष्ठे ४८१–४८८]

परिशिष्ट

डॉ. य. दि. फडके यांच्या प्रस्तावनेची ही दुसरी बाजू :

लेखक : श्री. बाळाराव सावरकर

मतम ने 'तत्त्वज्ञ सावरकर' या नावाचे एक पुस्तक प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेतला. या पुस्तकाच्या संपादनाचे आणि त्याला प्रस्तावना लिहिण्याचे काम त्यांनी डॉ. य. दि. फडके यांच्याकडे सोपविण्याचे ठरविले. तसे त्यांनी मला कळविले आणि स्वा. वीर सावरकर साहित्यातील उतारे घेण्यासाठी माझी अनुज्ञा मागितली. तेव्हा मी त्यांना कळविले की श्री. य. दि. फडके यांची प्रस्तावना ते घेणार असतील तर त्यासंबंधी मी जे विचार मांडीन, किंवा त्यांच्या लिखाणाला मी जे उत्तर देईन तेही त्याच पुस्तकात छापावे, कारण श्री. य. दि. फडके यांची विचारांची पद्धत सावरकरी विचारांशी जुळणारी नाही. श्री. फडके यांची माझी प्रत्यक्ष भेट झाली, चर्चा झाली, तेव्हा असे ठरले की श्री फडके यांच्या प्रस्तावनेसंबंधी मी जे लिहीन तेही पुस्तकात छापले जावे, आणि माझ्या विचारांना ते जे उत्तर देतील तेही छापावे. त्यानुसार श्री. फडके यांच्या प्रस्तावनेसंबंधी मी येथे दोन शब्द लिहित आहे.

फडके यांच्या प्रस्तावनेसंबंधी थोडक्यात लिहायचे तर माझी वाचकांना विनंती आहे की त्यांनी वीर सावरकरलिखित 'संन्यस्तखड्ग' हे नाटक, 'गांधी गोंधळ,' 'गरमागरम चिवडा' 'हिंदुराष्ट्रदर्शन', 'ऐतिहासिक निवेदने' आणि 'सहा सोनेरी पाने' एवढी तरी पुस्तके वाचावीत, आणि फडके यांच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत.

फडके लिहितात, विसाव्या शतकातील जीवशास्त्रज्ञांचे हे विचार सावरकरांनी नीट लक्षात घेतले होते असे म्हणण्यास आवश्यक ते पुरावे त्यांच्या उपलब्ध लेखनात आढळत नाहीत.

ही शंका य. दि. यांनी ज्या निसर्गनियमांच्या संबंधात व्यक्त केली आहे ते निसर्गनियम जुन्या शास्त्रज्ञांनीही सांगितले आहेत. संन्यस्तखड्ग नाटकात सावरकरांनी या प्रश्नाची चर्चा बुद्ध-विक्रमादित्य संवादात केली आहे. युद्ध नष्ट करण्याच्या भगवान बुद्धाच्या प्रयत्नांना सहाय्य करण्यासाठी विक्रम शस्त्रत्याग करून संन्यासी होतो; पण जेव्हा शेजारचा राजा त्याच्या राज्यावर आक्रमण करतो, त्यांची घरेदारे जाळतो, तेव्हा मरायचे की जगायचे हा प्रश्न निर्माण होतो. तेव्हा विक्रम शस्त्र उचलतो. त्याही प्रसंगात प्रा. फडके यांच्याप्रमाणेच भगवान बुद्ध सांगतो की आपण मरावे, कोणीही मेले तरी मला काय सारखंच, ज्यांना मरायचे असेल अथवा दुष्ट सत्ताधाऱ्यांची हाजी हाजी करून जगायचे असेल त्यांनी विसाव्या शतकातील शास्त्रज्ञांना सिद्धांत प्रमाण मानून जगावे. पण ज्यांना मानाने जगात जगायचे असेल त्यांनी क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके आदिप्रमाणे सुष्टांशी सुष्टपणे आणि दुष्टांशी दुष्टपणेच वागणे आवश्यक आहे.

फडके लिहितात, गेल्या पन्नास वर्षांत सामाजिक शास्त्रे डार्विनवादाच्या मगरमिठीतून मुक्त झाली.

फडके यांना अभिप्रेत असलेल्या डार्विनवादाच्या मगरमिठीतून शास्त्रे कदाचित मुक्त झाली असतील, पण झिया, माओ, अमेरिका आणि रशिया आदी प्रबळ राष्ट्रे तसेच अगदी साहित्य सहवासाच्या दोन तीन मैलाच्या परिसरातील गुंड आजही शस्त्रास्त्र सज्ज बनून आक्रमण करीत आहेत ना ? त्यांचे काय करायचे ?

या प्रश्नाला य. दि. फडके विचारसरणीचे सुशिक्षित, गीतेच्या पहिल्या अध्यायातील अर्जुनाप्रमाणे उत्तरतील की आपण शरण जावे, युद्ध करू नये, कारण आपणही अणूला अणूने तोंड द्यायचे ठरविले तर सर्व जगाचा विध्वंस होईल.

याला सावरकरी विचाराचे कट्टर लेखक भगवान कृष्णाप्रमाणे सरळ उत्तर देतील की हा विध्वंस आम्ही पत्करू. पण केवळ दुष्टांना सुखाने जगू देणार नाही. रशिया नि अमेरिका ही दोन्हीही बलाढ्य राज्ये आज अशाच पवित्र्यात उभी आहेत म्हणून जगताहेत. उद्या त्यांचे युद्ध चुकून वा जाणून बुजून जुंपलेच तर कदाचित ही आजची मानवी वा राक्षसी संस्कृती नष्ट होईल आणि नंतर काही वर्षे तर महायुद्ध थांबेल. किरकोळ लढाया होतील त्या दगडाने होतील. मला आठवते की आइन्स्टाइननेही असे लिहिले आहे.

फडके लिहितात, ' संपूर्ण विश्व म्हणजे आपल्या नजरेला दिसणाऱ्या जगाचा केवळ विस्तार, अशी गेल्या शतकातल्या अनेक शास्त्रज्ञांची समजूत होती. अद्यावत असणाऱ्या सावरकरांची अशी अवस्था व्हावी याबद्दल खेद वाटला तरी त्यामुळे ही वस्तुस्थिती नाकारण्याचे कारण नाही.

सावरकरांचे वाचन अद्ययावत् होते. सावरकरांची विश्वाची कल्पना त्यांच्या 'जगन्नाथाचा रथ' या काव्यात दिसते तशीच ती सप्तषाहच्या अंदमानात लिहिलेल्या कवितेतही दिसते. इतिहासाचे पहिले पान सापडत नाही हे सावरकरांनी लिहिले आहे. तसेच त्यांनी सप्तर्षीमध्ये लिहिले आहे की हा मानव त्याच्या कुटुंबियासह प्रकाशातील वेगाने जाणाऱ्या विमानात बसून सप्तर्षीकडे जावयास निघाला तर जाताना त्याला वाटेत झाशीची राणी प्रत्यक्ष घोड्यावरून कशी उडी मारत आहे, अशोकाने आपल्या भावाला मारले की नाही, ख्रिस्ताला सुळावर चढविले की नाही आदी घटना प्रत्यक्ष दिसू शकतील !! त्याची मुले अथवा नातवंडे सप्तर्षीवर पोचतील आदी ! तसेच रशिया अमेरिका आदी देशांतील मानसशास्त्रज्ञ आज ज्या राजयोगाच्या कुंडलिनी-जागृतीचा विचार करीत आहेत, ती कुंडलिनी सावरकरांनी सन १९२८ मध्ये आपल्या ध्वजावर अंकित केली आहे. त्यावर लेखही लिहिला आहे.

ह्याच 'सप्तर्षी' काव्यात सावरकरांनी लिहिले आहे की, पृथ्वीचा उपग्रह असलेल्या परप्रकाशित चंद्राला लोक 'तारापति' म्हणून गौरवितात आणि सप्तर्षींनो ! तुम्ही अनंत तेजाची सात विश्वे असूनही तुमचो मात्र तारे म्हणून संभावना ! असेच असते बाबा. प्रजाहत मानवाच्या नगरीत चोरच राजे समजले जायचे !! (सप्तर्षी : ओळी १५५ ते १६०)

डॉ. य. दि. फडके यांनी सावरकरांचे हे ध्वज, सप्तर्षी, तसेच मुसलमानी दंगे, त्यांच्या सिंध वेगळा करण्यापासून पाकस्तान – निर्मितीच्या कटासंबंधी आणि ख्रिश्चनांच्या नागाभूमीतील कटासंबंधी आगावू दिलेल्या सूचना कदाचित वाचल्या नसाव्यात.

डॉ. फडके यांनी या प्रस्तावनेत इतिहासाचे पहिले पान सापडणे कठीण हा सावरकरांनी मांडलेला विचार 'सप्तर्षी'मध्ये सांगितला आहे असे लिहिले आहे. त्यावरून त्यांनी सप्तर्षीमधील हा तरी विचार वाचला असावा व त्यांना तो आवडला असावा असे दिसते. त्यामुळे वाटते की त्यांच्या काहीं कवितेतच वर असलेला प्रत्यक्ष इतिहास पहाण्याचा विचार डॉ. फडके यांनी वाचला असावा. पण फडके यांनी तो लेखाच्या लांबीच्या भीतीने अथवा त्यांच्या सिद्धांताला न रुचणारा म्हणून या प्रस्तावनेत सांगितला नसावा. काही असो, वाचकांनी मात्र वर दिलेले विचार तसेच पाकस्तान आणि नागासंबंधी दिलेल्या पूर्वसूचना वाचाव्यात आणि मग ठरवावे की सावरकर १९ व्या शतकातील स्वप्नात दंग होते की पुढच्याही दोन-तीन तरी दशकात घडणाऱ्या घटना एखाद्या द्रष्ट्याप्रमाणे आधीच सांगत होते !!

फडके लिहितात की, सावरकरांनी केवळ मुसलमानांवर हल्ला चढविला. इतर धर्मियांविरुद्ध ते बोलले नाहीत. डॉ. फडके यांना विनंती की त्यांनी, सावरकरांनी सन १९३१ मध्ये लिहिलेला नागासंबंधीचा लेख, हिंदुसभेच्या अध्यक्षीय भाषणात त्रावणकोरच्या ख्रिश्चनांविषयी दाखविलेला धोका, आणि १९५३ मध्य परकीय मिशनऱ्यांच्या कारवायासंबंधी दिलेल्या पूर्वसचना अवश्य वाचाव्यात. तसेच सावरकरांनी हिंदूंमधील सद्गुण विकृतीवर आणि अंधश्रद्धेवर चढविलेले प्रखर हल्ले एकदा डोळ्यापुढे आणावेत म्हणजे त्यांना कळेल की सावरकरांनी केवळ मुसलमानांवर हल्ले चढविले हे त्यांचे विधान किती भ्रामक व चुकीचे आहे.

फडके लिहितात की सावरकर अंदमानात जाण्यापूर्वी हिंदुराष्ट्रवादी नव्हते आणि त्यानंतर सावरकरांचा मुस्लिम विरोध इतका टोकाला गेला की त्यांना वस्तुस्थितीचेहि भान राहिले नाही.

फडके यांनी पुन्हा एकदा सावरकरांनी अंदमानात जाण्यापूर्वी लिहिलेले बाजीप्रभू, तानाजी, यांचे पोवाडे, शिवाजी महाराजांची आरती, वंदेमातरम् हा लेख, तसेच लंडनमध्ये असताना त्यांनी केलेले शिवाजी महाराज आणि गुरु गोविंदसिंह यांचे उत्सव, १८५७ मध्ये स्वधर्म आणि स्वराज्य हे प्रकरण, मॅझिनी-मधील धर्म आणि सत्ता यांचा घातलेला मेळ, तसेच प्रियकर हिंदुस्थान या कवितेत 'पितृभूमि तू पुण्यभूमि तू' हा केलेला उल्लेख वाचावा, म्हणजे त्यांना आणि दुसऱ्या वाचकांनाही सावरकर अंदमानात जाण्यापूर्वी हिंदुत्वनिष्ठ होते की नाही हे उमजेल. तसेच अंदमाननंतरही सावरकरांनी दि. १५-२-१९३० च्या श्रद्धानंद-मध्ये लिहिलेला 'जनतेचा प्यारा अशफाक' हा लेख अवश्य वाचावा. युसुफ मेहेरअली यांस सावरकर पतितपावन मंदिरात घेऊन गेले होते हेही लक्षात घ्यावे. काश्मीरमध्ये मुसलमानांनी दिलेल्या मानपत्राला सावरकरांनी दिलेले उत्तर वाचावे. सावरकर मुसलमानांना हिंदु करण्यास सिद्ध होते. मुसलमानांना ते म्हणत, याल तर तुमच्यासह. शिकंदर हयातखानची त्यांची दोनदा भेट झाली होती. सिंधच्या आणि बंगालच्या मुस्लिम मंत्रिमंडळात हिंदुसभेच्या नेत्यांनी मंत्रीपदे घ्यावीत असेही सावरकरांनी सांगितले होते. चांगल्या मुसलमानांशी सहकार्य करण्यास, त्यांना एक माणूस एक मत, गुणानुक्रमे काम देण्यास सावरकर सिद्ध होते. केमालपाशा या खिलाफत नष्ट करणाऱ्या सुधारक मुसलमानासंबंधी सावरकरांनी लिहिलेले विचार इस्लामप्रेमी प्रा. फडक्यांनी एकदा अवश्य वाचावेत.

तसेच फडक्यांनी लक्षात घ्यावे की सन १९३६ मध्येच सावरकरांनी त्यांच्यावर धर्मद्रोही म्हणून टीका करणाऱ्या सनातन्यांना सांगितले की हिंदुस्थानचे पाकिस्तान बनविण्याचे घाटत आहे तिकडे लक्ष द्या. (विज्ञाननिष्ठ निबंध: भाग २, पृष्ठ ७४. वीर सावरकर प्रकाशन आवृत्ती), १९४२ मध्ये त्यांनी सांगितले की

काँग्रेसच्या छोडो भारत चळवळीचा शेवट, छोडो भारतमध्ये होईल. १९४५/४६ च्या निवडणुकीत त्यांनी बजावले की काँग्रेसला मत म्हणजे फाळणीला मत. सावरकरांचे हे राजकीय तर्क आम्हालाही त्याचवेळी खरे होतील असे प्रामाणिकपणे वाटत नव्हते. कारण अन्य बहुतेक नेते पाकिस्तान हे दिवास्वप्न आहे असे सांगत होते. सावकरांनाही स्वत: ते खोटे ठरावेत असेच मनापासून वाटत होते. पण त्याचे ते आडाखे खरे ठरले. तरीही फडके म्हणतात सावरकर १९ व्या शतकात वावरत होते आणि त्यांनी मुसलमानावर विनाकारण हल्ले चढविले !

प्राध्यापक फडके यांनी दुसरी व्यवहारी गोष्ट लक्षात घ्यावी की रोग झाल्यावर त्यावर औषध घ्यायचे असते. मधुमेह झाल्यावर साखर सोडावी लागते, इन्सुलिन घ्यावे लागते. तसेच जोवर मुसलमान समाज हिंदूशी नीट वागत होता तोवर सावरकरांनी त्याच्याशी वैर धरले नाही. पण मोपल्यांचे बंड खिलाफतीच्या आंदोलनातील भाषणे, सिंध वेगळा करण्याचे प्रयत्न, हिंदूंना वाटविण्याच्या, एवढेच नव्हे तर अर्धे अस्पृश्य मुसलमान व्हावेत या त्यांच्या मागण्या, उर्दूचा त्यांचा हट्ट आणि फाळणीचे त्यांचे ठराव, त्यासाठी चालविलेले दंगे आणि ती मान्य करण्याची गांधीवृत्ती, आदि घटना जेव्हा सावरकरांनी पाहिल्या तेव्हा त्यांनी फाळणी मागणाऱ्या मुस्लीम लीगवर आणि मान्य करावयास निघालेल्या काँग्रेसी हिंदुनेतृत्वावरही प्रखर टीका चालू केली. एकट्या मुसलमानांवर नव्हे.

फडके लिहितात, ' सावरकरांनी आर्थिक शक्तीकडे दुर्लक्ष केले. त्यांचे विचार सदोष आहेत.'

वाचकांना माझी विनंती आहे की त्यांनी सावरकरानी यंत्रांसंबंधी रत्नागिरीत लिहिलेले दोन लेख, आणि १९३९ मध्ये कलकत्ता येथे केलेल्या अध्यक्षीय भाषणातील आमचा तातडीचा आर्थिक कार्यक्रम यासंबंधी दिलेली सूत्रे वाचावीत.

सावरकरांनी यंत्रांचे स्वागत केले आणि सांगितले की बेकारी वाढते हा यंत्राचा दोष नसून समाजरचनेचा दोष आहे. आर्थिक कार्यक्रमांच्या प्रारंभी त्यांनी सांगितले की सीमा नि सिंध प्रांतांतील लुटारू मुसलमान केवळ हिंदु धनिकांना लुटतात. मुसलमानांना लुटत नाहीत.

सावरकरांचे हे म्हणणे खरे ठरले की खोटे ?

त्यांनी सांगितले राष्ट्रहितासाठी दोन्ही वर्गांनी समन्वयाने काम करावे. (फडक्यांच्या विसाव्या शतकांतील शास्त्रज्ञांच्या मताप्रमाणे) तसे न केल्यास शासनाने अपराध्यांना ताळ्यावर आणावे. ' वर्गहिताचा राष्ट्रीय समन्वय ' हे तत्त्व सावरकरांनी सांगितले, आपलेच अर्थशास्त्र खरे, आपणाला त्यातील सर्व काही

कळते, असा दावा इतर पुस्तकी पंडितांप्रमाणे सावरकरांनी केलेला नाही. हा प्रश्न वेळोवेळी तज्ज्ञांनी सोडवावा असे सावरकरांनी सांगितले आहे. अमेरिकेपासून रशियापर्यंतची बहुतेक राज्ये आज त्यांच्या आर्थिक योजना अर्थतज्ज्ञांकडेच सोपवितात.

फडके यांनी त्यांच्या शेवटच्या छेदकात जे काही लिहिले आहे त्याला नीट उत्तर द्यायचे तर स्वतंत्र लेखच लिहावा लागेल, कारण त्यांतील बहुतेक वाक्ये विवादास्पद आहेत. ती अस्पष्ट कल्पनांची निदर्शक कशी आहेत हे नीट समजावे म्हणून काही वाक्यांचेच विवरण करतो.

फडके लिहितात, अंदमानातून परतल्यानंतरच्या काळांत ज्या हिंदुराष्ट्रवादाचा त्यांनी पुरस्कार केला त्यामुळे त्यांच्या विचारविश्वाला आपोआप मर्यादा पडल्या.

अंदमानातून सुटल्यावर सावरकरांचे हिंदुत्व हे पुस्तक प्रसिद्ध झाले. त्याच्या शेवटी ते लिहितात. 'हिंदू लोक सर्व जगाला जे गीतेने सांगितले, बुद्धाने सांगितले तेच करावयास सांगतील. ज्यावेळी हिंदू मनुष्य हिंदुत्वातीत होतो, त्यावेळेला तो शंकराचार्याप्रमाणे 'वाराणसी मेदिनी' म्हणून गावयास लागतो. आणि श्री. तुकाराम महाराजांप्रमाणे 'अमुचा स्वदेश भुवनत्रयामध्ये वास' असे गर्जून उठतो. काय विचारता माझा स्वदेश? 'ऐका तर बंधूनो, माझ्या देशाच्या मर्यादा म्हणजे त्रैलोक्याच्या मर्यादा. तीच माझ्या देशाची समसीमा.'

'अैक भविष्याला' या १९२८ मध्ये लिहिलेल्या कवितेतही सावरकर स्वप्न रंगवितात. 'कोटी कोटी हिंदु जाती चालती रणाला।' पुढे ते म्हणतात 'होऊनिया मुक्त स्वत: करील मुक्त ती जगता। समतेच्या ममतेच्या सुजन रक्षणाला। चाललो रणाला.'

त्याच काळात त्यांनी जो कुंडलिनी कृपाणांकित हिंदुध्वज निर्माण केला त्या ध्वजावरील कुंडलिनीचे वैशिष्ट्य सांगताना ते लिहितात, 'कुंडलिनी हे कोणा जातीचे वा वर्णाचे बोधचिन्ह नाही. प्रत्येक मानवी शरीरात ती असते. कोणालाही ती जागृत करून ब्रह्मानंदाचा अनुभव घेता येतो. मानवजातीच्या उच्च आकांक्षेची ती प्रतीक आहे.'

खंडित भारत स्वतंत्र झाल्यावर आपल्या घटना समितीने मान्य केलेला तिरंगी ध्वज सावरकरांनी आपल्या घरावर (काही अनुयायांचा विरोध असताही) फडकाविला.

एकदा सावरकरांनी सांगितले की जेव्हा पृथ्वीचे नि दुसऱ्या ग्रहाचे युद्ध होईल तेव्हा पृथ्वीवरील सर्व राज्ये एक होतील. आपल्या घटना समितीने विभक्त

मतदारसंघ बंद करून, सर्व समान अधिकार असणारी घटना मान्य केली तेव्हा सावरकरांनी तिचे स्वागत केले.

फडके लिहितात राष्ट्ररक्षणाच्या नावाखाली समाजामधल्या गोरगरीबांची दिशाभूल करणे मूठभर प्रस्थापितांना सोपे जाते. याही फडके – सिद्धांताचे थोडे विवेचन करू.

हिटलर, जीना, मुसोलिनी आदींचा विचार केला तर फडके यांचा सिद्धांत पुष्कळ अंशी खरा ठरतो. पण भारताचा विचार केला तर काय दिसते ? येथील गोरगरीब अथवा मध्यम वर्गीय पढित पंडित किती वेळा राष्ट्ररक्षणार्थ बहुसंख्येने उभे राहिले ? तसे राहिले असते तर परक्या मुसलमान इंग्रज साम्राज्यवाद्यांची राज्ये अनेक दशके टिकली असती का ? बहुसंख्य मानतावादी हिंदु म्हणत राहिले. ' ठेविले अनंते तैसेचि रहावे, चित्ती असू द्यावे समाधान !' राष्ट्ररक्षणार्थ वासुदेव बळवंत फडके उठले. चाफेकर बंधू, दादाभाई, कामाबाई, मदनलाल धिंग्रा, अलताफ हुसेन, सुभाष बोस तसेच काही सहस्त्र सत्याग्रही राष्ट्र स्वतंत्र करण्यासाठी उठले. पण त्यापेक्षा कितीतरी अधिक भारतीय लोक ' अर्थस्य पुरुषो दासः ' म्हणत मुसलमानांची नि इंग्रजांची हाजी करीत चाकरी करीत राहिले. ज्याच्या त्याच्या बुद्धिनुसार कोणी चपरासी, कोणी सैनिक, कोणी शिक्षक व प्राध्यापक म्हणून इंग्रजाने नेमलेली क्रमिक पुस्तके शिकवित राहिले. परकीय प्रस्थापितांच्या शस्त्राच्या धाकाने आणि पैशाच्या लालचेने राष्ट्ररक्षणार्थ लढ-ण्यांचे पाय ओढीत राहिले. आजही तेच आहे. औरंगजेबाचा सरदार जयसिंह हजारोची सेना घेऊन शिवाजीला मारण्यासाठी महाराष्ट्रात उतरला तेव्हा त्याच्या समवेत आलेल्या इटालियन मनुचीने लिहिले आहे की त्याच्याकडे लोकांना लाच देऊन शिवाजी विरुद्ध उठविण्याचे काम होते. त्यात त्याला पुष्कळ यश मिळाले. शिवाजीचे काही निष्ठावंत तेवढे वळले नाहीत. (पहा ग्रँड रिबेन, लेखक किंकेड, पृष्ठ १०४–१०५) आज सी. आय. ए., के. जी. बी., पेट्रो डॉलर तेच करीत आहे. आणि येथील काळाबाजारवाल्यांचे दास असलेले राज्यकर्ते विद्वानांना आणि गुंडानाही विकत घेत आहेत. म्हणून सावरकरांचा हिंदुराष्ट्रवाद प्रस्थापित करणे आमच्यासारख्यांना कठीण जात आहे. फडके म्हणतात तसे सोपे जात नाही हा आमचा अनुभव आहे.

मुसलमान देशभक्त म्हणून फडके यांनी काही वहाबींची नावे घेतली आहेत. जे भारत बलिष्ट, स्वतंत्र करण्यासाठी लढले ते वहाबी असोत, मुसलमान असोत अथवा अल्ड्रेंडसारखे इंग्रज असोत, आम्हांला त्यांच्याविषयी आदरच आहे. पण फडके यांनी एप्रिल १९८५ चा डायजेस्ट वाचला तर त्यांना कळून येईल की

वहाबी, बहाई, अहमदिया आदींना खोमेनी वा झियाचे मौलवी मुसलमान मानीत नाहीत.

१९३७ मध्ये सावरकरांनी विचारले की या स्वातंत्र्यलढ्यात किती मुसलमान होते ? सावरकरांचा हा प्रश्न त्यावेळच्या संदर्भात आहे. तो संदर्भ असा. त्यावेळी मुसलमान त्यांच्या लोकसंख्येपेक्षा अधिक राखीव जागा त्यावेळच्या नगरपालिका, जिल्हापरिषदा, विधानसभा यांतून मागत होते. म्हणून सावरकर विचारीत, सत्तास्थानात तुम्हाला अधिक जागा हव्यात पण त्यासाठी लढा देताना मात्र अधिक वाटा मागत नाही. लढनेको तुम और खानेको हम या त्यांच्या वृत्तीला हे उत्तर होते. पाश्चिमात्य लेखकांच्या सामाजिकशास्त्र विषयक पुस्तकात गुंतलेल्या डॉक्टर फडके यांना हिंदुस्थानातील या राजकीय प्रश्नाचे बहुधा भान नसावे.

फडके विचारतात प्राणिसृष्टीतले नियम माणसाला लावायचे का ? माणसात जोपर्यंत रावण, कंस, दुःशासन, औरंगजेब निर्माण होत आहेत तोवर तशा माणसांना ते नियम लावलेच पाहिजेत. सावरकर हा भेद जाणत होते म्हणूनच ते राष्ट्रद्रोही हिंदू, मुसलमान आदींशी तसे वागा असे सांगत होते, तर उलट ज्यांना अस्पृश्य लेखले त्यांच्यापुढे आणि खऱ्या साधुसंतांपुढे नतमस्तक व्हा असे सांगत होते.

फडके सांगतात सावरकरांना केवळ हिंदुसमाजातच सुधारणा हवी होती. माझी डॉ. फडके आणि अन्य वाचकांना विनंती की त्यांनी सावरकरांचे मुसलमानी धर्मांतील पंथोपपंथ हे लेख तसेच खिलापतीसंबंधी लेख वाचावेत. म्हणजे त्यांना कळेल की सावरकरांना सर्व धर्मांतील अंधश्रद्धा नष्ट व्हायला हव्या होत्या.

डॉ. फडके लिहितात, स्वखुषीने हिंदुधर्म सोडून अन्य धर्मांचा स्वीकार करण्याचे स्वातंत्र्य हिंदूंना देण्यात ते (सावरकर) तयार नसत.'

डॉ. फडके आणि अन्य वाचकांना पुन्हा विनंती की या संबंधात त्यांनी सावरकरलिखित आंबेडकरांचे चिरंजीव पुन्हा हिंदुधर्मात येतील हा दि. ३-११-१९३५ चा लेख वाचावा. त्यात सावरकर लिहितात ' ५०-७५ वर्षांपूर्वी डॉ. आंबेडकर परधर्मात गेले असते तर त्यांची जितकी चिंता वाटावयास पाहिजे होती तितकी देखील आज वाटावयास नको. कारण आता शुद्धीचा दरवाजा सताड उघडा आहे.' (जात्युच्छेदक निबंध, वीर सावरकर प्रकाशन; पृष्ठ १३६). जन्मजात अस्पृश्यतेचा मृत्युलेख या १९५० मध्ये लिहिलेल्या लेखात सावरकर लिहितात ' ह्या उपरही ज्या मूठभर वा मोटभर मंडळीना धर्मांतर येनकेन प्रकारेण करायचेच असेल त्यांनी ते सुखेनैव करावे. आम्हास आता त्याची क्षिती वाटण्याचे कारण नाही.' (वरील पुस्तक, पृष्ठ २०५)

सावरकरांची स्त्रियांसंबंधीची जी मते डॉ. फडके यांनी लिहिली आहेत ती अगदी घाईत आणि अर्धवटपणाने मांडली आहेत. स्त्रियांनी आपली संतती सुदृढ, सुसंस्कृत, स्वदेशाभिमानी होईल याकडे लक्ष द्यावे हे सावरकरांचे म्हणणे होते. पण यासाठी स्त्रियांनी स्वतःला घरातच कोंडून घ्यावे असे सावरकरांनी सांगितले नाही. स्त्री-पुरुषांत संपूर्ण साम्य आहे, समानता आहे असे कोणी कितीही ओरडून सांगितले तरी ते निसर्गाच्या नियमाने पहाता कधीच खरे ठरणार नाही. ती नैसर्गिक विषमता सोडता इतर विषयांत सावरकरांनी रंगविलेल्या स्त्रिया पहा. त्यांच्या तिन्ही नाटकातील नायिका 'सबला' आहेत. पराक्रमी आहेत. झाशीची राणी, कामाबाई, येसूवहिनी, यांच्याविषयी सावरकर आदरानेच बोललेले आहेत. संततीनियमनाचे संबंधात ज्यांना खरोखर सावरकरांचे विचार समजावून घ्यायचे असतील त्यांनी त्यांचे 'ललनांच्या लावण्याचे हानी लाभ,' रशियातील घटस्फोट स्वातंत्र्य आणि चीनच्या सौ. चांग कै शेक, सौ. मुसोलिनी आणि ॲबिसिनियाच्या सम्राज्ञी हे लेख पहावेत. (प्राचीन-अर्वाचीन स्त्रिया, वीर सावरकर प्रकाशन) हे लेख वाचा आणि मग फडक्यांच्या निष्कर्षात किती सत्य आहे ते स्वतःच ठरवा.

फडके लिहितात की राष्ट्रवादामुळे जागतिक शांतता धोक्यात आली आहे. फडके यांचे हे मत थोडे कसावर घातले तर आज असे दिसते की आजची जगाची विभागणी सर्वसाधारणपणे राष्ट्राराष्ट्रांत झालेली आहे तशीच ती राज्याराज्यांत झालेली आहे. पण जगातील जे दोन मुख्य प्रबल गट एकमेकासमोर क्षेपणास्त्रे उभारून तारेयुद्धाच्या गोष्टी करीत आहेत ते आर्थिक व्यवस्थेच्या विचारावर आधारलेले आहेत; राष्ट्रवादावर नव्हे. श्रमिकवादी रशिया गट विरुद्ध धनिक धार्जिणा अमेरिका गट. अनेक राज्यांतील विशेषतः ज्या राज्यात एकसंध समाज आहे त्या पेशातील पक्षोपक्षही मुख्यतः यावर आधारित आहेत. सावरकरांना याची जाणीव पूर्णपणे होती. म्हणूनच अमेरिकेने पाकिस्तानला शस्त्रास्त्रांचा पुरवठा करून भारताविरुद्ध बलिष्ठ करण्याचा प्रयत्न चालू केला तेव्हा सावरकरांनी भारताने रशियाशी केलेल्या मैत्रीचे स्वागत केले !!

फडके ज्यासाठी तळमळत आहेत त्या जागतिक शांततेसाठी नेहरूंनी चीनशी पंचशीलचा करार केला. तेव्हा सावरकरांनी सांगितले की माओ हा तिबेटचा उंदीर पचवून आता ह्या गोष्टी करीत आहे. तेव्हा केवळ करारावर विसंबून न राहता त्याने आक्रमण केल्यास प्रतिकारार्थ सज्ज रहा. शेवटी १९६२ मध्ये काय झाले ? युद्ध टळावे म्हणून भारताने फडके यांना प्रिय असलेल्या २० व्या शतकातील तसेच बुद्ध, ख्रिस्त, गांधी तत्त्वाला धरून फाळणी मान्य केली तरीही ६५ नि ७१ मध्ये त्यांनी युद्ध लादलेच ना ?

फडके यांना अभिप्रेत असलेली विसाव्या शतकातील समाजशास्त्रीय विचारांची पुस्तके वाचून जर क्षेपणास्त्रे थंड होण्याची शाश्वती असती तर सावरकरानीही ती पुस्तके स्वत: छापून 'ॐ शांति: शांति: ' हा मंत्र म्हणत वाटली असती. अलिप्त राष्ट्रांची अध्यक्षा शेवटी परकीय देशातील दुष्ट प्रवृत्तीने केलेल्या कटाचीच भक्ष्य ठरली ना ?

काही ग्रह करून घेतलेल्या य. दि. फडके यांना माझा वरील प्रश्न समजेल असे वाटत नाही ! चालायचेच ज्याला उत्तम गाता येते त्याला चांगला अभिनय अथवा गणित येतेच असे नाही. पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना. अष्टपैलू असणारे फारच थोडे. सर्व सावरकर साहित्य वाचूनही ज्या फडके यांना सावरकरांचे खरे अंतरंग नीट कळले नाही, त्यांचे मत माझ्या ह्या उत्तराने पालटेल अशी माझी अपेक्षा नाही. पण हे पुस्तक वाचणारे जे कोणी वाचक असतील त्यांना ही दुसरी बाजू कळावी म्हणून हा प्रपंच मी मतम मंडळाच्या अनुमतीने केला.

□

संपादकाचे प्रत्युत्तर

स्वातंत्र्यवीर सावरकरांचे आडनांवबंधू, भूतपूर्व निजी सचिव आणि लेखनाधिकारी श्री. बाळाराव सावरकर यानी माझी प्रस्तावना काळजीपूर्वक वाचण्याची तसदी घेतली असती तर प्रस्तावनेत मी जी विधाने केली नाहीत ती केली असल्याची सोयिस्कर समजून करुन घेऊन त्यांनी जे 'पांढऱ्यावर काळे' केले तसे केले नसते.

१) 'सावरकरांनी केवळ मुसलमानांवर हल्ला चढविला. इतर धर्मीयांविरुद्ध ते बोलले नाहीत' हे बाळारावांनी माझ्या नांवे दडपून लिहिलेले विधान मी कोठेही केलेले नाही. हिंदूप्रमाणे मुसलमान, ख्रिती, यहुदी, बौद्ध, जैन, वगैरे धर्मांच्या लोकांचा भाबडेपणा, धर्मभोळेपणा यावर स्वातंत्र्यवीर सावरकरांनी झोड उठवली हे त्यांचे पुस्तकरूपातील उपलब्ध वाङ्मय मी एकदा नव्हे तर तीनचार वेळा काळजीपूर्वक वाचले असल्याने मला माहीत आहे. त्यांच्या या विचाराचा नमुना म्हणून बौद्धधर्मातही भाकडकथा, भाबडेपणा वगैरेचा कसा बुजबुजाट झाला आहे हे दाखवणारा स्वातंत्र्यवीर सावरकरांचा एक लेख मी या पुस्तकात समाविष्ट केलेला आहे.

२) सावरकरांनी यंत्रासंबंधी लिहिलेले दोन निबंध या पुस्तकात मी समाविष्ट केलेले आहेत, तसेच हिंदुमहासभेच्या १९३९ च्या कलकत्ता अधिवेशनातील अध्यक्षीय भाषणांत सावरकरांनी दिलेला आर्थिक कार्यक्रमही मी प्रस्तावनेत (पृ. १५, १६,) नमूद केलेला आहे. या वस्तुस्थितीकडे डोळेझाक करून मी जणु काही या भागाकडे दुर्लक्ष केले आहे असे भासवून वाचकांनी तो भाग वाचावा अशी बाळारावांनी खास शिफारस करण्याचे कारण नव्हते. तरीही त्यांनी तसे केले यावरून त्यांनी माझी प्रस्तावना नीट वाचली नाही, एवढेच नव्हे तर मराठी तत्त्वज्ञान-महाकोश मंडळाने मी निवडलेल्या उताऱ्यांची यादी त्यांची अनुमती घेण्यासाठी पाठविलेली असताना ती ही धड वाचलेली नाही हे उघड दिसते.

३) 'संन्यस्त खड्ग' नाटकातील बुद्ध व त्याचा शिष्य सेनापती विक्रमसिंह (बाळाराव सावरकरांनी त्याचे 'विक्रमादित्य' असे नामांतर केले आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी मृत्युपत्रानुसार त्यांना लेखनाधिकार (Copy right) दिला हे सर्वश्रुत आहे. तात्यारावांनी आपल्या नाटकातील पात्रांची नावे बदलण्याचा अधिकारही बाळारावांना दिला नसावा अशी माझी समजूत आहे) या

दोषामधील संवादाचा हवाला देऊन बाळाराव म्हणतात, 'प्रा. फडके यांच्याप्रमाणेच भगवान बुद्ध सांगतो की आपण मरावे'; बाळारावांनी हे धादांत खोटे विधान केले आहे. 'आपण मरावे' असे मी कोठेही लिहिलेले नाही. गौतम बुद्धाने तसे म्हटले असे खुद्द स्वातंत्र्यवीर सावरकरांनीही लिहिलेले नाही. 'संन्यस्त खड्ग नाटकाची एखादी अप्रकाशित वेगळी प्रत बाळारावांच्या संग्रहात असेल तर त्यांनी ती प्रसिद्ध करावी. मी समग्र सावरकर वाङ्मयाच्या सातव्या खंडात 'संन्यस्त खड्ग' नाटक वाचले; त्यांत पृ. ५९७ वर बुद्धाच्या तोंडी स्वातंत्र्यवीर सावरकरांनी खालील वाक्ये घातली आहेत. 'आम्ही यापुढे असे अनुशासन देतो की न्याय्य युद्धात आततायी शत्रूंशी लढण्यासाठी शस्त्रधारण करण्यास माझ्या गृहस्थाश्रमीय अनुयायांस माझी अनुज्ञा आहे. एतदर्थ शाक्य राष्ट्राने ह्या असुधारणीय विद्युद्गर्भाच्या या अत्याचारी आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी शस्त्रधारण अवश्यमेव करावे. त्या हिंसेचे पाप त्या सदाचारी प्रतिकाऱ्यांवर नसून त्या अत्याचारी अनुयायांवर आहे. हे राजदूता, जा, आणि ही माझी अनुज्ञा शाक्यांस कळव. या धर्मयुद्धात तुमच्या असिलतेला माझे आशीर्वाद साहाय्यक होवोत.' बाळाराव समजतात त्याप्रमाणे आपण मरावे असे स्वातंत्र्यवीर सावरकरांचा बुद्ध शाक्यांना सांगत नव्हता हे वरील उताऱ्यावरून कोणाच्याही लक्षात येईल. संन्यास घेतलेल्या भिक्षु विक्रमसिंहाने खड्ग उचलून आपली वस्त्रे रक्तात भिजवून घेणे हे कृत्य त्याने आधी राजीखुषीने स्वीकारलेल्या संन्यासधर्माशी विसंगत आहे असे बुद्धाचे म्हणणे होते.

बाळारावांनी समग्र सावरकर वाङ्मयही काळजीपूर्वक वाचलेले दिसत नाही. अशा परिस्थितीत माझी प्रस्तावना आणि मी निवडलेल्या उताऱ्यांची यादीही त्यांनी नीट वाचली नाही याचे मला नवल वाटत नाही. बाळारावांनी माझ्या प्रस्तावनेची दुसरी बाजू दाखवताना कशी दडपेगिरी केली आहे त्याची वर वानगीदाखल काही उदाहरणे दिली आहेत. त्यांच्या गैरलागू विधानांचा व भुसभुशीत युक्तिवादाचा समाचार घ्यायचा तर विस्तृत प्रत्युत्तर लिहावे लागेल, पण तसे करून या पुस्तकाच्या परिशिष्टातील जागा अधिक अडवण्याची माझी इच्छा नाही. कारण बाळारावांचे विचार किंवा मी त्यांचे केलेले खंडण मुळीच महत्त्वाचे नसून हजारो पृष्ठांच्या सावरकर वाङ्मयात विखुरलेल्या स्वातंत्र्यवीरांच्या तत्त्वचिंतनाचा वाचकाला परिचय करून द्यावा हे या पुस्तकाचे मुख्य उद्दिष्ट आहे. शिवालयात शिरताना नंदीला आधी वंदन करण्याचा शिरस्ता असला तरी अखेर नंदीला महत्त्व तो शिवभक्त असल्याने, आणि काहीही झाले तरी नंदीपेक्षा शिवशंकराचे दर्शन महत्त्वाचे याचे भान ठेवलेले बरे!

य. दि. फडके

सावरकर संग्रहालय दादर
3963
निबंध 2515
27/9/18
शाखा (स्थळ प्रत)

शुद्धिपत्र

पृष्ठ क्रमांक	ओळ	अशुद्ध	शुद्ध
प्रस्तावना ४	वरुन ५	फ्रान्सिल	फ्रान्सिस
,, ५	,, ८	राष्ट्राराष्ट्राचा साऱ्या	राष्ट्राराष्ट्रांच्या साऱ्या
,, ६	,, ३	ठिकाण	टिकाव
,, ७	,, १	चित्छुक्तीला	चिच्छक्तीला
,, ८	,, ३	उघडगारा	उठणारा
,, १०	,, ७	–साची (राक्षसाची)	–सीची (राक्षसीची)
,, १४	,, ६	ओबदुल्ला	ओबेदुल्ला
,, १६	वरुन २१	असे सांगत	असे ते सांगत
,, १९	,, ८	घटनामुळे	घटकांमुळे
संदर्भ टीपा २०	,, २	पृष्ठ ११४–१२५	पृष्ठ ११४–११५
विभाग पहिला			
,, २३	खालून ५	स्वतंत्र्यप्राप्ती नंतर	स्वातंत्र्यप्राप्तीनंतर
,, २६	,, २	परस्थितीत	परिस्थितीत
,, २७	वरुन १७	स्वतंत्र्य	स्वातंत्र्य
,, ३०	,, २३	प्रचंड राक्षस एखाद्या घुंगरुटास आपल्या अंगावर चालू देतो, पहातो ती गंमत आणि ते त्या घुंगरुटाचे (असे वाचावे)	
,, ३३	,, १	पृष्ठ ३०४–३७५	पृष्ठ ३७४–३७५
,, ३६	,, ५	नैषकर्माच्या	नैष्कर्म्याच्या
,, ३६	,, १०	स्वतंत्र्यादिक	स्वातंत्र्यादिक
,, ३८	,, ८	रंजनाई	रंजनार्ह
,, ४१	३ ऱ्या परिच्छेदानंतर (समग्र सावरकर वाङमय : खंड ८ : पृष्ठे ४३१–४८७) असे वाचावे.		
,, ४८	संस्कृत श्लोक	अंतारिक्तो बहीरिक्तो	अंता रिक्तो बही रिक्तो
	शेवटचा संस्कृत श्लोक	कर्तव्य	कर्तव्यं
	शेवटच्या संस्कृत श्लोकानंतर (समग्र सावरकर वाङमय : खंड ८ पृष्ठ ५२३ व पृष्ठ ५२९) असे वाचावे.		

पृष्ठ क्रमांक	ओळ	अशुद्ध	शुद्ध
विभाग दुसरा			
,, ६५	९ व्या ओळीनंतर (स्फुट लेख : पृष्ठ २१६–२२२) असे वाचावे.		
,, ७०	(संस्कृत श्लोक आततायी वधे...कश्वन नाततायीवधे...कश्चन		
	३		
	४	प्रकाशं वा प्रकाशं मन्युतन्मन्युमर्हंती	प्रकाशं वाप्रकाशं मन्युस्तन्मन्युमृच्छंती
,, ७१	वरुन १	Volentce	Violence
,, ७१	तिसऱ्या परिच्छेदानंतर (गांधी गोंधळ.....सावरकर. समग्र सावरकर वाङ्मय : खंड ३ : पृष्ठे १२६–१३२) असे वाचावे.		
,, ७६	शेवटची	(हिंदुत्वाचे पंचप्राण.....मदुरा. समग्र सावरकर वाङ्मय : खंड ३ : पृष्ठे ६०–६५) असे वाचावे.	
विभाग तिसरा			
,, ८२	खालून ९	जीवौब्रह्मैवनापर	जीवो ब्रह्मैव, नापरः
,, ८६	पहिली	सोपरो साधते	सोऽपरो बाधते
,, ८६	१७ वी	(सावरकर साहित्य.....पृष्ठे ३२–४३. समग्र सावरकर वाङ्मय : खंड ३ : पृष्ठे ३०७–३१६) असे वाचावे.	
,, ८९	पहिल्या परिच्छेदानंतर (समग्र सावरकर वाङ्मय : खंड ४ : पृष्ठे २५५–२५८) असे वाचावे.		
,, ९३	पृष्ठ शीर्षक	विभाग चौथा / ९३	विभाग तिसरा / ९३
,, ९६	खालून ३	आरब	अरब
		आरबांच्या	अरबांच्या
	संस्कृत श्लोक	मतुन	यतुन
विभाग चवथा			
,, १०५	शेवटी	पृष्ठे १ ते १३) च्या पुढे (समग्र सावरकर वाङ्मय : खंड ३ : पृष्ठे १ ते ११) असे वाचावे.	
विभाग पाचवा			
,, ११९	शेवटी	(समग्र सावरकर वाङ्मय–निबंध : खंड ३ : पृष्ठे ६४१–६४४) असे वाचावे.	
,, १२३	शीर्षक	बौद्ध धर्माचे स्वरुप	बौद्ध धर्माचे स्वरूप

पृष्ठ क्रमांक	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१२४/१३०	शेवटची	समग्र सावरकर वाङ्मय-निबंध	समग्र सावरकर वाङ्मय निबंध-खंड ३
,, १३८	पहिला परिच्छेद १ ली ओळ	जिलाब्या	जिलब्या
विभाग सहावा			
,, १४७	पहिली	अधील	मधील
,, १४८	वरून १७	Monarihial	Monarchical
,, १४८	,, १८	Anarchlal	Anarchical
,, १४९	शेवटची	लंडनचे दरवाजे ठोठावतील...च्या पुढे (समग्र सावरकर वाङ्मय : खंड ८ : पृष्ठे ४२१-४२५) ही टीप वाचावी.	
,, १६५	शीर्षक	यंत्राने बेकारी वाढते	यंत्राने का बेकारी वाढते ?
,, १७५	शेवटची	(यंत्राने बेकारी का वाढते ?)	(यंत्राने का बेकारी वाढते ?)
विभाग आठवा			
	वरून १८	मुस्कटदाबीही	मुस्कटदाबीही
,, १८०	,, १८	सत्य	सत्ये
,, १८३	खालून ५	लेखणा	लेखणी
,, १८७	वरून २	सप्तर्षांह्या	सप्तर्षी ह्या
,, १८९	,, १	छोडो	सोडो
,, १८९	,, ५	सावकरांनाही	सावरकरांनाही
,, १९१	,, ८	पठीत	पढीक
,, १९१	खालून १०	रिबेन	रिबेल

REFBK-0025185